


म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ७६००

REFBK-0013473

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३५६९० वि: काव्य....
क्रमांक ....९६.०.८........ नों: दि: 7/12/64

होनाजी बाळाकृत

# लावण्या

REFBK-0013473

REFBK-0013473

संपादक व संग्राहक

कै. शंकर तुकाराम शाळिग्राम

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

दा. क्र. 93403

आवृत्ति चौथी

१९६३

चित्रशाळा प्रेस प्रकाशन, पुणें २.

किंमत पांच रुपये

तिसरी आवृत्ति १९२४

चौथी आवृत्ति १९६३

• • • •

सर्व हक्क स्वाधीन

मुद्रक व प्रकाशक:

दामोदर त्र्यंबक जोशी, बी. ए. ( टिळक ), व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,

५६२ सदाशिव पेठ, पुणें २.

# प्रस्तावना

## लेखक— य. न. केळकर

मनुष्यदेह आणि त्याची कीर्ति यांच्या सौंदर्यात एक मोठाच फरक आहे. मनुष्य-देहाचें सौंदर्य त्याच्या तारुण्यांतच तेवढें असतें. आणि त्यांतहि पुन्हां तें 'नूतन वयां'तील तारुण्य असतें, तेव्हांच त्या सौंदर्याची पराकाष्ठा झालीशी समजण्यांत येते. निदान लावणी-वाङ्मयाच्या रसिकांना ही गोष्ट तेव्हांच पटेल! याच्या उलट, कीर्ति ही मात्र जितकी अधिक म्हातारी म्हणजे वयस्क, तितकी ती अधिक सौंदर्यसंपन्न ठरते. आद्य कवि वाल्मीकि किंवा कालिदास यांची कीर्ति आज हजारों वर्षें त्यांच्यामागें कायम टिकून राहिली आहे आणि अजूनहि त्यांच्या काव्यसौंदर्याच्या विविध अंगांचा रसिक लोक आपआपल्यापरी उपभोग घेऊन लोकांनाहि त्यांची मौज लुटवीत आहेत. कालिदास किंवा वाल्मीकि हे 'पाठ' व 'प्रासादिक' कवि, म्हणजे 'पंत' किंवा 'संत' वर्गांतील. पण त्यांच्या मानानें शिक्षणसंस्कारांची ओळखहि नसलेले असे 'धीट' वर्गांत मोडणारे बहुजनसमाजाचे प्रतिनिधि जे शाहीर कवि त्यांचेंहि कीर्तिसौंदर्य वरील कवींच्याप्रमाणेंच वृद्धिंगत होत चाललें आहे.

अर्थात् तो त्यांच्या काव्यांतील जिवंत व जातिवंत प्रतिभेचाच परिणाम होय. प्रस्तुत मराठी शाहीरपंचकांतील प्रमुख जो होनाजी बाळा तो दीडशें पावणे दोनशें वर्षांपूर्वी पेशवाईत होऊन गेलेला कवि; तो अवघा चाळीस पन्नास वर्षेंच जगला. परंतु त्याची कीर्ति अद्यापवर टिकली व आतां तर ती दिवसेंदिवस अधिकाधिक वाढीसच लागत आहे. ज्या होनाजीला आजच्या शाळेंतल्या पोराइतकेंहि लिहिण्यावाचण्याचें शिक्षण मिळालेलें नव्हतें, त्या होनाजीच्या भूपाळीला गोविंदाग्रजासारखा कवि-कोहिनूर डोक्यावर घेऊन नाचूं लागला; व त्यानें होनाजीच्या भूपाळीच्या बरहुकूम 'महाराष्ट्र भूपाळी' लिहून त्यांत

"तुला जागवी ऐन पहाटें गवळी गोपाळ।
धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ ॥"

असा त्याचा गुणगौरव करून त्यास मानाचा मुजरा केला. ' बी ' सारख्या कवीनेंहि आपल्या एका कवितेंत " चंदन ढाळिस जसा लपेटा-जहरी सर्पाचा "। हा होनाजीचा चरण जशाचा तसाच स्वीकृत करून होनाजीच्या प्रतिभेला करभार दिला. ही झाली चाळीस-पन्नास वर्षांपूर्वींची गोष्ट. पण त्यानंतर अलिकडे तर होनाजींची कीर्तिगंगा शतमुखांनीं विस्तारत चालली आहे. त्याच्या चरित्रावर नाटकें व सिनेमा होत आहेत. त्याचीं अप्रसिद्ध काव्यें आणि त्याच्या अज्ञात चरित्रांतील माहिती शोधण्यासाठीं संशोधकांत जागृति निर्माण झाली आहे; व विद्यापीठांतील सर्वोच्च जी एम्. ए.ची परीक्षा तिच्यासाठीं होनाजीचीं काव्यें नेमण्यांत येत आहेत !

होनाजीचीं काव्यें संपादन करून तीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याचा आद्य मान श्री. शंकर तुकाराम शाळिग्राम व चित्रशाळा प्रेस यांचाच. तो मान त्यांनीं अद्यापपर्यंत तसाच कायम टिकविला आहे. पन्नास पंचावन्न वर्षांपूर्वीं पाहिली आवृत्ति निघाली, आणि आतां १९६३ सालीं ही चौथी आवृत्ति चित्रशाळाच प्रसिद्ध करीत आहे. **ही आवृत्ति तांतडीनें तिसऱ्या आवृत्ति-बरहुकूम जशीच्या तशी प्रसिद्ध होत आहे** हींत होनाजीच्या वाटणाऱ्या अशा कांहीं लावण्या वगळल्या आहेत. बाकी सर्व मजकूर जशाचा तसाच छापला आहे. अगदीं त्यांतील पाठप्रमादासुद्धां ! **म्हणून तिसरी आवृत्तीच अधिकृत धरून सुचलेले कांहीं विचार प्रथम दाखल करतों. ही चर्चा अभ्यासकांना उपयुक्त ठरेल.**

१९२४ च्या तिसऱ्या आवृत्तींत होनाजी बाळाच्या नाहींत अशा दुसऱ्यांच्याहि कांहीं कांहीं लावण्या छापल्या आहेत ! उदाहरणार्थ—लावणी नंबर ८ ही शांत सिद्ध किंवा शांत लिंग याची किंवा धोंडी बापूची आहे.

लावणी नंबर ९ साताप्पाची किंवा बाळा बहिरूची आहे.

लावणी नंबर २३ ही जनार्दनाची आहे.

लावणी नंबर ८५ शेवटास कर्त्याचें नांव नाहीं. " कवि म्हणे हें बरवें घडलें " असा मोघम उल्लेख आहे.

लावणी नंबर ८७ धोंडी बापूची आहे.
लावणी नंबर ९१ ही गुणिराजाची आहे.
लावणी नंबर ९२ बाळा बहिरूची आहे.
लावणी नंबर ९५ प्रभाकराची.
लावणी नंबर १०१ मार्तंड कवीची आहे.
लावणी नंबर १०५ बाळा बहिरूची.
लावणी नंबर १०६ मार्तंडाची.
लावणी नंबर १०७ दामू विठूची.
लावणी नंबर १०८ मार्तंडाची.
लावणी नंबर १०९ धोंडी बापूची.
लावणी नंबर १११ बाळा बहिरूची.
लावणी नंबर ११२ मार्तंडाची.
लावणी नंबर ११३ धोंडी बापूची.
लावणी नंबर ११५ काशीरामाची.
लावणी नंबर ११६ बाळा बहिरू किंवा धोंडी सुभानाची.
लावणी नंबर १२३ मार्तंड किंवा दामू-नागूची.
लावणी नंबर १२५ कवीचें नांव नाहीं.
लावणी नंबर १२७ बाळा बहिरूची.
लावणी नंबर १२८ कवीचें नांव नाहीं.
लावणी नंबर १३० महादू विश्वनाथाची.
लावणी नंबर १३१ बाळा बहिरूची.
लावणी नंबर १३३ मार्तंड, दामू विठू यांची.
लावणी नंबर १३४ मोरूची.
लावणी नंबर १३६ रामचंद्राची.
लावणी नंबर १३७ बाळा बहिरूची किंवा धोंडिराजाची.

लावणी नंबर १४१ दामू नागूची.

लावणी नंबर १४२ कवीचें नांव नाहीं.

एकच लावणी दुबार छापण्याचाहि दोष आढळला. उदाहरणार्थ—६७ नंबरची "नाडबंद किति दिवस सख्या तूं" ही लावणी पुन्हां १३२ नंबरला तशीच छापली आहे. लावणी नंबर ६९ "नाजुक रुपडें बुंद मुखोटा" ही लावणी पुन्हां ९० नंबरला जशीच्या तशी छापली आहे.

पाठशुद्धीचा तर मागमूसहि नाहीं. शुद्धिपत्र द्यावयाचें तर पांच-पंचवीस पानें अडतील!

जुन्या लावण्यांचीं बाडें संशोधकांना सांपडतात, त्यांत अनेक कवींच्या लावण्या सरमिसळ, जशा उपलब्ध होत गेल्या, तशा एकाखालीं एक उतरलेल्या असतात. आणि संशोधक किंवा संपादक तज्ज्ञ किंवा चिकित्सक नसला म्हणजे मग तो कित्येक वेळां भलत्याच्या लावण्या भलत्याच्या नांवावर छापून टाकतो. कित्येक वेळां असेंहि घडतें कीं एखाद्या शाहिरी पंथाच्या किंवा फडाच्या म्हणून एकत्र संग्रह केलेल्या लावण्यांचें बाड असतें. परंतु त्यांत त्या फडाचा मुख्य वस्ताद जो असेल त्याच्या व त्याखेरीज त्याच फडांतील इतर कवींनींहि रचलेल्या लावण्या लिहून ठेवलेल्या असतात; व संपादक चिकित्सक नसला म्हणजे तो, त्या लावण्या त्या फडाच्या मुख्य वस्तादाच्या किंवा शाहिराच्या नांवावर घालतो.

अशा रीतीच्या चुकांचें एक उदाहरण म्हणजे गंगू हैबतीच्या फडाचें. गंगू हैबती हा त्या फडाचा वस्ताद. त्याची स्वतःची पुष्कळ कविता आहे, परंतु त्याच्या फडांतले दुसरे लोकहि कवि असत व तेहि कवनें किंवा लावण्या रचीत. त्यापैकींच प्रभाकर, महादू, गंगाधर वगैरे होत. या सर्वांचीं कवनें त्या गंगू हैबतीच्या फडातर्फे होणाऱ्या तमाशांत गायलीं जात. व त्या सर्वांचा एकत्र संग्रह फडाच्या उपयोगार्थ गाथेसारखा एकत्र लिहून ठेवला जाई. आणि त्यामुळेंच कालांतरानें त्या गाथा छापतांना संपादकाचा घोटाळा होऊन भलत्याच्या लावण्या भलत्याच्या नांवावर छापल्या जाण्याचा प्रमाद घडतो. आपण नाटक कंपन्यांचें उदाहरण घेऊं. कंपनी एकच असते परंतु तिचे नाटककार वेगवेगळे, पुष्कळ होतात. 'किर्लोस्कर' मंडळीचे जनक आण्णासाहेब

किर्लोस्कर स्वतः कवि व नाटककार होते व त्यांनीं स्वतःचे कंपनीकरितां शाकुंतल, रामराज्यवियोग हीं नाटकें लिहिलीं. पुढें आण्णासाहेब वारले. तरी त्यांची कंपनी त्याच नांवानें तशीच चालू राहिली. आणि तिच्याकरितां मग कोल्हटकर, खाडिलकर, इत्यादिकांनीं नाटकें लिहिलीं. 'शाकुंतल' किर्लोस्करांचें, 'प्रेमशोधन' कोल्हटकरांचें, आणि 'मानापमान' खाडिलकरांचें. पण लोक म्हणतांना त्या नाटकांना किर्लोस्करांचीं म्हणजे किर्लोस्कर कंपनीचींच नाटकें म्हणतात. तोच प्रकार कोण्या एखाद्या शाहिरी फडांतील विविध लावणीकार कवींच्या बाबत घडतो.

लावणीचा कर्ता किंवा कवि नक्की कोण हें समजण्यास आणखीहि बऱ्याच अडचणी असतात. अभंगांत ज्याप्रमाणें अखेरीस 'तुका म्हणे' किंवा 'नामा म्हणे' असे अभंगकर्त्याचें एकट्याचेंच नांव असे, तसा प्रकार लावण्यांचा असता तर कर्त्याबद्दल संशयच निर्माण न होता. तशा निःसंदिग्ध लावण्याहि कांहीं कांहीं आहेत. उदाहरणार्थ आम्हीं छापलेल्या 'अंधारांतील लावण्या' या संग्रहांतील होनाजीच्या लावण्यांतील बहुधा प्रत्येक लावणींत एकट्या होनाजीचेच कर्ता म्हणून नांव नमूद आहे. क्वचित् दुसऱ्या कोणा काशीरामाचा किंवा रामा अंदूचा नामनिर्देश केलेला असला तर तो ती लावणी तमाशांत गाणारा म्हणूनच आहे. पण अशा लावण्या थोड्या. बाकी बहुतेक सर्व लावण्यांच्या शेवटास कर्ता कवि, त्याचा फड, त्या फडाचा वस्ताद, त्या लावण्यांना चाली लावणारे गुणिजन किंवा गवई, आणि त्या लावण्या प्रत्यक्ष गाणारे किंवा हावभावासहित बतावणी करणारे नाचे पोरे आणि साथीचीं वाद्यें वाजविणारे या सर्वांचा निर्देश झालेला असतो; पण तो निःसंदिग्ध नसतो.

अलिकडील सिनेमाशोच्या प्रारंभीं दाखविल्या जाणाऱ्या त्या त्या शोच्या जाहिरातीच्या उदाहरणानें ही गोष्ट अधिक स्पष्ट होईल. त्या जाहिरातींत कथाकार कोण, संवाद कोणीं रचले, गाणीं कोणीं तयार केलीं, त्यांना चाली कोणीं लावल्या, ब्रेक कोणीं दिले, प्रमुख भूमिका कोणच्या नटांनीं केल्या आहेत, व चित्रपटाचें डायरेक्शन कोणीं केलें, फोटोग्रफी कोणाची, कॅमेरा-मन कोण, इत्यादि माहिती खातेवार अलग, अलग, सुस्पष्ट दाखविली जात

असते. यामुळें संशय किंवा गोंधळ राहात नाहीं. तमाशा म्हणजे तोहि एखाद्या नाटक कंपनीचा प्रयोग किंवा एखाद्या सिनेटोन कंपनीचें पिक्चरच. फरक इतकाच कीं तमाशांतील कामांच्या खाते-वांटणीची जाहिरात सिनेमा-शोप्रमाणें सुरवातीस न होतां ती प्रत्येक लावणीच्या अखेरच्या कडव्यांत केलेली असते ! मात्र ती बरीच मोंगळ असते, यामुळें पुष्कळ वेळां तो तपशील वाचूनहि लावणीचा कर्ता नक्की ठरविणें अवघड होऊन बसतें.

या दृष्टीनें या पुस्तकांत छापलेल्या लावण्यांची तपासणी केली असतां काय दिसतें तें पाहा—

लावणी नंबर १ ते ७ फक्त होनाजीचें नांव.

लावणी नंबर १०, ११, १२ १३, १४ फक्त होनाजीचेंच नांव.

लावणी नंबर १५ मध्यें होनाजी बाळा व रामा अंदु अशी दोघांचीं नांवें आलीं आहेत, परंतु कर्त्यांचा स्पष्ट खुलासा नाहीं.

लावणी नंबर १६ होनाजीचा व काशीरामाचा उल्लेख, तरी स्पष्टता नाहीं.

"म्हणे होनाजी बाळा" या शब्दावरून होनाजी कर्ता समजावयाचा.

लावणी नंबर १७ चा शेवट असा आहे—

"कविशांत गुणरतन राधिके । होनाजी बाळाचें वतन राधिके ।
आधिं करून मतीचें मथन ॥ राधिके ॥ कथिलें श्रीहरीचें कथन ॥
राधिके ॥ रामा अंदु करितो श्रवण अक्षरें वनसुधारस कवनें होतीं
उद्भवन वृत्ति निर्मिली ॥"

यांत होनाजी बाळाचें कुलदैवत शांतलिंग किंवा कविशांत असें सांगितलें आहे. "कथिलें श्रीहरिचें कथन" या शब्दावरून ते होनाजीनें कथिलें असें धरावयाचें. पुढें "रामा अंदू करितो श्रवण" याचा अर्थ रामा अंदू 'करावितो' श्रवण असा करावयाचा. म्हणजे ही लावणी गाणारा रामा अंदू असे धरावयाचे.

लावणी नंबर २९ शेवट असा—

"होनाजी बाळासी मती आगळी कविरायाची। धोंडी सदाशिव जोड" येथेंहि धोंडी सदाशिव लावणी गाणारा असेंच समजावयाचें आहे.

लावणी नंबर ४४ विठू अंदु लावणीचा गायक.

लावणी नंबर ५० पांडू लावणीचा गायक.

लावणी नंबर ६३ लावणी गायक भवानीबापू.

लावणी नंबर ६८ गायक बापू धोंडी किंवा धोंडी बापू.

लावणी नंबर ८० गायक काशिनाथ.

लावणी नंबर ८२ गायक काशी.

लावणी नंबर ९७ गायक भाऊ त्रिंबक.

लावणी नंबर ११४ "होनाजी बाळा गुणा आगळा कवीची जडणी। तयाचे जा चरण स्मरोनी। धोंडी सटवा म्हणे बापुजी बाजी हारीप वैऱ्याचे। बोलणें मंजुळ मैनाचें" ॥४॥

या शेवटावरून लावणी धोंडी सटवाची का होनाजी बाळाची याचा निश्चित निर्णय होत नाहीं. धोंडी सटवाचा गुरु किंवा वस्ताद होनाजी बाळा होता. त्याचें स्मरण धोंडी सटवानें केलें असेंच वाटतें. परंतु लावणीच्या शब्दरचनेवरून ती होनाजीचीच असावी असाहि संभ्रम पडतो.

लावणी नंबर ११५ लावणीच्या शेवटीं होनाजी बाळा म्हणे आणि काशिराम म्हणे असे दोन्ही उल्लेख आहेत. तेव्हां ही लावणी होनाजीची कीं काशीरामाची? त्याचप्रमाणें लावणी नंबर १२४ चा प्रकार आहे. तेथें होनाजी बाळा म्हणे व धोंडी बापू म्हणे असे दोघांचे उल्लेख आहेत.

## होनाजीचें चरित्र

होनाजी बाळ हा जातीनें नंदगवळी. आडनांव शिलारखाने. होनाजीला कवित्वाची देणगी पिढीजातच होती असें म्हणावें लागतें. कारण त्याचा आजा साताप्पा आणि चुलता बाळा हे दोघेहि मोठे नामांकित शाहीर म्हणून प्रख्यात होते. होनाजीचा आजा सातापा गवळी हा खुद्द श्रीमंत पेशवे सरकारचा खाजगींतला एक चाकर किंवा आश्रित होता. पेशवे रोजकीर्दींत सन १७३९ सालची एक नोंद त्यासंबंधीं नवीन सांपडली आहे ती

अशी—" अरबैन मया व अलफ छ १० रबिलाखर साताप्पा गवळी, चाकर सरकार हा वसमत प्रांते व मांदाड प्रांते म्हशी खरेदी घेऊन येईल त्यास दस्तक. (परवाना)" यावरून साताप्पा हा थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दीपासून पेशव्यांच्या पदरीं होता हें सिद्ध होतें. साताप्पा हा त्याहि आधींपासून पेशव्यांच्या चाकरींत कदाचित् असावा असा तर्क करण्यासहि जागा आहे. पेशव्यांचा गुरु ब्रह्मेंद्रस्वामी हा सन १६८९ नंतर कोंकणांत चिपळुणाजवळ प्रथम प्रगट झाला. त्या वेळीं पेढें येथें स्वामींनें कांहीं चमत्कार दाखविल्यामुळें तेथला बाळ गवळी त्याच्या भजनीं लागला; व त्यानेंच लोकांत स्वामींची प्रसिद्धि केली. त्याच वेळीं श्रीवर्धनकर देशमुख बाळाजी विश्वनाथ हा जंजिरेकर हबशातर्फे मीठबंदराचा हवालदार होता. त्यालाहि स्वामींचें दर्शन घेण्याची इच्छा झाली. पुढें त्यानें व वर सांगितलेल्या बाळ गवळ्यानें एकाच वेळीं स्वामींचा कांहीं चमत्कार अनुभाविला. त्यावरून तोहि त्याचा भक्त बनला; व तेथपासूनच त्याचा व बाळ गवळ्याचा घरोबा पडला. पुढें बाळाजी विश्वनाथाला पेशवाई मिळाल्यावर त्यानें इतर अनेक जुन्या परिचितांचा परामर्ष घेतला, तसाच बाळ गवळ्याचाहि घेतला व त्यास कांहीं वतन इनाम करून दिलें. हाच बाळ गवळी साताप्पाचा बाप असला पाहिजे. साताप्पाच्या थोरल्या मुलाचें नांवहि बाळा असें आजाचेंच ठेवण्यांत आलें. त्यावरूनहि वरील तर्कास बळकटी मिळते.

असो. बाळा गवळी गुरुभक्तिपरायण होता. तसाच त्याचा मुलगा साताप्पा हाहि पुढें वरदी सत्पुरुष म्हणून तमासगीर शाहिरांत विख्यात झाला. तो उत्तम कवि होता. त्याच्या लावण्या अगणित होत्या म्हणतात. दुर्दैवानें त्या उपलब्ध झालेल्या नाहींत. शाहिरी वाङ्मयाचे आद्य संशोधक कै. शालिग्राम यांनीं होनाजीच्या घरच्या लावण्यांचा संग्रह धुंडाळला. तो प्रचंड होता, असें त्यांनीं लिहून ठेवलें आहे. तो संग्रह तेव्हांच हस्तगत करून नीट तपासून संशोधून झाला नाहीं म्हणून साताप्पाच्या लावण्यांना महाराष्ट्र मुकला. तथापि शालिग्राम यांनीं होनाजीच्या म्हणून ज्या लावण्या छापल्या आहेत, त्यांतच नजरचुकीनें चार-दोन साताप्पाच्याहि छापल्या गेल्या आहेत. त्यावरून साताप्पाच्या कवित्वाचा मासला कळतो. शाहीर म्हणून साताप्पाचा

अस्कारा फारच असे. फडकऱ्यांत तर साताप्पा म्हणजे कोणी वरदी महापुरुष आहे व शंकराचा त्याला वरप्रसाद आहे, अशी दृढ समजूत होती. तो केव्हां वारला हें नक्की कळण्यास कांहीं साधन नाहीं. तो कोणत्या तरी श्रावणी सोमवारीं वारला एवढें मात्र निश्चित दिसतें. तो वारला तेव्हां पुण्यास संगमावर त्याची समाधि बांधण्यांत येऊन त्याच्या नांवानें एक शातालिंग स्थापन करण्यांत आलें. अजूनपर्यंतहि दर श्रावणी सोमवारीं पुण्यांतील तमासगीर तेथें जाऊन हजेरी देत असतात. त्या सर्व प्रकारास 'पाचवा' म्हणतात.

असो. सातापाच्या मृत्यूचा महिना व तिथि अशी मिळाली तरी सालाचा वांधा राहतोच. तथापि तो नक्की कोणत्या सालीं वारला हें जरी कळत नाहीं तरी तो नक्की कोणच्या सालापर्यंत जिवंत होता हें कळण्याचें मात्र एक साधन आम्हांस उपलब्ध झालें आहे.

पेशवे दप्तरांत संशोधन करतांना पुढील दोन नोंदी पेशव्यांच्या रोजकीर्दींत सांपडल्या.

१७६५–६६

सीत सितैन स्वारी पंत प्रा॥ हुताशनी खर्च माहे रमजान.

रु. ७२ छ ३० रोज मु॥ पुणें त्रि॥ बालाजी जनार्दन फडणीस.

१० छ १६ रोज इच्छा भवई याचा खेळ वाड्यांत केला.

५५ छ १९ रोज शाहीर वगैरे याचा खेळ वाड्यांत केला.

१० शाहीर.

५ सिदोजी राऊळ.

५ संताजी गौळी ( सातापा )

---

१०

३० नाचणार पोर होतें त्यास.

१७६८-६९

तिसा सितैन माहे जिल्हेज.

रु. २२ छ २० रोज वाड्यांत खेळ केला त्यास इनाम.

७ सिदू राऊल शाहीर.

५ संताप्पा गौळी शाहीर.

१० बाळा नाचणार.

२२

साताप्पाला तीन मुलगे होते. थोरला बाळा, दुसरा कुशाबा आणि तिसरा सयाजी. यांपैकीं बाळा म्हणजेच सुप्रसिद्ध "बाळा बहिरू" होय. प्रथम हा बापाचे तमाशांत नाचण्याचें काम करीत असे, हें मागच्या नोंदी वरून दिसतच आहे. पुढें तो स्वतःच कवनें रचूं लागला. बाळा बहिरू असें जोडनांव पडण्याचें कारण, बहिरू नांवाचा रंगारी, बाळाच्या बैठकींतला नेहमींचा जिगरदोस्त असे. बाळानें लावणी करावी व ती बहिरूनें म्हणावी किंवा बहिरूची लावणी बाळानें म्हणावी. अशा प्रकारामुळें, त्यांच्या तमाशाचें नांव 'बाळा बहिरूचा तमाशा' असेंच पडलें व तेंहि स्वतःस तसेंच जोड नांव लावूं लागले. बाळा बहिरूचा स्वतंत्र असा लावण्यांचा संग्रह प्रसिद्ध नाहीं. परंतु साताप्पाप्रमाणेंच बाळा बहिरूच्याहि कांहीं लावण्या होनाजीच्या नांवावर शालिग्रामांनीं छापल्या आहेत.

"आस्त्री प्रलयंगता तुझी ग बुध नाहीं कामाची ।
आम्हांस आलीं पत्रें धन्याचीं जलदी करण्याचीं"

ही सुप्रसिद्ध लावणी त्याचीच आहे. त्या लावणींत वर्णिलेल्या कर्नाटक-स्वारीच्या प्रसंगावरून आणि

"कर्नाटकच्या स्वारीस होतों श्रीमंतांबरोबर ।
रणसंग्रामीं झटुन केली अंगीं तलवार ।
झाडीमध्यें पिटुन घातला लुटून हैदर."

इत्यादि उल्लेखांवरून थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीपासून बाळा बहिरूचा

फड पुण्यांत गाजत असावा असें दिसतें. त्यानें केलेला पोवाडा असा मात्र एकच उपलब्ध आहे व तो नाना फडणविसावरील.

"खूप शर्तीनें राज्य राखिलें मनसोबीच्या तलवार।
भले बुद्धिचे सागर नाना ऐसें नाहीं होणार॥" हा होय.

सवाई माधवरावांचीहि जवळ जवळ सर्व कारकीर्द बाळा बहिरूनें पाहिली. 'इसन्नै तिसैनच्या' म्हणजे सन १७९१ च्या शिमगा खर्चांत पेशव्यांकडून बक्षिसें पावलेल्या सुमारें ३०–४० शाहीर तमासगिरांत बाळा बहिरूचें नांव असून त्यास दहा रुपये पोहोंचले आहेत. त्याच नोंदींत होनाजीसहि पंधरा रुपये मिळाले आहेत. पारसनीस म्युझियममधील सवाई माधवरावाच्या दिनचर्येच्या रुमालांत, इसन्नै तिसेन फाल्गुन वद्य १ ची म्हणजे २१–३–१७९१ ची एक नोंद आहे ती अशी— "सहा घटका दिवसापासून— चार घटकापर्यंत (श्रीमंत सवाई माधवराव) लावण्या म्हणवीत होते. १ सिंदे पोरगे. १ बाळा बहिरू गवळी."

येथेंच पेशवे दप्तरांत शाहिरांचें संशोधन करीत असतां आम्हांस उपलब्ध झालेल्या कांहीं महत्त्वाच्या नोंदी दाखल करतों. त्यांत बाळा बहिरू व होनाजी बाळा यांचे उल्लेख आहेतच, पण शिवाय त्यांना समकालीन असलेल्या दुसऱ्याहि अनेक प्रसिद्ध शाहिरांची त्यांत नोंद आहे. शाहिरी वाङ्मयाचें ऐतिहासिक दृष्टीनें संशोधन करणाऱ्या अभ्यासकांना त्या नितांत महत्त्वाच्या होत.

### १७८०

रु. ५९ सुरु समानीन छ ३० रबिलोवल सिमगा खर्च बाळू शाहीर गंगापूरकर.

### १७८६

रु. ६० सीत समानीन राजमंडळ स्वारी पंतप्रधान खर्च खेरीज मुशाहिरा सिमगा खर्च १५१ सन आर्बा समानीनांत पावले त्याप्रों रुपये (१७८३।८४)

१२ राणू शिंपी पेठ शुक्रवार शहर पुणें.

१२ सिदू राऊळ.

१२ राम्या गवंड्या.

१० संतू बिडकर.

२० गोविंदा भराडी.

१५ मानसिंग जोहरी.

२० दादू गोपाळ वगैरे वानवडीकर.

२० गोविंदा इंदुलकर वगैरे सोंगाडी.

१० गभ्र्या पुणेंकर.

२० भवानी बाबाजी चांबळीकर.

२० भिक्या जंगम अहिरेकर.

२० बापूजी शिंपी पेठ रविवार.

३५ सन खमस समानीनांत जाजती आले त्यास.

१७८४–८५

१५ रु. धोंडी शंकर.

१० रु. लहरी मुकुंदा.

१० रु. होन्या गवळी.

३५

१८६

१७८६–८७

सुरु सबा समानीन खर्च बा। मु। सिमगा खर्च पोता पैकीं माहे साबान रु। रु. १२ रामा गवंड्या, १५ भवानी बाबाजी, २० कलासूत्री, ८ आंबडापूरकर, ८ बीडकर, ८ कवठेकर, १० सिरालेकर, ५ वाकू लगडा, १२ राणू सिंपी, १० गोविंदा भराडी, १५ मानसिंग जोहरी, १२ सिदू राऊल, १० गोविंदा इंदुलकर, १० भिक्या जंगम, १० बापू शिंपी, १५ हरी

महादू, २० सुलताना कुंभार, १० महादू सुतार, १० पठणकर, २० होन्या गवळी, १० दादू गोपाळ, १० गिरी विश्वनाथ, १० पैठणकर, (सोनोरीकर).

## १७९१-९२

६२ राजमंडळ स्वारी पंत प्रधान सुरु इसन्ने तिसैन सिमगा खर्च.

१० गोविंदा भराडी
१० गिरी विश्वनाथ
१५ बाळा ब्राह्मण
१५ चाकणकर
१० कर्नाटकी
८ गोविंदा श्रीगोंदेकर
१२ राणोजी शिंपी
१५ मानासिंग जोहरी
१५ हरी माहादू
१२ सिदू राऊळ
१० गोविंदा इंदलकर
१० गर्भ्या
१० लहरी मुकुंदा
१० सुभाना राऊळ
१० गंगू पोट्या
१५ धोंडी सिंपी
१० गंगू भोरकर
८ मोघ्या
८ सदाशिव पेठकर
१० सेवगावकर
१० भवई
८ धावजी परीट
जाजती आले ते

१० बापू शिंपी
१५ भवानी बाबाजी
१० सिदू बेलसरकर
१० संतू वाणी
१२ महादू गुराखी
१० बाळा बहिरू
१५ राणू बाळ्या
८ तुळ्या सोंगाड्या
१५ होना गवळी
१० रामा गवंड्या
२० बाळ्या धोंड्या
१५ जागेसरी गोसावी
१० भोरकर
१० हरीसिंग
८ नारु बापू सिंपी
८ माणकू मैराल

### सलास तिस्सेन मधील काहीं नांवें

महादू सुतार
सटवा माळी
अंतोबा चक्रदेव

## सन १७९२ जून–जुलै

सलास तिसैन सिमगा खर्च खेरीज मुशाहिरा खर्च पोता. शिमगा खर्च माहे जिलकाद रु॥ २३३४ छ ३ रोज वाड्यांत खेल जाले त्यास बिदाई साल गु॥ सन इसन्ने तिसैनची यादी रु.

रु. १२ राणू शिंपी, १५ मानसिंग जोहरी, १५ हरी महादू, १२ सिदू राऊल, १० गोविंदा इंदलकर, १० बापू सोंगाड्या सिंपी.—१२ भवानी बाबाजी सोंगाड्या, १० सिदू बेलस्कर, १० संतु वाणी, १२ महादु गुराखी, १५ राज्या बाळ्या, ८ लिंग्या सोंगाड्या, १५ होन्या गवळी, १० रामा गवंड्या, १० लहरी मुकुंदा, १० सुभान्या राऊल, १५ धोंडी सिंपी, ८ मोघ्या सोंगाड्या, ८ सदाशिव पेठकर, ८ धावजी परीट, २० धोंड्या बाल्या, १० हरीसिंग, १० नान्या बाप्या, १० गोविंदा भराडी, ८ सटवा माळी, ८ भिक्या जंगम, ७ विठू भांबवडेकर, १० महादू सुतार, ७ छट्ट कुंभार, ७ मल्या दशा, १२ बज्या (बन्या) रंगारी. ३३४.

## अर्बा तिसैन

### सिमगा खर्च माहे मोहरम

रु. १९८ छ ६ रोज साल गुदस्ता वाड्यांत पोन्याचे खेल सिमग्या-बद्दल कराविले त्यास बिदाइ रु.

रु. ५ रामा गौडी, गोंधले बेलसरकर, हरी महादू सासवडकर, बाल्या रंगारी, धोंडी मेव्या (धोंडी मेहत्या असला पाहिजे) ६ धावजी परीट, १० मोघ्या, ५ फकिरा नि॥ देवकांते, ८ बाल्या गौली सासवडकर, ५ बाल्या साली, ५ महादू विभूत्या, ५ बहिरू न्हावी, ८ बाल्या तांबोळी, १० महादू तमाखूवाला, १० अंतोबा चक्रदेव, ६ मानसिंग जोहरी.

बाळा बहिरू सासवडास राहात असे व तेथेंच तो वारला.

बाळा बहेरुला ईश्वर म्हणे। मुशाफर फंदी भोगिला तिनें ॥चाल॥ गाई गुणी धोंडीराज छंद हिरा । हें कवन जडणी हिरा । उतरला हारी महादुचा तुरा ॥ चाल ॥ तुरा शिघ्र लाविला **सासवडवस्ती रहिवासी** ॥

सासवडास त्याची समाधिहि अद्याप दाखवितात. बाळा ऊर्फ बाळा बहिरूला कुशाबा व सयाजी असे दोघे भाऊ होते. त्यासंबंधीं विशेष कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. फक्त कुशाबा हाहि तमाशांत गात असे असें म्हणतात.

'झांगड झांगड नौबत झडे' हा खर्ड्यांच्या लढाईचा एक पोवाडा कोणा कुशाबा शाहिराचा आहे. तो व हा कुशाबा हे एकच असल्यास न कळे. कुशाबाचा खालचा भाऊ सयाजी हाच होनाजीचा बाप होय. त्याच्या-संबंधीं कांहींच माहिती कोणी देत नाहीं. त्यावरून तरुणपणीं लवकरच तो वारला असावा.

होनाजीचा जन्म कधीं झाला तें माहीत नाहीं. तथापि थोरल्या माधव-रावाच्या कारकीर्दीअखेर तो चांगला सज्ञान होऊन घरचा गवळ्याचा व बाहेरचा तमाशाचा धंदा करूं लागला असावा असें दिसतें./ सवाई माधव-रावाच्या कारकीर्दीपर्यंत तो चांगलाच नाणावला. त्यानें आपला स्वतंत्र तमाशा काढला. त्याचा बाळा करंजकर नांवाचा तमाशांतील साथीदार होता. होनाजीनें लावणी रचावी आणि बाळानें ती तमाशांत गावी असा नेहमींचा प्रकार असे. यामुळेंच होनाजीच्या तमाशाला 'होनाजी बाळाचा' तमाशा असें नांव रूढ झालें व पुढें होनाजीलाहि 'होनाजी बाळ'च म्हणण्याचा प्रघात पडला./ बाळा बहिरूचाहि तोच प्रकार होता हें पूर्वीं वर सांगितलेंच आहे. होनाजीला कवित्वाची देणगी घरचीच होती. शिवाय पुराणादिकांतील कथांचा आणि दाखल्यांचाहि त्याला भरपूर परिचय होता. यामुळें दुसऱ्यांनीं रचलेल्या लावण्या म्हणण्याची पाळी त्याच्यावर येण्याचा संभव नव्हता. तथापि अशीहि एक वृद्धमुखांतील माहिती आहे कीं, त्या वेळीं शनवारांत नदीच्या बाजूला धोंडोपंत लेले म्हणून ब्राह्मण होते. त्यांनींच होनाजीला देवादिकांच्या बऱ्याच लावण्या करून दिल्या. ही माहिती १८९४ सालीं प्रसिद्ध झालेल्या 'व्ही. एस्. चे मार्मिक ऐतिहासिक लेख' या पुस्तकांत सांगितली आहे. होनाजीच्या लावण्यांतले जे गण म्हणजे गणपतीच्या स्तुतीपर लावण्या आहेत त्यांतील संस्कृतप्राचुर्यावरून त्या लावण्या मात्र वरील लेल्यांच्या असण्याचा संभव वाटतो.

सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत होनाजीला राजाश्रय मिळाला. सवाई माधवरावाचा रंगाचा समारंभ आणि खर्ड्यांची लढाई या प्रसंगावरील

२....

पोवाडे त्याच्याकडून भर दरबारांत गाऊन घेण्यांत आले होते. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत होनाजीच्या भाग्याची परिसीमा झाली. स्वतः बाजीराव अत्यंत विषयासक्त, रंगेल आणि गाण्या-नाचण्याचा आणि तमाशांचा कमालीचा षोकी होता. यामुळें इतर सर्व दृष्टींनीं त्याची कारकीर्द जरी निंद्य व हानिकारक झाली तरी अस्सल मराठी लावणी व गायन-प्रकाराचा परमोत्कर्ष तेव्हांच झाला, हें मान्य करावें लागतें. नट-नर्तक, गायक–वादक, नाचे-तमासगीर आणि कसबिणी-कलावंतिणी यांच्या कर्तृत्वाला त्या कारकीर्दींत अगदीं खुलें मैदान झालें. होनाजी हा तर पेशव्यांचा प्यार शाहीर बनून गेला. तें कृतोपकार होनाजीनेंहि सव्याज फेडले. दुसऱ्या बाजीरावावर त्याचे बरेच पोवाडे व लावण्यांचें कवित्व आहे.

होनाजीवर बाजीरावाची खुष मर्जी होण्याचें कारण आणखी एक हें आहे कीं होनाजीनेंच प्रथम निरनिराळ्या रागदारीच्या चालीवर लावण्या रचून तमाशालाहि बैठकी गाण्याचें स्वरूप आणून दिलें.[1] कै. शाळिग्राम यांनीं होनाजी चरित्रांत असें म्हटलें आहे, "बाळा बहिरूच्या सर्व लावण्या बैठकीच्या म्हणजे शांत सुराच्या होत्या. तें वळण बाळा बहिरूस साताप्पा-पासून मिळालें होतें आणि तेंच पूर्वजांचें वळण होनाजीनेंहि तसेंच उचललें. फडावरील उंच स्वराच्या लावण्या होनाजी कधींच म्हणत नसे." बाजीराव साहेबांनीं एकदां इच्छा प्रदर्शित केली कीं, 'बैठकीच्या लावण्यांत रागदारीचे सूर प्रकट करतां येतील काय?' ती त्यांची इच्छा होनाजीनें परिपूर्ण केली.' या संबंधांत पूर्वोक्त 'व्ही. एस्.' यांनीं निराळीच हकीकत दिली आहे. ते म्हणतात, "दुसऱ्या बाजीरावींत एक-दोन घंटे नाचून झाल्यावर श्रीमंत आतां बसून म्हणा असें सांगत. मग कळवंतिणी ख्याल, टप्पा, ध्रुपद म्हणत. प्राकृताची त्यांना माहिती नव्हती. पण पुढें होनाजी बाळ या गवळीशिंप्याच्या तमासगीर जोडीनें प्राकृत प्रथम कळवंतिणीच्या गाण्यांत आणलें." आपल्या गायकी लावण्या घेऊन होनाजी बाळ तबल्यावर गाऊन तमाशा करूं लागला. पुढें व्यंकट नरसी नांवाची अत्यंत नामांकित नर्तकी पुण्यास होती. तिला तबल्यावर तमाशा सुरू झालेला पाहून राग आला. म्हणून तिनें एक दिवस बाजीरावास आपल्या गायनानें खूप करून त्याच्याकडून असा हुकूम घेतला

कीं, तमाशेवाल्यांनीं तबल्यावर गाऊं नये. यामुळें होनाजीचा हिरमोड झाला. मग त्यानें युक्ति केली, ती अशी— होनाजीची आहिली कामाठीण नांवाची एक अत्यंत गोड गळ्याची वारयोषिता शिष्या होती. तिच्याकडून मराठी रागदारी लावणी शिकण्याचें त्यानें कबूल करून घेतलें व तीं दोघेंजण सहा महिनेपर्यंत मुंबईस जाऊन राहिलीं. त्यानंतर पुण्यास आल्यावर आहिलीनें मराठी लावण्या बैठकींत म्हणण्यास सुरुवात करतांच लोक बेभान झाले. तेव्हांपासून सर्व नायकिणी बैठकींत मराठी लावण्या म्हणूं लागल्या. ''

होनाजी हा खराखुरा संगीतज्ञ आणि नवीन स्वररचना करणारा कल्पक पुरुष होता, यांत शंका नाहीं. त्याच्या गायकी लावण्या पेशवाईनंतर अनेक वर्षेपर्यंत रसिकांना मुग्ध करीत राहिल्या, हेंच त्याचें प्रत्यंतर. मराठीचे आद्य व्याकरणकार सुप्रसिद्ध दादोबा पांडुरंग यांनीं आपल्या आत्मचरित्रांत याबाबत लिहून ठेवलें आहे. तें येथें उल्लेखनीय होय. ते म्हणतात, "रामजोशी, सगनभाऊ, अनंत फंदी, होनाजी बाळा यांचीं कवनें मला आवडत असत. होनाजी हा शृंगारांत पुष्कळ ठिकाणीं घसरून जाई. सर्व शृंगाररस सुज्ञ ऐकणारास कंटाळा येईल इतके प्रकाशित करी. परंतु तो दांडग्या रुचीच्या लोकांचा रावबाजीच्या अखेरीच्या कारकीर्दींतला कवि. तथापि मला त्याची कोठें कोठें शब्दांची ठेवण फार सरस वाटते व लावण्यांचें नवे नवे छंद व घाटणी कानास फारच गोड लागतात. हे नवे नवे छंद व तऱ्हतऱ्हेच्या घाटण्या हे मराठी कवि कोठून व कसे काढीत असत याचें मला मोठें आश्चर्यच आहे व याविषयीं त्यांची सरस कल्पना रसिक जनांच्या स्तुतीस योग्य होय. जसे इटली व जर्मनी येथें होगार्थ आदिकरून अपूर्व गायनाचे कल्पक होऊन गेले, त्याच मासल्याची यांची स्तुत्य कल्पना होय. यांत होनाजी बाळा आदिकरून गरीब मराठी कवि यांजवरच मी आपला ठपका ठेवावा हें ठीक नाहीं; कारण यापेक्षांहि बीभत्स कवि संस्कृत भाषेंत पाहिजे तितके सापडतील. ''

बाजीराव कमालीचा विषयासक्त आणि गाण्या-बजावण्याचा वेडा, तशांत त्याला कारभारी मिळाला तोहि त्र्यंबकजी डेंगळ्यासारखा माणूस. त्र्यंबकजीनें बाजीरावाच्या चैनबाजीच्या षोकांत यत्किंचितहि कमतरता पडूं नये अशी

दक्षता घेतली. त्या त्र्यंबकजीची आणि होनाजीची बहुधा नेहमीं एक बैठकच असे.

१८१०–१८११

यादी खासगत राजश्री त्रिंबकजी– पाटील डेंगळे मु॥ पुणें सुरु इहिदेअशर मयातेन अलफ जमा सालमजकूर ता॥ गु॥ सरकार जामदारखान्याकडे.

( ३१–१२–१८१० )

माहे जिल्हेज पौष मास मिति शु॥ ६, १०० होनाजी गौळी यास दिल्हे.
माहे सफर फाल्गुन मास मिति शु॥ ८
४० चतरसिंग राजे यांस खर्चाकारितां मिति शु॥ १२ (६–३–१८११)
२००० रामचंद्र गोसावी याजकडे.

१८११

तालेबंद खासगी पोतें सरकार गु॥ त्रिंबकजी डेंगले सुरु अिसने अशर मयातैन व अलफ माहे जमादिलावर ऊर्फ आषाढ मास इ॥ छ २ रोज ता॥ छ ३० मिनहू स्वारी पंढरपूर शके १७३३ ( २४–६–१८११ )

सरकारचे मुदबखाबद्दल दिल्हे रु. ७४२ ( **पैकीं एक रकम रु. ४० होनाजी गौळी याचे नांवें आहे.** )

४० होनाप्पा गौळी यांजकडील दूध व लोणी सरकारचे मुदबखाकडे घेतलें. त्याचा हिशेब अदमासें ८० रु. खर्ची लि॥ पैकीं वसूल दिल्हे ४० रु. बाकी देणें तें जमा.

पेशव्यांकडून शिमग्यामध्यें पांच दिवस सरकार वाड्यापुढें म्हणजे शनवारवाड्यापुढें तमाशा करण्याबद्दल होनाजीला सालिना तीनशें रुपये मिळत असत. खेरीज अवांतर प्रसंगीं त्यास शेले, दुपट्टे व नख्त देणग्या किंवा बक्षिसें मिळत. त्या सर्वांचा संग्रह होनाजीनें त्रिंबकजी डेंगळ्याच्या वाड्यांतील आपल्या खोलींत केला होता. त्रिंबकजी डेंगळ्याचा हा वाडा शुक्रवारांत भोतकराच्या हवेलीसमोर मारुतीचें देवालय आहे त्याच्या शेजारीं होता. तेथें होनाजीची एक स्वतंत्र खोलीच होती. तेथें तो आपलें डफ, तंबोरी, मंजिरी इत्यादि तमाशाचीं वाद्यें व आपली मिळकत ठेवीत असे.

पुढें इंग्रज सरकारनें त्रिंबकजी डेंगळ्यास कैद करून सुतळीच्या तोड्यासुद्धां त्याची सर्व मिळकत जप्त केली, त्यांत होनाजीचेंहि सर्वस्व गेलें. पेशवाईनंतर कांहीं वर्षेपर्यंत होनाजी हयात होता. इतर शाहिरांप्रमाणें त्यालाहि पोटासाठीं दरसाल बडोदें पाहावें लागत होतें. बडोद्याच्या सयाजी महाराजांकडून त्याला दोनशें रुपयांचें वर्षासन होतें. होनाजीच्या मृत्यूनंतरहि ग्यानू पाड नारळवाला नांवाचा इसम तें घेत असे, अशी माहिती शालिग्राम यांनीं दिली आहे.

होनाजीचा शेवट मोठा वाईट झाला. कांहीं खाजगी अदावतीवरून त्यावर मारेकरी घालण्यांत आले. हा प्रकार भाद्रपद कृष्ण चतुर्दशीचे दिवशीं घडला. हां हां म्हणतां सर्वत्र बातमी पसरली व शहरांतील सर्व तमासगिरांनीं मोठ्या समारंभानें त्याच्या लावण्या म्हणत व भजन करीत त्याच्या शवाची मिरवणूक काढून मग प्रेतास अग्नि दिला. अद्यापपर्यंत दरसाल भाद्रपद कृष्ण चतुर्दशीचे दिवशीं पुणें शहरांतील सर्व तमाशे गवळीआळींत होनाजीच्या वाड्यापुढें हजेरी देत असतात. होनाजीचा नक्की मृत्युशक किंवा सन मात्र कळत नाहीं. होनाजीस कुशाबा आणि बाबाजी नांवाचे दोन मुलगे होते. त्यांनींहि कांहीं दिवस तमाशाचा धंदा चालविला. त्यांस इंग्रज सरकारकडून बुधवार वाड्यापुढें शिमग्यांत पांच दिवस तमाशा करण्याबद्दल सालिना शंभर रुपये मिळत असत.

लावण्या, पोवाडे मिळून होनाजीची कवनसंख्या अडीचशें, पावणे तीनशें इतकी भरेल. अर्थात् यांत आम्हीं संशोधिलेल्या अंधारांतील लावण्या या पुस्तकांत ज्या सर्वस्वीं अप्रसिद्ध अशा सत्तर बहात्तर लावण्या उपलब्ध करून दिल्या त्यांचाहि समावेश केला आहे. याहिखेरीज गायनांतलि ख्यालांच्या धर्तीवर रचलेल्या चार चार किंवा आठ आठ ओळींच्या लावण्या अद्याप अप्रसिद्ध अशा आमचे संग्रहीं आहेत. त्याचप्रमाणें दोन-चार पोवाडेहि आहेत.

कवित्वाबाबत आतां होनाजीचा कोणी निराळा गौरव करावा अशी स्थिति उरलेली नाहीं. त्याचे एक दोन विशेष प्रतीत होतात ते मात्र उल्लेखनीय वाटतात. पहिला विशेष हा कीं होनाजी हा कवि असल्यामुळें सहृदय तर होताच होता, परंतु त्याच्या सहृदयतेंत संतांची सात्त्विकता व कळवळा हीं इतर शाहिरांपेक्षां अधिक होतीं खास. संभोगादि प्रकारांच्या

बेभान प्रसंगींहि त्याच्या नायिकांचीं भाषणें व वर्णनें पाहिलीं असतां ही गोष्ट प्रत्ययास येईल. गतभर्तृकेची होनाजीची लावणी हा होनाजीच्या उदार-हृदयाचा एक जिवंत झराच होय. विधवेला पापी समजून तिचा आत्यंतिक छळ करण्यांत आपण धर्मच आचरीत आहोंत अशी दृढ समजूत समाजांत होती. अशा त्या जुन्या जमान्यांत दीडशें वर्षांपूर्वीं ही लावणी लिहिण्याची स्फूर्ति होनाजीला झाली यांतच संताला शोभण्याइतकी त्याची हार्दिक तळमळ सिद्ध होते. ज्ञानेश्वरींत संतांच्या सहृदयतेचें वर्णन करतांना पाण्याचा एक मार्मिक दृष्टान्त दिलेला आहे. पाणी नेहमीं उताराकडे वाहतें. तसें तें वाहत असतां वाटेंत एखादा खळगा असला तर तें पाणी प्रथम आपलें सर्वस्व वेंचून तो खळगा भरून काढतें व त्या खळग्यांतील पाण्याची व आपली सम पातळी झाली म्हणजे मगच तें पुढील मार्गक्रमण सुरू करतें. गतभर्तृकेसंबंधीची होनाजीची ही लावणी वाचतांना तोच प्रत्यय येतो.

निर्मत्सरपणा हाहि होनाजीचा आणखी एक विशेष आहे. "बोद्धारो मत्सरग्रस्ताः" हें तर प्रसिद्धच आहे व या शाहीर पंथीय कवींची मजल मनांतल्या मनांत मत्सर करण्यापर्यंतच न थांबता ते आपल्या प्रतिपक्षी-यांची यथेच्छ निंदा किंवा टवाळी अहमहमिकेनें करीत. या पार्श्वभूमीवर होनाजीनें अनंत फंदीवर रचलेली—"फंदी अनंत कवनाचा सागर" ही अति सहृदय व सुंदर लावणी पाहिली म्हणजे खरोखरच चमत्कार वाटतो.

असो. आधुनिक काळांतील कवींचें तुलनेसाठीं उदाहरण घेऊन बोलावयाचें म्हटल्यास प्रभाकराला गडकऱ्यांची व होनाजीला रे० टिळकांची उपमा बरोबर साजेल. प्रभाकरांत रचनेचा व वर्णनाचा झगझगाट दिपवतो, तर होनाजींत संथ वाहणाऱ्या नदीच्या प्रसन्न पात्राचें दर्शन घडतें. होनाजीच्याच शब्दांत सांगावयाचें तर प्रभाकराच्या कवित्वाचा थाट पाहून रसिक "चकचकाट लखलखाट जैसें दुकान जोहऱ्याचें" असा चकित होतो, तर होनाजीचें कवित्व वाचून त्याला "निर्मळ गंगेचें नीर मध्यम मंजुळ समीर" अनुभविल्याचा आनंद वाटतो.

❋ ❋ ❋

# होनाजी बाळाच्या लावण्या

या नव्या आवृत्तींत कांहीं लावण्या गाळल्याचा उल्लेख प्रस्तावनेंत आहे. त्या तशा गाळल्यामुळें नव्या आवृत्तींतील लावण्यांचा अनुक्रम अर्थातच बदलला आहे. यासाठीं जुन्या व नव्या आवृत्तींतील लावण्यांच्या अनुक्रमाचा तक्ता सोबत मुद्दाम जोडला आहे.

| आवृत्ति ३ री १९२४ लावणी नंबर | आवृत्ति १९६३ (नवी) लावणी नंबर | आवृत्ति ३ री १९२४ लावणी नंबर | आवृत्ति १९६३ (नवी) लावणी नंबर |
|---|---|---|---|
| १ | १ | २१ | १८ |
| २ | २ | २२ | १९ |
| ३ | ३ | २३ | १३७ |
| ४ | ४ | २४ | २० |
| ५ | ५ | २५ | २१ |
| ६ | ६ | २६ | २२ |
| ७ | ७ | २७ | २३ |
| ८ | १२७ | २८ | २४ |
| ९ | १२० | २९ | २५ |
| १० | ८ | ३० | २६ |
| ११ | ९ | ३१ | २७ |
| १२ | १० | ३२ | २८ |
| १३ | ११ | ३३ | २९ |
| १४ | १३५ | ३४ | ३० |
| १५ | १२ | ३५ | ३१ |
| १६ | १३ | ३६ | ३२ |
| १७ | १४ | ३७ | ३३ |
| १८ | १५ | ३८ | ३४ |
| १९ | १६ | ३९ | ३५ |
| २० | १७ | ४० | ३६ |

| आवृत्ति ३ री १९२४ लावणी नंबर | आवृत्ति १९६३ (नवी) लावणी नंबर | आवृत्ति ३ री १९२४ लावणी नंबर | आवृत्ति १९६३ (नवी) लावणी नंबर |
|---|---|---|---|
| ४१ | ३७ | ६७ | ६२ |
| ४२ | ३८ | ६८ | ६३ |
| ४३ | ३९ | ६९ | ६४ |
| ४४ | ४० | ७० | ६५ |
| ४५ | ४१ | ७१ | ६६ |
| ४६ | ४२ | ७२ | ६७ |
| ४७ | ४३ | ७३ | ६८ |
| ४८ | ४४ | ७४ | ६९ |
| ४९ | ४५ | ७५ | ७० |
| ५० | १३८ | ७६ | ७१ |
| ५१ | ४६ | ७७ | ७२ |
| ५२ | ४७ | ७८ | ७३ |
| ५३ | ४८ | ७९ | ७४ |
| ५४ | ४९ | ८० | ७५ |
| ५५ | ५० | ८१ | ७६ |
| ५६ | ५१ | ८२ | ७७ |
| ५७ | ५२ | ८३ | ७८ |
| ५८ | ५३ | ८४ | ७९ |
| ५९ | ५४ | ८५ | १०९ |
| ६० | ५५ | ८६ | ८० |
| ६१ | ५६ | ८७ | १२८ |
| ६२ | ५७ | ८८ | ८१ |
| ६३ | ५८ | ८९ | ८२ |
| ६४ | ५९ | ९० | ८३ |
| ६५ | ६० | ९१ | ११० |
| ६६ | ६१ | ९२ | १२१ |

| आवृत्ति ३ री १९२४ लावणी नंबर | आवृत्ति १९६३ (नवी) लावणी नंबर | आवृत्ति ३ री १९२४ लावणी नंबर | आवृत्ति १९६३ (नवी) लावणी नंबर |
|---|---|---|---|
| ९३ | ८४ | ११९ | ९७ |
| ९४ | ८५ | १२० | ९८ |
| ९५ | १३६ | १२१ | ९९ |
| ९६ | ८६ | १२२ | १०० |
| ९७ | ८७ | १२३ | ११६ |
| ९८ | ८८ | १२४ | गाळली |
| ९९ | ८९ | १२५ | १०१ |
| १०० | ९० | १२६ | १०२ |
| १०१ | १११ | १२७ | १२४ |
| १०२ | ९१ | १२८ | १०३ |
| १०३ | १२९ | १२९ | १०४ |
| १०४ | ९२ | १३० | ११७ |
| १०५ | १२२ | १३१ | १२५ |
| १०६ | गाळली | १३२ | गाळली |
| १०७ | १३३ | १३३ | १३४ |
| १०८ | ११३ | १३४ | १३२ |
| १०९ | १३० | १३५ | १०५ |
| ११० | ९३ | १३६ | ११८ |
| १११ | ११४ | १३७ | १२६ |
| ११२ | ११५ | १३८ | १०६ |
| ११३ | १३१ | १३९ | १०७ |
| ११४ | १३९ | १४० | १०८ |
| ११५ | ९४ | १४१ | १४० |
| ११६ | १२३ | १४२ | ११९ |
| ११७ | ९५ | १४३ | १४१ |
| ११८ | ९६ | १४४ | १४२ |

# होनाजी बाळा

या कवीचें नांव सर्वांस विश्रुत असेल. याच्या अनेक लावण्या जागजागीं असून बहुतेक तमासगिरांजवळ त्यांचाच भरणा आढळतो. महाराष्ट्र देशभर याचा विलक्षण लौकिक आहे. तरी तो पुणें प्रांतांत विशेष आहे. गंगथडी-पेक्षां भिवरथडींत याच्या लावण्या फारच. प्रांताप्रांतांत तिकडील लोकांच्या आवडीचा एकेक कवी होऊन गेला आहे. सोलापूर प्रांतांत जसे रामजोशी बोवा, कोंकण प्रांतांत जसे प्रभाकर, गंगथडींत जसे परशराम व अनंतफंदी, त्याचप्रमाणें पुणें प्रांतांत होनाजी बाळाला हें एक गुणनिधान सर्वांच्या आवडीचें होऊन गेलें आहे.

होनाजी बाळाच्या लावण्या गोड सुराच्या आहेत. त्यांची म्हणणीहि फार अवघड नाहीं. सगनभाऊच्या लावण्यांच्या जशा त्रिकट चाली आहेत तशा होनाजी बाळाच्या लावण्यांच्या नसून साध्या व गोड अशा चाली आहेत. दुसरी एक या कवीच्या लावण्यांत खुबी आढळते ती अशी कीं, होनाजी बाळाच्या लावण्या अज्ञ जनांस आणि सुज्ञ जनांस सारख्याच प्रिय वाटतात! याचीं कारणें काय आहेत? असा अप्रतिम गुण दुसऱ्या कवीच्या लावण्यांत क्वचितच आढळून येईल. रामजोशी, प्रभाकर यांच्या लावण्या आदरास पात्र आहेत; परंतु त्या सामान्य लोकांच्या तोंडांत फारशा येत नसून त्या लावण्यांचा गूढार्थ अडाणी लोकांच्या मनांत लवकर उतरत नाहीं. सगन-भाऊच्या लावण्या शृंगाररसानें भरलेल्या आहेत; म्हणून विषयी जनांसच त्या प्रिय वाटतात. शालजोडी मिळण्याचा सुमार नाहीं त्यानें सकलादीवरच संतोष कां न मानावा? परंतु रंगाच्या सारखेपणावरून उपयोगाचा सारखेपणा किंवा मोलाचा सारखेपणा त्यांनीं मानणें व सकलाद हीच शाल मानणें हा वेडेपणा. अज्ञ जनांत जरी सगनभाऊच्या किंवा त्याहूनहि शृंगाररसानें थबथबलेल्या अशा लावण्या म्हणण्याचा परिपाठ आहे तरी थोर आणि गंभीर मनाचे पुरुष या लावण्यांचा धिक्कार करतात. तसें होनाजी बाळाचें लावण्यांविषयीं नाहीं. पुणें प्रांतांत होनाजी बाळाच्या लावण्यांवर जसे लोक फिदा आहेत,

त्याचप्रमाणें गंगथडींत परशराम यांच्या लावण्यांवरहि फिदा आहेत. होनाजी बाळाच्या लावण्यांत कोणता अप्रतिम गुण उतरला आहे आहे कीं त्यावर लोक फिदा असून त्या लावण्यांचा फारच लौकिक व्हावा ?

' होनाजी बाळाच्या लावण्यांची रचना सरळ असून शब्दलालित्य व अर्थगांभीर्य विलक्षणच आहे, यामुळें त्या प्रीतीस पात्र झाल्या आहेत. कवीचें जें अपार चातुर्य, नवयौवनसंपन्न स्त्रीचे हावभाव व रूपवर्णन करण्यांत खर्च व्हावयाचें, तें होनाजी बाळाचेंहि कांहीं झालें; परंतु त्याचा विशेष भर परमेश्वरलीला वर्णन करण्यांतच खर्च झाला.' होनाजी बाळा हा जातीचा गवळी असून त्यानें पुराणांतील कथांची सरणी लावण्यांत उतरून दिली ! ती बिनचूक पाहून असा भास होतो कीं, पूर्वी द्वापारयुगीं श्रीकृष्णांनीं गोकुळांत ज्या लीला प्रकट केल्या त्यांचें वर्णन भक्तांनीं आजपर्यंत केलें आहे. भागवतांत श्रीव्यासांनीं लीला वर्णिल्या; मोरोपंत, वामन-पंडित यांनींहि काव्यें केलीं; परंतु श्रीकृष्णाची त्यांपासून तृप्ति न होतां आपण गवळी म्हणून आपल्या जातीचा गवळी यास स्फूर्ति देऊन आपलें रसाळ चरित्र आबालवृद्धांस माहीत करविलें. हेंच एक कारण होनाजी बाळाच्या एकंदर लावण्या थोर लोकांत मान्य होण्यास झालें. श्रीकृष्णाच्या कथा भागवतांत वर्णन केल्या आहेत. त्याच पुनः होनाजी बाळानें लावण्यांत गाइल्या; म्हणून त्यास कांहीं बूज नाहीं. होनाजी बाळाच्या शब्दरचनेची तऱ्हा अप्रतिम आहे. रामजोशी यांना ही हातोटी साधली होती कीं, संस्कृत आणि मराठी शब्दांची अशी भेसळ करून द्यावयाची कीं, त्यांची चीज ऐकतांच मनुष्याचें मन गारीगार होऊन जावें ! रामजोशी स्वतः ब्राह्मण असून मराठी भाषा त्यांच्या सेवेस सदा तयार होती. होनाजी बाळा गवळी असून मराठी भाषा रामजोशासारखीच यांच्या अंकित होती. संस्कृत भाषेचें अध्ययन रामजोशासारखें यांनीं केलें असावें, असें दिसतें. संस्कृत आणि मराठी भाषेची भेसळ करून देण्याचे कामांत रामजोशाचे खालची असामी अलीकडील मंडळींत हीच दिसते. गाई-म्हशी वळीत रानांवनांत राहून, जंगलांतील व पर्वतांतील लोकांच्या भाषेशीं काय तो संबंध ! अशा प्रकारच्या विलक्षण तऱ्हेनें मराठी भाषेंत नांवाजलेला हाच काय तो दिसतो. अलीकडे

मराठी भाषेवर व्यासंग करणारे पुष्कळ आहेत; तरी होनाजी बाळासारखी इमारत बठवून देण्याचें सामर्थ्य एकांतहि असेल, असें वाटत नाहीं. वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलेंच आहे कीं, याची लावणी साधी, सरळ आणि गोड अशी असते. शिवाय तींत ईश्वरगुणानुवाद वर्णनाकडे विशेष झोंक असतो. याच विलक्षण गुणामुळें ती थोर मनाच्या पुरुषांचें प्रीतिपात्र होऊन राहिली आहे. होनाजी बाळानें शृंगाराची अशी लावणीच केली नाहीं असें नाहीं. परंतु सगनभाऊचा संग्रह घेतला आणि होनाजी बाळाचाहि एकंदर संग्रह घेतला तर त्यांतून होनाजी बाळाच्या लावण्या थोर मनाच्या लोकांस पसंत होण्याजोग्या म्हणजे खोल विचाराच्या अशा फार निघतील व सगनभाऊच्या त्या मानानें फारच थोड्या.

धाकटे बाजीरावसाहेब राज्य करीत असतां लावण्या म्हणणारी मंडळी बरीच उदयास आली; त्यांत होनाजी बाळाचें नांव वर येण्यास कारण असें झालें कीं, बाजीराव साहेबांनीं इच्छा प्रदर्शित केली कीं, बैठकीच्या लावण्यांत रागदारीचे सूर प्रगट करता येतील काय ? ती इच्छा होनाजी बाळानें पूर्ण केली. बाजीरावसाहेबांस तमाशा ऐकण्याचा छंद असे. नटाचें तोंड व त्यानें केलेले हावभाव हें बाजीराव साहेबांस पाहण्याचें कौतुक वाटे. बाजीरावांच्या पूर्वीं तमाशाचा क्रम थोडा असून त्या कलेची पूर्णता बाजीराव साहेबांचे कारकीर्दींत झाली. नटाचा अभिनय पक्कदशेंत त्याच वेळीं आला. बाजीराव साहेबांसारखाच तमाशाचा व हावभावाचा षोक खंडेराव महाराज गायकवाड यांसहि होता, असें म्हणतात. मल्लांच्या कुस्त्या, जेठी हत्तींच्या टकरा, बारभाईमंडळ, इत्यादि असे कांहीं कांहीं प्रकार खंडेराव महाराजांचे बाजीराव साहेबासारखेच होते असें म्हणतात.

बाजीरावाचे कारकीर्दींत शुक्रवारांतून चाललें तर माडीवरून रात्रीं साळूमैनांचे जे सूर गोड लकेऱ्यांत मंजुळ असे पूर्वीं ऐकूं येत होते ते हळूहळू बंद होऊन एकदम डफावर थाप पडली ! फडाचे तमाशे सुरू होऊन अनंतफंदी, होनाजी बाळा इत्यादि मंडळी पुढें आली. आमच्या मतें तेव्हां त्यांचा जो इतका लौकिक झाला होता तो त्यांच्या अजब गुणावरूनच झाला. तमाशा पाहण्यांत कोणी दुर्गुण दाखवोत, परंतु त्यांपासून कांहीं

फायदेहि आहेत. तमाशे पाहण्याचा षोक पुरा करण्यासाठीं फडांत शिरणें, किंवा त्रिनादिक्कत पोऱ्या मांडीवर घेणें, हें वाईट ! ! त्यांनून असले प्रकार वडील माणसांच्या देखत करणें, बायकांसमक्ष फड उभा करणें, असल्या गोष्टी कोणास आवडत असतील त्याची धन्य खरी ! ! लावण्या ऐकण्यापासून फायदे तीन दिसतात. पाहिला फायदा प्रथमदर्शनीं सूरनाद; हा इतका विलक्षण आहे कीं, त्यापासून मनास हुषारी वाटते व प्रसंगविशेषीं शीण-भाग हरून आल्हादवृत्ति होते. एवढ्यासाठीं कंटाळलेल्या किंवा त्रासलेल्या मनास विश्रांति देण्याचें हें सुलभ साधन आहे. त्रासलेल्या मनास स्थिर करण्यास दुसरे जे अवांतर उपाय असतील ते इंद्रियजन्य असून त्यांत मन शिरण्यासहि कठिण पडतें. वरील प्रकारच्या बहारींत तसें कांहींच कठिण नसून सूरनादाबरोबर आनंदाच्या लहरीहि आपोआप डोक्यांत शिरून मन शुद्ध होतें. दुसरा फायदा हा कीं पूर्वींचे लोकाचार व शिष्ट-संप्रदाय, कवींसारखे ते मनांत हुबेहूब उतरून देणें दुसऱ्याचे हातें घडणें दुर्लभ. कवींचें वर्णन इतकें कांहीं अप्रातिम उतरलें असतें कीं जसा पूर्वींचा सर्व थाट डोळ्यांसमोर रेखला उभा. पूर्वींचे रीतरिवाज देश-स्थिति कळण्यास कवच साधन आहेत. वरील कवी बहुतेक पेशवाईत झाले असल्यामुळें त्या वेळची स्थिति सहज समजून येते. पोवाडे ऐकून त्या वेळच्या राज्याच्या घडामोडी, उलथापालथी समजणें जशा सुलभ पडतात, त्याचप्रमाणें लावण्यांतून साधारण लोकसमूहाच्या उलाढाल्या वर्णिल्या असून त्या वेळच्या मानवजातीचें रुचिवैचित्र्य दृष्टीस पडतें. तिसरा फायदा विषयवासना. हाच बहुतेक सर्व लोकांचा समज अलीकडे दृष्टीस पडतो. इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांत एकंदर स्त्रीपुरुषांचा विषयसुखावर जितका भर असून विलासादि उपभोग ते जितके घेतात त्या मानानें इकडे कमी, असा समज आहे. मुग्धविलास आमच्या देशांत जे चालत आले आहेत त्यांचा अंशहि त्यांस भोगण्यास सांपडत नाहीं. इकडील स्त्रियांस तिक-डील स्त्रियांसारखे वरकांति प्रेम जरी दाखवितां येत नाहीं तरी खरा विलास व स्त्रीपुरुषांचें खरोखर प्रेमसुख इकडील देशांत विशेष दृष्टीस पडतें.

वर सांगितलेले लाभ वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलेच असतील;

त्याबद्दल परिस्फुटता करणें प्रशस्त नाहीं. होनाजी बाळाच्या उदयाचा प्रकार वर सांगितला; परंतु अंतस्थ म्हटलें तर त्याला घरचीच शाळा असून घरच्या शिक्षणापासून त्याला कविता करण्याची किल्ली सांपडली.

होनाजी बाळाचे आजोबा साताप्पा गवळी, शिलारखाने आडनांवाचे पुण्यास राहत होते. या वेळेस पेशवाई होती, किंवा नव्हती याविषयीं खात्री-लायक कळत नाहीं. हे साताप्पा स्वतः लावण्या करून गात असत. त्यास शंकराचा वरप्रसाद होता असें सांगतात. पुढें त्याच्या मरणानंतर त्याचे जे पुत्र तेहि लावण्या करीत असत. या साताप्पाची समाधी हल्लीं संगमावर हरनामगिरीचे घाटावर आहे. त्या समाधीस शांतलिंग म्हणतात. त्या शांत-लिंगापुढें अद्यापपर्यंत श्रावणमासात दर सोमवारीं तमासगीर जाऊन हजेरी देत असतात. त्या सर्व प्रकारांस पंचवा म्हणतात. साताप्पास तिघे पुत्र होते. त्यांचीं नांवें:— बाळा, कुशाबा आणि सयाजी. साताप्पा सांबभक्त होता. त्यानें जी आराधना केली होती त्याचें फळ असें प्राप्त झालें कीं त्याला ईश्वरपदप्राप्ति होऊन तिघे सुपुत्र झाले. आणि पुढें नातवाचा म्हणजे होनाजी बाळाचा लौकिक दणाणून राहिला. साताप्पास ईश्वरपदप्राप्ति झाली कशी? ही शंका येईल तर तिचें निराकरण वर होऊन चुकलेंच आहे कीं, त्याची जी समाधि संगमावर आहे तिजवर लिंगस्थापना होऊन साताप्पा हेंच शांतलिंग दैवत होऊन बसलें आहे. त्या लिंगचिन्हाची पूजा करतात, इतकेंच नाहीं, तर दर श्रावणी सोमवारीं तेथें यात्रोद्देशें सहस्रावधि लोक जमतात! असो. साताप्पाचे तिघां मुलांपैकीं होनाजी बाळाचा बाप धाकटा, सयाजी होय. थोरला बाळा हा कवी असून उत्कृष्ट गाणारा होता. बाळा आणि कुशाबा हे दोघे बंधु गात असत. परंतु बाळाचा लावण्या करण्याचा व म्हणण्याचा विशेषतः सोबती म्हटला तर बहिरू नांवाचा रंगारी जातीचा होता. या दोघांच्या नांवच्या लावण्या पुष्कळ प्रसिद्ध आहेत. "बाळा बहिरू" हें नांव आमचे वाचकांतून पुष्कळांच्या ऐकिवांत असेल. हें जसें दोन पुरुषांनीं आपलें नांव जोडून लावण्यांत घालून दिलें, तोच मासला होनाजी बाळाच्या नांवांतहि आहे! होनाजीस त्याचे घरचे मंडळी होनाप्पा म्हणून म्हणत असत. त्याचा सोबती बाळा कारंजकर शिंपी जातीचा

मनुष्य गुणवान् होता. हे दोघे मित्र एके बैठकींत असल्यामुळें व त्यांची तमाशांत जोडी असल्यामुळें पेशव्यांचे वाड्यांत होनाजी बाळा म्हणून म्हणत असत. तेंच नाव त्यांनीं आपल्या सर्व लावण्यांतून घालून दिलें. या जोडी-पैकीं दुसरा जो बाळा कारंजकर यास मूळबाळ नाहीं म्हणून ऐकिवांत आहे. होनाजीस दोन मुलें होतीं. बाळा बहिरू हा उत्कृष्ट गाणारा असून त्यानें आपल्या बापाचे मागें नांव चांगलें राखलें. याच्या सर्व लावण्या बैठकीच्या म्हणजे शांत सुराच्या आहेत. हें वळण बाळा बहिरूस सातप्पापासून मिळालें होतें; तेंच पुढें पूर्वजांचें वळण होनाजी बाळानेंहि उचललें. फडावरील उंच स्वराच्या लावण्या होनाजी बाळा कधींच म्हणत नसे. स्थिर समुद्राची लाट सायंकाळीं जशी पाहणाऱ्यांस मनोरम दिसून उदासीन मनास आल्हाद देते, एकामागून एक ती लहान येते ती वारंवार पाहण्याची जशी हौस वाढत जाते हाच प्रकार होनाजी बाळाचे लावणींतील होय.– ‘ वाऱ्याची हालचाल अगदीं बंद होऊन समुद्राचा सर्व विस्तार अगदीं निश्चल दिसतो “ सूर्य अस्तास जाऊं लागून संध्याकाळचें आकाश त्याच्या सोनेरी किरणांनीं देदीप्यमान झालें असतें, व अशा वेळेस आरशाप्रमाणें स्थिर अशा पाण्यावर जेव्हां आकाशाची कमान शाबूद उठलेली असते तेव्हां ती तर काय शोभा सांगावी ! ’ तिसऱ्या प्रहरचा म्हणजे भैरवी रागांत पहाटेच्या सुरावर मंजुळ लावणी म्हणण्याचा होनाजी बाळाचा मोठा अष्कारा असे. वर जें नुक्तेंच म्हटलें कीं, ‘ शुक्रवारांतून चाललें तर माडीवरून दोन प्रहर रात्रीं साळू-मैनाचे जे सूर गोड लकेऱ्यांत मंजुळ पूर्वी ऐकूं येत होते ते हळू हळू बंद होऊन एकदम डफावर थाप पडली !’ त्या वेळीं पूर्वी दुसरा असाहि प्रकार सुरू झाला होता कीं नायकिणीच्या पोरी ज्या रागदारीच्या सुरात गाण्यासाठीं ख्याल, टप्पे वगैरे चिजा शिकत असत त्या चिजा शेवटीं सोडून देऊन त्यांस होनाजी बाळाच्या लावण्या शिकण्याचा प्रसंग आला. कारण त्या वेळीं वरील चिजांचे मोक्ते क्वचितच उरले असल्यामुळें अर्थातच गाण्याचा धंदा चालून उपजीवन होण्यासाठीं होनाजी बाळाच्या लावण्यांचा अंगीकार त्या पोरींस करणें भाग पडलें. त्या वेळच्या स्थितीविषयीं एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, “ रात्रीस

रस्त्यांत आणि बोळांत फिरणाऱ्या विलासी लोकांचीं मनें आपणाकडे ओढून घेणारे नुक्तेच चिमणी, साळू, मैना यांच्या मंजुळ कंठांत होनाजी बाळानें घातलेले खडे सूर; आणि फौजेकडील सिलेदार, बारगीर, शिपाई आणि शहरांतील सुखवस्तु शिंपी, माळी, सराफ, दुकानदार, यांस रिझविण्याकरितां बहिरू, मल्हारी, धोंडीबापू, सगनभाऊ आणि रामा गोंधळी यांनीं सजिवलेले डफतुणतुण्याचे तमाशे आणि कलगीतुऱ्याचीं भांडणें; हे सर्व थाट रावबाजीच्या उल्लसित मनोवृत्तीच्या प्रेरणेनें पुणें शहरांत जेथें तेथें गाजून राहिले होते. मग 'यथा राजा तथा प्रजा' या न्यायानें त्या प्रेरणेचा अंमल सर्व पेशवाईंत पसरला नसेल असें संभवत नाहीं. त्या काळीं सर्व गुणी जनांचे आशेनें भरलेले डोळे पुणें शहराकडे लागले असून, त्या शहरानें जो कित्ता घातला होता, त्याची नक्कल जेथें तेथें होऊन कित्येक ठिकाणीं त्या नकलेवर ताण करणारे उमेदवारहि निपजूं लागले. "

होनाप्पास दोघे पुत्र होते. त्यांचीं नांवें :—थोरला कुशाबा आणि धाकटा बाबाजी. कुशाबास गणपती आणि कोंडिबा असे दोन पुत्र अद्याप पुण्यांतील गौळआळींत जें होनाप्पाचें घर आहे तेथें राहतात. हे होनाजी बाळाच्या लावण्या म्हणत असत. सध्यां असलेलीं कुशाबाचीं मुलें गणपती आणि कोंडिबा हेहि करनें गातात. बहुश्रुतपणा आणि निरपेक्षबुद्धि या दोन्ही गुणांचा त्याच्या ठिकाणीं अभाव. बहुश्रुतपणा नसल्यानें अर्थात् अज्ञानत्व. त्याचप्रमाणें निरपेक्ष बुद्धि नसल्यानें द्रव्यलोभ. अनंतफंदी, रामजोशी, होनाजी बाळा हे तिघे कवी विलक्षण फटिंग आणि निर्लोभी होऊन गेले. त्यांच्या वंशजाच्या ठिकाणीं लोभी स्वभाव पाहून थोडी खंती वाटते. त्या लोभी स्वभावापुढें त्यास आपल्या पूर्वजांच्या गुणांचें स्मारक देखील राहात नाहीं, ही मोठ्या चमत्काराची गोष्ट आहे. होनाजी बाळानें आपल्या नातवापणतवांच्या, उपजीविकेचा जिम्मा घेतला असेल असें वाटत नाहीं. असें असतां त्याजवर त्याच्या वंशजांनीं का रुसावें? हें तर काय पण पेशव्यांच्या आश्रयानें गेल्या शतकांत वाढलेले शेंकडों सरदार, मुत्सद्दी, यांनीं आपल्या मुलांबाळांकरितां आणि आपल्या वंशजांकरिता मोठमोठाल्या जहागिरी मिळवून टोलेजंग वाडेहि बांधून ठेविले. पण राज्यक्रांतीमुळें त्या

जहागिरी आणि वाडे कित्येकांच्या कायम राहिले असतील बरें ! जे कांहीं कायम राहिले त्यांची तरी कोण स्थिति आहे? सारांश, अज्ञानत्व आणि आळस हीं दोन दुर्व्यसनें कितीहि मोठी संपत्ति असली आणि कितीहि मोठी जहागीर असली तरी पुरेनाशी होऊन कफल्लक बनण्यास उशीर लागणार नाहीं. यासाठींच साधु तुकाराम यांनीं वाईट संतति नसलेली बरी असें म्हटलें आहे.

लक्ष्मी मोठी चंचल आहे. ती केव्हां सोडून जाईल याचा नेम सांगवत नाहीं. ती आपल्याजवळ नेहमीं असावी अशी ज्याची इच्छा असेल त्यानें उद्योगाची कांस बळकट धरली पाहिजे. विद्वज्जनांजवळ तरी लक्ष्मी आपलें ठाणें देऊन बसेलच बसेल असा नियम नाहीं. कोणी कोणी तर असें देखील म्हणतात कीं सरस्वतीचें आणि लक्ष्मीचें वैर आहे ! पण हें म्हणणें चहूंकडेच लागूं पडतें असें नाहीं. सारांश, लक्ष्मी नसेल तेथें सरस्वती नसेलच असें समजणें चुकीचें होय. तर होनाप्पानें आपल्या नातवांसाठीं जहागीर, मोकासा लावून ठेविला नाहीं म्हणून त्याच्या ठिकाणीं शहाणपणा कमी होता असें समजणें हें त्याच्या नातवांस योग्य नाहीं. तरी वरील प्रकारावरून शहाण्या माणसास विचार करण्यास पुष्कळ जागा आहे. होनाजी बाळास पेशवाईत शेले, दुपेटे वगैरे ज्या देणग्या मिळाल्या त्या त्यानें त्रिंबकजी डेंगळ्याच्या घरीं ठेविल्या होत्या. त्या देणग्यांपैकीं होनाजी बाळाच्या मुलांस कांहींच अंश लाभला नाहीं. त्याचें कारण असें कीं, त्रिंबकजीवर मारेकऱ्यांचा रोष असल्यामुळें त्याच्या संपत्तीची धुळधाण झाली. त्याबरोबरच होनाजी बाळाच्या संपत्तीचीहि वाताहत झाली. शुक्रवारांत भोतकराच्या हवेलीसमोर पूर्वेस जें मारुतीचें देवालय आहे त्याचे शेजारींच त्रिंबकजी डेंगळ्यांचा वाडा होता. त्या वाड्यांत होनाजी बाळाची म्हणून निराळीच खोली असून, त्या खोलींत त्याची बैठक असे. तेथेंच डफ, तंबोरी, मंजिरी इत्यादि तमाशाचीं वाद्यें असून त्याच खोलींत ते आपली मिळकतहि ठेवीत. त्रिंबकजी डेंगळ्यास जशी दौलत लाधली तशीच ती नष्टहि झाली. हरिअबा आश्वीकार यांस त्रिंबकजीची दौलत उडवावयास सांपडली. हरिअबा हे त्रिंबकजीचे प्रीतींतील असून शेवटीं तेच दौलत संभाळणारे झाले.

कोंडणपूर येथें जो डोंगर आहे तो डोंगर व त्याजभोंवतालचें रान होनाजी बाळाला पेशव्यांकडून लाभलें असून हल्लीं तें सर्व रान होनाजी बाळाचेच वंशज उपभोगीत आहेत. या डोंगराविषयीं हकीकत अशी आहे कीं, हा डोंगर शिलारखाने गवळ्यांचा ( शिलारखाने गवळी म्हणजे होनाजी बाळाचे वंशज होत. ) नसून चौधरी गवळ्यांचा तो आहे. पूर्वी सवाई माधवराव पेशव्यांचे वेळीं पेशव्यांच्या वाड्यांत नेहेमींची दूध पोंचाविणारी गवळण जी असे तिजवर वाड्यांतल्या मंडळींची कृपा बरी असून खुद्द यजमानास गवळणबाई बंधूच्या नात्यानें आळवीत असे. पुष्कळ जुन्या माणसांच्या तोंडून असें ऐकलें आहे कीं, जुन्या माणसांस आतांच्या मंडळींपेक्षां माया फार असे. त्याप्रमाणें यजमानसाहेबांचें प्रेम त्यांच्या थोरपणाप्रमाणें गवळणबाईवर होतें. एकदां दिपवाळीचे दिवशीं गवळणबाई पेशवे सरकारास ओंवाळण्याकरितां गेली तों सरकारस्वारींनीं गवळणीस ओंवाळणीची देणगी म्हणून भरजरी पाटाव देऊन मोहरापुतळ्यांनीं ओटी भरूं सांगितली. गवळणबाईनें ही देणगी स्वीकारून राजवाड्यांतून बाहेर पडली, ती थेट आपल्या वाड्यांत दाखल झाली. वाड्यांत वडील माणसें होतीं त्यांनीं ही ओंवाळणी पाहून गवळणीस म्हटलें कीं, राजाजवळून अशी का देणगी घ्यावयाची ? पाटावा फाटून जाईल, द्रव्य खर्चून जाईल. राजाची अशी देणगी असावी कीं, वंशपरंपरा पुरून तिजपासून जन्माची दगदग मिटावी. तें ऐकून गवळणबाई परत राजवाड्यांत गेली आणि पेशव्यांजवळ झालेली गोष्ट सांगितली आणि म्हणाली, ‘ आम्हां गवळ्यांची लक्ष्मी तर गाईम्हशी; त्यांचें संगोपन करून त्यांजपासून जें दूधदुभतें प्राप्त होणार तेंच आमच्या निर्वाहाचें साधन; त्याअर्थी त्या लक्ष्मीच्या संगोपनाची तजवीज करून आपण मुक्या जनावरांचा आशीर्वाद घ्याल म्हणजे आम्हांस जन्माची भाकर दिल्यासारखें होईल.” तें ऐकतांच सरकारची आज्ञा अशी झाली कीं, “ तुला जी भूमि पाहिजे तेथें तूं तुझे हातांतील दीप घेऊन जा; आणि तो तुझा दीप जेथपर्यंत प्रज्वलित राहील ती सर्व भूमि तुला दिली. दीप मावळला कीं, तीच तुझ्या वनाची सीमा.” हें वचन ऐकून ती गवळणबाई तत्काळ वाड्यांतून निघून कोंडणपूरच्या डोंगराचा रस्ता तिनें धरिला. कोंडणपूरचा

डोंगर चढून पलीकडचे बाजूस उतरून त्या बाजूस लांबपर्यंत जाऊन दीप विझाला. तितका सर्व रानाचा भाग पेशवे सरकाराकडून चौधरी गवळ्यांस तेव्हांपासून लाभला. तोच अद्यापपर्यंत त्यांजकडे आहे असें ऐकिवांत आहे. याच डोंगराच्या संबंधानें दोन तीन वर्षांपूर्वीं रास्त्यांचा आणि गवळयांचा वाद पडून शेवटीं तो वाद गवळयांनीं जिंकला. या डोंगरांत होनाजी बाळाचा मालकीचा संबंध नाहीं; परंतु इतकें मात्र खरें कीं, चौधरी-गवळ्यांची मुलगी होनाप्पाचे मुलास दिली असल्यामुळें त्या उभयतांचा सोइरसंबंध झाल्यापासून होनाजी बाळा त्या डोंगरावर आपलीं जनावरें घेऊन जात असे.

वरील कोंडणपूरच्या डोंगराची देणगी होनाजी बाळास पेशवे सरकारकडून मिळालेली नसून ती दुसऱ्या गवळ्यास मिळाली आहे; ही गोष्ट वरील माहितीवरून कळून चुकलीच असेल. पेशवे सरकारांतून होनाजी बाळास सालिना तीनशें रुपये शिमग्यामध्यें पांच दिवस वाड्यापुढें तमाशा करण्याबद्दल मिळत असत. इंग्रेजी झाल्यावर देखील बुधवारच्या वाड्यासमोर होनाजी बाळाचीं मुलें तमाशा करीत असून पांच दिवसांबद्दल त्यांस सरकारांतून शंभर रुपये मिळत.

याखेरीज होनाजी बाळास बडोद्यास सयाजीराव महाराज गायकवाड यांजकडून दोनशें रुपयांचें वर्षासन मिळत असे. तें पुढें पुढें ग्यानूपाड नारळवाला हा बडोद्यास जाऊन होनाजी बाळाच्या नांवाचें तें वर्षासन आणीत असे. त्याच्या मागें तें वर्षासन बुडालें.

बाळा बहिरूची समाधि जशी अजूनपर्यंत सासवडास आहे, तशी होनाजी बाळाचीहि येथें संगमावर होती; परंतु आतां ती राहिली नाहीं. मागें जें शांतालिंग सांगितलें त्याच घाटावर होनाजी बाळाचीहि समाधि होती; परंतु ती कांहीं कारणानें त्या जागेच्या मालकानें काढून टाकून तेथें एक बिल्ववृक्ष खूण म्हणून अद्याप ठेविला आहे. होनाजी बाळाचा शेवट चमत्कारिक आहे, तो असाः—भाद्रपद कृष्ण त्रयोदशीचे दिवशीं दोन प्रहर दिवसांत होनाप्पाचे घरची सर्व मंडळी रानांत गेलेली संधि पाहून, दोघेजण महार गवळीआळींत होनाजी बाळाचे घरीं येऊन त्यांनीं

होनाप्पास वानवडीकडे बोलावून नेलें. वानवडीच्या अलीकडच्या रानांत आणखी कांहीं मारेकरी जमून त्यांस नेऊन मरेमरेतों मारलें आणि शेवटीं निवडुंगांत ढकलूनहि दिलें. असा सूड घेऊन नंतर दोन प्रहर रात्र उलटल्या-वर त्यास घेऊन शहरांत आदितवार पेठेच्या कोपऱ्यावर आणून टाकिलें. हा इतका प्रकार त्या मारेकऱ्यांनीं कां केला ? हें बरोबर कोणी सांगत नाहीं. कोणी म्हणतात कीं, त्या महारांजवळचें सुमारें सात आठ रुपयांचें गवत होनाप्पानें घेतलें असून त्याविषयींची बोलाचाली इतक्या विकोपास कारण झाली ! सुज्ञ व विचारी आहेत ते असें सांगतात कीं, त्या वेळच्या सर्व तमासगीर मंडळींत होनाजी बाळाचें वर्चस्व असून पेशव्यांचे वाड्यांत जो त्याचा विशेष मान होत असे तो पाहून कित्येक तमासगीर होनाजी बाळाचा हेवादावा करीत असत. त्यांतून कोणी तरी सूड उगवण्यासाठीं हे वरील मारेकरी पाठवून हा इतका प्रकार केला असावा. भाद्रपद कृष्ण चतुर्दशीचे दिवशीं कांहीं शहरवासी लोकांनीं पहाटेस होनाप्पाला उचलून त्यांच्या घरीं पोहोंचतें केलें. त्यास मारून मारून बेदम करून टाकिलें होतें, त्यामुळें त्याच दिवशीं होनाप्पाचा अंत झाला. या प्रकारें मारेकऱ्यांचे हातून होनाजी बाळा या मृत्युलोकापासून मुक्त होऊन परलोकवासी झाले. ज्या दिवशीं शेवट झाला त्या दिवशीं शहरांतील तमासगीर मंडळी जमून त्यांनीं प्रेतसंस्कार केला ! प्रथम जडदेहापुढें भजन वगैरे करून नंतर शव घेऊन वाजत गाजत व रस्त्यानें होनाजी बाळाच्या लावण्या म्हणत व भजन करीत सर्व लोकांचा मोठा जमाव स्मशानभूमिवर गेला. या प्रकारें प्रेतसंस्कार झालेला कांहीं महिन्यांपूर्वी प्रसिद्ध राघोभट भिंगारकर यांचा पाहिला. राघोभटाचें नांव त्यांच्या कीर्तनावरून सर्वांस विश्रुतच असेल. त्याच्या शिष्यमंडळींनींहि याच-प्रमाणें भजन करीत स्मशानभूमिवर प्रेत नेऊन तेथें वाळवंटावर कीर्तन केल्यानंतर प्रेतास अग्नि दिला. होनाजी बाळाच्या मरणानंतर तेराव्या दिवशीं गवळ्यांच्या जातींत मोठा खर्च करून जेवण केलें. सर्व तमासगीर मंडळींस मनमुराद जेवण मिळालें. मरणाच्या दिवशीं जो तमासगिरांचा मेळा गवळी-आळींत होनाजी बाळाच्या वाड्यासमोर जमला होता तो पुढें दरसाल चालू राहिला ! अद्यापपर्यंत भाद्रपद कृष्ण चतुर्दशीचे दिवशीं या शहरांतील सर्व

तमाशे जाऊन त्याच्या वाड्यापुढें हजिरी देत असतात. त्या दिवशीं शहरांत तमासगिरांस मोठा मान आहे.

होनाजी बाळास पेशवाईंत पुष्कळ मिळकत जरी मिळत असे तरी नियमित नेमणुकीचें उत्पन्न म्हणून कांहीं असेल असें वाटत नाहीं.

येथपर्यंत होनाजी बाळाचें थोडकेंसें इतिवृत्त आमच्या प्रियवाचकांसाठीं सादर केलें. त्याचे जन्ममरणाचा शक चांगलासा कळला नाहीं. होनाजी बाळानें एकंदर लावण्या पुष्कळ केल्या आहेत. त्यांच्या जो घरीं कांहीं संग्रह शिल्लक आहे तो मात्र सर्व होनाजी बाळाचाच नाहीं; कारण तो आमच्या अवलोकनांत आला आहे; त्यावरून असें वाटतें कीं, इतकें काम एका माणसाच्या हातानें उठावयाचें कठिण. तो संग्रह जुनाट मोडी लिपींत लिहिलेला असून फार अशुद्ध आणि खराब झालेला आहे त्यांतून चाळून पाहतां बाळा बहिरू, सातापा यांच्याहि लावण्या आढळल्या; यावरून असें वाटतें कीं, होनाजी बाळाच्या आजोबापासून संग्रह त्यांत असेल. असो. ही सेवा जर आमच्या प्रिय वाचकांस मानवली तर त्याचा प्रयत्न करून त्या लावण्या प्रसिद्धीस आणूं. होनाजी बाळाचा लौकिक या प्रांतांत गाजून राहिला आहे त्यास आमच्या या चार ओळींनीं कितीशी भर होणार आहे ? परंतु याची पूर्तता केव्हां तरी चांगली व्हावी व तिजला आमचें हें लेखन कांहीं अंशीं तरी साधन व्हावें म्हणून हें चरित्र लिहिलें आहे. होनाजी बाळानें जी एक भूपाळी 'घनःशाम सुंदरा' केली आहे तिजवरच त्याचें नांव सदोदित टिकण्यासारखें होतें. कारण कांहीं कवींनीं एकेक, दोन दोन पदें केलीं असून त्यांनीं आपलीं नांवें कविमालिकेंत गोंविलीं आहेत. त्या मानानें पाहतां होनाजी बाळाची भूपाळी अत्युत्कृष्ट साधली आहे. एकंदरींत होनाजी बाळाच्या लावण्या सर्वच चांगल्या आहेत. त्यांतून अक्षरें चांगलीं खरीं रेखलीं उठवून देणारीं असून त्याची म्हणणी गोड असली तर मग कोंदणांत बसविलेल्या हिऱ्याप्रमाणें एकेक अक्षर खुलतें. बापू मराड्यासारखा म्हणणारा किंवा पिंपळवडीकर गोंधळ्यासारखा म्हणणारा असला तर आमच्या म्हणण्याची प्रचीति तत्काळ येऊन चुकेल.

ह्या लावण्यांची प्रथमावृत्ति छापतेवेळीं दोन वह्या आम्हांस मिळाल्या. एक कै. गणपतराव साठे यांची व दुसरी कै. बाळासाहेब पटवर्धन यांची. त्या दोन्ही वह्या सारख्याच होत्या. त्यांजवर कै. रा. ब. देशमुख यांनीं कै. खंडेराव महाराज गायकवाड यांनीं बडोद्यास छापलेलें एक पुस्तक आम्हांस दिलें. त्याजवर चालीहि घातलेल्या असून त्या सर्व लावण्या या नवीन पुस्तकांत घेतल्या आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम .......... वि ............
क्रमांक .......... नों: दि: ..............

# होनाजी बाळाकृत

# लावण्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम क्रमांक ३५२८० दि. नों. दि. ९।१२।६
९८००
१३८५३

# होनाजी बाळाकृत लावण्या

## ॥ गण पहिला ॥ १ ॥

चाल—महाराज गौरिनंदना अमरवंदना दैत्यकंदना ।
हे मंगळमूर्ति, ठेवी कृपादृष्टि, एकदंत [illegible] पुती ॥
— रामजोशी.

॥ श्रीगणेशाय नम: ॥ श्रीवक्रतुंड गणपती, गणाधिपती, तुझी जे स्तुति, नर निशीदिनीं[1] करती । ते नर निरविघ्न प्रपंचीं जगीं विचरती ॥ ध्रु० ॥ गजवदन बहुत गोजिरें मस्तकीं बरें दुर्वांकुर तुरे शमीचीं पत्रें । तीं चार अयुधें[3] चतुष्करी चित्रविचित्रें । मूषकध्वज, लंबोदरा, सिंदूरध्यान, सुंदर जे जपती मंत्रें । ऐश्वर्यवान नांदती ते पुत्रकलत्रें ॥ चाल ॥ लाडू मोदक परिपात्रें । पुजियेला । तव निर्गुण अर्चनयंत्रें । येजियेला । अंतरीं अक्षरेंमंत्रें । भजियेला । एकदंत सिद्धविनायक तो सुखदायक । हे गुणगायक हृदयीं धरती । ते नर० ॥ १ ॥ मस्तकीं मुगुट तेजाळ तें दोंदें[4] विशाळ तयावर व्याळें[5] कटाप्रती मिरवे । पीतवर्ण वस्त्र कासेशीं कशीलें बरवें । कुंडलें तीं मकराकृत श्रवणीं तळपतीं फरशांकुर हातीं मंडितकरसरवे । चौसष्ट कळांचा लेख कोणा न करवे ॥ चाल ॥ चौदा विद्येचा सिंधु । प्रबळ हा । अक्षयीं अचळ दिनबंधु । अढळ हा । स्वानंदनभीचा[6] इंदु । अढळ हा । लागतां लक्ष त्या रुपीं, नाम साक्षपी, भाव आक्षपी, जड मूढ उद्धरती । ते नर० ॥ २ ॥ मृगमदें[7] मुगुटा तळवटीं टिळक मळवटीं केशरी उटी

---

१ रात्रंदिवस. २ नांदतात. ३ शस्त्रें. ४ पोट. ५ सर्प. ६ आनंदरूप आकाशीचा चंद्र. ७ कस्तुरी.

सर्वांगीं पिवळी । दिसे अर्धचंद्र शोभांकित कपोलयुगुळी । विश्वात्मक विश्वारंब असा जगदंबा धराहेरंभ मूर्ति हृदूकमळीं । परमार्थ अर्थ पहा सज्जन जनहो सकळीं ॥ चाल ॥ मंगळारंभीं साजे । तो अर्धी । तारक म्हणवुनि श्रीद गाजे । ज्या पदीं । अघहारक नामा विराजे । त्यामधीं । दाता सिद्धीबुद्धीचा, भूपतींचा कलश मुक्तिचा यथाविधी । स्मरती ते नर निर० ॥ ३ ॥ नक्षत्रनाथ[1] नभिं जसा, दंतमुखीं तसा. सुशोभित कसा सुमुक्ताभरणीं[2] । गजवदन बहुत मंडित शुभ्रप्रावर्णी । ढाळिती सिद्धी चामरें घेऊन अपकरें मधुरनेपुरें वाजतीं चरणीं । कल्याण कीर्तिमंगळ आकाशीं तरणी[3] ॥ चाल ॥ निरविघ्न निरंतर हृदयीं । आठवा । जिव्हेस गोड रुचीकर हे । चाटवा । नामामृत रस हृदयीं । सांठवा । शिवसुत चरित्र चोखटें नित्य जो पठे सकळ संकटें तयाचीं हरतीं । होनाजी बाळा तव चरणां[4]-बुजिं अनुसरती ॥ ते नर नरविघ्न० श्रीवक्रतुंड० ॥ ४ ॥

## ॥ गण दुसरा ॥ २ ॥

चाल— ( वरची ) —रामजोशी.

श्रीशूर्पकर्ण[5] इभमुखा[6] हे तव पादुका भक्तजन सुखालागीं मनीं ध्याती । उद्धरशी जड मूढ हे त्रिजगीं तव ख्याती ॥ ध्रु० ॥ सद्गुरु समर्थ उदार जो दिनोद्धार तयाचीं सुंदर पादारविंदें । भाव पुरस्कर नमिलीं प्रिय मिलिंदें[7] । हा जगद्वंद्य जगदीश तो पूर्ण गुणाचा दर्श हृदयांत स्वच्छंदें । झालासी तूं वक्रानन तुज नमु आनंदें । हे निर्जरेंद्रमूर्ळमूर्ति[8] । चिद्रुपा । स्वानंदभरें तव कीर्ति । सद्रुपा । स्मरणें संकटें हारतीं । तद्रुपा । दोंदीलें[9]

---

१ चंद्र. २ अलंकार व वस्त्रें यांनीं. ३ सुर्य. ४ चरणकमलीं. ५ सुपाप्रमाणें कान ज्याचे. ६ हत्तीप्रमाणें मुख असा. ७ भ्रमरानें. ८ अनादिमूर्ति. ९ मोठें पोट.

उदर बरें दिसें गोजिरें तनुसिंदुरें चर्चिली विज्याती ॥ १ ॥ आननीं मृगांकवत् दर्शन कटी अहिभूषण[1] विघ्नविनाशन हें नाम विराजे । वदनाब्ज पितवसनें तनु पूर्ण साजे । परब्रह्म पूर्ण अवतार सत्य करणार ज्ञानदातार ब्रिदपदीं गाजें । अवलोकून तव तेजास मित्र शशी लाजे ॥ चाल ॥ संपन्न ज्ञान विद्याब्धी[2] । सुखघना । नमितों तुज सुमन सुशब्दी । क्षणक्षणा । तव भक्त ते मुक्त भवाब्धी । तारुणा । चौसष्ट कलेचें भुवन कारिती कवि स्तवन तुझें गुणश्रवण हें घडो स्वजाती ॥ २ ॥ शुभ्र जसा मंदराचळ तेचि कोमळ कांति सोज्वळ सुखदायक मूर्ति । तव गुणार्णवीं न चले पादोदरें[3] स्फूर्ति । अमरपुरीं अमर नृपाशीं[4] वंद्य सर्वांशीं भाद्रपदमासीं शुक्ल चतुर्थी । सुर असुर सकळ पुजिती तुज मंगलमूर्ति ॥ चाल ॥ दुर्वा सिंदूर शमीचीं पत्रें । केकती । भक्त लाडू मोदकपात्रें । अर्पिती । मुगुटावरतीं मुक्त छत्रें । शोभती । पूजार्चित ध्यान हें बरें भक्त सादरें अति आदरें दृढ हृदयीं वहाती ॥ ३ ॥ श्रोत्रे चक्षुजिव्हाघ्राण[5] हें मुख्य स्थान तें शास्त्रप्रमाण तूं प्रतापगंगे । मुढ तोही बृहस्पती होय तुझ्याची प्रसंगें ॥ तव गुण हे महदाकाश धरुन अवकाश नवनीरदाभासें[6] निज अंगें । म्हणून मस्तक पदीं ठेवून वंदिती मनरंगें ॥ चाल ॥ तो मायातीत नियंता अनुपमा । त्या दूर करी पतितमहंता । मोहभ्रमा । या सज्जन संतमहंता - प्रति नमा । कुळदैवत श्रीवळनाथ तारिती अनाथ करिती सनाथ मान्य स्वजाती । होनाजी बाळा म्हणे वियोग न हो देहांतीं ॥ ४ ॥ श्रीशूर्पकर्ण० उद्धरती जन मुढ हे त्रिजगतीं तव ख्याती ॥

* * *

---

१ सर्पभूषण. २ विद्यासमुद्र. ३ शेष. ४ इंद्रास. ५ कान, डोळे, जीभ, नाक. ६ नवीन मेघांप्रमाणें कांती.

## ॥ गण तिसरा ॥ ३ ॥

चाल— वंदे श्रीगजमुखमगजानिवालं । विधुसुललितभालं ॥
— रामजोशी अथवा दामाजीची रसद.

गंगाधरसुतरंगगीतं । गीतसंगीतनृत्यसुरंगं । गर्जती मृदुस्वरसारंग ॥ चाल ॥ गजर करिती पदीं नेपुरनादें गररगर गररगती गती अवनीं स्तवनीं ॥ १ ॥ हेरंभ शृति संभवनी । चतुराक्षरा गणपती स्तुतीवाचे सरस्वती रस उद्भवनीं स्तवनीं ॥ ध्रु० ॥ जनवारण वक्रशुभानं । नदिपती निरीबुडीत निधानं । नमनीं निरसेभवभानं ॥ चाल ॥ न गणीत दुर्घट विघ्न कदापि चिरंजीव येकदंत त्रिभुवनीं स्तवनीं ॥ २ ॥ पढती श्रुतिवेद प्रतापं । पद खंडीत तीव्र त्रितापं । पक्षिती हरीजन अनुतापं । पदरज जो नर विनायकाचा तो अक्षय साधक संजिवनी ॥ ३ ॥ तीव्र तेज भावरधांती । तिप्पट सुखस्मरण सिद्धांती । तिष्ठती अति स्वजन सिद्धांती ॥ चाल ॥ तीन जगीं तूं कृपानिधी हे होनाजी बाळाप्रती मती कवनीं स्तवनीं हेरंभशाती ॥ ४ ॥

## ॥ गण चौथा ॥ ४ ॥

चाल— दैवप्राधान्य उभयतांचें ।
म्हणून भारजा रत्न लाधलेंस गुणवंताचें ॥

सांभतनय हेरंभ दयानिधी ॥ ध्रु० ॥ गितसंगीत करताल तालथैमान आलापित मोरचंग मृदंग काव्ळू करतालबीन सारंगी भेरीतुरई । बंबसुर मंडळ किंनरी सुरणा करणा सिंग बासरी दायल तबले सतार तंबुरी । छंद राग उपराग रागिण्या लगट ताल सुखरूपकझंपा चौताल मूळ तीन ग्रामते सप्तसुर एकवीस मुर्छना गायन गुण तव नृत्यारंभीं । येई त्वरें धाऊन विद्यानिधी ॥१॥ शिखीवेहनी[१] कमळोद्भवे[२] तनया विनय होऊन तुज प्रार्थित

१ मयूरवहनी. २ सरस्वती.

कविला वर दे सत्वर ब्रिद तव चरणीं । रुळती मजला स्तवनीं अनुसरलों कृपाकटाक्षें पाही आज हें माय माउली नृत्यकाळीं । विधिहरकर्त्ती टाळ घेऊनिया आपले स्वकरीं चोहों वाचाची तूं ईश्वरीं म्हणविशी बरवी । होनाजी बाळा शरण तुला चरण हृदयीं धरितो दिनरामा अंदुतव संगीमग आपलें महत्त्व जाणून धांव पाव आज रंग राखी जे गायन काळीं । भाव सबळ सद्भाव जयापदीं । सांबतनय हेरंभ दयानिधी ॥ २ ॥

## ॥ लावणी सांबाची ॥ ५ ॥

चाल— होळीला तुम्ही गृहीं असतां कधीं ॥

भाळलोचना नागभूषणा निलग्रीवा पशुपती । मुगुटीं जटेंत कोठून दिसती ललनेची आकृती ॥ ध्रु० ॥ नेटकी पद्मीण वनिता सुंदर केवळ बिंबोधरी । सांगतां मजप्रती वाटतें तूंच ठेविलें शिरीं । कोमळांग लावण्य सांवळी मूर्ति बहुत गोजिरी । नेत्र मृगासारखे चमकती विद्युल्लतेचे परी । निवळ धनुष्याकृती भोंवया शोभा वरी । कां हो चोरितां मला दक्षक्रतुदलना सांगा तरी । रत्नमाणिकें जडित सुशोभित सुरस कंकणें हातीं । तेज सांवळें करी उणें आणिति नक्षत्राप्रती । भाळलों० ॥ १ ॥ शिरीं अपूर्व वाहतसे तें गंगाजळें निर्मळ सुंदरें । जळावरील तें कमळ नव्हे मुख पहातां न्याहाळूं या बरें । कमळांतील मकरंद सेविती मिलिंदें प्राणेश्वरें । म्हणून सांवळें तेज तुला दिसतें हिमनगकुमरें । नेत्र नव्हे ते मीनें तळपती जिवनामधें येकसरें । नव्हे भोंवया सलिल लहेरी उदकाच्या प्रियकरें । रत्नमाणिकें नव्हेत जळावर ते तरंग उठती । वृष्टी करितां मेघ बिंदु नक्षत्रावत् झळकती । भाळलों०॥२॥ विश्वव्यापका विश्वपती विश्वेशा

---

१ स्त्रियेची. २ तोंडल्याप्रमाणें लाल ओठ जिचे. ३ दक्षाच्या यज्ञाचा नाश करणाऱ्या. ४ अप्रातिम. ५. गंगेचें पाणी. ६ सुधारस. ७ भ्रमर. ८ हिमालयपर्वतकन्ये. ९ मच्छ. १० उदकांत. ११ लाटा.

विश्वंभरा। विश्वोद्धारक विश्वरक्षणा इशान जगदीश्वरा। त्रिपुरांतक त्रिविध-तापहरणा। अहो त्र्यंबकेश्वरा भवभंजनभयहरणा। भूतादिपती अपर्णावरा[1] नागनाथ राजेंद्रभूषणा वृषभध्वज शंकरा। मदनदहन हे पंचवक्त्रा[2] भालचंद्रशेखरा। कुंडलकत कुचमंडळ दोन्ही कनक कलश भासती। अति बारिक चिर कंचुकि हिरवी भुजीं प्रभा दाविती। भाळलों० ॥ ३ ॥ प्रणवरूपिणी फरशांकुशकरमंडित सुखवर्धने। चिद्विलासिनि हे जगदंबे महिषासुरमर्दने। दाक्षायणे[3] अष्टभुजे अहो दुर्गे हिमनगनंदिने[4]। शुंभनिशुंभादिकें दैत्यदानवकुळनिकंदने[5]। कुच नव्हे तें चक्रवाक गंगातिरीं शुभमूर्धने। नव्हे चिर कंचुकी जळीं शेवाळ मनीं शोधने। वदे गिरजा शांभवा बोल हे अप्रमाण वाटती। होनाजी बाळ म्हणे उभयतां पदीं वसो चित्तवृत्ती। भाळलोचना नागभूषणा नीलग्रीवा पशुपती ॥ ४ ॥

## ॥ लावणी मार्तंडाची ॥ ६ ॥

चाल—परनार पट्याची धार घातकरी जीवा।
ब्रह्मादिक चकले काय इतरांचा केवा ॥

त्रिशूळधारी श्रीमल्हारी उभा पर्वतावरी। वामांगीं म्हाळसा शोभती चार आयुधें करीं। धर्मात्मज सप्तऋषी निभ्रांत त्या मनचुळ[6] पर्वतीं। सबळ दैत्य मणिमल्ल ते पद्मोद्भववरदे[7] या क्षितिं निर्जरांस[8] ते आले ऋषी आश्रमाप्रती। यज्ञकुंड विध्वंसुन ऋषी, प्रमदेलागुन ताडिती। सहकुटुंबें ऋषी जाउन राहिले आणिके स्थळीं निश्चिती। हें संकट वर्तमान सांगूं गेले इंद्राघरीं। इंद्र म्हणे ते अजिंक जिंकील विष्णुक्षणाभीतरीं ॥ १ ॥ असें ऐकून मखकारक विष्णुमंदिरांत पातले। रत्नमंडपीं हरीनें

---

१ पार्वतीपति. २ पांच मुखें आहेत ज्याला असा जो शंकर. ३ दक्षराजापासून झालेली जी पार्वती. ४ हिमालयपर्वताच्या मुली. ५ शुंभनिशुंभ यांचें हनन करणारी. ६ पर्वताचेंनांव. ७ ब्रह्मदेव. ८ देवांस.

त्यास वर्तमान सांगितलें। तो म्हणे क्षणांत त्रिनेत्र निवटील हे असुर मातले। चला सांगूं कैलासीं दैत्य जे तुम्हाश्रमीं वर्तले। भेटून शिवास निशाचरें अनुचित श्रवणीं घातलें। हें ऐकून शूळपाणी प्रतापें क्रोधाग्नि तापले। पिनाककर म्हणे चला शीघ्र तुम्ही मृत्युलोकीं सत्वरी। विदारून दैत्यास ऋषी स्थापुन मनचुळ शिखरीं ॥ २ ॥ सप्तकोटी सुरगणांसहित कर्पूरगौर धांवले। ऋषीरक्षणा लावी त्वरें मन चुळगिरीं पावले। सांभचमु आणि दैत्यचमुद्वय युद्धीं सरसावलें। विषकंठाचें वीरें दैत्यदळ स्वर्गपंथिं लाविलें। माणिमल दोघे उरले ते शंभुकरें विसाविलें। प्राणांताचे समयीं कांहीं वरदान मागूं भावले। दैत्य म्हणे निलकंठा तूं मज चरणरजें उद्धरी। मल्हारी हें नाम जनमुखीं वदीव कुंभिनीवरीं ॥ ३ ॥ शततारका नक्षत्र शुद्धपक्षीं मार्गेश्वरीं। चंपाषष्ठी मित्रवार अवतार धारीं पेमरीं ॥ मल्लांतकें नेमिली तेथून संस्थान पाली दुसरी। नळ दुर्गी तिसरें स्थळ बरवें चवथे जेजोरी। कृपाकटाक्षें करून पूजिती भक्त मूर्ति निजकरीं। तो हा मल्हारी दृष्टि पाहिला नगाचे शिरीं। होनाजी बाळा म्हणे आश्रय धरिला अंतरीं। तुजाविण त्राता नसे आम्हांला त्रैलोक्याभीतरीं। त्रिशूळपाणीधारी श्रीमल्हारी उभा पर्वतावरी ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ ७ ॥

चाल—कर्धांग साळू बोलसी आवडसी आम्हांला।
प्राणदान देऊं तुला हाचि लाभ झाला ॥

— सगन.

चाल—( दुसरी ) घनःशाम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला ॥

सोडी सोडी श्रीहरी रवी उदय करूं पाहे। मंदिरांत दीपरत्न शुभ्र दिसत आहे ॥ ध्रु० ॥ रात्र जागृतीमुळें आरक्त नेत्र जाहले। उभयतां

१ शंकर. २ शंकर. ३ पृथ्वीवर. ४ रविवार. ५ संस्थानाचें नांव. ६ लाल.

मुखासीं पीतवर्ण तेज आलें । सकळ यामिनींतें आजून कां न घालें ॥ ॥ टेक ॥ पति पाहती उभयतां तस्थींत केवी राहे ॥ सोडी० ॥ १ ॥ हें असो परंतु गृहानंद पत्नी जागी । येऊनिया चापतील जेव्हां हरि । तुज न देखतांच घाबरेल तीव्र रागी ॥ टेक ॥ दिन उदयीं पवेळीं तुझी हांबरते गाय ॥ सोडी० ॥ २ ॥ राधा पतिव्रता असे जगत्रया ठावें । हें जाणुन गुप्तवेष गोकुळीं कळावें । मम लज्जा रक्षुनी हरी सत्वरीं उठावें ॥ टेक ॥ गडी तुझे तुज बाहतात धांव लवलाहे ॥ सोडी० ॥ ३ ॥ सुरपती तुज वंदितात दीनोद्धारकारें । पदरज होनाजी बाळा निशिदिनीं तुज ध्याये । सोडी सोडी श्रीहरी ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ ८ ॥

चाल—हा फंदी फाकडा मज सांपडला गुंडा ।
चालूं दे प्रीत शेवटा देवा मार्तंडा ॥

श्रीअक्रूर तो क्रूर येऊन पूर्वीं कृष्णाला । आतां सई येशोदेचे द्वारीं हा कोण रथवाला ॥ ध्रु० ॥ पराधीन सांपडतां प्रपंचवणव्या माझारीं । मेघरूपें जन्मला यशोदे सदनीं पूतनारी । अंतरध्यांनीं हर्षकृत अवघ्या नारी । अक्रूरसमीरें वळवुन नेला जळंधरकंसारी । पंगु व्यंग चक्षुहीन पसरलों जो गिरीं कांतारीं । अक्रूर तस्करें नेली करींची काठी मुरारी ॥ चाल ॥ केवढा अनर्थ केला । गोकुळाहुन मथुरेला । यदुवीर घेउन गेला ॥ चाल ॥ श्रीहरीवियोगें अग्नींत लोटलें बाई । अक्रुरें । या वडिलपणाची भीड तरि धरिली कांहीं । अक्रुरें । मंदिरामाजीं मोहिली यशोदाबाई । अक्रुरें । मथुरेप्रती नेला क्षीराब्धीचा जावाई । अक्रुरें । घातल्या अवघ्या

१ पिवळे. २ रात्रींत. ३ गाईचें नांव. ४ बोलावितात. ५ लवकरी. ६ प्रपंचरूप वणव्यांत. ७ मनांत. ८ अक्रूररूप वाऱ्यानें. ९ कृष्णरूप मेघ. १० वनांत. ११ चोरानें.

गोपी शोक प्रवाहीं। अक्रुरें। अक्रूर हें नामाभिधान सांगून पाही। अक्रुरें। निष्ठुरपणें केली गोकुळांत आतई। अक्रुरें। रात्रौसमईं येकांतीं बोधिले भोळ्या नंदाला। सिद्ध केलें न्यावया राम हरि या उत्साहाला॥ १॥ ही वार्ता ते वेळीं श्रुत जाली गोकुळग्रामासी। उदईक जातो श्रीरंग होतो मथुरानिवासी। अरुणोदईं रथीं बसुन घेउन जातो कृष्णासी। आडव्या होउनी गोपी विनविती बहुत अक्रूरासी। तूं एक उदार दाता याचकें आम्ही आलों तुजपासीं। नको नेऊं सांवळा दान दे येवढें आम्हांसी॥ चाल॥ घातकी अक्रूर कळला। किंचित् नाहीं वळला। निर्दयसा आढळला॥ चाल॥ आमची करुणा नुमजुन किंचित् मनातें। अक्रुरें। यादवांत वडिलपणाचें तोडून नातें। अक्रुरें। मानून हृदयें चांडाळ कंस आज्ञेतें। अक्रुरें। घडघडा रथ चालविला मथुरापंथें। अक्रुरें। हरिवियोग-जळीं बुडवून या सर्व जनांतें। अक्रुरें। कैसें नेलें उभयतां रामकृष्णांतें। अक्रुरें। शोकार्णवीं[1] टाकून मागें व्रजप्रमेदांतें। अक्रुरें॥ चाल॥ हरिविलासीं रत असतां हा अक्रूर कोठुन आला। तळमळींत गोकुळाष्टाजीं[2] ठेविलें वृजजनीं ललनांला[3]॥ २॥ धांवा धांवा सख्यांनो विसावा जातो प्राणाचा। आण घाढ्न अक्रूरास रथ फिरवूं श्रीरंगाचा। न दे तरी आणूं हिरून करूं संकल्प जीवित्वाचा। आम्ही इतुक्या जणी कोण पाड येकल्या अक्रूराचा। हा कृतार्थ कृतनिश्चय ठरला सर्वत्रांचा। त्या दुर्जनें दूर लांबविला स्यंदनें[4] गोपाळांचा॥ चाल॥ मग झाली निराशा, बाई नेलें सर्वेशा, अंतरलों हृषीकेषा॥ चाल॥ आज दुरावलों आम्ही पाहा कमळ-पत्राक्षा। अक्रुरा। ठेवी तशीच आमच्या हृदयांत अपेक्षा। अक्रुरा। गोपिकांस झिडकाविलें हरी मागत भिक्षा। अक्रुरा। गोकुळच्या जनांस दिधली प्रेतदीक्षा[5]। अक्रुरा। प्रभु प्रजासहित सर्वांस लाविली शिक्षा। अक्रुरा। नाहीं भोगूं दिधली चित्तपरीक्षा॥ अक्रुरा॥ तोचि असा कीं

१ शोकसमुद्रांत. २ गोकुळांतील स्त्रिया. ३ स्त्रियाला. ४ रथ. ५ प्रेतकळा.

काय अजून हें नकळे कोणाला । नाहीं त्याचा विश्वास जाईल अवचित घाद्धून घाला ॥ ३ ॥ पूर्वी प्रणाम करणें वाल्मीकवचनाशीं । निमित्यास कैकयी निघाली राघव वनवाशी । ते वेळें अति दुःख झालें अयोध्या-ग्रामाशीं । सकळ प्रजाजन मिळुन वेष्टिलें जानकीजिवनाशीं । हें दुःख सांगती नितंबिनी यमुनातिराशीं । कृष्णासारिखा कृष्णभक्त पाहिलें उद्धवाशी । चाल ॥ म्हणती घनसांवळा । कटीं पितांबर पिवळा । कधीं आला गोकुळा ॥ चाल ॥ करुणा जाणुन हरी आणिला गोकुळभुवनीं । अक्रुरा । नाना परि केला शोक ऐकिला श्रवणीं । अक्रुरा । पाहिल्या विकळ[1] व्रजवनितौ[2] दडल्या अवनीं । अक्रुरा । मरत्यास दिधली जय अमृत-संजीवनी । अक्रुरा । जणु धर्मन्यायें लवण[3] मिळविलें जीवनी । अक्रुरा । वाटतें कळवळा धरितां आमचे स्तवनीं । अक्रुरा । जवळ येऊन न्याहाळितां दृष्टी देखिलें उद्धवाला । होनाजी बाळा म्हणे उद्धव बोधील गोपिकाला ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णराधाची ॥ ९ ॥

चाल– कोठें करमिली रात्र सांग रे वात सारिते मुखाकडे ।
कां निजलासी पाठमोरा हतावेड्या खव्याकडे ॥ – सगन.

राधा म्हणे श्रीहरी तुम्ही रात्रीं होता कोणे ठाईं ॥ तें सांगा मजप्रती आतां सत्वर भूधरशाई[4] ॥ ध्रु० ॥ नूतन वधु[5] देखण्या गोकुळामध्यें गोंवळबाळी[6] । नित्य तुम्हांला हरी नवीन एक हृदयीं कवटाळी । चार प्रहर क्रमिली निशी कोणे घरीं वनमाळी । आला नेत्र पुशीत उठून येवढे प्रातःकाळीं । सुरस गंध केशरी टिळक वर कस्तुरी भाळीं[7] । धर्मानें पुसिला भोगली कोणीतरी वेल्हाळी[8] । दिसती नेत्र आरक्त मुखावर तेज कचित् नाहीं ॥ १ ॥ वर्तमान साद्यंत हकीकत नाहीं तुला कळली । श्रवण करी

---

१ शोकग्रस्त. २ स्त्रिया. ३ मीठ. ४ शेषशायी ( कृष्ण ). ५ स्त्रिया. ६ गोंवळ्याच्या मुली. ७ कपाळास. ८ सुंदर नार.

तूं बरें अंतरीं घे समजुन वहिली । वनामाजीं पोवळी गाय माझी पळून गेली । तिला आणायासाठीं राधिके रात्र बहुत झाली । ते श्रम झाले आम्हांसी रात्रीं असी जागृती घडली । त्यायोगें आरक्त नेत्र मुखीं पीतै दशा आली । तेज नसे यालागीं राधिके मनीं शोधून पाही ॥ २ ॥ कांहो रुळला दिसे चिरा[2] मस्तकिंचा श्रीरंगा । पेच असे मोकळा मनीं विचारा भवभयभंगा[3] । सुगंध वस्त्रें सारीं येतो परिमळ तुमच्या आंगा । न बोलतां हें असत्य हरी तुम्ही मजपासी सांगा । ओठ कां हो सुकले गोपीमानस-राजीवभृंगा । प्रवर्तला कांहीं म्हणा तुम्ही रात्रीं स्त्रीच्या प्रसंगा[4] । गालाला अंजन[5] लागायाचें कारण काई ? ॥ ३ ॥ आणावया पुष्पें माध्याह्नीं मळ्या-मधीं गेलों । आकाशीं घन[6] वर्षतांच मग मी जाई तळीं बैसलों । पडतां वर पुष्पाचे बिंदु मी तळीं अवघा भिजलों । सुगंध त्याचा असे परस्थळीं नाहीं कोठें रमलों । ओठ सखे सुकले धुंडितां गाई वनीं श्रमलों । तरुसं[7] गुंतला चिरा ठाउक नसे भ्रांतींत भ्रमलों । म्हणून पेंच मोकळा टिळ्याची गाली काळिमाही ॥ ४ ॥ क्षिराब्धिवासा जगन्निवासा अहो यदुकुळभूषणा । हे गोविंद मुकुंद मुरारे अच्युत मधुसूदना । जगव्यापक हे जगनिधी गोपीमानसमोहना । शकटांतक श्रीहरी भजन हे रुक्मिणीच्या रमणा । चार वेद षड्शास्त्रें पुराणें अठराही नाना । शिणलीं गुण वर्णितां न येशी तूं त्यांच्या ध्याना॥ होनाजी बाळ वसो दृढनिश्चय तुजपाईं । ते सांगा मजप्रती आतां सत्वरभूधरशाई ॥

## ॥ लावणी पंढरीनाथाची ॥ १० ॥

**चाल—** क्षमातळीं इज समान नाहीं उमामहेश्वरपुरीं ।
पुरी पडेना काशी मग इतर दासी न कोणी अशी हो पंढरी ॥
— रामजोशी.

---

१. पिवळी ( पिंगट ). २ मंदिल. ३ संसारसुखाचें नाश करणाऱ्या. ४ सुरतसुखांत. ५ काजळ. ६ पाऊस. ७ झाडास.

अन्यक्षेत्र द्वारकादि करून रक्षण भीमातिरीं । दृष्टी आवडी पाहिली पवित्र भूवैकुंठपीठ पंढरी ॥ ध्रु० ॥ समपदकटीं कर ठेउन सांवळा विटेवर अक्षई उभा । निशिदिनीं तिष्ठत भक्तांचा सखा वैकुंठपुरिचा सुभा । मकराकृति कुंडलें सुशोभित श्रवणीं फांकती प्रभा । इंद्रनीळापरि कांती ज्याची तो रंग चढला नभां[1] । ब्रह्मवेत्ते स्वानंद भरित भाविक संतांची सभा । नामस्मरणें करुनि आळविती त्या रुक्मिणिवल्लभा ॥ चाल ॥ मृदु मृदु मृदंगमंजिरें । वाजती विणे सुस्वरें । नाचती प्रेमाच्या भरें । सद्गदित अंतरें । आलिंगन कवळुन देती करीं ॥ ध्रु० ॥ ॥ १ ॥ हरिनामाचा गजर पताका वाळवंटिं फडकती । ठायीं ठायीं कीर्तनीं संत आपणचि नटला श्रीपती । कोठें सांगे ब्रह्मज्ञान कोठें सांगे राज्यनीती । कोठें सांगे प्रपंच व्युत्पत्ति । कोठें सांगे गोकुळांतील स्वयें बाळपणाच्या स्थिती । कोठें सांगे गोपीचे विषय प्रेमयुक्त बहुधारीती ॥ चाल ॥ कोठें उद्धव बोलावुनि धाडी गोकुळालागुनी । म्हणे ये गोपीस बोधुनी । श्रोतावक्ता आपण होउनी । रंग कीर्तनीं भरी ॥ २ ॥ कृतायुगीचे ठायीं जनाला ध्यान प्राप्तिच्या श्रयें । त्रेतायुगीं महा महा यज्ञ ज्यातें समर्पिती स्वयें । द्वापारयुगीं नीतिराज्य उपचार अर्पिती प्रियें । परी द्वारका प्रभुची यत्किंचित पदप्राप्ती नये । कलियुग चतुर्थयांत भक्तजन नामीं धरुन निश्चयें । आठउन हृदयीं निरंतर वर्तती जगामाजी निर्भयें ॥ चाल ॥ जें परब्रह्म सांवळें ॥ साहीचहू[2] आठरा न कळे । तें विटेवर स्वनामलिळें । भक्तजनांप्रती बळें । स्वअधें[3] उद्धरीत श्रीहरी ॥ ३ ॥ रामनाम हें तारक नौकाभवाब्धींत दिनिनिशीं । प्रवर्तला हा केशव सदैव तिष्ठत भक्तांपाशीं । करी भवाब्धीपार म्हणुन ते भगवत्जनयेविशीं । नामीं धरुन विश्वास सदा रत श्रवण मनन मानसीं । सदा सर्वकाळ स्नेह ठेवुन वाढवीत मायबाळका जसी । घनःशामदासावर प्रत्यहीं कृपा करी तसतशी ॥ चाल ॥ नामीं

१ आकाशांत. २ शास्त्रें, वेद व पुराणें यांस. ३ पातकें.

धरितां आवडी । दर्शनी मुक्ति रोकडी । तो गोपाळांचा गडी । आठवितां घडोघडी । देतसे पदअचळे[1] अंबेरीं[2] । होनाजी बाळा म्हणे हरी रमवा निजमंदिरीं । अन्य क्षेत्र ॥ ४ ॥

## ॥ भूपाळी ॥ लावणी ॥ ११ ॥

घनःशाम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला । उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला । ॥ ध्रु० ॥ सायंकाळीं एकेमेळीं द्विजगण अवघे वृक्षीं । अरुणोदय होतांच उडाले चरावया पक्षी । अघमर्षणादि करुनि तापसी तपाचरण दक्षी । प्रभातकाळीं उठुनि कावडी तीर्थपथ लक्षी । करुनि सडासंमार्जन गोपी कुंभ घेउनि कुक्षी । यमुनाजळासि जाती मुकुंदा दध्योदन भक्षीं ॥ चाल ॥ मुक्तता होउं पाहे, कमळिणी-पाशुनी भ्रमरा । पूर्व दिशे मुख धुतलें, होतसे नाश तिमिरा । उठिं लवकरी गोविंदा, सांवळ्या नंदा कुमरा ॥ चाल पहिली ॥ मुख प्रक्षाळण करी अंगिकारी भाकरकाला । उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ घनःशामसुंदरा श्रीधरा० ॥ १ ॥ घरोघरीं दीप अखंड त्याच्या सरसावुनि वाती । गीत गाती सप्रेमें गोपी सदना येती जाती । प्रवर्तोनि गृहकामीं रंगावळीं घालुं पाहती । आनंदकंदा प्रभात झाली उठ सरली राती । काढि धार क्षिरपात्र घेउनी धेनू हंबरती । द्वारिं उभे गोपाळ हाक मारुनि तुजला वाहती ॥ चाल ॥ हे मुक्तहार कंठीं, घालीं या रत्नमाळा । हातीं वेत्रयष्टि बरवी, कांबळा घेई काळा । ममात्मजा मधुसुदना, हृषिकेशी जगत्पाळा ॥ चाल पहिली ॥ लक्षिताती वासुरें हरि धेनुस्तनपानाला । उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ घनःशामसुंदरा श्रीधरा० ॥ २ ॥ प्रातःस्नानें करुनि गोपिका अलंकारें नटती । कुंकुमादि चर्चुनी मंथनालागिं आरंभीती । प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावळी गाती ।

---

१ अढळपद. २ स्वर्गात.

अर्घ्यदान देउनिया द्विजगण देवार्चन करिती । नेमनिष्ठ वैष्णव ते विष्णु-पूजा समर्पिती । स्मार्त शिवार्चनसक्त शक्तीतें शाक्तहि आराधिती ॥ चाल ॥ ऋषीगण आश्रमवासी, जे निरंजनीं धाले । अरुणोदयिं आपुलाले, ध्यानीं निमग्न झाले । पंचपंच उषःकालीं, रविचक्र निघों आले ॥ चाल पहिली ॥ एवढा वेळ निजलासि म्हणुन हरि समजेल नंदाला । उठिं लौकर वन-माळी उदयाचळीं मित्र आला ॥ घनःशाम सुंदरा श्रीधरा० ॥ ३ ॥ विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं । अध्यापन गुरु करिती शिष्यहि अध्ययना उदयीं । याज्ञिकजन कुंडामधिं आहुति टाकितात पाहीं । रविप्रभा पडुनियां उजळल्या शुद्ध दिशा दाही ॥ हें माझें पाडसें सांवळे उठ कृष्णाबाई ॥ सिद्ध सर्वे बळिराम घेउनि गोधनें वना जाई ॥ चाल ॥ मुनिजनमानस-हंसा, श्रीमनःकमलशृंगा । मुरहर पंकजपाणी, पद्मनाभ श्रीरंगा । शकटां-तक सर्वेशा, हे हरि प्रतापतुंगा ॥ चाल पहिली ॥ कोटिरवींहुनी तेज आगळें तुझिया वदनाला । होनाजी बाळ नित्य ध्यातसे, हृदयीं नाममाळा । उठिं लौकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥ घनःशाम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला ॥ ४ ॥

## ॥ कृष्णाची लावणी ॥ १२ ॥

चाल—हा फंदीफांकडा मज सांपडला गुंडा ।
चालूं दे प्रीत शेवटा देवा मार्तंडा ॥

उद्धवा गोपी वांछिती हरी सुखसंगा । तुम्ही जा मथुरेसी घेउनिया श्रीरंगा ॥ध्रु०॥ अवतरले यशोदे सदनीं श्रीहरी जेव्हां । आम्ही तारी व्रजाच्या[1] आनंदलों मनीं तेव्हां ॥ आजन्म भाग्यसंयोग पूर्वीचा ठेवा । म्हणवून विलासी अनुसरलों केशवा ॥ सावळें सगुण सद्रूप उद्धवा केव्हां । दाखवितां दृष्टी यश जोडशील येव्हां ॥ चाल ॥ येऊन दुष्ट अक्रुरें हें

१ गोकुळींच्या.

केले कृत्य उद्धवा ॥ दाखवी दृष्टि सुरमर्दना झालों भृत्य ॥ उद्धवा ॥ पाषाणें घेऊन आम्हीं मस्तक फोडूं परतें ॥उद्धवा॥ जाऊन मथुरेसीं सांगत याला सत्य ॥ उद्धवा ॥ हरि तुझ्या वियोगें गोपी पावल्या मृत्यें ॥ उद्धवा ॥ टाकिली रक्षा यमुनेमधि न्याहाळून प्रेतें ॥ उद्धवा ॥ त्या उदकें करीन आंघुळी आणून हरी येथें ॥ उद्धवा ॥ मुरलीध्वनी करिव येकदां जाळल्या तेथें ॥ उद्धवा ॥ धाडिलें तुला पहावया गोपिचीं चित्तें ॥ उद्धवा ॥ अंतरलों आम्हीं सांवळ्या भक्त भवभंगा ॥ १ ॥ जयेपासुनी हरी गोकुळीचें निधान गेलें । तैंपासून गोकुळ अवघें उदासलेलें । चातके आम्ही पाहा आमचें भाग्य उदेलें । वाटतें हरी मेघबिंदु रे भले । मातापितयास मुख्य स्थळीं त्यजियलें । मथुरेंत राहावें बरें हरीनें केलें ॥ चाल ॥ आम्ही कठोर पाहा केवढ्या गवळ्यांच्या नारी ॥ उद्धवा ॥ वांचलों अजून हरी नसतां या संसारीं ॥ उद्धवा ॥ जो जिवंत गोकुळीं तो भेटवी पुतनारी ॥ उद्धवा ॥ तुझिया बळें तो वर्ततो मुरारी ॥ उद्धवा ॥ हें कोणी नांव ठेविलें अवधारी ॥ उद्धवा ॥ तो क्रूर केवळ निष्ठुर मनाचा भारी ॥ उद्धवा ॥ तूं जलद जाउन आम्हांला तारी । श्रीहरिवियोग हा रोग देहामाझारीं ॥ उद्धवा ॥ श्रीकृष्ण कृपारस दें कर आरोग्य काया सारी ॥ उद्धवा ॥ दाखवी दृष्टी उद्धवा सांवळ्या श्रीरंगा ॥ २ ॥ उद्धवा तटस्थ निश्चय पाहून गोपींचें । न कळे कोणासी कर्तृत्व धन्य श्रीहरीचें । लागलें ध्यान गोपीला सगुण रूपाचें । निर्गुण दावितां प्राण वांचती कैंचे । हरी तूं बोधिव आकळी मन बुजवानितांचे । ह्या न मानिती ब्रह्मज्ञान कथितां वाचें ॥ चाल ॥ उद्धव म्हणे ऐका सावधपणें कांहीं श्रीपती । तुम्ही व्यर्थची भ्रमतां तो तुम्हां वेगळा नाहीं ॥ श्रीपती ॥ नाना तरंग येक सागर स्वरूप पाहीं ॥ श्रीपती ॥ रांजणी घागरीं सूर्यबिंब येक तऱ्हा ही ॥ श्रीपती ॥ अभेद सूत्र वर तामणी सुगराई ॥ श्रीपती ॥ धरूं जातां जवळ किंचित् बचकेंत न

१ दगड. २ मेल्या. ३ रत्न. ४ पूतनेचा शत्रु. ५ शरीर.

राही ॥ श्रीपती ॥ परिगार रूप हें हातासी तें लवलाही ॥ श्रीपती ॥ कस्तुरी ती दृष्टी सगुणरूपी पाही ॥ श्रीपती ॥ जो सुगंध तो निर्विकार खुण बळकावी ॥ श्रीपती ॥ तो जवळ असून कां पडतां व्यर्थ प्रवांहीं ॥ श्रीपती ॥ कोठें जाउन आणुं श्रीहरी हें मज सांगा ॥ ३ ॥ जे बसले असतील वनीं नागवे उघडे । हें ज्ञान तुझें उद्धवा कथी त्यापुढें । दाखवी आम्हांला सगुण सांवळें रुपडें । नाचतां राम मंडपीं गोपीला आवडे । वाजवी सुंदर मोहरी व्रजवृंदें आवडे । ती ध्वनी ऐकुन चित्त मन त्याजकडे ॥ चाल ॥ अक्षई रत झालों आम्ही सगुण रूपासी ॥ उद्धवा ॥ हा विसर पडेल केंवी गोपिकांसी अबळासी ॥ उद्धवा ॥ तूं बहुत आवडता कसे प्राण हरणासी ॥ उद्धवा ॥ प्रत्यया आलें सांगितलें ज्ञान आम्हांसी ॥ उद्धवा ॥ तुझिया श्रवणें समजलों निर्विकारासीं ॥ उद्धवा ॥ तूं दिव्य ज्ञान बोधिलें गोपव्रजांसी ॥ उद्धवा ॥ रहा चातुरमास गोकुळीं निश्चय श्रवणासी ॥ उद्धवा ॥ होनाजी बाळा लावुन या लक्ष पदासीं ॥ उद्धवा ॥ गुण गाय प्रेम आवडी श्रीहरिचरणासीं[२] ॥ उद्धवा ॥ रामा अंदुत्वं पदिं लीन स्मरण प्रसंगा ॥ ४ ॥ तुम्ही०

## ॥ लावणी कृष्णाची ॥ १३ ॥

चाल—घनःश्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला ।
उठिं लवकरी वनमाळी उदयाचळीं० ॥

नंदनंदना हे वृंदावनवासा[३] पूर्णकामा । कोठें गुंतलास कोणत्या विलासा त्यर्जुन आम्हां ॥ ध्रु० ॥ मधुसुदना मुरमर्दना मुकुंदा शेषशोई[५] । प्रवर्तलों असंतां आम्ही विषय छंदा तुझे ठायीं । अच्चळ अनाम अलक्ष निरद्वंद्वा सांग कांहीं । आम्हां त्यागिलेंस कोणत्या संबंधावरून पाही ।

१ वाहवतां का. २ कृष्णास. ३ तुळशीवनांत राहणाऱ्या (कृष्णा). ४ टाकुनी. ५ शेषावर निजणाऱ्या (विष्णु).

तुजविण त्राता आम्हांलागीं श्रीगोविंदा दुजा नाहीं । विसरूं ना कदापी तव पदारविंदा सर्वथाही । देई दर्शन किती पहासी तमाशा घनःशामा ॥१॥ हे अनंत वेषधारका मुरारी मोक्षदानी । आम्ही तुजवांचून सर्व गोपी नारी दैन्यवाणी । हे विरंचितात मधुकैठभारी चक्रपाणी । विषयसंकटीं तुज पहावें पुतनारी कोणे स्थानीं । हे स्मरारी गोवर्धनधारी गदापाणी । आम्हा चातकाशीं मेघ होउन तारि या निर्वाणीं । अशा दुर्बळास पावशी केव्हांसा सौख्यधामा ॥ २ ॥ जाईजुई मालती बकुळी खर्जुरी हो तुझी आतां । देखिली कीं काय सांगा सुंदरी हो गोपीनाथा । कुमुदिनी कमळणी स्वस्त सरोवरीं हो येथें रहातां । देखिलें कीं काय कर्दळी बदरीं होम दनताता । देवदार आणिक तुळसी मंजुरी होईकुन जातां । देखिलें काय सांगा तुम्ही तरी हो शेषभ्राता । पाही नेत्र उदित भक्तहृदयें वासा मनोआरमा ॥ ३ ॥ हे वैकुंठपते अद्वया अव्यक्ता गुणसमुद्रा । कोठें आली न कळे गोपीविरह सक्ता त्यजुनी निद्रा । म्हणविसी तूं गीतेमाजीं पार्थवक्ता निर्जरेंद्रा । रासमंडळांत व्रजवासी भोक्ता पूर्ण चंद्रा । होसी प्राप्त आम्हां तूं विषययुक्ता इंद्रचंद्रा । म्हणे होनाजी बाळा सदां तुझे भक्ताहृदयीं मुद्रा पाव श्रीहरी असाच तुझा दासा कासीरामा ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ १४ ॥

चाल—रुंद छातीवर बुंद गेंद जणुं गुलाब बहरामधीं फुलती ।
वसंतकाळीं कळे कोवळे तसे तुझे जोबन खुलती ॥ —प्रभाकर.

राधा हरिला पुसती नेत्र विलसती लाल भासती उघड दिसती दृष्ट धुंमिली । सांगा मजला श्रीपती काल तुम्ही रात्र कोठें क्रमिली ॥ ध्रु० ॥ नाजुक कोंवळे निखळ निवळें झालें पिवळें स्वरूप सांवळें सकळ लोपलें।

१ पादरूपकमला. २ कृष्ण. ३ महादेव. ४ गोवर्धन पर्वत उचलणारा. ५ गदा ज्याच्या हातीं तो. ६. धुंद.

परगृहीं अतुरागृहीं ज्या गृहीं निद्रेनें व्यापिलें । नवतीचे दिवस हे चार म्हणून व्यभिचार[1] करून साचार त्यजुन आचार भाव आपले । हे लटके शब्द नेटके करून चेटके बरें स्थापिलें । नूतन केशर निर्मळ जवादीमळ अंगीं आमळ सुरस परिमळ सुगंध लेपले । पुष्पहार कंठीं जो हार करा परिहार वचन सोपलें ॥ चाल ॥ जाउन विषयाचे बळें ॥ श्रीपती ॥ तुम्ही रतलां पर अबळें[2] ॥ श्रीपती ॥ आरक्त झालीं बुबळें ॥ श्रीपती ॥ नेतां यमुनातिरा बळें ॥ श्रीपती ॥ जी तुम्हांसवें रतली तिच्या हातिची विडी[3] घेतली तेणें जिंतिली घटका वर्मली ॥ १ ॥ तव प्रीतविषय अधिके सौख्य साधिके वृत्ति वेधिके अहो राधिके तूं मनमोहने । ढवळी पिंवळी सांवळी धेनू चुकल्यास धुंडिलीं वनें । पाहा प्रचीत बसूनया निचिंत नको मन दुचीत पडियेलें खचीत आम्हां धांवणें । राहिली तितुकी वायली पाहिली तुळसी वृंदावनें । त्या जळधारा वर्षती नाहीं फुरसती न पक्षि स्पर्शती चारा चावणें । हें अरिष्ट येवढें वरिष्ठ येथें परिष्ट प्रिये दावणें ॥ चाल ॥ कर शोध मनीं दुरवरी ॥ राधिके ॥ नको करूं छळणा वरवरी ॥ राधिके ॥ इ का व्यर्थची आणसी तूं अपमानसी हृदयीं छानसी तुझ्या मानसीं ममरित भ्रामिलों ॥ २ ॥ ल्हान परि परवधु नव्या नूतन ह्या नव्या मनीं मानाव्या करून ओणव्या तुम्ही ठकविल्या । कंसारी विषय रतीसारी गोपमुलि संसारी मुकविल्या । हे गुण तुम्हांत वित्पत्ती आहो । श्रीपति अशी विपत्ती । कसी लोपती उदंड चुकविल्या । घडीं कथितां पळक्षण जरा देहि हें अमृतफळ पिकविल्या । जाऊन परसदनांतरीं कामनांतरीं मिथुन अंतरीं अशा कितितरी स्त्रिया छकविल्या । लोकांतीं विषयसुखांतीं गोष्टी म्यां येकांतीं शिकविल्या ॥ चाल ॥ शिरीं तिवट पेच गुंतले ॥ श्रीपती ॥ जवेमणी हृदयीं रुतले ॥ श्रीपती ॥ पीतवर्ण मुखें जिंतले ॥ श्रीपती ॥ कार्यानिमित्त चिंतलें ॥ श्रीपती ॥ श्रीहरी तुम्ही श्रेष्ठ पदांत गोप्रमदांत हो

---

१ जारकर्म २ स्त्रियेशीं. ३ विडा.

आनंदांत विषयनादांत गोष्ट शर्मिलें ॥ ३ ॥ गुण सुगुण प्राणवल्लभ सौख्यें सुलभें विषय दुर्लभ तुझा वल्लभें आम्ही दिनिनिशीं । नसतां घरीं नंदातें न कळे हा वृत्तान्त आम्हां जसजसा कुणबी शेतकण निसी । त्यागती वृत्ति रंगती तुझ्या आमचें मननिसीं । निर्धन धन सांपडे भ्रांती ना पडे सदा बापडें तें मन भाबडें करून घननिसीं । तुज तसें हें मन भजतसें विषयीं रिझतसें प्रीतपणानिसी ॥ चाल ॥ कवि शांत गुणरतन राधिके । होनाजी बाळाचें वतन राधिके । आधिं करून मतीचें मथन ॥ राधिके ॥ कथिलें श्रीहरीचें कथन ॥ राधिके ॥ रामा आंदु करितो श्रवण अक्षरें वनसुधारस कवनें होतीं उद्भवन वृत्ती निर्मिली ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ १५ ॥

चाल—वा काय घालतोसी संसृतीचा पिंगा रे ।
या मानवदेहीं भज रे० ॥
अथवा— हा फंदी फाकडा मज सांपडला गुंडा ।
चालूं दे प्रीत शेवटीं देवा मार्तंडा ॥

सोडी वाट जाऊं दे मला शामसुंदरा रे भक्तकाम[1]कल्पद्रुम हरी धुरंधरा ॥ ध्रु० ॥ जळ हें न्यावयासी मित्रकन्ये[2]चे तटीं । दिवसां दोप्रहरीं आली सहज एकटी । पदर धरून घातलें त्वां व्यर्थ संकटीं । व्रज-वनितालागीं कसें अडविसी भलतेच मिसें । मार्गीं अवगुण असे अयोग्य श्रीधरा ॥ १ ॥ आधींच तुझी सांवळीं मूर्त गोजिरी । सदनीं तृषा हरणी नेत पूर्ण घट शिरीं कंदुकें[3] दें म्हणवून त्वां धरियेली निरी । छी छी हें करिसी काय करिसी विचक्षणा येथुन जाय धरितसे मी तुझे पाय अरे गदाधरा ॥ २ ॥ नवल परी यशोदेशीं गोष्टी सांगसी । गोपमुलांमाजि श्रेष्ठपणें वागसी । कंदुक मजपासीं नसुन कां तूं मागसी । पहा चित्त

१ भक्तांची इच्छा पूर्ण करणारा कल्पवृक्ष. २ यमुना. ३ चेंडू.

अनुभवें हें हरी तुज योग नव्हे टाकि टाकि असी सर्वे सुगुणमंदिरा ॥ ३ ॥ तव करीं इंदिरावरा[1] आमची स्थिती । व्यर्थ छळावें आम्हांसी हें तुझे चित्तीं । राज्यभार चालविशी कोणते रितीं । वर्तसी अज्ञानपणें लौकिकासी होय उणे होनाजी बाळा म्हणे सुरेख कंदरा ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ १६ ॥

चाल— रतिवंत महाराज पेशवे अमोलिक सुर्ती मोती ।
सवाई माधवराव सवारी निघाली नवाबावरतीं ॥

जन्मोजन्मीं हरिप्राप्ती स्तवते उदीत भामासती[2] । प्रश्न पुसून नारदालागीं दान दिधला श्रीपती ॥ ध्रु० ॥ सत्राजित प्रभुची कन्या ती भामा सुंदरी। द्वारीं स्वर्गीचा वृक्ष स्यमंतक मणी पित्याच्या घरीं । त्या ऐश्वर्यावरून न मानी कोणा द्वारकेपुरीं । जन्मोजन्मीं प्राप्ती हरीची इच्छितसे अंतरीं । तो नारद पातला अकल्पित भामेच्या मंदिरीं । ती म्हणे नारदा हरिप्राप्तीची युक्त सांगा मज बरी ॥ चाल ॥ नारद म्हणे हे आवळा । नेणुन हरिची कळा । इच्छित अंत सांवळा ॥ चाल ॥ नारदे बुद्धि सांगितली बरवे परी । दानासी कृष्ण दे भामे आपले करीं । होईल प्राप्त जन्मोजन्मीं श्रीहरी ॥ चाल ॥ ऐसें उत्तर भामा ऐकुनी । पुसती एकांती हरीलागुनी । दाना देते द्विजं[3] बोलाउनी । हें तो मानेल कीं तुमचे मनीं । भामे हरी म्हणे त्वरा कर झणीं । सखये ही मात न फुटतां जनीं ॥ चाल ॥ अति हर्षे सत्राजितबाळी[4] । पूजा आणि सामोग्री ते काळीं । सिद्ध करून ठेवी वेल्हाळी ॥ चाल ॥ गंध अक्षता नाना परिचीं सुगंध पुष्पें निरांजन आणि कर्पुर आरत्या परमानंद हृदयीं भामेच्या नंदनास श्रीगोविंदजीस बसवून मुनीपुढें ॥ चाल ॥ यथाविधी संकल्प करुनी हरि दिलों[5] नारदाहातीं ।

---

१ लक्ष्मीपति. २ सत्यभामा. ३ ब्राह्मण. ४ सत्राजिताची कन्या. ५ अर्पण केला.

नारद म्हणे हें त्रिजग धुंडितां न मिळे असा सोबती ॥ १ ॥ नारद म्हणे उठ चाल त्वरें मज सवें जगन्नायका । विणा गवाळें पुस्तक सांभाळी आमच्या पादुका[1] । हें काय आज आश्चर्य अगा हे वैकुंठीचा सखा । याच्या खांदा ओझें नेतसे कोठें नारद नेटका । केलें दान भामेनें नारदा-प्रती यदुकुळटिळका । प्रगटतां हे मात आल्या भामेसदनीं गोपिका ॥ चाल ॥ मंद्रावती बोले मुखें । भामे अनर्थकारके । तव ज्ञान आम्हां ठावकें ॥ चाल ॥ पाऱ्यातक पुष्प हें स्वर्गीहून आणिलें । तें सहज रुक्मिणीप्रती हरीनें दिलें । निर्वाण तयाचें त्वां फारच मांडलें ॥ चाल ॥ स्वर्गीं हरी या कामें लाविला तेव्हां त्वां स्वर्गवृक्ष देखिला । तो त्वां जंव द्वारीं आणून लाविला तेव्हां जीव तुझा संतोषला । एक वेगळी करून रुक्मिणी । अष्ट नायका आदि कामिनी । सर्व आल्या गजगामिनी तैशा। तळपतात सौदामिनी[2] जैशा । गर्जतात कैशा हरिदानालागीं स्वामिनी। कोण होसी वैरीण भासे अनर्थ न पाहतां त्वां अप परमार्थ गमाउनी व्यर्थ, पतिदानार्थ, कोण शास्त्रार्थ, सुचविला । म्हणे देवकी नवमास उदरीं माझ्या हरी गर्भस्थिती । माझें बाळ द्यावयास दान तूं कोण होसी निश्चिती ॥ २ ॥ लक्ष्मणा यज्ञजिती म्हणे साधिलें सवतीमत्सरा । तुझ्या पित्यानें मण्यानिमित्यें वनीं धाडिलें यदुविरा । पहा पहा केवढा अनर्थ निर्दाळिलें प्रशंशी नवरा । हा मणी घातला घातला जीवा सत्राजित नृपवरा । अनर्थकारक मणी प्रत्यहीं वसे तुझ्या मंदिरा । याच निमित्यें जांबुवंति ते पतुंन आणिलें घरा ॥ चाल ॥ तव ज्ञान समजलें आम्हां । होउनी हरिची रमा । ना लेखिलें पुरुषोत्तमा ॥ चाल ॥ बोलती सर्व वनिता[3] आपापले परी । प्रत्युत्तर न देची मग भामा सुंदरी । बळिरामानें सैन्य तें सिद्ध करून सत्वरी ॥ चाल ॥ पाठोपाठीं मुनिच्या धांवती । मार्गीं उभयतांसी आटोपिती। स्वामी नारदा उभे बोलती । कोठें नेतां आमचा यदुपती । सांगे नारद

---

१ पायाचा खडावा. २ विजा. ३ स्त्रिया.

बळिरामाप्रती । ठकवुन नेतो काय हरी या रितीं ॥ चाल ॥ दान करी भामा कृष्णासी । आम्ही जातसों स्वआश्रमासी । भांडावया सिद्ध सैन्येसी। आले तयावरी तो घनःशाम अग्रज मग काय वदतसे नम्र बोलते । अमृत जैसें तैसें मुनिप्रती प्रार्थित कैसें । अति रहस्यें संतोष मुनिस पदारविंदीं[१]। मस्तक ठेउनी त्या संनिध मुनी वदती । रडे देवकी स्नेहें नारदापुढें पदर पसरिती । पुत्रदान मागतें देई मज येवढें प्रसन्न चित्तीं ॥ ३ ॥ मुनिस म्हणे बळिराम कृष्ण पालट घ्या सेवकजनां । मागें देवकी दान तिसी अर्पावें जगजीवना । नारद म्हणे ब्रह्मादि वंदिती ज्या यदुकुळभूषणा । अनायासें[२] लाधला आम्हांप्रती न करितांची साधना । ते वस्तु तुम्ही नेउं म्हणतसां ठकउन मज ब्राह्मणा । याच प्रकारें प्रार्थितात नारदास कृष्णांगना ॥ चाल ॥ यादव म्हणती अहो मुनी । पालट सुवर्ण घेउनी । द्या हरी आम्हांलागुनी ॥ चाल ॥ नारद म्हणे आवश्य या घेउनी झडकरी। उभविली तुळाते तेथें तया अवसरीं । धांवले तेव्हां जन मग घे अवघे सत्वरी ॥ चाल ॥ तेथें पारडीं हरीस बसविला । भामा म्हणे सोडवीन हरीला । सत्राजितें मणी आपणां दिला । प्रसवे प्रत्यहीं सुवर्णरासिला । सदनीहुन सुवर्णनग[३] आणविला । गर्वें पारड्यामध्यें घातला ॥ चाल ॥ तरी कदापि नुचले तें पारडें पडे । समुद्रामाजीं हरळ तैसें जालें रडें । देवकी कडोविकडीं घालिती सुवर्णरासी । आंगावरील अलंकारासी । घालुनिया रुक्मिणी वरासी । म्हणती सोडवूं तुळणेसी । न येतें सुवर्ण भामेसी । म्हणती साधिलें सवतमत्सरासी । भ्रतारासी दान देऊन त्या भांडारीं राज्याचे द्वारकाजन सुवर्ण आणिती । अष्ट धातु घातल्या पारडें नुचलें अक्षई क्षितीं ॥ ४ ॥ जन करिती आश्चर्य बहुत हा जड जाला श्रीहरी । गर्व सत्यभामेचा निर्दाळुन समुळीहुन करी एक चोर एक ज्यार चहाड एक मैंद कर्म आचरी । दोघे मिळून हा मंत्र योजिला भामेच्या मंदिरीं ।

१ चरणकमलीं. २ श्रम न करतां ३ सोन्याचा पर्वत.

म्हणे देवकी भामेसी सप्तजन्मीची वैरिण खरी । कसा वैर साधिला वैरिणी माझा तव यावरी ॥ चाल ॥ मग बोले ब्रह्मनंदन । जे पट्टराणी रुक्मिणी । ते नाहीं आलियांतून । घरीं तिच्या धनाच्या रासी बहुत असती । यादव ऐकून उद्धवासी पाचारिती । जा घेऊन या रुक्मिणीप्रती ॥ चाल ॥ वेगें उद्धव मंदिरीं पावले । तेथें भीमकी रत्न देखिलें । भावें उद्धवीं हृदयीं आलिंगिली । जालें वर्तमान निवेदिलें । किंचितसें हास्यवदन दाविलें । भीमकीचें हृदय वर उठलें ॥ चाल ॥ हस्तपाद प्रक्षालुन अपूर्व गर्व नसून मग सर्व प्रकारें । बरवें परी तुळसीस प्रार्थी हें पर्व मोठें पक्क पत्र तबकांत वस्त्र आच्छादून वरतें । पुर्तेपणें भावबळें जाणून परतें । सुवर्ण काढून तुळेतें तें तुळसीपत्र ठेवितां पारडें उंच उसळलें । कळला हा भावार्थेची सारा जयजयकारा प्रवर्तले । ते वृंदारक[1] संभारानें । पुष्पवृष्टी करिती धारिती हातीं रुक्मिणी सर्वेशा, पाहती तमाशा । गोपी कशा धन आशा धरुन भांडती परस्परें । तशांत भामा धन अपार आवरित स्वहातें फारच म्यां भांडार फोडुनी । सुवर्ण आणिलें किंचित् होतां न्यूनच मग मी बरी नव्हे आवघे जन पडती । एकमेकींच्या गळां देवकी म्हणे सकळां तुम्ही लबाड दिसतां वस्ता द्या माझ्या मज वांटुनी । सुना म्हणती सासुशीं कशाला कशासी नग द्या आम्हांसी वांटुनी । याच प्रकारें सहद्वारका गोपिका धन-लोभें गुंतल्या ते पाहती ब्रह्मसुत कृष्ण रुक्मिणी । भीमकीनें भावार्थी सोडवून नेला हरि या रिती । होनाजी बाळा म्हणे भुकेला भावाचा यदुपती ॥ ९ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ १७ ॥

चाल—रतिवंत महाराज पेशवे अमोलिक सुर्ती मोती ।
सवाई माधवराव सवारी निघाली नबाबावरतीं ॥

---

१ देवांचे समुदाय.

षोडशसहस्त्र गोपी अष्टनायका सहित श्रीपती। अचळ संपत्ती सुजाण संतती नांदे द्वारावती ॥ ध्रु० ॥ मित्रवृंदेचे सखीसी अवचित हरी भामे घरीं येऊनी। कटीवर[1] भामा उभी निकेतनीं[2] ती दृष्टीस पाहुनी। विनोदें परी कौंसारी सत्राजित दुहिते-[3]लागुनी। म्हणे अहो मित्रवृंदे आम्हां आवडती प्राणाहुनी। संपत्तींत गजगामिनी पहा प्रिये सवत नांव ऐकुनी। पाचारीत श्रीरंगातें शत्रूंचें नांव ठेवुनी ॥ चाल ॥ क्षोभून भामा। सुंदरा आपल्या गोपुरा। म्हणे बेरे आला याहो याहो कौंसासुरा। सोडून स्वस्थळ मथुनप्रलंबसहोदरा। कोणत्या अर्थी आगमन द्वारावती पुरा। नावरे क्रोध श्रीधरा इंदिरावरा। गुप्त वेषें गेले मित्रवृंदेचे घरीं ॥ चाल ॥ मागुती दासी पाठविली हरी समजुती। ती म्हणे चल भामे निकेतना यदुपती। आम्ही न येऊं म्हणवुन वस्त्रें गवरविली दुती ॥ चाल ॥ भामा अंतर गर्वें व्यापिली। जाणून श्रीकृष्णमूर्ती लोपली। निर्वाण वस्तु गमवून आपली। मुग्धा वियोग व्यथेनें[4] तापली। मित्रा अस्ती कमळण चोपली। सेवे परिचारिका[5] आज्ञापिली ॥ चाल ॥ मुख मृगाला अस्ती आमावास्यें। तव प्रवेशुनी राजिवहंसे। मुख मंचकी अति चिंताक्रांत बळी साधन साविती। पंचाग्नि उष्णकाळ तप्ती। शीतवत् जळ न म्हणुनिया वल्कलें वसन दिगंबरधारी वेष धरुनी शिरीं जटाभार वाहुनी निरंजनी हार ज्या प्राप्तीस्तव तिष्ठती ते प्राप्ती करून अप्राप्ती साधन असाध्य हे स्तुती। लाधली ती गमउन विनवणीला म्यां पाठविली दुती ॥ १ ॥ श्रीहरी अदृश्यें जाणुन अति व्याकुळ भामा सुंदरी। मन हरलें मुरहर वियोगानळ व्याहाळी अंतरीं। अपप्रहस्ती तटस्थ नभातें ती चक्रवाक भास्करी। कां न सारे आज यांमिनी[6] ढळती नक्षत्रें अंबरीं। अति कुसुम केशरी सुगंध विटले चंदन आगरी। मालती बकुली पुष्पहार सुकले सुख-

१ कमरेवर हात ठेवून. २ मंदिरांत. ३ कन्येस. ४ विरहदुःखानें. ५ दासी. ६ रात्र.

शेजेवरी ॥ जाल ॥ दिनप्राय मार्ग लक्षिती हो भडमासती । श्रीहरी सह-वियोग चिंतार्णवीं चित्तवृत्ती समीरप्राय सत्वरी गती आली धांवत दुती । भामा म्हणे कां दाटली धापा । तुजप्रती मस्तकीं विदारले रीती केस दिसती । बहु वाढवले भोगिलें सुखें श्रीपती ॥ चाल ॥ चीर कंचुकी तुज ज्या कारणें नेसविली । द्वयें नेत्रीं अंजन भोगबळें वाहवली । खुण दीक्षदंत चुंबन आधारीं दाविली ॥ चाल ॥ नेसता निरकाचीर भिजले सखे । तुझ्या रुतली पयोधरीं नखें । दृष्टी घुर्मीत तूं वृंदारके । निद्रा आवर्णी सेवाकारके । दुग्ध रक्षणार्थ मार्जर सुखें पहा पहा म्यां पाठविलें कौतुकें ॥ चाल ॥ अर्ध-चंद्र भांग टीक शिरीचा । चळावया रतिरंग श्रीहरीचा । चाचित मैला-गिरी चंदन ते। श्वेत अति भ्रशक दिसे अति धर्मबळें वाहवला सकळ त्वां उशीर काय कारण लावाया । आननइंदु उतरला तुझ्या तव खंजिरींट नेत्रीं अंजन वाहवलें कसें त्वां सुख भोगिलें म्हणून संपादनीचें कर मनन अंतरीं हो सावध निश्चिती । घे निद्रा सुख सदनीं रात्रीं तुज घडली जागृती । दुती प्रत्युत्तर देत विचक्षण तूं भामा सुंदरी । सहज धावलें म्हणून दाटली धापा शरिरीं अंतरीं । म्यां मस्तक हरिपदीं ठेवितां धरिलें वरचेवरी । चळावया कारण सांपडलें केश हरीचे करीं । निरपराधें ऐक सांगतें चीर भिजल्याचें परी । म्यां जळीं प्रयाण केलें तुझा वर मच्छरूपें सागरीं ॥ चाल ॥ रूपें कर्मट तुझा पती तीव्र पृष्टी आकृती । दर्श स्तब्ध विकळ मी विकळ शरीरप्रकृती । मग मुखीं तव भ्रतार स्थिती शुकर वित्पत्ती । लागले दंत त्या धरूं जातां अवचितीं । ती नारसिंह मूर्ती वधी दैत्याप्रती । चल म्हणतां लोटलें मजला सक्रोध रिती ॥ चाल ॥ रुतली नखें दिसतीं पयोधर स्थळां । लागला उशीर वामनरूप घन-सांवळा । शोधीत शोधीत मी गेलें त्या रसातळा ॥ चाल ॥ झाला तव

१ वाऱ्याप्रमाणें. २ स्तनावर. ३ मुखचंद्र. ४ कच्छ. ५ वराह. ६ पाताळांत.

पती फरश करीं धरी। कोंडून क्षेत्रीं ही वसुंधरी। जय वेळ पाहून अति हर्षांतरीं। सन्मुख ठेलें तव अहिवरी। केलें भाषण अति नम्रतेपरी। हा तापला तो मर्दुन अरी। तुझी सखी म्हणवुन मजला। नेसवली ही तव खुण तुजला। तो श्रीराम अवतार धरुनी दशकंठ बंदिचे पराक्रमें निर्जर सोडवले त्यांत राहून सुटला। तीव्र तो पाहुनिया हा चंद्रावळी एक द्वादश गांवें वैश्वानळें श्रीकृष्णें प्राशिला। ते समयीं मज श्वेत शीतळ चंदन हा धर्म बळें वाहवला। असे कीं तव भ्रतार बौद्धरूपें मजसी न बोलेची शस्त्रावस्त्राविरहित निरंजनीं। नग्न फिरतसे कोठें न दिसे अव्यक्त म्हणवुनी उशीर लागला। तुझा रमणं पाहावयास गेले विशेष त्यासी क्रोध चढियेला। पाहून या उत्कर्ष म्लेंच्छ तो हातीं घेउनिया याकुत कुरंगी वहन उपीत पीछित त्या क्रोधें न बोलेची मज रुदन आलें। अंजन हें मम आक्षीं वाहवलें। इंदु उतरला करी निश्चिती। दशावतारीं लीला दाविली श्रीहरीनें मजप्रती ॥ ३ ॥ संपादणी कौटील कफालती ठाउक अवघ्या तुज। श्रम घडले तुज रात्रीं जा कर पुरती निद्रावज। मी सत्राजीत तनया पडलें शोकसमुद्रीं आज। न पवे निधान तारु माझे नौका अधोक्षज। तेजहीन दीपक उदया न पवेची सुपर्णाग्रज। निराभिमानी स्तुती करितां पावले बळिभद्रानुज ॥ चाल ॥ जय प्रिय विलास गोकुळीं मूर्ति सांवळी। येऊन कपाट अंगोळ्याग्रजें खळबळी। हें जाणून हृत्कमळीं करी मागुती रळीं। म्हणे कोण आला तस्कर रात्रौ या स्थळीं। मी चक्रधर यदुकुळीं कीर्ति आगळी। उघडी कपाट घे प्रिय मंचक मंडळी ॥ चाल ॥ मग भामा म्हणे कुळील सर्व या तुम्ही। कां येणें केलें हरिपत्नीसदनाश्रमीं। हरी म्हणे मी माधव आलों वहन विहंगमी ॥ चाल ॥

---

१ पृथ्वी. २ शत्रु. ३ देव. ४ अग्नि. ५ पाति. ६ श्रीकृष्ण. ७ अरुण. ८ कृष्ण. ९ दार. १० कृष्णपक्षी कुंभार. ११ कुंभार. १२ सत्यभामेच्या मंदिरांत. १३ लक्ष्मीपति; पक्षीं, वसंत.

भामा म्हणे जा वास्तव्या [1]झणीं। माधव नामे रुतु वसंतवनीं। [2]धरणीधर मी हरी प्रसिद्ध जनीं। अहो सावध हो भामा मर्गीं। कोणा डसावयास ये क्षणीं। आला फणिवर रजनी पाहुनी ॥ चाल ॥ भोगबळें आलों तव भुवनीं। भामा म्हणे ज्युत्पिदीरंघवनी। सोडून कांतार आला हरिकालया अघासुरया। शासन करितां विनोद रिती भामा म्हणे मज तुम्ही खगेंद्रें मजला। किमर्थ तुमचें आगमन येथें। हास्यवदन करी धरुन प्रिय मंदिरीं नेत। नानापरी पुष्पें मालती बकुळी जाई जुई शेवंती गुलाब पार्यातक सुमनें चंपक कळिका पुष्पहार ते हेमपुष्करीं। मृगमद कस्तुरी सुवासित श्रीहरी अंगा चर्चिलें लिंबलोण हरी मुखावरुनी उतरिती प्रेमें सत्राजित कुमरी। प्रियविलास हरी सवेतीया भीनरुती भामा क्रीडती। होनाजी बाळा म्हणे सर्व पदीं वसो चित्तवृत्ती। अचळ संपत्ती सुजाण संतती नांदे द्वारावती ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ १८ ॥

चाल – वेडीच झालें फार सुचेना घरधंदा कांहीं।
पती प्रवासी जाती हौस मनींची पुरली नाहीं ॥

राधे हा मुकुंद उचलुनी कडिये घेई घेई ॥ ध्रु० ॥ करूं देईना हा माझा दुधदुपत्यांस कांहीं। मंथितां दह्यातें धरितो रवी करी ठाईं ठाईं। हाटे हा कदापी नुमजे समजविल्यास बाई। बारा समजाऊन यासी तुझ्या घरीं नेई नेई ॥ १ ॥ हरिसी आनंदें राधा मृदुमृदु बोलविते। माझे घरीं चाल कृष्णा दूधभात कालवितें। पाळण्यांत घालून तुजला निजवून हालवितें। यशोदेसी सोडी कान्हा माझे जवळ येईं येईं ॥ २ ॥ गोविंदा गोपाळा कृष्णा मुकुंदा क्षीराब्धीवासा। जगज्जीवना व्रजभूषणा गोपी-मानसराजहंसा। उगा नको रडूं श्रीरंगा यशोदेसी सोडी कैसा। तुझी

---

१ लवकर. २ पृथ्वी धारण करणारा; पक्षीं, शेष. ३ शेष.

धरितें हातुवटी मी, निरे दुध पेई पेई ॥ ३ ॥ मला हाटे येथें मोठें खळियेलें सांवळ्यानें । असाच हा रोज राधे हरि घरीं नेत जाणें । उगा हा निचिंत कैसा सुधा समजाविल्यानें । होनाजी बाळा त्या स्तवनीं सदा हरीसही राही ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाचें स्वयंवर ॥ १९ ॥

**चाल**—दैव प्राधान्य उभयतांचें ।
म्हणून भारता रत्न लाधलेंस गुणवंताचें ॥

पत्र दिधलें द्विजवरें करीं । वाचितां आनंदकंद तो मुकुंद मंद मंद हांसत नंदसुत श्रीहरी ॥ ध्रु० ॥ द्वारकाधीशा त्वरित येई हो । चैद्य जंवुका काग हे समग्र छेदणार व्याघ्र तूं आवश्य सित्र होई हो । आंबिकालई भेटी देई हो । समय पाहून त्वरित धांऊन येऊन या गवी गवून स्वधनु येऊन जाई हो । भुवनसुंदरा सिद्ध होई हो । रुक्मियासी क्लेश देऊन द्वेष धरून ये शरणीं निशेष त्या अपेश देई हो । पतितपावना देई लवकरी ॥ १ ॥ म्हणसी तूं जरी निर्लज्ज मानसीं । राजिवाक्ष सर्वसाक्ष कर्माध्यक्ष अपरोक्ष तूं प्रत्यक्ष लक्ष जाणसी । कल्प वाउगें हृदयीं नाणसी । धन प्रदीप्त भीमक आप्त देईन गुप्त होऊन तृप्त वाणसी । सांवळी तुझी मूर्त लहानसी । म्यां न देखतांच श्रवणीं मननीं पठणीं समनीं नमनीं शयनीं तूं झणी वृत्तीस जाणसी । ऐकिली अशी कीर्ति मंदिरीं ॥ २ ॥ उठून त्या सुदेवास आदरें । देऊन क्षेम परिसहेम दृष्टी सूक्ष्म मनीं सप्रेम करून नेम प्रेम गाहिंवरें । भीमके तुझें वदन गोजिरें । म्यां न पाहतां रूपास भास हा जीवास तुझी आम्हांस आस सुंदरें । लिहिल्या विधें येईन मी त्वरें तुज प्राणे न राजसे जसें तुझ्या मनीं कसें ते सखे विशेष उत्तरें सांग जा द्विजा गोष्ट ही खरी ॥ ३ ॥ विवाहाकारणें श्रीकृष्ण चालले ।

---

१ श्रीकृष्णा.

त्यजुन भ्रांत हा वृत्तान्त मंदिरांत गोपिकांत न कळतां रथांत बैसले। नेमिल्या रिती स्थान पावले । अति कृतघ्न विर निमग्न शस्त्रें नग्न करून भग्न लग्न लाविलें । मागध शिशुपाळ त्रासले । ध्यातसे होनाजी बाळ हे कृपाळ सरस कोमळ चरण कमळ दावी आपले लक्ष हें वसो तव पदांवरीं ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ २० ॥

चाल— नवी नवतीचा पुर आंगीं सरलासे ।
आज उद्यां येतील म्हणुनि दम धरलासे ॥
—परशराम.

सखे जमुनाका पानी गहे रचिला । भरण ज्याती जिसामो माधो मिला ॥ ध्रु० ॥ सुने रे जसोदा गोपी मिलसगरी । शीरपे धरिती माई भरि गगरीं । जलद चलि थी अपने घर नगरी । पकर मोहे कुकहे जलहे पिला ॥ २ ॥ कहे दुसरी होज्या के तेरो नंदलाल । चढके आवे हंपरसात गोपाल । मटकी फोरा दधिकी ये मोरे हाल । इतनावा तोसेमरा जावे भला ॥ ३ ॥ अर्ज कीई थी मोरी मानी नहीं । किसने कहुं क्या कछु ज्याने नहीं ॥ दिलके कुन्हा आपणे छनानाही । क्यां देखो रे तैनेक उकेभला ॥ ४ ॥ सबनीकनी हो आपणे घरघरसे । मनानेगेही मोहनगीरी-धरसे । होनाजी बाळा कहे उनपरसे । वारिज्यानाहो कहे बहुसि भला ॥ ५ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ २१ ॥

चाल—रतिवंत महाराज पेशवे अमोलिक सुर्ता मोती ।
सवाई माधवराव स्वारी निघाली नबाबावरतीं ॥

असून गरती आम्हांवरतीं इतुका हट कां रे । राजिवाक्ष सर्वसाक्ष मुळीं अलक्ष तूं प्रत्यक्ष नटनाटका रे ॥ ध्रु० ॥ कान्हा छंद फंद तुझें तुला गोड रे । मुलें लहानसहान घेऊन संगें रोड रे । वाट धरिसी करिसी व्यर्थची

उरफोड रे । जगद्वंद्य तूं मुकुंदजी हे नंदजी परिस तुझा थाट कां रे ॥ १ ॥ आम्ही व्रजवासिनी शुद्ध गरिब गाय रे । उंच नीच कर्म हृदयीं नेणूं कांहीं रे । सासुश्वशुर गांजिती तुजपाई रे । दान मार्गीं मागसी सुजाण होउनी दुग्धपान करून झालासी तूं चाटका रे ॥ २ ॥ तुझी सुखकांती सुंदर कोमलांग रे । येऊन झोंबसी कोंबसी गोपीकांग रे । वदन चुंबून भोगसी यथासांग रे । त्राहे त्राहे आम्ही उपाये काय सांग तूं लवलाहे विषयचटका रे ॥ ३ ॥ पाहसी पूर्ण कृपें गोकुळ सुखदायका रे । प्रथम यौवनादि पाहून नूतन बायका रे । कोण्या लोभें न कळे भुलविसी व्रजनायका रे । असें कुभांड करून दांड होऊन भांड धरिसी घाटका रे ॥ ४ ॥ वदे व्यास मुखें म्हणविसी विधी पाप रे । स्थावरजंगमादि तूं जगत्र आप रे । वर्णी होनाजी बाळा तव प्रताप रे । काशीराम गाई नाम हें विश्राम गर्भ सुटका रे । असून गरती आम्हांवरतीं इतुका हाट कां रे ॥ ५ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ २२ ॥

चाल—अंतर काय पडलें सांगा मला ।
मज कलगीच्या लाला ॥

—परशराम.

नको करूं हाट जाऊं दे मला घरा । सोडि वाट शामसुंदरा ॥ ध्रु० ॥ सदनीं माझी सासू क्रोधयुक्त कीं । नको आडवूं हा नव्हे वक्त कीं । गोकुळांत मुख्य नंद पोक्त कीं । हे गुणपणा थोर आसुक्त कीं । याची लाज तूं तरी धरी जरा ॥ १ ॥ कुळसीळ जरी ससी गोपिके । देई दान आम्हां राधिके । मधुर मधुर शब्द बोलुनी निके । जाऊं पहासी अशा कौतुकें । गोड वदून लोभ दाविसी बरा ॥ २ ॥ दाविसी किती युक्ति चतुरसुंदरी । देई दान आलागी सत्वरी । मग जा मथुरेसी तूं यानंतरीं । करी गोरस विक्रय बरी । मग मानिल तुजसी सासुसासरा ॥ ३ ॥ कमळ-नाभ कमळप्रिया श्रीपती । तुला सुरवरादि वंदिती । काय रे हरी तुझी

असी स्थिती । योग्य ह्या नव्हे तुला अशी रिती । देही तूं हरी धनी चराचरा ।। ४ ।। कौसांतक अरिप्रतापभंजना । हे पुतनारी मधुसुदना । हे मुकुंद गोपीरंजना । गाई होनाजी बाळा तव गुणा । पाहि मां यदुपते मुरलीधरा ।। ५ ।।

## ।। लावणी कृष्णाची ।। २३ ।।

चाल—कां रे मनीं माधवाचें चरण धरा ना ।
किती कथितों हित कांहीं करा ना ।। —रामजोशी.

सांगा हा मुकुंद बाई कोणीं पाहिला ।। ध्रु० ।। रासक्रीडा करितां व्रजनारी होतों सखे आम्ही विषयविचारीं । टाकुन गेला तो पूतनारी । कोठें गुंतून बाई कोठें राहिला ।। १ ।। उद्‌भिज श्वेतज वृक्ष शीले हो । पक्षादिक वनचरें कोकिळे हो । गोपी पिशा आम्ही कामानळें हो । जो वृंदावनीं बाई मनींचा हिला ।। २ ।। सुरत आनंदें श्रमलों जेव्हां गे । निद्रा आल्या आम्हां नकळे केव्हां गे । जरी असतों आम्ही जाग्या तेव्हां गे । जाऊं न देतों सखये त्या हिला ।। ३ ।। गोपी आळिविती हे व्रज-भूषणा हे । गरुडध्वजा असें केलेंसी काय हें । वियोग तुझा आम्हांलागीं न साहे । आम्ही तुजला श्री गुणी गाईला ।। ४ ।। भावबळें अशा वनिता व्रजाच्या । बोलाउन सुताप्रती नंदजीच्या । प्रेमपदीं यदुकुळटिळकाच्या । म्हणे होनाजी बाळा देह वाहिला ।। ५ ।।

## ।। लावणी अहिल्येची ।। २४ ।।

चाल—हा फंदी फाकडा मज सांपडला गुंडा ।
चालू दे प्रीत शेवटा देवा मार्तंडा ।।

गंगेंत अहिल्या संगमतीर्थी पाही । उद्धरिला तो शचिकांत इंद्र ते ठाईं ।। ध्रु० ।। अहिल्या पवित्र पद्मजकन्या । सद्‌गुण त्रैलोकमान्या । जीचि-यासि मानसे लावण्या । देवद्विजपदारविंदीं अनन्या । ते पद्मनेत्रीं ।। चाल ।।

जणुं समुद्र सौंदर्याचा इंदुवक्त्रा। क्षमांगी कुशाळ हे दुजी धरित्री । सुरवरांतरीं जे अलभ्य कोमळगात्रीं । वरयोजनार्थी हा भाव विरंची अत्री । ऋषी निरजराज मिळविले सुरभुवन सुक्षत्रीं । जो करील कुंभिणी प्रदक्षणेस स्वतंत्री । सर्वांआधीं येईल त्यास हे प्राप्त पवित्री ॥ चाल ॥ आपलाले वहनीं बसून त्रिदश लवलाहीं ऐकतां । निघाले कितीएक पाईं ॥ १ ॥ गंगेंत ॥ ध्रु० ॥ विबुधपृथ्वी प्रदक्षणेसी निघाले ऋषी नृपाळ वेगेंसी । वरु इच्छुन विरंची दुहितेसी । प्रसुत वच्छोर्धकाळ धेनुसी ॥ चाल ॥ गौतम पाहुनिया आले त्वरित गौतमें स्नान करुनी । ओले वसनीं तीन प्रदक्षणा घालुनिया । पूर्ण प्रसुत धेनु उपरांतीक होउनिया। ब्रह्मयासी भेटले गौतममुनी जाउनिया। आम्ही आलों कुंभिनी प्रदक्षणेस करुनिया ॥ चाल ॥ तूं पूर्ण ब्रह्म जाणता ब्रह्मज्ञानीही । अर्ध प्रसुत धेनु पृथ्वी होय कां नाहीं ॥ २ ॥ गंगेंत ॥ ध्रु० ॥ ब्रह्मदेव तात्काळ ते काळीं । गौतमास दिली अहिल्या बाळी । लग्न लाविलें स्वयें त्या वेळीं । नंतर आली सर्व मंडळी निर्जर ऋषी राजे । तों तेथें अहिल्या ऋषी अर्धांगी विराजे । पाहूनी निर्जर ऋषी नृपाळ व्याप्तलज्जे । त्यामध्यें अखंडल गौतम वपुर्च्या तेजें । झाला अहिलेसी रत व्यभिचार विलाजे । आले गौतम गेले होते अनुष्ठाना जे ॥ चाल ॥ नित्यसांयंप्रभें सारखी प्रिया सहसा ही। बाहेर न येची ऋषी संशय निरप्रवाहीं ॥३॥ गंगेंत ॥ध्रु०॥ गौतमशिष्य आश्रमीं होते । स्वदृष्टीस पाहून गौतममुनीतें । अति आश्चर्य वाटलें त्यांतें ॥ चाल ॥ गौतमवेषी कोण गृहातें हा वेषधारी । प्रत्यक्ष गौतम ऋषी मुद्राद्वारीं । कळलें विधिकन्येलागीं मनामाझारीं । पावली परम पतिव्रता भयातें भारी । चांडाळ पतित दुर्जन दुर्मती अति अविचारी । तूं कोण म्हणऊन पुसती झाली गौतमनारी । मग शिरला त्रिडौजें

१ ब्रह्मदेवाची कन्या–अहिल्येस. २ अर्धे वासरूं बाहेर आलें अशी संधि. ३ पृथ्वी. ४ देव. ५ इंद्र. ६ शरीराच्या. ७ संधिप्रकाशाप्रमाणें तेजस्वी. ८ अहिल्या. ९ इंद्र.

बिडाळैयाचे शरीरीं । आली द्वारीं उतरला मुखमृगांक निर्धारी । गौतमास प्रार्थिती झाली विरंचीकुमारी ॥ चाल ॥ त्रिवाचें मग नोव्हे मन संकल्पित अन्याई । तरी चरणीं तरण असली निर्मळ पुण्याई ॥ ४ ॥ गंगेत ॥ध्रु०॥ गौतम संपत्तींत हृतेकोशीं । म्हणे ब्रह्मजे सूक्ष्म नदी होसी । भगांतैक अमरपती महादोषी ॥ चाल ॥ ऐकून प्रगट करी स्वरूपासी । वज्रधार तेथें करितां जाला प्रार्थना गौतममुनीतें । अपराधी ऋषिवर्या तुझा मी सत्य सत्य । परि क्षमा करून उद्धरावें मज पतितातें । उ:शाप वदून स्वपदीं रक्षावें समर्थें । संतोष मनीं ऋषी प्रसन्न अमरपतीतें । तूं अहिल्यासंगमीं तीर्थ जेथें । करी स्नान दान शचीवरातें तीर्थीं निगुतें । हे भगे पावसी ते सहस्र नेत्रांतें । मग अहिल्येस ऋषी बोले आशीर्वचनातें । गंगासंगमीं मिळसील जेव्हां विधिदुहिते । मूर्तिमंत तेव्हां पावसी पूर्वदेहातें । व्यासोक्त हेंची इंद्रतीर्थ म्हणती त्यातें । विधी सांगे नारदा गंगामाहात्म्य स्थितीतें । नैमिष अरण्य सुतशौनकादिक ऋषींतें । सांगतों सत्कारुनिया मन उच्छाई । होनाजी बाळा त्यांतील कथारस गाई ॥ गंगेत ॥ ५ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ २५ ॥

चाल — कारटा तुझा हा द्वाड यशोदेबाई ।
कां पडला आमुचे डाईं ॥

— रामजोशी.

श्रीरंगा कमलाकांता हरी पदरातें सोड ॥ ध्रु० ॥ व्रजलर्लैना नारी । जात असो कीं बाजारीं । अहो कान्हा मुरौरी अडवितां कां कंडारी । मथुरेची बारी । पाहूं मजा हो गिरधारी । विकून नर्वनीत दँधी गोड ॥ श्रीरंगा ॥ १ ॥ ऐका लवलाहीं गृहीं गांजिला सासुबाई । परतुनिया पाईं ।

---

१ मांजराच्या. २ हृदयांत. ३ छिद्रें. ४ गोकुळांतील स्त्रिया. ५ कृष्ण. ६ लोणी. ७ दहीं.

येऊं आम्ही ईश्वरग्वाही । यानें देऊन कांहीं । मग जाऊं आपले ठाईं । पतीभयानें देह रोड ॥ श्रीरंगा ॥ २ ॥ गडी तुमचे धरिती नानापरी चेष्टा करिती । जुलूम आम्हांवरती । मधुसूदना लज्जा हरिती । अबरूच्या गैरती । कळली तुमची बदमस्ती । वाईट शिकला खोड ॥ श्रीरंगा ॥ ३ ॥ विनवून कृष्णासी । शरणागत झाल्या दासी पाहून मजा खालीं । आणल्या गोपी महालासी । होनाजी बाळासी मती आगळी कविरायाची । धोंडी सदाशिव जोड श्रीरंगा कमलाकांता ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ २६ ॥

चाल—कांहीं नाहीं लाज पोटीं । मनुष्यांची काय दाटी ॥

— रामजोशी.

कोणी ध्यावें मुरली करिचीं । शुद्ध मी विसरलें घरची ॥ ध्रु० ॥ ऐकुनिया श्रवणीं मुरली । भ्रांती नाहीं मज उरली । नांवें वृत्ति तव हरली । वाजवी माधव परोपरीची ॥ कोणी ॥ १ ॥ दुसरी म्हणे श्रीहरी तो । येऊन आम्हांला धरितो । नानापरी छळणा करितो । वाईट हो खोड हारिची ॥ कोणी ॥ २ ॥ तिसरी म्हणे पुरे ही मस्ती । सोसावी किती बदमस्ती । धरी करी हा धिंगामस्ती । फाडली कंचुकी जरीची ॥ ॥ कोणी ॥ ३ ॥ चवथी म्हणे यशोदाबाई । कृष्णास शिकीव कांहीं । होनाजी बाळा गुणग्राही । करी काशिराम भक्ति हरिची ॥ कोणी ॥ ४ ॥

## ॥ लावणी उखेची ॥ २७ ॥

चाल—दोघी सवती भांडती पती भांगडभुंगा ।
आपसांत वर्म बोलती गौरी आणि गंगा ॥

:—परशराम.

---

१ वहान. २ पतिव्रता.

सुखस्वप्नींचें उखा सांगती चित्ररेखेप्रती । म्यां रात्रीं वैशाख शुद्ध द्वादशीस भोगिला पती ॥ ध्रु० ॥ चारी प्रहर प्राणेश्वर माझे होते शेजारीं । तों मी मोठें हर्षयुक्त होतें आपली अंतरीं । अरुणोदय जालिया निघाले मज टाकून मंदिरीं । उभे उभे प्राणनाथ म्हणवून म्यां धरिलें पदरीं । कोठें दिसेना कांहीं मग मी मनीं झालें घाबरी । तो मन्मथ[1] दुसरा सखे भेटीव मज लवकरी ॥ चाल ॥ जातात ग माझे प्राण । विगलित झालें देहभान । होऊं पाहती जिवाची आण । मूर्च्छित पडताती । चित्ररेखा तिजला सावरिती ॥ ॥ १ ॥ म्हणे उखेसी ती चित्ररेखा श्रीगुरु नारदये । मी चित्रें रेखितें ज्ञान मजला त्रिभुवनीचें आहे । तुझा पती कोणता वोळखी त्यांतून आपला स्वयें । तो तुजला भेटवितें आणून निश्चयें निःसंशयें म्हणून गजवदन रेखिला चित्री मंगलमयें । मग लिहून विधिपूर्वक नारद नमस्कारिला स्वयें ॥ चाल ॥ हरिहार रूपें रसाळ । स्वर्गी निर्जरादिके दिक्पाळ[2] । मृत्युलोकाचे नृपाळ । भोगेंद्रेसहित पाताळ । भिंती घोटोन सुढाळ । भरून सप्त रंग पात्रें चित्रीं लिहून दाविती ॥ २ ॥ कोण विचार करावा यामध्यें नाहीं गे प्राणसखा । धीर माझेनी न धरवे म्हणून धरणीवर पडली उखा । बळें चित्ररेखा ती तिसी सावरी करीं कुरवाळून मुखा । सावध होऊन पहा एक सखये ती उरली द्वारका । हाची काय वोळखी म्हणून रेखीत यदुकुळटिळका[3] । उखा म्हणे याचेच वंशिचा वाटतसे नेटका ॥ चाल ॥ यावरि प्रद्युम्न काढिला । सासरा होय हा मला म्हणवून मुखशशी झांकला । यांचे उदरीं जन्मला । हा तरी वोळखी म्हणे तिला । अनिरुद्ध लिहून दाविला । हाच सखे प्राणेश्वर मजला भेटिव शीघ्रगती[4] ॥ ३ ॥ निराळमार्गें[5] चित्ररेखा चालली सत्वरी । अकरा सहस्र गांवें तेथून असे द्वारकापुरी । क्रमुन मार्ग पावली सिंधुचें तीर

१ मदन. २ इंद्र, चंद्र, यम, वरुण. ३ श्रीकृष्णास. ४ लवकर. ५ आकाशमार्गें.

दुसरे प्रहरीं । गुरु नारद भेटतां कळविला वृत्तान्त मधुरोत्तरीं । रक्षीत ग्रामसुदर्शन प्रवेश नोव्हे माझा भीतरीं । जों नेत्रपातें न लवे तों एकवीस आवर्तनें[1] करी । पुढलें भविष्य जाणुनी । मोहनी मंत्र तिजलागुनी उपदेशीत नारदमुनी । म्हणे आण माझी घालुनी । आंत प्रवेश करी साजणी । मंचकासहित[2] उचलुनी । घेउनी जा अनिरुद्ध शोणितापुरीं आज सत्वरगती । होनाजी बाळा म्हणे भेटवील वर उखेसी निश्चित । सुख स्वप्नींचें उखा सांगती ॥ ४ ॥

## ॥ लावणी उखेची ॥ २८ ॥

जो स्वप्नीं भोगिला तोच भेटवि लागे प्राणपती । काय होऊं उतराई चित्ररेखे मी तुजप्रती ॥ ध्रु० ॥ करुन इतुकें कृत्य शोणितापुराप्रती पावली । तों इकडे मंदिरीं उखा शृंगार करुनि बैसली । पतिमंचकसमवेत चित्ररेखा येतां देखिली । रतीसुत[3] सावध करुनी उभयतां गुरु मोहनी काढिली । म्हणे तुम्हांला आणिलें उखेसी सांभप्रियीं[4] पावली । करा उखेचा अंगिकार तुम्ही स्त्री म्हणऊन आपली ॥ चाल ॥ गंधर्वलग्न मग तेथें लाउन या मन्मथसुत । धरुनिया उखेचा हात । मंचकावरी पहुडत । उभय पक्षीं मिळालें चित्त । निशीं दिवस असे क्रीडत । चार मास क्रमितां उखेला गर्भव्यथा दिसती ॥ १ ॥ हा वृत्तान्त दासींच्या मुखें ऐकून बाणासुर असा । मनामाजीं दैत्येंद्र प्रळईं प्रळयाग्न क्षोभला जसा । वेढा सदन उखेचे निघतां शब्द मुखांतून असा । सैन्यावरतीं मध्यें सांपडले कृष्णपौत्र डोळसा । उखा म्हणे । मी आणून तुम्हांला वैर साधिला कसा । आधीं वध माझा करून मग तुम्ही जा बाहेर राजसा ॥ चाल ॥ अनिरुद्ध म्हणे सुंदरी । राहा स्वस्थपणें मंदिरीं । यादववीर नरकेसरी । कृष्ण बळे पृथ्वीवरी । तूं भय किंचित् ना धरीं । दळें आटित पाहा एक क्षणभरी । आरगळा

---

१ प्रदक्षणा. २ पलंगासुद्धां. ३ अनिरुद्ध. ४ भवानी.

घेतली करीं । चढून उपरी मन्मथसुत सैन्य विलोकित क्षितीं[1] ॥ २ ॥ सैन्यसागरीं उडी घातली मीनकेतनें[2] कुमरें । दळ आटलें बाणाचें आरगळा घायें करुन एकसरें । बाणासुर प्रतापी शस्त्रें सोडित सहस्रकरें । नागापाशीं सांपडतां वधु इच्छिलें बाणासुरें । पुढें येउनि या कुंभक प्रधान विनवित सहोदरें । हा तुमचा जामात वधूं नये यासी आतां नृपवरें ॥ चाल ॥ मग कारागृहीं[3] रक्षिला । जितुका वृत्तान्त वर्तला । तितुका श्रीहरीस समजला । हरी बाणग्रामीं पावला । त्या कैवारा शिव आला । युद्धकंदनीं मिसळला । भुजा छेदुन बाणाच्या पाडून शिवास ही विस्मृती ॥ ३ ॥ सावध होऊन सांभ विलोकितसे बाणाच्या भुजा । तों पूर्वीच्या दिला आठवलें अंतरीं वृषभध्वजा[4] । मग बाणाच्या करें करविली हरिची पूजा । प्रल्हाद पण म्हणे बळीपरियंत भक्त हा तुझा । सोहोळा करून चतुर्दिन दिधली उखा मदन आत्मजा । बोळविलें द्वारकेसी बळीपुत्रें बळरामानुजा ॥ चाल ॥ आहेर घेऊन सत्वर । द्वारकेसी आला यदुवीर । वाजविले मंगळतुरे । मिरवत पावलें मंदिर । रुक्मिणीरतिचरणावर । शिर ठेविती उखा सुंदर । वर दुर्गेचा होता उखा सौभाग्यें रूप वर्तती । होनाजी बाळा म्हणे इती उखाहरण निश्चिती[5] ॥ ४ ॥

## ॥ लावणी व्याधाची ॥ २९ ॥

चाल—देवदैत्यांनीं मिळून केलें समुद्रमंथन जधीं ।
पृथ्वी लागली डुबूं कच्छरूप देवें धारिलें तधीं ॥

— परशराम.

गंगामहात्मीं हे कथा समुळीं अघहरती[6] । सहपत्नी[7] कपोता पाव मन वराहतीर्थी ॥ ध्रु० ॥ भीषर्ण[8] वपुवत एक व्याध[9] ब्रह्मनगासिखरीं । चांडाळ

१ पृथ्वीवर. २ अनिरुद्धानें. ३ बंदिशाळेंत. ४ शंकरास. ५ संपूर्ण. ६ पापनाशक. ७ स्त्रियेसहित. ८ भयंकर. ९ पारधी.

कृतघ्न तेथें कुटुंब परिवारीं । तो सकळ जिवाचा भक्षक अति अविचारी । उदरानिमित्त त्या वनीं श्वापदें मारी । व्याधासारखी सपत्नी गृहामाझारीं । संतती आवघी एकरूप वर्ते संसारीं ॥ चाल ॥ बोलिला सपत्नी अंतरगृहांत व्याधासी । आज जावें पारधी करिती आपण वनासी । मारून श्वापदें आणा क्षुधाहरणासी । मग व्याध पाशवाघुरी[१] घेऊन कुक्षेसी । तो झाला प्रवर्तला परीख प्राण हरणासी । बहुतेक श्वापदें वधून तेथें ते दिवशीं । श्रमला फारच परंतु न येतां सदनासी । तों वळियेला अकस्मात पर्जन्य आकाशीं । प्रळयमयें आवघे न दिसे मार्ग पारधीयासी । अति झाला चिंताव्याप्त व्याध मानसीं । दिनमान पावला नभीं अस्तमानासी । तो पुढें दिव्यवृक्ष देखिला दृष्टिसी । शाखापल्लवमंडित[३] सौख्यछायेसी ॥ चाल ॥ ते स्थळीं कपोता पक्षी आणि कपोती । वरि संतती सहवर्तमान ते स्थळीं वसती ॥ १ ॥ विश्रांतीस्थळ लक्षून तो व्याध मनातें । विश्रांती ध्यावयालागीं पातला तेथें । कोठार कपोत्याचें तें पूर्वींच होतें । लाउन जाळें मग व्याप्त निद्रेंत । उभयतां उडालीं आंतून क्षुधाहरणातें । सांपडली कपोती अवचित जिवंत व्याधातें । जाळ्यांत घातली करून बंधन येतें । तो आला कपोता क्षुधा हारून सदनातें । मातृहीन[४] लेकरें पाहून दीन दृष्टींतें । लागला रुदन करून आठवून सगुण प्रियेतें । तूं कां न येसी गुंतलीस कोठें गुणसरिते[५] । कल्याणदायक पाहावें कोठें तुज निगुतें । यापरी कपोतें आरंभिलें शोकातें । मग बोले कपोती जाळ्यांत गुंतलें येथें । मग म्हणे कपोता तुज काढीन गुणिवंते । यापरी आळवीत पतीस सगुण धर्मातें । अनायासें करून आला अतिथि[६] गृहातें । अर्चनें[७] भोजनें तृप्त करावें यातें । अनन्यभावें आचरतां अशा पुण्यातें । ते नर पावती स्वसुखें वैकुंठ पदातें । भगवान मज तुम्ही हे तुम्हांस विज्ञप्ती[८] । पती नका काढूं जाळ्यांत

१ फांसा व जाळें. २ पाठीशीं. ३ खांद्या व पानें यांनीं परिपूर्ण. ४ आईवांचून. ५ गुणाची नदी. ६ पाहुणा. ७ पूजा करून. ८ विनंती.

गुंतल्या अर्थीं ॥ २ ॥ गौरवांत गौरव स्वामी गौरवा असे । दुसरें माहात्म्य या सृष्टींत न दिसे । वानितां तुम्ही सद्गुण स्वमुखें सरसें । अमृततुल्य हें भाषण भासतसे । पावले तव संगती पुत्रपौत्रा असे । यापरतें काय मिळवावें जगुन सायासें ॥ चाल ॥ अतिताचें आतिथ्य करावयास्तव कांहीं । किंचित् धान्य आपल्या संचय पदरीं नाहीं । तरि हा अभ्यागत तुष्ट एक उपायीं । अग्नी आणिला काष्टें मिळवून लवलाही । हा व्याध सीतेंकरून[1] दुःखित पाही । अर्पावा उष्ण उपचारें तो यासमयीं ऐकतां असे तोषला कपोता हृदयीं । बैसून उंच वृक्षीं तो न्याहाळून पाही । दूरदेशीं जाऊन जळत काष्टें आणिलें त्याहीं । तृणकाष्टें चंचूनें जमा करून ते ठायीं । अग्नी प्रदीप्त केला कपोतेपक्षाहीं । म्हणे पतिव्रता पतीलागीं गोष्ट ऐका ही । हा अतीत तृप्त होईल भक्षून मम देहीं । घडतां ऐसें जोडेल महत पुण्याई । म्हणे पतिव्रतेसी कपोता धर्म याविषयीं । असतां मी धर्म तुझा नोव्हे सहसा वी । असें वदुन पति प्रवेशल्या अर्थीं । जाळ्यांतून पक्षिण त्या लुब्ध त्यापाशीं प्रार्थी ॥ ३ ॥ तव पंजरस्थमीं[2] पवित्र कपोतजाया[3] । करी कृपा सोड पतिसवें प्रयाण कराया । या हुताशनांत[4] दग्धवितें आपली काया । भक्षून शांत करी सुखरूप तव उदराया । शंकला व्याध मनीं दृष्टी पाहून नवलाया । मग कपोतपत्नी मुक्त केली लवलाह्या । व्याधास प्रार्थिती झाली स्तवन करून या । सद्गुरु आणिला तूं देव आम्हांला पारधिया । पायरी तूं आमची स्वर्गमार्ग चढाया । सांभाळी आमचीं मुलें कृपा करुनिया । अग्नीस तीन तीन प्रदक्षणा घालुनिया । टाकितां उडी झाली भस्म त्यांत जळोनिया । आलें भानुसमान विमान त्वरित मग उभयां । दचकला व्याध मानसीं असें पाहुनिया । धिःकार असो नरदेह व्यर्थ हा वायां । मग करी पक्ष्यासी विनवणी कर जोडुनिया । मागणें हेंची उद्धरावें पातकीया । ते म्हणती गौतमीसी जावें स्नान कराया । त्या

---

१ थंडीनें. २ जाळ्यांत सांपडलेली. ३ स्त्री. ४ अग्नींत.

पुण्यें आचारें उद्धरशील पारधीया। गंगाप्रवाहीं मग वराहतीर्थीं जाऊनिया। स्नानदान तेथें पुण्यदेह पावूनिया। त्रिवर्ग बैसले विष्णुपदीं जाऊनिया। विधियुक्त हाची गंगामहात्मीचा पर्या। विधी सांगे नारदाप्रती कृपावंत होऊनिया। निमिषारण्यीं सूत सांगे शौनकादिक ऋषीवर्या। अत्यादरें सांगत कथा हें सत्कारूनिया। तेचि ही कथा सुंदर परिसावी श्रोता। म्हणे होनाजी बाळा ही सर्वांस विनंती ॥ ४ ॥

## ॥ लावणी नळराजाची ॥ ३० ॥

**चाल**—रतिवंत महाराज पेशवे अमोलिक सुर्ता मोती।
सवाई माधवराव स्वारी निघाली नबाबाबरतीं ॥

माझे नळरायें निरपराधी मज त्यागिलें ॥ ध्रु० ॥ अगदीं तीन दिवस अरण्यामाजीं होता उपवासी। म्हणऊन पक्षी नळराय मुकला वस्त्रासी। येऊन नदीतीरीं मग नैषधरायें वधिलें मच्छांसी। पचऊन लौकर घाली म्हणुनी या दिधला मजपासी। भाजुनिया जों सत्वर गेले वधावयासी। होऊनिया तों जिवंत माझें हातिंचा गेला दुःखरासी। केवढे दुःखाचे डोंगर झाले उभयतां आम्हांसी। बोले येऊन विदर्भाजवळीं वनीं कष्ट भोगिले ॥ १ ॥ ऐशा दुःखामध्यें असतां घडला हा वियोग बाई। या गे समयांत तयाच्या सखये मी संनिध नाहीं। वाटे दुःख माझ्या अंतरीं गत करूं तरी मी कांहीं। पक्ष्यादिक वनचरें वृक्षशिळे हो तुम्ही सर्वत्रांहीं। येथें कीं काय नळासी ल्वलाहीं। पाहूं जाऊं दृष्टीनें आपल्या तरी कवणें ठाईं। भक्षाभक्षा श्वापद हो मजला तुम्हीं सत्वर गती। याचे किंचित् हृदयांत न साहे दुःख मागिलें ॥ २ ॥ दोघे उपवासी तीन दिवसांचे या अरण्या मार्गें। देखुनी ओसाड धर्मशाळा कष्टी निजला गे। तेथें लागून गेली काळासी दारुण निद्रा गे। माझ्यानें पहावेनात क्लेश तयासी म्हणवून

१ नलराजानें. २ माशांना.

मजलागे । फाडून वस्त्र अर्धें निजल्या मी जागीं टाकून गेला गे। आतां मजला त्याविण मरण सुखाचें हें न येची कां गे। कंटक पाषाण रुतती त्याच्या सकुमार पदीं । कधीं ग उष्ण वायूसी तयानें नाहीं पाहिलें ॥ ३ ॥ ऐसे दुर्धर पर्वत विंध्याद्री ओलांडुनी गेली । तेथ त्या वनीं ऋषींचीं स्थानें उत्तम देखिलीं । म्हणती वसुधामर[1] पाहुनी तिजला आदि शक्ती उदेली। तेव्हां आमचे तपसिद्धी न कळे आज फळाशी आली। ऋषीनें मग प्रसन्नमनें करूनिया तिजला पुसी केली । जितुकी वर्तली तितुकी ऋषीवर्या वार्ता सांगितली । पुढतीं आज म्हणे होनाजी बाळास तिनें पतिव्रतपणें। भाग्य पहा ऋषी आशीर्वादें पतीमुख देखिलें ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ २१ ॥

चाल–हृषीकेशी दूर देशीं अंतरले । प्राणपती मनीं कोणाच्या भरले ॥

—परशराम.

मंगलधामा मेघःशामा कंसारी[2]। सांगा कोठें क्रमिली निशा सारी॥ध्रु०॥ आनंदकंदा गोविंदा चक्रपाणी । तुला न पाहतां जिव होतो वेड्यावाणी। संसारास घातलेंस माझ्या पाणी । कोणे ठिकाणीं तुम्ही असतां अहो श्रीहरी ॥ १ ॥ मिळाली होती रात्रीं संताची मांदी। कीर्तनछंदें मी पडलों त्यांचे नादीं। श्रवणीं भरलीं सावडी नामें साधीं। त्या अनुवादी भरियेलों भारी ॥ २ ॥ विरंचिताता विश्वपते विश्वोद्धारा । सायंकाळीं मी काढून दुग्धधारा । लक्षीत मार्ग बैसलें आड करून दारा। परम उदारा पंकजनेत्रा गिरधारी ॥ ३ ॥ एक वेळां आम्ही आलों होतों तुजपाशीं । लागून गेली निद्रा तुझिये नेत्रासी। न गमे राधे तुजविण आमचे चित्ताशीं। परस्थळाशीं परतून गेलों परभारी ॥ ४ ॥ यदुकुळभूषणा । श्रीपती जगत्पाळा। भवभयहरणा अरे यशोदेच्या वेल्हाळा । तव आश्रयानें न गणून असतो कळिकाळा । होनाजी बाळा तुज ध्याई मनामाझारीं ॥ ५ ॥

१ ब्राह्मण. २ श्रीकृष्ण.

## ॥ लावणी कृष्णाची ॥ ३२ ॥

चाल – करी जिजाबाई प्रार्थना धांव विठाई ।
द्रव पावला वस्त्र दिलें कोणें ग ठाई ॥

— परशराम.

श्रीहरी ऐसा गोकुळिया चाळक नाहीं । शिकवी याला बरवे गुण यशोदेबाई ॥ ध्रु० ॥ आम्ही तरी बसव्या सासुरवासिनी व्रजनारी[1] । कुळरीत कैशी बाई आठीव मनामाझारीं । नाहीं तरी बसूं अवघ्या येऊन नंदद्वारीं । तो कंसारी मग करील आमचें कांहीं ॥ १ ॥ वर्तत असतां आम्ही आपल्या लौकिक छंदें । प्रजा आम्ही तुमच्या या नृपाळसंबंधें । हरएकविषयीं त्रासविलें आनंदकंदें । बाई निरद्वंद्वें वसतसों या गोकुळठायीं ॥ २ ॥ पाडून विसरी अवचित कोणीकडून येतो । ठकवून दृष्टीहि वत्सें सोडून देतो । शिरून घरामध्यें हा दधीदुध अवघें पितो । आम्ही किती भितों आबरूशीं जगीं या ठायीं ॥ ३ ॥ त्यजून प्रपंचा निश्चळ तप करितां रानीं । विवेकदृष्टी गोविंद वळखिला ज्यांनीं । होनाजी बाळा पद आठवी तयाचें ध्यानीं । काशी नित्य रत सदा हरीचे पायीं ॥ ३७ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ २३ ॥

चाल—आला हो वनवास पती गेला नवतीचा गडे चाहणारा ।
आतां समजलें राजा भर्तृहरी भरतपूरचा राहणारा ॥

— सगन.

आम्ही दिनें तुजपदीं सदा हा भाव वसो जगदांकुरा । अद्भुत नाव बुडविली यमुनाजळीं श्रीहरी करी मनोरथ आतां पुरा ॥ ध्रु० ॥ आज प्रभंजन[2] सुटला काय करावी आतां गती । नेत्रीं भरली मृत्तिका धुळीनें

१ गोकुळांतील स्त्रिया. २ वारा.

व्यापिली कुंभिनी[1] अती। दिन आहे का अस्त पावला किंचित् न कळे आम्हांप्रती। चहुंकडून वळला पर्जन्य त्यामध्यें विद्युलता प्रकाशती। नग्न होऊनिया छिद्रें बुजविलीं नौकेचीं आपले हातीं। तरी जळ भरलें आंत बुडालों आकंठ[2] आम्ही हे जगत्पती ॥ चाल ॥ कोठें तुज लपवावें सांग यशोदेच्या वासुरा ॥ आम्ही० ॥ १ ॥ नाना यत्नें करून जीवावें[3] येथें आम्ही तुजला कोण्यापरी। चिंता जळीं बुडतसें आम्हां काढी सत्वरी तूंच हरी। वर्तमान आद्यंत यशोदेनंदाप्रती समजलें जरी। त्यागितील ते प्राण उभयतां शोक करून यमुनेतिरीं। आम्ही चांडाळणी बळें बसविलें नौकेमध्यें तुज धरून करीं। आतां संकटीं पडलों आम्हांला न दिसे कंचित् गती बरी। ओढवला प्राणन्त भेटवी हे गोपीमानसमधुरा ॥ आम्ही० ॥ २ ॥ पूर आला यमुनेशीं कसा हा असंभाव्य नीर उचंबळलें। गच्छ नक्र कासवें विरोळें मंडुक[4]सुसरीजवळ कुळें। तृषाक्रांत जळपाना सायंकाळीं आलीं श्वापद पाळे। रोहेरीस वनगाई कस्तुरी मृगजवादी मांजरें नकुळें[5]। भयानके मुरडून पाहती आम्हांकडे सिंहशार्दुळें[6]। आतां न वांचूं हरी आम्हां अंतरलीं आमचीं बाळें ॥ चाल ॥ पूर्वीच्या वैरिणी तुझ्या केवढ्या आम्ही अति निष्ठुरा ॥ आम्ही० ॥ ३ ॥ हरी म्हणे गोविलें बरें कीं अनर्थामधें तुम्ही अशा। कृतान्तभगिनी[7]-मधून मला तारून तुम्ही तराल कशा। घाबरल्या अवध्याच अंतरीं होऊनिया पिशा[8]। न योजितां तरणोपाय बसल्या स्वस्थपणें बावऱ्या जशा। भावबळें झांकाल नेत्र हें निर्मळ मनें तुम्ही गोपस्नुषा। कडेस लागेल नौका वाढेल तुमची पूर्ण आपजशा। होनाजी बाळा म्हणे निश्चिती तरली ती गोपी चतुरा तशी। नाव नेलीस पैलतिरीं त्वां इंदुप्रताप सुरा ॥ आम्ही० ॥ ४ ॥

---

१ पृथ्वी. २ गळ्यापर्यंत. ३ वांचवावें. ४ बेडूक. ५ मुंगूस. ६ वाघ. ७ यमुना नदी. ८ वेड्यागत.

## ॥ लावणी कृष्णाची ॥ ३४ ॥

चाल—जीव गेला जाऊं दे नारी केला नेम ना कधीं डग न ।
वायकोस आडवी दादल्या तूं मरशील मी सती निधन ॥

— परशराम.

कहे चंद्राबल गुजरी किसन हासना हकसताता मुजे । जान गई तो भलासेकी आब मैदान न देऊंगी तुजे ॥ ध्रु० ॥ चोर छिनाल बेदबी बेपर्वी बेशमी बेहाया । बाजंदेबै कैदते बदमस्त इताक्कं भया । भलेपणोमें जबसे कहेती बनही मावता कहा । मल्लो छांड गारि देऊंगी हाठेले बिच फडा क्यं रहा । राहा पकड ब्रिजबनमों कहे गोदानसबी सोलिया । छोड मेरेसे नहीं चलनेका मैं तो बुरिहुं स्त्रिया । अरे संगल्यिे बालगोपाल बनमे तूं । तूं करे समजके ख्याल बनमे तूं । तैं नंदाजीको लाल बनमे तूं । मत पडे हमोरे ख्याल बनमें तूं । हाकनाहाकरे जंजाल बनमे तूं । क्यं करे गोह्याबेहाल बनमे तूं । खुष कंमरमें सोटे खावोगे ऐसा मुजकु सुजे ॥ जान० ॥ १ ॥ कहे किसन सुनग्वालन मुखके सुकुन सुनाती बुरे । उपर भाव बतावत अंदर नखरा हमसे करे । हाकमी हमारी घर गोरस परहुकूम हमारा फिरे । जबरदस्त मय किसन धुवेसे नयन तेरे क्यं भरे । तूं छिनाल तेरी सासु चोर तूं क्यं हामसेलरे । खडी रहे चुबकी हासल बिनापाव आगेमत धेर ॥ चाल ॥ ते ब्रिजभानकी कारश्चाल तूं । आंब खायगी मार ग्वालन तूं । हाकनाहाक करे जंज्याल ग्वालन तूं । चिपी लगावें बेर ग्वालन तूं । क्यं करवाती स्वाल बनमे तूं । पैल हमारी कैसी गुजरी दिल्तरा नामुजे ॥ जान० ॥ २ ॥ खांदे कमरीया हात लकरिया माल लटकती गेले । कालेची पडे सातीची कन्हया तेरेसरिखे मिले । गवलनके चरवया दुबले पतले मिले । इसि सुरतसो दान लेयेगो कुच तेरा नाचले । चंद्रभान राजाकी कारसुनकिरे अलबेली । ना समजे तुज समजन्ही हे

क्यं धमका नामुजे ॥ चाल ॥ अरे यशोदा मायको कान्हा बाल तूं । अरे क्यं करे हमे हैराण वालम तूं । अरे येहि खुसिको दान बालम तूं । अरे मत बतावे तेरिशान बालम तूं । आगे पीछे देख मेरेसे दान चुकाकर लिये मुजे ॥ ३ ॥ तै औरतकी जात दिवानी शान बताती वडी । हामयाके प्रभुराज अबिलग तुझे समज ना पडे । खांदे कमरिया हात लकरिया दुबले पतले गडी । इसि सुरतसे नहीं लगनेके नारद तूं फुलझडी । पाव उठाके देख तमाशा आजब हमारी बडी । ज्याती नहीं ह्यासे क्यं जुट्या बाता बडी करती खडी ॥ चाल ॥ क्यं मेरा करेगी राग ग्वालन तूं । देजा गोरस गोरसदान ग्वालन तूं । मैं ब्रिंदावनको वाध ग्वालन तूं । कहे चुपी बता बेफाम ग्वालन तूं । क्यं नहीं करे बैताग ग्वालन तूं । अरे क्यं लगवालेगी दाग ग्वालन तूं । होनाजी बाळा कहे ब्रिजबनमों नाम नगारा बजे । गुण गावत मकानी आपने तानसे यही पग पुजे ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ ३५ ॥

चाल—हृषीकेशी दूरदेशी अंतरलें । प्राणपती मनीं कोणाच्या भरले ॥

— परशराम.

गोपीमनकमळप्रियभृंगा हे श्रीरंगा वस्त्रें देई ॥ध्रु०॥ कै गुनोनथी तमारो । प्रभुजी हमारो चीर आलोंछे । रिसावे डोसी घरमों मजे मारवाने भलो मिलोछे ॥ चाल ॥ जसोदावालो चेटकहो रुखडो घनो । ज्यावाछे बोसिने ठाकुरजी चिरलीनो । सो नगन करेछे जमुना जल गोपीनो । संदीपण मेहेताने आलखवाने बुद्धि शिकाई ॥ गो० ॥ १ ॥ मी हात जोडितें तुम्हां तूं सोरकीरे कान्हा दे सना झाले । मारिल मा ही सासु म्हातारी जाऊं दे मुरारी तुझें काय झालें । तुम्हा नंदाची आण हरी तुम्ही दिवाने भले तूं ये तरीं खाले ॥ चाल ॥ तुम्हा भयानें आलों आम्ही आंगुळ कराया आठ । दूर जागा पाहिला तुहा वारा नाहीं जेठ । घेतलीस लुगडीं अवचित

श्रीहरी त्वां कुठें । बसलास झाडावर एक आडकी सुडकी न धरी मायेची द्वाही ॥ गो० ॥ २ ॥ सब गोपी निकसेन्हाने जमुना म्याने आजी नंदे लाला । कपडे छोड तठपे हामे मष्करे ताके वाला । सबयेके चीर तुम लेगये दिवाने भये ताल क्यं डाला ॥ चाल ॥ गोकुलके राजा शान तुत्यारी येही । सोहेवी आउरइ भरतकां हा नंदकी रही । दखरत बैठे जेब तुमने चोरी किई सो हाकम पणें कीदस्ती नंदकी बस्ती भसभरपाई ॥ गो० ॥ ३ ॥ तंव कृष्णाकरुणाशिळे कुळसुशिळे प्राणनिधानं । इदं किर हेमां-बराचिर किं हारं वस्त्रप्रधानं । विद्यावयोद्रविणधामं मनाभिरामं पटार्पिदानं । ॥ चाल ॥ तनमई भवान्न खलु वृत्तिवैरागरा । मद्वाक्यहि श्रुत्वा गुणानं भुवन-सुंदरा । दृशा दृश्यमतां अखिलार्थलाभसुरनरा । मात्मार्पितच्चिरं घननीलशरीरं वासुकीशायी ॥ गो० ॥ ४ ॥ जागविता जगा गभस्ती पैल ते दिसती किरणें आकाशीं । करद्वय जोडुनिया भावें तुम्ही नमावें तमांकासी । मग सत्वर गमन करावें त्वरें रत व्हावें सदनसुखासी ॥ चाल ॥ ऊर्ध्वकरें गोपी नमिती भास्कराप्रती । ज्याचीं त्यास वस्त्रें अर्पितसे श्रीपती । होनाजी बाळा म्हणे गत्गोरी अहंकृती । रामा अंदू दिनरजनीं सादर भजनीं ॥ गो० ॥ ३ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ ३६ ॥

चाल—कुठंवर हा भव पुरे पुरे । नाहीं यांत किमपी सौख्य रे ॥

—रामजोशी.

मुकुंद यमुने थडीथडीं । खेळतसे मिळवून गडी ॥ ध्रु० ॥ विटीदांडू आणि चेंडुलिंगोऱ्या लपंडावी कावडी । साखरपाड्या भोंवरें चक्र गोट्याच्या परवडी ॥ १ ॥ हुतुतू हमामा दुंबर घालुन मुलें वदती बोबडी । पहावया तें सौख्य मला हे गोविंदाची आवडी ॥ २ ॥ चला सर्व यमुनेजळीं जाऊं । पाहूं मूर्त फांकडी । वनमाळा । आपाद जयाच्या स्कंधीं काळी

१ सूर्यास. २ वर हात करून. ३ अभिमान. ४ पायापर्यंत. ५ खांद्यावर.

घेंगडी गडी ॥ ६ ॥ स्वप्न जागृती तींत मूर्त कदापि मज न दिसे नावडी । स्मरण हरीचें होनाजी बाळा म्हणे हें अमृत घडीघडी ॥ मुकुंद ॥ ४ ॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ ३७ ॥

चाल—कुठंवर हा भव पुरे पुरे । नाहीं यांत किमपि सौख्य रे ॥

— रामजोशी.

चला सख्यांनो सर्व जाऊं या गे । त्यजुन गोकुळ्या श्रीरंगाच्या मागें मागें ॥ ध्रु० ॥ रात्रीं बोधुनिया नंद यशोदेशीं । नेतो अक्रूर हरिलागीं मथुरेशीं । दृष्टी कैंचा मग पडेल हृषीकेशी ॥ चाल ॥ जातो खाम पूर्णकाम शाम राम धामजिवी मीया तमाम अन्न द्या गे ॥ १ ॥ गोकुळिच्या हत्या सर्व आतां । अक्रुरा पडतील तुझ्या माथां । नको नेऊं मथुरेशीं जगन्नाथा ॥ चाल ॥ असें बोलून त्या निदान म्लानवान प्राणदान जाण घालुनिया प्रमाण याचें ध्या गे ॥ २ ॥ दिसे अक्रूर हा क्रूर मोठा बाई । याणें मोहुनिया नंदयशोदाही । नेतो आमचा जीव प्राण शेषशायी ॥ चाल ॥ हरी जळ एक आम्ही मीन हीन दीन तयाविण हीन दीन लीन शीण क्षण भक्षील आम्हांलागे ॥ ३ ॥ सखे क्षणभरी रथ थांबविला । कसा दुर्जनें हरी दूर लांबविला । जीवा अक्रुरें चिंताग्नी झोंबविला ॥ चाल ॥ गीत होनाजी गाई ध्याय पाय साय न्याय सर्व लागे । चला सख्यांनो० ॥ ४ ॥

## ॥ लावणी द्रौपदीवस्त्रहरणाची ॥ ३८ ॥

चाल—दोघी सवती भांडती पति भांगडभुंगा ।
आपसांत वर्म बोलती गौरी आणि गंगा ॥

— परशराम.

द्रौपदी म्हणे ये समयीं धांव हृषीकेशी । गांजिलें फार मी कौरव दुष्ट सभेशीं ॥ ध्रु० ॥ ऐश्वर्य तेजसंपत्ती पंडुकुमाराची । त्यावर मंडप चतुराई

विश्वकर्म्याची । अनुकूल अवघे परिपूर्ण कृपा श्रीहरिची । पाहून कपटी-वृत्ती जळपे सुयोधनाची । त्रैलोकीं कीर्ति राजसूय यज्ञाची । वर्णिती सुरनर ते सभा धर्मरायाची ।। चाल ।। दुर्जनें कपट योजून द्यूतपण केलें । त्या पणें करुनिया धर्मे[1] राज्य हराविलें । द्रौपदीसहित धन सर्वहि जिंकुन नेलें ।। चाल ।। सद्बुद्धि धर्म ऐसा विपरित कैसा । खेळून द्यूत पाही । बैसला दिनत्रयीं निरउपाई । तो द्रुपदजांवई । सद्भक्त सत्यवचनी अनुचित करणें । दुसरें न सुचे कांहीं ।। चाल ।। दुर्योधन बोले विदुराशीं आम्हीं जिंकिलें पंडुसुतांशी । झाली द्रौपदी आमची दासी ।। चाल ।। सभेमाजीं बोलावून आणी । तिचें पतिव्रतपण ये स्थानीं । दाविल तें पहावें सर्वांनीं । विदुर म्हणे अरे पापखाणी । निकट आली तुजला प्राणवाणी[2] तरीच वदसी अपवित्र वाणी । तिचा पाठिराखा निर्वाणी । निशिदिनीं[3] संनिध चक्रपाणी ।। चाल ।। दुर्योधन त्या विदुराशीं बळें धिःकारी । निकरानें । आपले प्रातिकामी[4] सुतासी । हाक मारी । आदरानें भीड सोडून आण पांचाळी सभेमाझारीं । स्वकरानें । तो म्हणे जाऊन द्रुपदराजकुमारी । ते द्यूत खेळून हारविली संपद सारी । धर्मानें । बोलवितो दुर्योधन सभेशीं निर्धारी । क्रोधानें । किंचित् न चले कोणाचें तेथें अवधारी । अभिमानें । पांचाळी वदे दुर्योधन आधींच द्वेषी । मांडिला रोकडा अनर्थ भाग्यविशेषीं द्रौपदी म्हणे ।। १ ।। द्रुपदतनया म्हणे दुर्योधनपुत्राशीं । श्रुत करा निवेदन तुम्ही भीष्मद्रोणाशीं । द्यूत खेळून धर्में हारविलें आपणाशीं । तरी मग ते तुमचें कारण काय आम्हांशीं । मी पंच जाया मज नेमिलें पंचवरांशीं । दोन मास द्वादश दिवस एक एकाशीं ।। चाल ।। प्रस्तुत आतां रत असें भीमाचे ठाईं । मजलागीं सत्य सर्वथा जिंकलें नाहीं । दुर्योधन जाऊन सभेशीं लवलाही ।। चाल ।।

---

१ धर्मराजानें. २ प्राणहानि. ३ रात्रंदिवस. ४ हें सुताचें नांव. ५ द्रौपदी.

सांगे तयासी वार्ता म्हणे ताता । ऋतुस्नात[1] ऋतुकाळीं । द्रौपदी धरून पदरीं । सभेभीतरी । केवी आणू पांचाळी दुर्योधन निर्भर्त्सी म्हणे छी छी । पुत्रासी तये वेळीं ॥ चाल ॥ दुःशासन आज्ञापी कुमती । आण पांचाळी सभे निश्चितीं । किंचित् भीड न धरितां चित्तीं ॥ चाल ॥ महा व्याघ्र तो सरसावोन । धरी वनांत कपिलेसी जाऊन । कीं ते जनकात्मजा[2] निधान । धरूं धांवला द्विपंचवदन[3] । तेवीं द्रौपदी दुःशासन । म्हणे आतां वरी दुर्योधन ॥ चाल ॥ अन्यथा हें भाषण तूं काय करीसी माते । सत्पात्रा । गांधारी समान श्रेष्ठ मी सुयोधनातें । शिष्टाई कळेल तैसी करी तयातें । सत्पात्रा । हो माझा द्रुपद पिता अशा समयातें सत्पात्रा । न ऐकसी तरी घे शस्त्र मज वधी येथें । सत्पात्रा । तो पापरूपी निर्दय बोलतो तयेशीं । ऊठ चाल सभे वाचाळे धरीन केशीं ॥ २ ॥ ऐकून कठीणोत्तर द्रौपदी मागें सरली । मंदिरामाजीं शशिवदना[4] मुखीं उतरली । धाऊन दुःशासनें कवळुन केशीं धरिली । त्या श्रवणफुलाचीं मुक्तें[5] तळीं विखुरलीं । भवतालीं पाहे चहूंकडे सभेंत घाबरली । म्हणे धांव धांव श्रीरंगा लज्जा हरली ॥ चाल ॥ दुर्योधन जानु उघडी करून दावी । द्रौपदी बैस अंकीं[6] दुजी गोष्ट न वदावी । मम संगती योगें त्वां संपत्ती भोगावी ॥ चाल ॥ द्रौपदी म्हणे नष्टा बसेल दुष्टा । तुज अंकीं गदा नवरी रक्ततेची हरिद्रा[7] लाउन निद्रा । कर रणमंचक समरीं ऐकतां शब्द असा व्याघ्र जैसा बघु रिघे हरणी विवरीं[8] ॥ चाल ॥ दुःशासनास तो दुर्बुद्धी । म्हणे दुर्योधन न करी आवधी । पांडव हे शतमूर्ख त्रिशुद्धी ॥ चाल ॥ आधीं वस्त्रें घे यांचीं हिरोनी । मग द्रौपदीशीं नग्न करूनी । दावया सभेशीं त्वरें या नयनीं । हा शब्द पडतां पांडवश्रवणीं । पांच जणें वल्कलें वेष्टनीं । केवळ दीन बैसले होऊनी । त्या द्रौपदीसंनिध

---

१ रजस्वला. २ सीता. ३ रावण. ४ चंद्रमुखी. ५ मोत्यें. ६ मांडीवर. ७ हळद. ८ गुहेंत.

येउनी निरी आसाडितां दुःशासनीं । आठवी कृष्णाशीं कृष्णभगिनी ॥ चाल ॥ गांजिली कौरव दुर्जन मज-मेघःशामा । श्रीरंगा । संकट जाणून त्वर ये मंगलधामा । श्रीरंगा । विधिजनका भक्तजनांच्या ह्रदयरामा । श्रीरंगा । द्वारकाधीशा रुक्मिणीमानसाविश्रामा । श्रीरंगा । कां पहुडलास शेजार घेऊन भामा । श्रीरंगा । खेळला द्यूत धर्म म्हणून मोकलिले आम्हां । श्रीरंगा । करुणानिधी क्षीराब्धिवासा अजून न येशी । लज्जा गेल्यावर तूं काय हो डोळां पाहसी ॥ ३ ॥ पहुडला शेषमंचकीं तो मुमुक्षु-दानीं । तळहात पद रुक्मिणी चिदरत्नाची खाणी । उद्धव अक्रूर तें सीतळ समीर संधानी । उभे भक्तराज तिष्ठती करद्वय जोडुनी पाणी । ऐकिली श्रवणीं द्रौपदीची मिलिंदवाणी । गुंजारववर्ण श्रुतहरीतें निद्रास्थानीं ॥चाल॥ कौरव तस्कर शिरले पांडवभांडारीं । द्रौपदीसहित धनसंपत्ती नेली सारी । ऐकतांच जागृत झाला कंसतमारी ॥ चाल ॥ घाबरा उठून गे निघून वेगें । कोणासही न पुसतां । आपले भगिनीसाठीं तो जगजेठी । आला इंद्र-प्रस्ती । म्हणे द्रौपदी सावध होईं । आलों ऐकून व्यवस्था ॥ चाल ॥ याज्ञसेनी जंव मागे पाहे । कैवारी पाठीशीं उभा आहे । हें देखून मानसीं निर्भयें ॥ चाल ॥ तंव दुर्जन दुःशासन सरसी निरी ओढीत फेडित वसनांशी । नेसवीं वस्त्रें हरि भगिनीशीं ॥ चाल ॥ डाळिंबी मोती चुरनकसी । राधावळगुजरी खसखसी । कंबुवर्ण पटवस्त्र प्रकाशी । निळी हिरवी अंजिरी पानसी । सोनवडी रानघडीसरसी ॥ चाल ॥ नाना जाती भगिनीशीं पुरविलीं वस्त्रें । श्रीरंगें । आपल्या पितांबरें झांकिलीं द्रौपदीगात्रें । भगवंतें । हें फेडतील म्हणून करीं बसविलीं शस्त्रें । निजअंगें । पांडव यश आलें नेणती अपवित्रें । मदसंगें । श्री शांत सिद्ध तत्पर सांनिध सेवेशीं । गाई होनाजी बाळा वस्त्रहरण प्रेमेंसी । द्रौपदी म्हणे ये समयीं धांव हृषीकेशी ॥४॥

---

१ ब्रह्मदेवाच्या पित्या. २ हात. ३ भ्रमरशब्द. ४ चोर. ५ वस्त्रास.

११४७०२

## ॥ लावणी सुलोचनेची ॥ ३९ ॥

चाल—दशमुख लंकेशाची स्नुषा सुलोचना सती ।
भुज पाहुनि करी आकांत पडिले इंद्राजित रणीं पति ।

— परशराम.

सुलोचना वेल्हाळी राया इंद्रजिताची राणी । सदनीं असतां सुखी आंगणीं पडला भ्रतार[१]पाणी ॥ ध्रु० ॥ दु[२]र्जय वीर पावला इंद्रजीत लक्ष्मणाचे करीं । धड रणीं पडलें शिर सुवेळा । चळीं नेलें वानरीं । दशाननाची स्नुषा ज्येष्ठ ती शेषाची कुमरी । हर्षयुक्त असतां आनंदामध्यें आपले मंदिरीं । अकस्मात लंकेवरुनी आली भुज निकुंबळें आंगणांत पडतांच आल्या दासी अवचित बाहेरी ॥ चाल ॥ कर पाहून वीराचा तेथून दूती लगबग धांवती । सदनीं सुलोचनेशीं वर्तलें वर्तमान सांगती । कुठून वीराचा पाणी पडला आंगणांत अवचित ॥ चाल ॥ डचकली असें ऐकतां शब्द दासींचा । घाबरली मनीं मुखचंद्र उतरला तिचा । वाहवला धर्मशीतळ चंदन अंगिंचा ॥ चाल ॥ शृंगारयुक्त सदनीं कन्या शेषाची । ती केवळ बिंबाधरी[३] सर्वलक्षणी गजबजून सख्या चहूंकडून निशीं सावरिती । तांबूल शिरिचा पल्लव आदि करुणा भरती । मूर्छागत गुणसरि[४]ता धरणीवर पडली ती । विगलित झालीं अंगिचीं भूषणें ॥ चाल ॥ निर्मळ कोमल कांती । केवळ सुवर्णवर्णी । निस्तेजपणें दिसती ॥ चाल ॥ ती मुक्त घोषकर्णी । कर्दळी पडे जैसी । ती वायुयोगें धरणीं । घाबरी राजबाळा । हळहळी पतिस्मरणीं । पादुका शेषदु[५]हिता । लिहिल्या अपूर्व चरणीं । बोवडी वळत चाले । द्रुयपदीं चपळ हरणी । सुमनकळी चाप्याची शेषदुहिता रत्नाची खाणी । क्षेमरूप तें असो

---

१ पतीचा हात. २ पराभव. ३ पिकल्या तोंडल्याप्रमाणें लाल आहेत ओठ जिचे. ४ गुणाची नदी. ५ शेषाची मुलगी ( सुलोचना. )

दुतीशीं बोले मंजुळवाणी ॥ सुलो० ॥ १ ॥ सीतेचे कैवारें असंख्य वान्नर दळ घेऊनी ॥ नजीक सुवेळाचळीं राहिलें रघुनंदन घेऊनी । बहुतांपरी रावणा करीतसे मंदोदरी विनवणीं । कीर्ति महिमंडळीं करा सीता सुंदर देऊनी । उतावेळ युद्धाशीं राजा रामचंद्र उपवनीं । पौलस्त्यकुळ बुडेल चिंता वाटे माझे मनीं ॥ चाल ॥ बहुत प्रकारें करून तयेनें । दशकंठा बोधिलें । गर्वबळें रावणें सतीचें नाहीं वचन ऐकिलें । कुंभकर्ण आदि करून आपलें कुळ समग्र बुडविलें ॥ चाल० ॥ अतिकाया देवांतक पडले रणीं । आज स्वामी युद्धास गेले समरांगणीं । तशी उठून आली भुज पहावया आंगणी । पंचांगुळ[1] मुद्रिका मंडित दंडी विराजे । ती कीर्ति-मुख चपळेहून वरी शोभली । वीर कंकण सहवर्तमान भुज ओळखिली । मग शरीर तयेनें धरणीवर टाकिलें । आज माझें युद्धसमुद्रीं जहाज बुडालें । सौभाग्यतरूचें रोप समूळ अहाळलें ॥ चाल ॥ उचलून सुलोचनेशीं । त्या सखया सांवरती । भुज आलिंगून हृदयीं । आक्रंदत सुशिला सती । मूर्छना सांवरूनिया मग बोले भुजेप्रती । स्वामींच्या पदीं असल । जरी माझी चित्तवृत्ति । तरी दे लिहून मजला । कसें पडलें प्राणपती । मग आणुनिया पुढें ठेविलें भोजपत्र उकलोनी । वर्तमान वर्तलें लिहितसे भुज घेऊन लेखणी ॥ सुलो० ॥ २ ॥ धरून मनीं जय आशा होम करितां येकांतीं जाऊन ॥ ऐक शेषकन्यके निघाला अग्नींतून स्यंदन[2] । शत्रु आले ते स्थळीं समय फळ प्राप्तीचें जाणून । आराध्य दैवत क्षोभविलें वर चंडशिळा[3] घालून । अवघी नदी उतरून बुडाला तिरासमीप येऊन । तसेंच झालें येथें प्राणवल्लभे आम्हांलागून ॥ चाल ॥ शत्रूनें साधिलें वैर बहुतेक पाडिलें उणें । प्रारब्धाची दशा सुटेना भोग भोगल्याविणें । उपरी मांडिला पुढें संग्रामें[4] अति दारुण । ॥ चाल ॥ परी जय झाला पारखा आम्हांला दिसे । वाढता पराक्रम शत्रूचा राजसे । सौमित्राचें शरबळ विशेष होतसे ।

१ पांच बोटें. २ रथ. ३ मोठाले दगड. ४ युद्ध.

हितेज धनुर्विद्या पाहूनिया आगळी । संकल्प करून शिर उचित दिधलें त्याशीं । तिन्ही देह निरसून म्यां भित्र जोडला बरवा । जानकीकान्त श्रीराम अयोध्यावासी । धन्य आशावंत तो बिभीषण शरण निघाला । मम धरून जिवीं रक्षण केलें शरिराशीं ॥ चाल ॥ त्या लक्ष्मणें विप्रें । निरहारव्रत धरियेलें । सागर उतरून येतां । शिर दान तया दिधलें । रणीं घड राघवा पायीं । देऊन शिर समर्पिलें । संसारापेक्षां सुख रामपदीं दिसलें । म्हणून भुज धाडून तुजला । बोलाऊं पाठविला । शिरीं वंदून तें पत्र आपण वाचित शेषनंदिनी । भोंवताल्या सखया उभ्या ऐकती निश्चळ निवांत कानीं ॥ सुलो० ॥ ३ ॥ भुज घालून शिबिकेंत आश्विनीवर बसुनिया त्वरें । प्रवेशली लंकेंत पत्र घेऊन पती शोकांतरें । सर्व चिन्ह विपरीत स्नुषा ती दशकंदरा परम घाबरा मनीं पुसतसे तिजला अति आदरें । कां आलीस तूं येथें सांगहो इंद्रजीत सुंदरी । पत्र टाकितां पुढें वाचितां लंकाधीश सादरें ॥ चाल ॥ दुःखित सुमोळी पाही इंद्रजीत रणीं परत्र पावला । मी जाईन त्यासवें निशाचर पडला ॥ चाल ॥ मृत्तिका घेऊन लंकानाथ आपुले करीं । घालितसे दाही मुखीं तया अवसरीं । इंद्रजीत वार्ता ऐकून मंदोदरी । आली धांऊन लगबग मूर्च्छित पडली धरणीं । वक्षस्थळ बडवीत मयरायाची बाळा । म्हणे इंद्रजिता सुकुमारा तव सामर्थ्यें । रावणें घातलें देव बंदिं सकळां । एक सरें शोक करितात मिळुनिया अवघ्या । रावण कुटुंबीच्या ऐशी सहस्र अबला ॥ चाल ॥ समजावीत बहुपरी । सखया मंदोदरीशीं । म्हणे सुलोचना श्वशुरा । द्या शिर आणून मजशीं । पती माझे वाट पहाती । भेटेन जाऊन त्यांशीं । ऐकतां असा चढला । अति क्रोध रावणाशीं । म्हणे सिद्ध करा दळ हें । जाईन संग्रामाशीं । आज युद्ध करीन निकरें । त्या राम-सौमित्राशीं । मारून त्या दोघांशीं शिर मी आणीन लंकाभुवनीं । हें जरी न घडे तरी मी जाईन पुत्रपंथ लक्षुनी ॥ सुलो० ॥ ४ ॥ मग सुलोचनेशीं बोलतसे

मयकन्या ते वेळीं । शिर घालून घ्यावया तूंच जा माय सुवेळाचळीं । दुःखामाजीं सुख ठेवी मस्तक श्रीरामपदकमळीं । कौसल्येसारखी परस्त्री ज्यास सितेवेगळी । रामभक्त जांबुवंत नळ नीळ सुग्रीव मारुती बळी । न्यायसिंधु तो बिभीषण राखील पाठ तुझी ते स्थळीं ॥ चाल ॥ मंदोदरी बोलतां आलें तें सुलोचनेच्या मना । सुवेळेस जावया ती मागे आज्ञा द्या रावणा । तो म्हणे ठेवील तेथें जरी तुजसारखी अंगना ॥ चाल ॥ मग काय करावा विचार येथें आम्ही । म्हणे सती परस्त्री अभिलाषाचे कामीं । कल्याण कोण पावला अशा अनुक्रमीं ॥ चाल ॥ अधोवदनें रावण म्हणे तूं अवश्य जाई । ते ठेवतील तरी तयाशीं लाविन शिक्षा । तात्काळ निघाली बसून आश्विनीवरती । निवडून घेतला श्रेष्ठ सवें त्या क्षणीं । तें सुवर्ण लंकानगर उपेक्षून गेली पाहिलें दृष्टी । रघुनंदन कमळदळाक्षा ॥ चाल ॥ सती पाहून कपी हर्षें सांगती रामाजवळी । रावणें भय धरुनी धाडिली जनकबाळी । रघुनाथ वान्नराशीं । बोलतसे स्नेहमेळीं । रावण जीवंत आहे जो तो सिता तनुकवळी । बरें दृष्टी तुमच्या । ती न पडे कदाकाळीं । राम बिभीषणाकडे शेषात्मजेस देखुनी । तों जळधारा स्रवती । बिभीषण सद्गद आपले मनीं ॥ सुलो०॥५॥ मित्रकुळ मुकुटमणी बिभीषण म्हणे अहो रघुराया । परम पवित्र सुशीळ सती इंद्रजिताची जाया । गहनगती कर्माची न लागे उष्ण जिच्या पायां । ती आली तुमचेजवळ जानकीकांता शिर मागाया । राम म्हणे आतां आम्ही तुझ्या पतीचें शिर आणिलें या ठायां । वर्तमान तुज कसें समजलें सांग आम्हांशीं कळाया ॥ चाल ॥ म्हणे सुलोचना सती भुजेनें पत्र लिहून दिधलें । दावून पतीचें भुज लिखित राघवापुढें टाकिलें । तें पाहून वान्नरालागीं अवघें असत्य भासलें ॥ चाल ॥ आश्चर्य सर्व करिती आपले अंतरीं । लिहिलें पत्र हें कसें निर्जीव करीं । आम्ही सत्य म्हणूं पतिशिर हांसवील जरी ॥ चाल ॥ म्हणे राम इचा महिमा न वर्णवे वाचे । काय एक न करी येसमयीं येव्हां ।

तात्काळ वृषभावान्नरा हातीं आणूनिया। सतीपुढें ठेविलें शिर सुग्रीवें तेव्हां। पाहून सुलोचना हृदयीं धरून आलिंगी। उत्तरी वस्त्र हातरून वर बसविलें तेव्हां ॥ चाल ॥ विनवी शिराला पतीच्या। पाहून। प्रीतला वामनें पतिव्रता धर्म माझा। कपिकुळास दाखविणें। तुम्ही हास्य करा एकदां। स्वामी निर्जीव वदनें निर्जरामाजीं आगळी। होईल कीर्ति जेणें संतोषरूपें मजला रघुनंदन धन्य म्हणे। मजसी विनोद नानापरिचे करितां एकान्तस्थानीं। आज मनामधें क्रोध धरियेला स्वामी काय म्हणोनी॥सुलो० ॥ ६ ॥ करुणा विनोद दावी पतीला तनया भोगेंद्राची। का होम विध्वं-सिला कल्पना धरिली मनीं तयाची। रामरूप पाहून गोडी लागली सायुज्य पदाची। म्हणून खुंटलें बोलणें उपाधि तुटली जन्ममरणाची। कीं विदारणा केली सुग्रीवें पित्र कुंभकर्णाची। तोच हेत की जिवीं राहिला युद्धिं अशा जयाची। ॥ चाल ॥ कीं एक चुकलें आधीं जरी साह्यास आणितें पिता। तरी हातें बहु बरें शिर ऐसें उत्तर ऐकतां। सव्य नेत्र उघडून गद्गद हांसलें अवचित ॥ चाल ॥ या शब्दें कां शिर हासलें कपि बोलत। म्हणे राम तोच हा शेष सुमित्रासुत। हा पिता सती साह्यास आणितें येथें। त्या श्वशुरें मज मारिलें म्हणून शिर हासलें। तो ज्ञाननेत्र उघडून पाहिलें मजला। विस्मित होऊन अवघे वान्नर म्हणती सायुज्य मुक्तिशुद्ध शिर द्यावें इजला। पाहून सुलोचनाकडे लक्ष्मण हृदयीं। सद्गदित होऊन ममतेनें गहिंवरला ॥ चाल ॥ म्हणे म्यां अनुचित करणी। ज्या माताप्रती वधिलें जरी पितापुत्र बंधु। समरीं युद्धास आले। वधितां तयास येथें। निर्दोष राम बोले। म्हणे शेष सीतेसाठीं। तुम्ही वृक्ष आलिंगिले। अमृतकुपी आणूनिया। उठवीन तयाशीं बोले। ऐकतां अशा गोष्टी। मनीं वान्नर गजबजले। प्रभु कपी विचारे हो। शिर द्यावें असें ठरलें। होता निरास सतीची। मग रामचरण स्तविले। लंकेकडे वीर कोणी। आज धाडिजे आपले। येऊनिया सिंधुतीरीं। विस्तीर्ण कुंड

रचिलें । त्या धर्मशीळेवर हो । शिवध्यान हृदयीं आणिलें । पर ज्योति निघोन गेली । धड कुंडामध्यें पडलें । इंद्रजितासंनिध बैसली जाऊन स्वर्गाविमानीं । होनाजी बाळा म्हणे धन्य ही सती रत्नाची खाणी ॥ सुलो० ॥ ७ ॥

## ॥ लावणी ॥ ४० ॥

चाल—कस्तुरी वाळवीत होतें माडीवरती ॥ — सगन.

सूर्यवंशीं राजा दशरथ परम पवित्र । अति सत्त्वशील प्रेमळ देवाचा मित्र ॥ ध्रु० ॥ अयोध्येमध्यें करी दशरथ राज अहेराज तयाचे गुरु वसिष्ठ महाराज ॥ चाल ॥ महाराज तयाचें अद्भुत प्रतापतेज । अद्भुत प्रतापतेज काय तें चरित्र जाहलें आज तें ऐका कानीं । होती कौसल्या ते ज्येष्ठ तयाची राणी । सुमित्रा कनिष्ठ कैकैलय अभिमानी । लावण्यस्वरूप जणु विद्युल्लता असमानी । त्या तिघी स्त्रिया केवळ रत्नांच्या खाणी । येके दिवशीं राजे निजले रात्र माध्यान्हीं । पाहिलें स्वप्न तेव्हां दशरथरायांनीं । तीन प्राणी वधिले न लागतां क्षणमात्र । दोन पुरुष येक स्त्री वधुन उघडले नेत्र ॥ सूर्य० ॥ १ ॥ राजा उठून प्रातःसमयासी । चिंताक्रांत अयोध्यावासी, अहो वासी । गेले त्वरित वसिष्ठापाशीं, अहो पाशीं । तंव तो गुरु वसिष्ठरायाशीं पुसता जाहला । कां म्लान वदन त्वां केलें सांग आम्हांला । मग बोले अजाचा नंदन ऋषेश्वराला । रात्रींचें स्वप्न विपरीत सांगतों तुम्हांला । स्त्री येक वधुन वधिलें दोघा पुरुषालां । मग म्हणे मुनी तुम्हीं जावें त्वरित वनाला । तीन वधून श्वापदें या सत्वर सदनाला । आज्ञा वंदुनी सद्गुरूची तो सत्पात्र । ते काळीं पातले वनांत वीर विचित्र ॥ सूर्य० ॥ २ ॥ हिंडे अजसुत सारें रान । अहो रान लावून चापासी बाण तों रवी जाहला अस्तमान । सावज मोठें किंवा लहान । आढळलें नाहीं । गुरुआज्ञावीण जातां नाहीं । सावज

लक्षीत नृप उभा जळाचे ठाईं । काशीयात्रार्थी सुपुत्र श्रावण पाही । मातृपित्रास लागली तृषा ते समयीं । याअर्थें श्रावण जळ नेतां लवलाही ऐकुनी । याची वेळीं दशरथ राजीवनेत्र । सावज म्हणून सोडीत बाण ईश्वरी सूत्र ॥ सूर्य० ॥ ३ ॥ श्रावणाच्या हृदयीं शर बसतां । अहो बसतां । जाहला रामनाम मुखीं जपतां । अहो जपतां । आला अज नंद जवळ ऐकतां । पाहून मनुष्य तत्त्वतां अयोध्यावासी । म्हणे तूं कोण पुसता जाहला सांग आम्हांसी । तो म्हणे मी श्रावण पितृभक्त गुणराशी । बरें केलें आज उद्धरिलें मज पतितासी । परी तृषा लागली मातापितृव्याशीं । जा त्वरें आता हें जळ घेउनी त्यापासीं । अंध वृद्ध दोघे नाहीं तयाला नेत्र । आता प्राशन केल्याविण बोलूं नको अणुमात्र ॥ सूर्य० ॥ ४ ॥ ऐसें ऐकुनी अयोध्यापतीनें अहो पतीनें ॥ जाता जाहला चपळ गतीनें अहो गतीनें । पातला तेथें वायु रीतीनें अहो रीतीनें ॥ उभा राहून पुत्राच्या नीतीनें अहो नीतीनें । अयोध्यानाथ म्हणे ते काय होईल आतां हा धाक मनांत ॥ चाल ॥ तो वृद्धें मारिली हाक पुत्रा प्रेमांत । म्हणे बोले ना कसा बा श्रमला वनांत । तों दशरथ म्हणे श्रावण वधिला जळ जेथे । ऐकुनि वृद्धें ते काळीं केला आकांत । देह त्यागितो आम्ही करीतों पुत्र पुत्र । हा श्राप तुला पावसील हेंचि चरित्र ॥ सूर्य० ॥ ५ ॥ अवश्य म्हणून अयोध्यावासी अहो वासी । आलें गुरुआश्रमासी । अति हर्षे वदती वर्तमान जाहल्या पासी । ऐकुन ऋषी वसिष्ठ सांगतसे दशरथ राया । त्वरें शृंगऋषी घेऊन या यज्ञ कराया । आणविला शृंग दशरथ रंभें-पासूनिया । तीन पिंड दिल्हे मग प्रसाद यज्ञ करूनिया । रायें मग दिधलें त्या तिहींसीही वांटूनिया । म्हणे कैकै कां देतां मज मागुनिया । तों अकस्मात गेली घार पिंड घेउनिया । अकरावा रुद्र पिंडाचा वायुपुत्र । जन्मता उडाला भक्षावयासी मित्र ॥ सूर्य० ॥ ६ ॥ गर्भ राहिला तव तिघी स्त्रियांसी । अहो स्त्रिया जाहला अति हर्ष रायासी । निघाला डोहळे

पुसावयासी । गेले राव कैकैच्या सदनासी । हर्ष मनांत पाहिली उभी मंथरा दासी द्वारांत । पाहतां दशरथ रायासी गेली महालात । म्हणे उठा स्वामिनीं आले तुमचे कांत राहिले उभे तिजपासीं अयोध्यानाथ । मर्यादा कसी ती नाहीं जिच्या स्वप्नांत । तों पुसते जाहले प्रियेसी प्राणनाथ । सांग काय डोहळे होतीं तुझ्या मनांत । पुरवीन आतां क्षण न लागतांची यथार्थ । मग म्हणे कैकै पुरवी माझी भाष्य समर्थ तरी डोहळे मजला होती येक मनांत । वनीं पाठवावें होतां दोघींचे पुत्र स्थापावे । राजी माझें बाळ विचित्र ॥ सूर्य० ॥ ७ ॥ ऐसें उत्तर रायें ऐकुनी । व्याकुळ होऊन पडले धरणीं । तसेच उठले मम सांवरुनी । म्हणे त्वां वचनामध्यें गोउन घेतलें आम्हांला । परी विषातुल्य वाटती शब्द । जीवाला । जें मागसील या विरहित करीन हवाला । परी दुष्ट वासना ही आणूं मनाला । पाठऊं तरी कैसें लेकरें वनाला । ऐकतां असें म्हणे कैकैसी नृप नाथाला । हे न करितांची लागेल दोष वचनाला अति उदास उठले तेथुनिया । अजपुत्र हा दोष नाहीं तिजकडे ईश्वरी सूत्र ॥ सूर्य० ॥ ८ ॥ निघाले मग तेथुन लवलाही । लवलाही अती दुःखित मनाचे ठाईं । सुमित्रेचे सदनी आले पाही अहो पाहीं । तेव्हां तिनें तें राजींद्र सवाई । दृष्टी पाहुनिया । सावरून पदर उभी सन्मुख कर जोडोनिया । उजळुन दीप करी पंचारती घेउनिया । ओवाळी कांत । मनीं हर्षयुक्त होउनी । बसविले मंचकावर स्वामीस नेऊनिया । मग पुसती राव डोहळे ते प्रियेलागुनिया । ती म्हणे मज डोहळे हे वाटती पवित्र । करुं ज्येष्ठ बंधुची सेवा माझा पुत्र ॥ सूर्य० ॥ ९ ॥ असे शब्द तिचे ऐकोनी या ऐकोनी । मागलें दुःख गेलें विसरोनी । ज्येष्ठ पत्नीचे गृहीं जाउनी जाउनी ॥ सती कौसल्येतें पाहून अयोध्यावासी । देखुनी तें मुद्रा करी आश्चर्य मनासी । तें समाविस्थ नासाग्रीं ठेउनी दृष्टीसी । वस्त्राभरणें चौकुन सावरी ती दासी । झडपीली भुतें वाटे दशरथ रायाशीं । लग्नांतिल पुसतां रावण कृत्य तयेसी । फोडिली हाक जणु वीज कडकडली

आकाशीं । म्हणे वधीन रावणा शर लाउनी चापासी । धाबरेपणें नको वसिष्ठापाशीं । जाहला वर्तमान कथिला सर्व मुनीशीं । पाहावेसें ऋषी वसिष्ठ कौसल्येसी । पाहुन मुनीं तिसी बोले नृपनाथासी । पूर्ण ब्रह्म इज उदरीं अवतरतां पाहसी । नव्हे भुतचेष्टाही मिळाली रामस्वरूपासी । चैत्र शुद्ध ९ दिनकर माध्यान्हीसी । येतांच पुण्य नक्षत्र सफळ ते दिवशीं । जन्मतां राम सुख जहालें परम जनासी । अंतरीं हर्ष अद्भुत दशरथ रायासी । फोडून भांडारें अमित धनाच्या रासी । देता झाला मग अज नंदन विप्राशीं । म्हणे होनाजी बाळा । भजा स्मरा रे मित्र ॥ विठू आंदु प्रसंगीं गाती रामचरित्र ॥ सूर्य० ॥ १० ॥

## ॥ लावणी पंढरीनाथाची ॥ ४१ ॥

चाल—केशवकरणी अघटित लीला नारायण तो कसा
जयाचा सकल जनांवर ठसा ॥

समचरण विटेवरी कटीं कर हरी तव मुद्रा । भक्तिक्षुधे क्षीरसमुद्रा ॥ध्रु०॥ हे पंढरीच्या पावना अनाथ दिनाच्या । तारका तूं संतजनाच्या । अरे भक्तवत्सला गुण आगर गुणाच्या । हृद्गदा उमारमणाच्या । भाविक भक्ताप्रती संकटीं विकळ मनाच्या । जाण तया क्षणांत क्षणाच्या । कां आली न कळे मजविषयीं प्रभू तुज निद्रा ॥ १ ॥ शामसुंदरा हे मुकुंदा । अति प्रियकर सज्जनवृंदा । आनंदघना नंदनंदना हे गोविंदा । विकलों तव नाम छंदा । मम मन मिलिंद लक्षित तव पदारविंदा । श्रीहरी जगदांकुरकंदा । करीं कृपा जणासी प्राणिमात्र हरी हरिद्रा ॥ २ ॥ मधुकैटमारी मधुसूदन गुरुसंहारा । मनमोहन धीरउदारा । गोविंदा गोकुळवासा गोपकुमारा । गोपीकुचधिरविहारा । पद्मनाभा पंकजनेत्रा दहीपयहरा । पदीं परमात्मा या दे थारा । मुक्तिदायका मुनिमानसचकोरचंद्रा ॥ ३ ॥ शरणागतासी तारि तारि पंढरीराया । येई सनाथ कराया । रुक्मिणीप्राणवल्लभा लागतों

पायां । निशिदिनीं तव गुण गाया । बुडतों प्रभुसागरीं पैलपार उतराया । करी आतां कृपेची छाया होनाजी बाळा म्हणे इंद्राच्या इंद्रा ॥ ४ ॥

## ॥ लावणी गोपीचंदाची ॥ ४२ ॥

गोपिचंदा क्या यकीयारी । किसी कारण जोग लियेरे ॥ ध्रु० ॥ चौकी-चंदन किनीचडारी । लिये दस्त सुनेकी झ्यारी । काया कंचनकी देखी तेरी । बेटा सुदबुध सप गई मेरी । रोती उसकारण मोथारी । दीन दुनया दुखयारी ॥ चाल ॥ ते बापकी सुरथ धीरे बेटा । होगई खाक आखरजेरे बेटा । जालंदरके चरण धरे बेटा । वो तुजकू अमर करे बेटा । ऐसे साईके पग धरे बेटा । मैंने ज्यातुजे बचन दियोरे इनसै गुजगुजरीया रे ॥ गोपी० ॥ १ ॥ जोगी ज्यालंदर पीरसाई । जिने जोग जुगत बताई । तुवां फावडी झोली सजाई । पहेनी कथा खाक लगाई । आपणे बस्तिमों आलख जगाई । व्हां राणी कुमाई ॥ चाल ॥ मिलकर राण्या सबी होवें राजा । क्या कारण मुंडमुंडावें राजा । झोली पतरक्यं हात लेवे राजा । जोगी कोण सबही हुवे राजा । तुम्हारे शेजपर कोण सोवे राजा । दुधभात कोण देवे राजा । तुम्हारे पग कोणही धुवे राजा । ऐसा उपदेश कोण कियो राजा । जिनें जोग दुजसे दियारे । जोगिनो निरखते गयारीरे ॥ २ ॥ जब थे हाम धनदौलत धारी । तब तूं सकल राण्या हमारी । जोगी हुवे तबसे जगत तारी । दुनिया मया मानत सारी । भिछा मागन लिई हात झोली । काया ढाकण कंथा पेहेनी ॥ चाल ॥ गुरु कारण मुंडमुंडायो माई । मागन जोग लियो माई । कुत्ता मारण दंड लियो माई । दुधभात मंया देवे माई । लकडी फावडी पेशेज सोवे माई । किंकरी दो दो बाता कहे माई । गंगा जमुनामें पग धुवे माई । जिनसे जोगी मगन रहे माई । और बातकू कोण छिवे माई । जोगी जुगतको खेल लियो माई । गाज्या मत येवो कामिनी यारे ॥ ३ ॥

राजा गोपीचंद गुसंया । राण्या सोळासो संगलिया । रमते बेहेनके देश लिआया । ज्या दरवाजे आलख जगंया । भिछा दूती हात भेजपया । दुती कहेवो माई ते रामया ॥ चाल ॥ वहाटाडा आलख जगता जोगी । चंपावती कहे कोणसे देश रहेता जोगी । तेरी कोण माता पिता जोगी । गुरु कोणे अवधूता जोगी । गुरु माईके कोण बताव जोगी । किनहीं पत्तर सोनेका करता जोगी । रहे गमन भुगुत खाता जोगी । आया हासको रमता रमता जोगी । दिसले क्यं उदास हुवारे । वेटेवाले जरा जोगी यारे ॥ ४ ॥ मैनावती हमारी माया । पिता त्रैलोक्यचंद राया । चंपावती बेहेन कहवया । गोपीचंद उनकू भया । गुरु ज्यालंदरबसंया । उसी कारण जोग जमाया ॥ चाल ॥ गुरु माईके हमे पुत माई । उस कारण करता फिरो माई । घर घर आलख पुकारो माई । गज भोतीसो भंडार भरोहो माई । सव्वा लाख पर्वत सिराहो माई । हम वाहाजाके रहता माई । होनाजी बाळा पियारे प्योर । रामा अंदु गुणा रसियारे ॥ गोपीचंद० ॥

## ॥ लावणी भक्तांच्या नामावळीची ॥ ४३ ॥

चाल—धुमाळी; अनुष्टुप् छंद ।

जय सिद्धविनायकवेषा । ओंकार नमूं आदीपुरुषा ॥

— परशराम.

गा वदनीं कृपावंताचीं । सफळ चरित्रें संतांचीं ॥ ध्रु० ॥ समागमाच्या मुळसंसर्गें । सरसी ज्याला आपपरवर्गें । वसवून स्वकरें ती बोधखड्गें[1] । निरसुन अहंकारतम दुर्गें । लाविती जड मूढ तारला मार्गें ॥ चाल ॥ नामें तयाचीं श्रवण करा । भवतारा तारा । आगज्यारहित व्हा । स्मरा हृदयीं श्रीपती जनार्दन एकनाथ । आणि भानुदास सत्त्वभक्त निवृत्ती ज्ञानेश्वर सोपान मुक्ताबाई चांगया पद्मावती । स्वामी जयदेव स्वयें श्रीपती ।

---

१ बोधरूप खड्गानें.

तुळसीदास श्रीराममक्त प्रिय कबीर कमाल आवडते हरीचे कूर्मदास गोरोबा चोखा नामदेव पुरुषोत्तम मूर्ति । माळी सावता धनाजाट जगमित्र नागया जनाबाई सोनार नरहरी । मछिंद्र गोरखनाथ जिवा आणि तत्त्वा ब्राह्मण कबीर । दिव्यभूपदीं माजी नरसुमेहता पद्मनाभ रोहिदास चर्मकार । दास ते डाकुरवासी सूरदास तो सेना नापितें । मिराबाई जसवंत भक्त कर्माबाई सवें अंतःपुरीं भगवंत जेविले । मुद्गल मुरहरि कान्होपात्रा दामाजीपंत मृत्युंजय किरिटी । राम राजा बहिरव भट नागनाथ परिसा भागवत रुक्मिणी। भक्त परळीकर रामदास स्वामी रामरूपें पंढरीधीश भेटले । तुकाराम वैराग्यशील जग तारियेलें । स्वयें आपण तरुनिया स्थुळासहित शेवटीं वास वैकुंठीं ज्याचा निंबराज श्रीगोंदेकर ते शेख महंमद धामणगांवीं माणकोजीबाबा ते बोधले । गणेशनाथ श्री केशव स्वामी कीर्तनांत न कळतां कान्होबा जे नागप्रसादें भक्त वांचले । लति-बशाचे भाव देखिला चित्रानें तात्काळ विडा घेतला । यवन नृपचरणीं लागला । संतोबा पवार तयाची कांसवरूपें यात्रा उतरून स्वयंवरांत । साहित्य निळोबाच्या पैं केलें उद्धवचिद्घन भाविक पूर्ण । विसोबा खेचर श्रीधर स्वामी आदि नारायण पुण्यपरायण । कृष्णाजीबाबा सुखमूर्ति अगाध कीर्ति नामावर्ती । जन्मांतरीं पातकेंच नुरती । निशिदिनीं भावार्थ विचारा । हारती दोष पढती स्तोत्रें ॥ १ ॥ कलियुग आरंभ त्रितीय युगांतीं नामस्मरण जिवा विश्रांती । श्रीहरी आणिला साधूच्या कांती । दोन्ही न म्हणाव्या कल्पांतीं । भक्तकथामृत दुःख सुखांतीं । प्रसन्न व्हावें[1] निजात्मशांती ॥ चाल ॥ भर्तृहरी आणि जालंदर सत्य शिष्या । कानिफा सदानंद शंकराचार्य गोपीचंदराजा । नरसी नागर हिरादास वाणी गुजराथी मलुकदास नरसिंह भारती नारायण अच्युताश्रमीं जो विवेकखाणी बाबा । नानक मुदया भक्त मुकुंदराज विख्यात पहातो विवेकसिंधु निजबुद्धि

१ व्हावी.

अध्यात्मग्रंथ कथियेला ज्यानें कृष्णंभट याज्ञवल्की प्रेमळ कृष्णदास मुद्गल विवेकी । कान्हया हरिचा दास महान लोलिंबराज तो चांद बोधला शेख-फरीद आणि शाहुराज शमनजयराम नरहरी । मालोपंत नरसिंह सरस्वती महा मुद्गलभट एकलिंग भैराळ सुमती कमलाकर प्रसिद्ध नामा पाठक दासोपंत स्वानंद भरित गोसावी नंदन स्वामी वामन गिरिबाई । चिंनमय नंदन व स्वलिंग मैनावती निप्रकाशलिंग स्वयं श्रीरंग गंगकवी माधवदासजी पूर्णानंद ते परमानंद आनंदतनय प्रल्हाद बडवे बापुजीपंत दादो पिंजारी । तुकया जुने कानयापुत्र नारायण पवित्र बहिणाबाई मध्वमुनेश्वर पैठणकर शिवरामबावा । तैसाची स्मरावा माणकोजीबावा । उपरी भगवंत संत निमया कुमकर नारायण अगाध अमृतराय शंकराजी बाबा । शेऊरकर ते मेमसिंधु गुंडाजीबाबा । निस्पृह भक्त बाळोजीबावा भजनशीळ गोपाळ सखा ताराबादकर ते महीपतिबावा । भक्तिविजयीं भक्तकथा कथिल्या स्वानंदें त्रिपुटीकर गोपाळनाथ नानासाहेब गुरु यांची संतनामावळीं वाहुनी पुष्पांजळीं पदीं भाळ ठेऊनी दीनदयाळ पूजिला होनाजी बाळा म्हणे बरवीं वंदिली हीं पवित्र पात्रें । गा वदनीं कृपावंताचीं । संतांचीं पवित्र सुफळ चरित्रें ॥ २ ॥

## ॥ लावणी ॥ ४४ ॥

चाल—नवी नवतीचा पूर आंगीं भरलासे बाई ।
आज उद्यां येतील म्हणूनी दम धरलासे बाई ॥
—परशराम.

चाल—( दुसरी ) मज पापिणीची दृष्ट सख्या लागेल गे बाई ॥

नूतन वय दोघांचें सारखा जोडा गे बाई । पतिप्रवासा जाती हौस मनची पुरली नाहीं ॥ध्रु०॥ सासू सासऱ्या घरींच आजवर होतें मी अज्ञान । बाळदशा अगदींच आलें नव्हतें मजला न्हाण । आतां उमेदींत

आलें समजलें जों पुरतें ज्ञान। तो पती निघून जातो मारून प्रीतीचे बाण। हुरहूर वाटे जिवा लागलें हंसाचें ध्यान। कधीं भेटती येऊन सुखाचे घरीं आनंदानं। केवळ झालें वेडी सुचेना घरधंदा कांहीं ॥ १ ॥ फार कठीण ऐकतें मुलुखगिरी उत्तर देशाची। झाडी मोठी घनदाट सांगती दहशत भिल्लांची। कंटक वन दारुण सावजें फिरती जंगलचीं। वाघ म्हणतां कानीं आरोळ्या पडती व्याघ्राची। अशा अरण्यामध्यें कीं धरली उमेद जायाची। राहण्याचा निश्चय ठरवाया भीड वाटे त्याची। मर्जी एक तऱ्हेची बोलतां नाहीं मजला ठाईं ॥ २ ॥ माझा सुखाचा पिंड मला कधीं दुःख नाहीं मला ठावें। अशा पराईमध्यें दुःख तरी कोठवर सोसावें। मायबाप भाऊबंद आपल्या दैवानें घ्यावें। एवढा जिव मारून कोणाच्या बळें मी कंठावें। एकांतीं धरली लाज शरम त्यां हें काय बोलावें। असो यापुढें आतां दिवस कोण्या रीतीं जाळावें। या ममतेच्यामुळें वाटती वोस दिशा दाही ॥ ३ ॥ कोण उपाय करावा मी घरची सासुरवासी। दर्द जिवांतील माझा मी सांगूं कोणापाशीं। दोन गोष्टी समजावून सखये सांग भ्रताराशीं। येथेंच ईश्वर येईल म्हणावें द्रव्याच्या राशी। नित्य उठून अंतरीं प्रार्थना करिते देवाशीं। पति घरीं राहतील असा कधीं पावेल नवसासी। होनाजी बाळा म्हणे येतील घरीं परतून पाही। नको पडूं संशयांत सखये किंचित सहसाही ॥ नूतन वय० ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ४५ ॥

चाल—देह गेला तरी जावो परंतु नेम न टळे कधीं।
आम्हां स्त्रियांचा स्वधर्म ऐसा लक्षपतीच्या पदीं ॥
— परशराम.

वेळ घड्या शुभ अवघ्या असतां निष्ठा स्वामीपदीं। आम्हा स्त्रियांचें साधन मोठें हेंच जगण्यामधीं ॥ ध्रु० ॥ करून तीर्थयात्रादी तपश्चर्याव्रत

नेमिल्या रीती । वनामाजी विचरती जटाधारी नग्न मौन स्थिती । न्याय-सांख्य व्याकरण मीमांसादिक कर्मै स्थापिती । धूम्रपान अग्नि तपस्वी तपें तपती निश्चिती । अरण्यांत गुंफाश्रम बांधून मख अपूर्व आचरती । पुरुषमात्र या धर्मी पद भगवंताचें आळविती ॥ चाल ॥ पतिव्रतेचा धर्म पतिची सेवा करावी तिनें । ईश्वर मानून पतिसदनीं वर्ते आनंदवृत्तिनें । स्वामीकृपा मसीं पूर्ण होईल फार लगट केल्याविण । निघतां शब्द मुखांतून पतीचा शिरीं वंदावा आधीं ॥ आम्हां ॥ १ ॥ व्यतीपात वैधृत कल्याणी हे तव कुयोग असे । नामस्मरण हरिचें तितुक्यासही मंगळ करीतसे । स्वामी पदारविंद भावषट्पद मकरंदीं वसे । तरि जोडे निर्दोष यश या गोष्टींत संशय नसे । आपल्या पतीचें माहात्म्य आपल्या कर्णद्वारें अति रसें । प्रत्यही करितां श्रवण यांत संतुष्ट हरि होतसे ॥ चाल ॥ दुसऱ्याचें आश्चर्य नायके स्वप्नीं कदा दिननिशीं । जार जारणी पाहतां उपजे तिरस्कार मानसीं । स्वामी वचन प्रमाण न्यून न पडे दास्यत्व तिसी । पंच सत्यामाजी गणमंडित धर्मपत्नी द्रौपदी ॥ आम्हां ॥ २ ॥ तारा सीता अहिल्या मंदोदरी द्रौपदी पांचही । शिरोमणी पतिव्रता पतिसेवे सादर प्रत्यही । त्रैलोक्या जे वंद्य अनुसया धनपात्र या महीं । शांडिल्या सुमती सुलोचना आदिकरून सर्वही । पतीची सेवा हीच तपश्चर्या आचरून निश्चिती इहलोकीं । त्या धन्य परस्त्री पतिसहित अक्षई ॥ चाल ॥ सत्यवान सावित्री जन पूजिती अद्यापिवरी । सौभाग्याच्या राशी कीर्ति या त्रैलोक्याभीतरीं । हाच स्त्रियांचा नेमधर्म करावें पतिसेवार्चन घरीं । प्रसन्न मर्जी करून करावा लगट दिसोदिस आधीं ॥ आम्हां ॥ ३ ॥ सर्वां आधीं जागी होय निद्रा सर्वां मागून करी । दास्य सासु-स्वशुराचें करून मग पतिसेवा यावरी । मर्जी माफक विनोद एकांतीं केवळ रंभेपरी । सुरतानंदीं मन रिझवून पतिचे पाय स्वकरें चुरी । यथा अनुकूल धर्म वासना संतोष सदा अंतरीं । जी गोष्ट प्रिय स्वामिला त्याच गोष्टी साक्षपें करी ॥ चाल ॥

भोजनसमयीं पंचप्राण अति पतीचे भोजनीं । याचपरी स्नेहमंडित अशी हे शुभसूचक कामिनी । पतिसहित निर्दोषवास वैकुंठीं याच साधनीं । देह स्वामिकारणीं झिजावा हेत हृदयामधीं । होनाजी बाळा म्हणे स्त्रियांचे हें तीर्थाटण विधी । आम्हां स्त्रियांचें साधन मोठें हें ॥ आम्हां ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ४६ ॥

चाल—माझे पंचप्राण लागले सख्या तुजपाशीं ।
प्राणावर झालें उदार अहो गुणराशी ॥

— परशराम.

विरहज्यात आज सखे राजमंदिरीं । अशा संकटामध्यें ते पति द्वीपांतरीं ॥ ध्रु० ॥ जिंकीत जीवमात्र समुळी विषयरोग हा । अन्यत्र तें दुःख व्यर्थ शरीरभोग हा । थोर दुःख मुख्य सखे पतिवियोग हा । भ्रमित मन होउनी फिरे पिशाच्यापरी ॥ अशा ॥ १ ॥ निशी जशी कुमुदिनीशीं जळीं विकासती । होऊन प्रफुल्लित समीरसवें सुवासती । त्यांत पुष्पहार ते विखार भासती । शीतउपचारार्थ शयनीं दहती अंतरीं ॥ अशा ॥ २ ॥ कुठून प्रवर्तली असे घोर [1]यामिनी । त्यांत आम्ही कुळशील कुळवंत कामिनी । न मानुन गृहस्वार्थ कोण्या अर्थें स्वामिनी । करून चित्त कठोर कसे राहिले दुरी ॥ अशा ॥ ३ ॥ निज घर सोडून सखे पारखे घरीं । जावें वाटे पद ठेवणें अहिफणावरी । अन्य पुरुष चंद्रवरद चतुर्थी परी । न पाहती जन तद्वत मनवृत्त हे सुंदरी ॥ अशा ॥ ४ ॥ कृपण तो धन रक्षून जसा वर्ततो जनीं । परभाषणीं धर्म तसे वागती मनीं । या निश्चयें लाभ वाटे सांबपूजनीं । हृदयीं म्हणे होनाजी बाळा ध्यान हें धरी । अशा संकटामध्यें ते पति द्वीपांतरीं ॥ ५ ॥

१ रात्र. २ द्रौपदी.

## ॥ लावणी ॥ ४७ ॥

चाल—माझे पंचप्राण लागले सख्या तुजपाशीं ।
प्राणावर झालें उदार अहो गुणराशी ॥ — परशराम.

गुणीजन गुणमंडिता पाहतां अहो सद्गुणराशी । सर्वोपरी प्रत्यक्ष लक्ष तुमचे पायापाशीं ॥ ध्रु० ॥ सेवार्चनीं ध्यानस्थ अस्तमानापासून पाहीं । अरुणोदयपर्यंत ध्यान मजला दुसरे नाहीं । चारी प्रहर बात्तिस घटिक तरी प्रपंचा ठायीं । शरीर मात्र वर्तते परि मन निमग्न तव पायीं । स्नेह वियोग हा रोग करितसे या देहांतव्हाही । चैन पडूं नये कोठें वाटती ओस दिशा दाही ॥ चाल ॥ मम प्रियकर प्रिय पात्रा मी कुडी तुम्ही आत्माराम । मंगळसूत्र गळीचें तुम्ही माझें मंगळधाम । मी तों तीर्थयात्रा तीर्थी तुम्ही केवळ पुण्यग्राम । मन पावत विश्राम अशा तुमच्या प्रीतिरसाशीं ॥ १ ॥ धन्य धन्य सौभाग्य शुद्ध कुंकुम विशाळ निढळीं । कंठीं मंगळसूत्र धन्य मी जगीं भाग्य आगळी । अलंकार भूषणें वस्त्र प्रावर्णयुक्त सगळी । काय न्यून मज स्वामी पुण्य तुमच्या पदरीं सगळीं । अनुकूल पदार्थ मात्र असतां लक्ष तुम्हांजवळीं । निष्ठा अंतीं प्रतिष्ठा हें जीव जाणें हृद्कमळीं ॥ चाल ॥ तुम्ही केलें पवित्र मला म्हणऊन पदरीं पडलें । फळलें तप पूर्वीचें तव अर्धांगीं जडलें । अनायासें रत्न मला अंधारीं सांपडलें । भागीर्थींत घडलें स्नान मग कारण काय इतर जलाशीं ॥ २ ॥ प्रयत्नेंविण अनायासें लाधलें निजसुख प्राप्तीचें । मग कासया करावें साधन क्षुद्र दैवतांचें । सुधा प्राशिल्यावर काय भयें पळावें जीवित्वाचें । संजीवनी साधिल्या यत्न काय अनेक मंत्रांचे । घरीं आहिल्या मग कारण काय दीपाचें । एक सद्भावावरून जोडले पाय असे तुमचे ॥ चाल ॥ तुम्ही स्वामिराज मी तव तुमची जाया । तुम्ही कल्पवृक्ष मी तळींची अति सीतळ छाया । तव पदावरून आपली कुरवंडी करीन काया । अक्षई तुमच्या ठाया पाहून झालें सुखवासी ॥ ३ ॥

पूर्वसंबंधावरून मातृपितृउदराशीं आले । नंतर काया वाचा मनें वनिता तुमची झालें । भाग्यउदय सौख्यांत अष्ट अंगीं मी निवालें । विरक्तमात्र स्वतःसिद्ध नाभिकमळापासून धालें । साध्य साधनीं देहगेह समुळीं अवघेंच विरालें । ब्रह्मानंद डोहांत एक सद्‌भावें मी बुडालें ॥ चाल ॥ यांतील सारांश असा मुळीं एक शुद्ध सद्‌भाव । तरी प्राप्तीचा अनायासें स्वामी पदकमळीं ठाव । सत्त्वार्थी असावी हो सन्मार्गीं मनाची धांव । तरीच जड देह नाव पार होईल पैल तिराशीं । होनाजी बाळा म्हणे मी करीं पवित्र पवित्राशीं ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ४८ ॥

**चाल**—मी बारा वर्षें एकठीक न्हालें आधीं ।
जीव सुजला माझा बाई नाहीं बाळक झालें कधीं ॥
— परशराम.

या प्राणविसांव्यावांचून हा जीवपिसा । रुसला साजण समजेल आतां ग बाई कसा ॥ ध्रु० ॥ अशी रागिट मर्जी नवती ओळखिली कधीं । हा सजण सखे पलंगावर पाहिन कधीं । होईल दोघांची भेट साजणी जधीं । पेढे वांटिन राजहंस समजला तधीं । समजाऊन कोणता गुण दाऊं गुणनिधी । त्यापरी नाहीं गुण दाऊं विशेष समज मधीं । मज लागलें वेड सुटला चळ मंदिरीं । एकटी कंठूं कोणाच्या बळें । वाटती जिवाला रात्रंदिवस तळमळ । पद पाहून केवळ मोर झुरे वनीं जसा ॥ रुसला ॥ १ ॥ सारा दिवस झुरतां जीव हिंपुटी । मग सुख सेजेवर मी निजलें एकटी । स्वप्नांत सुखाची सुरत पाहून गोमटी । बाजूची उशी कवळुन मारितें मिठी । कां रुसला होतां म्हणून धरिली हनुवटी । मग अंतरीं आपल्या खुशाल होतें मोठी ॥ चाल ॥ बाई माझे ग मनची गोष्ट मला ठाउकी । शहरांत धुंडितां मजसारिखी नाहीं दुःखी । हें दुःख सांगतां न ये मी झाली मुकी ।

हरतऱ्हा करून बाई चुकी कोणती पुसा ॥ रुसला ॥ २ ॥ सखे या गोष्टीस उपाय कोणता करूं । अवघेच दुष्ट मी पाय कोणाचे धरूं । अंतरलें ग माझें राजहंस पांखरूं । यासाठीं आतां ग बाई विष खाउनिया मरूं । हें उदास झालें मन कुठवर आवरूं । मी मरेन आतां चौदिसां झुरझुरूं ॥ चाल ॥ बाई येथें नाहीं माझ्या बऱ्यावर कोणी । आगजाळ्या रांडा जळती मला पाहुनी । त्या हसती मनच्या मनांत कळ लाउनी । इतराजी व्हावया वैर साधिती असा ॥ रुसला ॥ ३ ॥ अशी नित्य कोणी करावी नित्य उठून घोकणी । सोसेना मला या मनची जाचणी । उभी मूर्त सख्याची दृष्टीपुढें क्षणक्षणीं । जिव वेडा झाला कधीं समजतील घरधणी । याला उपाय सुचला बरवा माझे मनीं । निराहार असावें देवाचे अर्चनीं ॥ चाल ॥ इतक्यावांचून नाहीं कोणाचा आसरा । आदरें पुजावें गिरजा गंगाधरा । संकट निरसून जय ईश्वर देईल खरा । होनाजी बाळा म्हणे बरा धरीं भरंवसा ॥ रुसला ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ४९ ॥

चाल—पोट पिकेना म्हणुन बांधिले भराभर गंडे ।
बाई मी दुःखी फार घोर जीव वाऱ्यावर हिंडे ॥

— परशराम.

हीन माझें प्रालब्ध वांझपण कधीं फिटेल बाई । एक बाळक पोटीं नाहीं ॥ ध्रु० ॥ सर्व गोष्टी अनुकूल कृपा परिपूर्ण ईश्वराची । नसे घरीं न्यूनता मला बाई कोण्या पदार्थाची । काया वाचा मनें भुकेली एक्या बाळकाची ॥ चाल ॥ आपआपल्या घरीं नारी मूल घेउनिया कडे । हौसेनें उभ्या राहतात भ्रतारापुढें । बोलविती मुलापासून वेडेवांकडे ॥ चाल ॥ हासविती पतीला अशा प्रकारें करून । रिझविती पतीचें मन एका बाळावरून । घडोघडीं बोलतो एकांतीं सखा मुख भरून ॥ चाल ॥ धिग्धिग् हें माझें जिणें । बाई एक्या बाळाविणें मंदीर घर दिसतें सुनें ।

कोण मधीं अडथळा ? न कळती पूर्व दोष कांहीं ॥ हीन माझें ॥ १ ॥ जरजर झालें शरीर प्राण कासाविस न गमे कोठें । लेंकुरवाळ्या पाहून माझें तिळ तिळ काळिज तुटे । नगनगोटे घडवायाचें मज कौतुक मोठें ॥ चाल ॥ शिवीवतें अंगडें कुंचडें उंच भरजरी । वाघनखें आणिक बिंदली गळ्यांतील सरी । कानांत झुबे बाळ्या ग दृष्टी मणी करीं ॥ चाल ॥ जडिताचें पिंपळपान बहुत गोजिरें । मनगट्या मुद्रिकेवरी बसवितें हिरे । करगोटा करवितें तळीं लावून घुंगुरें ॥ चाल ॥ पायीं पैंजण सांकळ्या । नक्षीदार चरणांगुळ्या । लावून वर्ते झिळमिळ्या । मनाची हौस कधीं फिटेल मला मूल होईल लवलाही ॥ हीन माझें ॥ २ ॥ तें दारिद्र मजलागीं भाग्यापरिस तें बरें । समावृत्तीनें स्त्रिया त्या खेळविती लेंकुरें । असून सारें सौख्य संततीवांचून जीव झुरे ॥ चाल ॥ निमित्य पुष्कळ पैसा खर्चिला । मध्यान्हसमयीं शिव बिल्वदळें अर्चिला । बाई यथासांग परिमळ चर्चिला ॥ चाल ॥ जाणी जोशी भट ब्राह्मण सांगितल्या रीती । म्यां प्रदक्षणा घातल्या पिंपळाप्रती । घेतली बगाडें लोटांगणें नेणूं किती ॥ चाल ॥ देव्हारे देव नवसितां । कुळमंत्री अभ्यासितां । शिणलें साधन साधितां । अजून कोणाची प्रचिती आली नाहीं मजला सहसाही ॥ हीन माझें ॥ ३ ॥ माझेंच मज भासतें पतीची मीच आहें वैरिण । नाहीं पुत्रफळ पोटीं म्हणून बाई अगदींच झालें लीन । वाळवंटीं तळमळी जसा ग बाई पाण्यावांचून मीन ॥ चाल ॥ त्यापरी रात्रंदिस बाई झुरतें मी मनीं । वाटतें चोरट्यावाणी वर्ततां जनीं । भासते जिवा वाटून घ्यावी हिरकणी ॥ चाल ॥ लौकिकांत वाईट दिसेल म्हणून सांगतें । संसारीं दृष्टी ठेवून जनांत वागतें । हें पूर्वजन्मिचें फळ आपलें भोगितें ॥ चाल ॥ या वांझपणाच्यामुळें । झालें भ्रमिष्ट केवळ । मी कंठूं कोणाच्या बळें । होनाजी बाळा म्हणे वर्म हें स्वाधिनचें नाहीं, स्वाधिनचें नाहीं । ठेव निश्चय सद्गुरुचे पायीं ॥ हीन माझें ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ५० ॥

चाल—सवती ग सवती नित्य भांडती नाहीं कोणाचा कमजोरा ।
पती पांगळा करुन बसविला अभय नारी शिरजोरा ॥
— परशराम.

होऊन कृपाळू आधीं समर्थें धन न ये धरिलें करीं । न पाहूं द्यावें आणिक द्वार हे पाय पाहिल्यावरी ॥ ध्रु० ॥ कायामनें सख्या मी शरण तुम्हांप्रती आलें । मरण चिंतू नये आतां कृपादृष्टीनें पाहा चांगलें । न कळे वृत्त नेमांत मी पूर्वीं तप करितां भागलें । अभेद कल्पतरूच्या शीतळ छायेतळीं बैसलें । भाग्य अकल्पित दरिद्र तम निरसून उदय पावलें । ते श्रम हरावयास्तव हें पद स्वामीचें पावलें ॥ चाल ॥ अहो प्राणसख्या जिवलगा । प्रियकर प्रीतिच्या नगा । मी पदरीं पडलें बगा ॥ चाल ॥ धन्य आज मी झालें स्वामी पायाची दासी । आतां सर्वस्वें मुख्य माझी लाज तुम्हांसी । नित्य दर्शन हें केवळ मज प्रयाग काशी । हृदयीं धरून आवडीनें चुरीन मी पद आपलें ॥ न पाहूं ॥ १ ॥ नाभिकमळापासून सांगतें विचार ऐका आधीं । कर जोडून विनवितें प्रियकरा मस्तक ठेवून पदीं । अंगीकार सागरीं वडवानळ धरिला उदरामधीं । द्वादश गांवें नित्य जाळी परी न सोडी त्याला कधीं । कूर्मपृष्ठीं कुंभिनी भार परि तो न करी तिशीं दुजें । तसा तुम्ही अंगीकार माझा केला हो गुणनिधी ॥ चाल ॥ पहा पहा तो जाश्वनीळ । कंठीं धरिली हळहळ । जाळी परि न सोडी मूळ ॥ चाल ॥ सनाथ करावें मजलागें याचप्रकारें । काळ क्रमितसे स्वामीच्या मुख्य आधारें । मी आपल्या स्वमुखें वर्णितें कीर्ति परभारें । बिभीषणास श्रीरामें अंगिकारून दिली लंकापुरी ॥ न पाहूं ॥ २ ॥ मी दुर्बळ अति हीन जिवाशीं न लटका वाटे आतां । व्यर्थची गेले दिवस पाय तुमचे दृष्टी न पाहतां । वक्र दृष्टीनें पहाल तरी काय मज गरिबाची कथा । ईश्वर तोच श्रीमंत करील रंकाचा राव सर्वथा । नाहीं कर्माचा

साथी जन्म देऊन मला गेला पिता । पदरीं पडलें पवित्र झालें हा प्राण संकल्पिता ।। चाल ।। तुम्ही जिवीचा जिवलग गडी । सागरीं मीं दिधली बुडी । न्या उतरून पैल थडी ।। चाल ।। तुम्हांविण आसरा जिवलगा कोणाचा नाहीं । आतां निःसंशय मनीं किंतू नका आणूं कांहीं । लक्ष हें माझें रात्रंदिस तुमचे ठायीं । अशा निश्चयें वाटें मीं पूर्वी चरण वंदिलें शिरीं ।। न पाहूं ।। ३ ।। पूर्ण गुणसंपन्न बत्तीस लक्षणी स्वरूप दिनकरा । उदार धीर परेशा हो मम प्रिय पाचुच्या हारा । चिंता व्याधिस्तास सख्या सुख औषध देऊन शिरा । हें लक्षण नृपतींचें त्यास जीवावें राजअंबीरा । अति आदरें सादरें होऊन प्रार्थितें प्राण प्रियकरा । पद चोळावें स्वहस्तें निजावें झोंपाळ्यावर जरा ।। चाल ।। सेवेस्तव तुमच्या पुढें । सन्मुख बापुडें । दास्यत्व नित्य मजकडे ।। चाल ।। पूर्व पुण्याई पदरीं पूर्वींची होती । म्हणून सांपडली अशी चिद्रत्नाची ज्योती । छत्र मम शिरीचें सौभाग्यपणाचें मोतीं । यांतील जो मथितार्थ शोधून पाहावा अंतरीं । होनाजी बाळा म्हणे अर्ज हा निवेदिला किंकरीं ।। न पाहूं ।। ४ ।।

## ।। लावणी ।। ५१ ।।

चाल—आजच झालें दूरशी कशी येऊं मधीं आडवी गंगा ।
चार दिवस अंतरलें सख्या तुमच्या सुखसंगा ।। —परशराम.

कां हो येवढें अधीर जवळ निजलें कीं सेजेवरी । आतां पळत नाहीं कोठें ? गांठ चोळीची सोडूं द्या तरी ।। ध्रु० ।। बंदोबस्ती करून उठून खोलीची लाविली कडी । घेऊन कडेवर मला निजविलें पलंगावर तांतडी । रात्र झाली दोन प्रहर कोठें जायाची असेल आवडी । म्हणून अहो जिवलगा करितसां तुम्ही जलदी येवढी । व्हा सावध प्रियकरा धरा शांतता खाऊं द्या विडी । उठून बसा मजपाशीं कीं रुतती डोईस मूद्राखडी ।। चाल ।। ही रीत भल्याची नव्हे राजसा । हातीं हातसर गजरे जवे

राजसा । कांपांतील आकडे खे राजसा । मानेमधें रुततात कवेंतुन सोडा मज लवकरी ॥ १ ॥ जीव झाला घाबरा नाहीं वाऱ्यास वाट ठेविली । त्यांत चैत्रमासाची उष्णता देह माझी पोळली । असेंच उतावेळपणें नित्य वर्तणुक तुमची भली । मीच एक सोसितें गोष्ट जी तुम्हीं अंगिकारिली । गोड बोलणें रसिक कला कुशलता बहुत चांगली । पाहून झालें पिशी घरदाराची आशा सोडली ॥ चाल ॥ मी स्त्री पती माझे तुम्ही । राजसा राया मी तुमची जुनी । वहिवटास घ्यावी आम्ही दोघे न होऊं श्रमी । असिच काय करा योजना वरी ॥ २ ॥ सारी रात्र मूर्खाची घडी चतुराची एक जिवलगा । शोध करून अंतरीं अर्थ यांतील काय तो बगा । श्रमऊं नये दुसऱ्यास आपणही करूं नये श्रम वाउगा । चतुर तेच जाणतील मूर्ख नेणती वर्मिच्या रगा । भिन्नभाव उभयतां स्नेहामधीं कचित नसावा दगा । हेंच आहे मागणें धरा जिवीं गोष्ट प्रीतिच्या नगा ॥ चाल ॥ लागतांच आपली आशा । चढतां विषयाची निशा । झाली काय आपली दशा । भिजलीं वस्त्रें उशा दाटला घाम शरीरांतरीं ॥ ३ ॥ देऊन विसावा सख्या उठून क्षणभर शेजारीं बसा । शांत होई जीव जरा फिरून मग मला कसोटी कसा । नव्या नवतीचा बहर नूतन जी बोली आली रसा । घ्या रस बरवेपणीं हो तुमचे मर्जिस मानेल तसा । होईन फकेरीण सख्या तुजसंगें निश्चय माझा असा । यावर ईश्वरसत्ता पुढील भविष्यार्थ निर्मिला जसा ॥ चाल ॥ मी निःसंग झालें आतां । सोडून या लौकिकता । राहिली इथें काय तथा । होनाजी बाळा म्हणे वृथा बोलणें तुझें सुंदरी । द्रव्य जंवर संग्रहीं तंवर या भावार्थाचे परी ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ५२ ॥

चाल—आतां संसाराची धुळधाणी । होशील कधीं शहाणी ।

चाल—(दुसरी) अरे दूर होय क्रियानष्टा । कळलें तुझें ज्ञान दुष्टा ॥

— परशराम.

रात्रीं सेजेवर प्राणसख्यानें मला भोगिलें ॥ ध्रु० ॥ सखये शृंगार रसाचे रंगें । बनली आलबेली । बरवी म्यां सेज फुलाची अंगें । पलंगावर केली । रात्रीं तीन प्रहर सुखाच्या संगें । सजणाच्या गेली । आणवून हार गजरे तुरे फुलांचे घातले गळां । आवळून कवटाळून हृदयीं धरूनिया मुख चुंबिलें ॥ १ ॥ चवथे प्रहरांत लागतां निद्रा । किंचित मजला गे । याच्या रागें झांकून मुखचंद्रा । टाकुन गेला गे । माझा कोणी शोध करून राजेंद्रा । नयनीं दावा गे । जैशी नळरायें दमयंतीला दारिद्रदशें । फाडून अर्ध वस्त्र निजल्या जागीं वनीं त्यागिलें ॥ २ ॥ याचा माझा वियोग सईबाई । कधीं आजवर नवता । पहाटे गेला नसतां अन्याई । हा दिवस उगवतां । इतक्यांतच असला गुणग्राही । पाहा कोठें भवतां । जीव गे तळमळतो माशावाणी । गत करूं कशी । जन्मापून दुःख अजून कधीं नाहीं असें पाहिलें ॥ ३ ॥ असल कमअसल मतलब गरजी । पहिल्यापून ठावी । किंचित अपराधासाठीं मर्जी । कांहो बिघडावी । येवढी माझी सजणाला अर्जी । जाऊन सांगावी । पाहा पाहा संसार किती दिवसांचा । मनीं शोध करूनिया । आज म्हणे होनाजी बाळा हें वर्म चांगलें । रात्रीं शेजेवर प्राणसख्यानें मला भोगिलें ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ५२ ॥

चाल—नारीनें करून शृंगार गेली ग पाण्याशीं ।
बारवे तिरीं एक मूर्त पाहिली खाशी ॥

अन्याय कांहीं किंचित् नसतां मजपासून । तुम्ही कां हो श्रीमंता बसला रुसून ॥ ध्रु० ॥ अरे प्राणसख्या स्नेह आदराचा पाळसी । छी हें काय अपराधाविण जाळसी । कामापुरता हात वरवर कुरवाळसी । आलगरज्या काम करून कंटाळसी ॥ चाल ॥ जातोसी पलंगाखालीं उतरून ।

शेजारीं निज पोटाशीं धरून । असें म्हणतां बोलतोस दुरचे दुरून । वाटतसें मला हें दुःख अंतरीं याचें । सहज उभयामुळें निघतें कजीयाचें । भरभरून वट्या मी घेतें द्रव्य जयाचें । त्यासंगें नाहीं बोलत प्रीतिनें हांसून । ती तुजला सांपडली रसीरसून ॥ १ ॥ आधीं प्राणसखे तूं ठायींची चंचळ । तुजपाशीं आम्ही बसतों सारा विळ । पापदृष्टी तुला पाहतां दुसऱ्या जवळ । तिथें क्षण एक नाहीं पडत आम्हांला कळ ॥ चाल ॥ आम्हीं जातों मग रुसून सखे तूं जरी । गेल्यावर हुरहूर वाटे अंतरीं । मलतीच पाहा कर्मणुक करितों घरीं ॥ चाल ॥ ममता जडल्यावर विषयाचें व्यसन खोटें । प्रीतींत बिघड पडल्या कर्मत नाहीं कोठें । हें हृदय भरभरून येतें दुःखाचे लोट । बोभाट जनामधीं झाला संगतीपासून । तूं नट चंचळ साजणी आम्हां काय असून ॥ २ ॥ अन्याय न करितां नित्य छळिसी मजप्रती । म्हणून काया झिजली माझी रती रती । त्वां प्राणसख्या अगदींच मोहिली वृत्ती । मी जाईन कीं रे मरून तुझ्या संगतीं ॥ चाल ॥ अरे फांशेपारध्या पाडिलें फशीं । शेवट तूं आज अंतर देशी मशीं । मी प्यारी अगदींच झालें तुजविशी ॥ चाल ॥ तूं प्राणसखा प्रीतिचा प्रियकर असतां सोशितें जाच तुजसाठीं खाऊन खस्ता । भेऊन चलतां शिरीं आळ आणसील नसतां । मर्जी रक्षून वागतें हें दृष्टी दिसून । घडोघडीं कां वरवर मज पाहतां कसून ॥ ३ ॥ आमची मर्जी रक्षितेस बहुत परी । म्हणून आमची ममता जडली तुजवरी । बसल्या रुसून समजाविसी करिसी वरी । पलंगावर नेतीस धरुनिया करीं ॥ चाल ॥ प्रीतिनें घालतीस मुखामधीं मुख ॥ त्यावेळें वाटतें जिवाला सुख तुज पाहतां सर्व हरें तहान भूक ॥ चाल ॥ संतोष तेव्हां खूष मर्जी आमची होती । जाई लुब्ध होऊनिया पतंग दिव्याचे ज्योती भासतें आम्हांला आमची तसी अवघी खोती । होनाजी बाळा म्हणे तूं प्रिय चित्तापासून । गाई रामा अंदू छंद प्रियकर ठसून ॥ अन्याय कांहीं ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ५४ ॥

चाल—कसून तीर नेला उराशीं नवळी गवळी जशी नागन ।
प्राणवल्लभे उभे तुजसाटीं प्रभे नभाचें भरलें गगन ॥
— परशराम.

गोल तुझा शरीराचा डौल वर गोरा रंग नौती कवळी । वय नूतन हातीं निऱ्या चालणें चपळ जशी नागीण गव्हळी ॥ध्रु०॥ अधरपुटीं बत्तीस हिरकण्या एक वळीनें विराजिती । ओठ शुद्ध पवळ्याचा रंग नासाग्रीं पाहून रावे रिझती । कुच संगिन पाहून परस्परें चक्रवाक पक्षी थिजती । मंजुळ स्वर ऐकून कोकिळा वृक्षीं बसून मनीं गजबजती । कटि पाहुनिया सिंह राहून वनीं मनीं आपल्या तुज भजती । स्थिरगमनीं गज मस्तकांत धूळ घालितसे पाहून धजती । जानुसंब सकुमार पोटऱ्या अति नाजूक कर्दळी ॥ वय नूतन ॥ १ ॥ श्रवण फुलें श्रवणांत सुढाळित मुक्त घोस ते घवघवती । नक्षत्रें भूषणें विराजित तुझा वदन चंद्राभंवतीं । क्षण प्रभेसारिखे तव मुख घर्मबिंदु चमकत स्रवती । विरहव्याप्त प्राणी तुज पाहता सोमकांत जैसे द्रवती । शेषाकृती वेणिच्या फणावर मणिप्राय मूद टवटवती । नभ शुंडावत दंडी कंचुकी हारित कटीं पातळ गवती । कोमळ करीं पाटल्या गोठ कंकण सुरेख तोडयाजवळीं ॥ वय नूतन ॥ २ ॥ खंजीर मृगनेत्र सुलक्षणें युक्त प्रमदा कैसी । तूं कामळालसा मंडळीमाजी नाढळ ऐसी । मोहिसी मृदू भाषणें तुझीं तव अमृतकुपी रसना जैसी । पूर्णपणें भरलीस भासे मजला चातुर्याची जैसी । योग्य तुला भोगितां तपश्चर्या असेल त्याची तैसी । म्हणऊन तूं त्यास प्राप्त मंचकीं एकांतामध्यें अति रहसी । तनु सोळा सत्रांत चित्रींचा लेप लेपिला चित्रावळी ॥ वय नूतन ॥ ३ ॥ हें विधिनीं वाटतें करून एकाग्र चित्त एकांतासी । स्वस्थपणें स्थिरमनें निर्मिलें तुज ऐशा चिद्रत्नाशीं । पूर्व तपश्चर्याव्रत नेमिला या पदरीं

जयाच्या रासी । तरीच मला भासतें धन्य ऐसें पात्र त्याचे पासीं । जाती स्त्रियांच्या कुढून तिष्टती होऊन केवळ तुझ्या दासी । मग पुरुषाच्या कैंवी पुसावी गत पाहतां तव स्वरूपासी । आधींच ज्याचें भाग्य चांगलें जो तुजला हृदयीं कवळी । होनाजी बाळा म्हणे मुख्य जन्मांतर पूर्वार्चन निढळी ॥ वय नूतन ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ५५ ॥

चाल—आमदाबादेमधें एक नार मोहना राणी ।
प्रीत दोहोंची कशी घ्या ऐकुनी ॥

नको अधिर होऊं थांब सख्या पदर सांवरुं दे । निऱ्या सुटल्या चिर आवरुं दे ॥ ध्रु० ॥ जाऊन सख्या खालीं घरचा कानोसा घेतें । सारीं निजलीं जागीं पहात्यें । नाहीं लाविलें दार कोणी उघडें कीं दिसतें । कडी लावून परतून येतें । येईल कोणी अवचित म्हणवुन अबरुला भितें । तुला विनवुन तिथवर जातें ॥ चाल ॥ पडली येवढी रात्रा । नको करूं घाई गुणी पात्रा । प्रियकर कोमळ गात्रा । उभयतांत स्थिती पाही । असें आज सत्वर करूं दे ॥ निऱ्या ॥ १ ॥ स्त्रीजात होता शांत मीही नवल वाटे मजसी । विषय इतका कोठून तुजसी । नित्य रात्रौ भोगून मला परकीवर रिझसी । नवीन नित्य किती द्वारें पूजसी । दो चहों दिवसां आड कोठें येऊन सख्या निजसी । रुसेन मी म्हणून किती गजबजसी ॥ चाल ॥ नसतां एक दिवसीं ठिकाण । तरी न कळे जाईल प्राण । चित्तापासून इमान । देऊन तूं मला निधान आतां म्हणसी असीच फिरूं दे ॥ निऱ्या ॥ २ ॥ महिन्यांतून मी तुझ्याजवळ चार दिवस निजतें । वेगळें चिन्ह तेव्हां दिसतें । म्हणून सख्या एवढ्यासाठीं मी तुजवर रुसतें । तूं समजाविसी म्हणून दूर बसतें । कां बसली तूं दूर असें न बोलसी नुसतें । मीच निर्लज्ज पुसतें ॥ चाल ॥ तूं कठोर मनाचा फार । तुझी छळणा

वारंवार । सोसितें होऊन बेजार । मजसारिखी असी नार दुजी तुजखालीं ठरूं दे ॥ निऱ्या ॥ ३ ॥ पहा काळा कोळसा दुधें धुतला तरी फळ काय । रंग त्याचा काळा नच जाय । सोडी मला प्रियकरा आतां येवढी तूं कळ साहाय । जुलूम मोठा करसी हायहाय । येऊन देहावर धीर धरी क्षणभर उगला राहाय । वक्त ऐकतांच हा पाहाय ॥ चाल ॥ समजुन निज एकीकडे । फिटलें अवघें लुगडें । दिसतें शरीर उघडें । होनाजी बाळा म्हणे गोड हा मनोरथ पुरूं दे ॥ निऱ्या ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ५६ ॥

चाल—दशमुख लंकेशाची स्नुषा सुलोचना एक सती ।
भुज पाहुनि करी आकांत इंद्रजित रणीं पती ॥

— परशराम.

भरज्वानीमधीं मस्त तुझा भर नौतिची बाहरी । पाहून लुब्धलों तुसी आतां किती दिवस चाळिवसी नटधारी ॥ ध्रु० ॥ सरळ भांग वेणीचा बुचडा मानेच्या मिसळीं । अनार दाणेदार तुझा गडे माषूक खड्यामध्यें बसलें । तंग चोळी छातीवर जोबन कोवळे रसरसले । आधींच कंबर बारिक त्यावर महेश्वरी पातळ कसलें । तूं रत्नाची खाण तुझे गुण बहुत योग्य दिसले । शरम तुझ्या नयनांत पाहुनिया मन आमचें तुजवर बसलें । येतां जातां भेटत जा उभी राहून द्वारीं ॥ पाहून ॥ १ ॥ तुझ्या गळ्याची आण वळखिलें आम्ही पुरतें तुजसी । लई अंतरची खोल मोठी वरनट केवळ सात्त्विक दिसती । गरीब रीतीनें करून आकरितपणी जनीं असती । खेळून अवघे खेळ बरवे गुप्तपणें मौजा करसी । खूप सुरत गुण प्यारे पाहणाराचे मनीं भरसी । आर्जवांत मर्जीनें गडे तूं रडत्याचे डोळे पुससी । जिकडे तिकडे करून टाकसी अशी वारासारी ॥ पाहून ॥ २ ॥ जसें बोलतसे तुजपासून तसें न घडे । देऊन आम्हां भूलथाप अजून किती

दाखवसील छंद फंदडें । तुमची तुम्ही माझे शब्द मंजूळ मिठडे । कंठाळीस हात लाऊं नये हें तुझें मनांतील वर्म गडे । लपंडावीचे डावपेंच माहित तुजला ठकडे । नवेंच कारस्थान सखे ग तूं तरी शिकलीस कोठून येवढें । मोहुनिया कैकांस ठेविलें त्वां आपले आहारीं ॥ पाहून ॥ ३ ॥ सोड मनांतील अढी घडी ही लाखाची जाती । पहा शोधून अंतरीं शेवटीं स्वरूपाची होईल माती । रूप ईश्वरी म्हणुनिया लोक तुला चाहती । त्यांत सवड पाहून आम्हांला दे सोवत एक रात्रीं । बसून जरा एकांतीं भिडूं दे छातीसी छाती । कर वचनाचा धुऊन घे हात भरली गंगा वाहती । होनाजी बाळा म्हणे बैस गडे हंसाशेजारीं ॥ पाहून ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ५७ ॥

चाल—कवळी रे माझी काया रोप केळीचे कवळे जसें ।
चढती पराई माझी शरीर हें सूक्ष्म तसें ॥

चाल—(दुसरी) रुंद छातीवर बुंद गेंद जणुं गुलाब वहारामधीं फुलती ।
वसंत काळीं कळे कोवळे तसे तुझे जोबन खुलती ॥

जसा कर्दळी कोम तसीच कोमळ काया । टवटवीत मुखकमळीं दिसतें कां पिंवळी छाया ॥ ध्रु० ॥ प्राणसख्या प्रियकरा खरेंच तुम्ही परस्त्रीवर रिझला । काल वचन मशीं देऊन तिच्या सदनीं रात्रौ निजला । चंचळ मन स्थीर करून दोन गोष्टी सांगा मजला । नवीन आतां जिवलगा विषय कां येण्याचा त्यजिला । ईश्वर भक्तिपुरस्कर वाटे पहिल्यानेंच पुजिला । चित्तापासून होता आवडता तो तिसरा मजला ॥ चाल ॥ दुर्गुण हे करितें क्षमा तुम्हां म्हणून आलें गरिबशी दिसून । म्यां तव तनु तुम्हांस विकली चिखली मोह ममतेस फसून । अन्याई हो किंचित् नसतां बसतां व्यर्थची मजवर रुसून । पहाल किती तरी हासून कसून हें मन तुमच्या ठायां ॥ टवटवीत ॥ १ ॥ बाळपणापासून जिवलगा जरी शहाणी

असतें । मानभावी वचनावर तुमच्या मी तरी कां फसतें । न लागतां ममता गृहीं आपल्या आनंदांत असतें । मला लेंकरामधीं कुटुंबी साजरी दिसतें । कोण विलास प्रामाणिक वचनामधें कांहींच नसतें । हजार केले छंद कशास्तव मग येउन पुसते ।। चाल ।। तुम्ही म्हणाल इची काय कथा सत्ता कांहीं असेल म्हणून वाटतें । शरिराकडे तुमच्या पाहून साहून दुःख दिवस लोटितें । जर हुषार दिसती कळा लळा लाउन हळूच गांठितें। घेऊन बरा थाया ।। टवटवीत ।। २ ।। दिवसनिशीं नाठवें लुब्ध तुमच्या मुखचंद्रासी । विषय पौर्णिमें येई भरतें या हृदयसमुद्रासी । सारा वेळ वरखालीं तुम्हांला पाहते गुणराशी । सिद्ध इच्छिला पदार्थ कळे तो रात्रीं फराळासी । प्राण करून सकल्प म्हणवितें सेवेची दासी ।। चाल ।। गिरिजावर देईल साक्ष लक्ष या पायीं आहे तरी कसा । केवळ तुमच्या पर्वती कर्वती देह माझा जसा । वचनाप्रति सांभाळितें मर्जी कीं राजसा । सर्वस्वें भरंवसा उभयतां स्वामी ।। टवटवीत ।। ३ ।। अजूनें वागतें ठेउनिया लौकिकांत दृष्टि एकदां जन्मा येऊन करावा सबळ कीर्ती सृष्टि । समजून पायाशुद्ध चालणें या कठीण गोष्टी। परंतु मी निश्चयें वर्ततें तुमच्या संवष्टीं । प्रिय विनोद भाषणें वाटती मज अमृतवृष्टीं । आलिंगून मुख चुंबितसे तोषून हृदयसंपुष्टीं ।। चाल ।। उभयतां प्रीत लावल्या वेधल्या चित्त तोडूं नका। सौभाग्याच्या भाषणालागीं जोडूं नका । सांगतें थोरला धर्म भ्रम चौघांत फोडूं नका। मनासी मोडूं नका तुम्हो जोडूं ही परकी जाया । होनाजी बाळा म्हणे कां असाव्या कां आग लावाया ।। टवटवीत ।। ४ ।।

## ।। लावणी ।। ५८ ।।

चाल—स्त्रीचरित्र थोर समुद्र त्यांतून कोण पार पडियेला ।
विरळा क्वचित त्यांत राहिला ।।　　　— परशराम.

रूपरंग चातुर्यकळा पाहुन झालों खुषी । म्हणऊन एकान्त केला तुसी ।। ध्रु० ।। क्षमा शांत दया मर्यादा त्रिगुण हें तव हृदयीं वसे । नीर

गंगेंत निर्मळ जसें । वदनचंद्र न्याहाळितां तुझा आम्हां भासलें कसलें । शेवटीं पीत नेसिला असें । परीस आणि लोखंड सखे उभयांचे समरसें । निवडतें शुद्ध कांचन जसें ॥ चाल ॥ जें होतें आमचे चित्तीं । पाहिली तशीच तुझी वृत्ती । उभयांच्या एकच रीती । कुळकुळाचरणी धन्य तुझा जन्म मायेचे कुसीं ॥ म्हणऊन ॥ १ ॥ पूर्वी कपाळीं खचित सख्या अक्षर लिहितां विधी । टळेना टाळण्यानें कधीं । हेत ठेउन मजवर घिरट्या घालित होतां आधीं । लावली प्रीत नाहीं तधीं । ऋणानुबंधें स्नेह घडला प्राणसख्या गुणनिधी । सिद्धी न्या आपण जगत्रामधीं ॥ चाल ॥ पसरून पदर मागतें । मर्जि रक्षुन वागतें । सत्क्रियेस मी जागतें । केली तदर्पण तनु आपली ही नवती लुसलुसी ॥ म्हणऊन ॥२॥ फ़ार शोधितां तुज ऐसी नाहीं पाहिली कोणी । आवडसी बहुत प्राणाहुनी । गुण सगुण स्वरूपांत कोठें किंचित् नाहींस उणी । त्यजावें केवीं तुजलागी । वरकांतीच्या कितिक अशा स्नेह ममता लावुनी । रिझविती अर्थ मुख पाहुनी ॥ चाल ॥ तूं नव्हेस त्यासारिखी । जो असल रत्नपारखी । तुज ऐसी सौख्यां कारकी । अति प्रयत्न ठेविल कोणी तुला हृदयीं मानसीं ॥ म्हणऊन ॥ ३ ॥ गुण दावुन संतोषवितां तुम्ही मज मधुरोत्तरीं । लावित ध्यान हृदयांतरीं । चालवा अथवा न चालवा प्रीत रीतीच्या परी । तुम्हांशीं ऐक्य झालें खरी । कुटिल शब्द ऐकून काय दुसऱ्याचे भरी । विनंती हीच बहुतां परी ॥ चाल ॥ होनाजी बाळा म्हणे सखे । मिळवुन आणा जा दुःखें । ते सेवावे अति सुखें । शब्द पाचुचे हार गळां गुणी भवानी बापुसी ॥ म्हणऊन ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ५९ ॥

चाल—पती गेले हो गेले काठेवाडीं । गिरनार अबूच्या पहाडीं ॥

घरीं येतां नित्य पाहतें हें मुख चंद्रापरी । सांग उतरलें कशानें

तरी ॥ ध्रु० ॥ प्रियकर माझा याविचा तूं एक प्रद्युम्न पती । तुझी मी शुद्ध जाया रती । उभयतां आपली प्राणसख्या सारखीच आकृती । शोभतें मी स्त्री तुजप्रती । अवचित पाहतां दृष्टी तुला आनंदमय चित्तवृत्ती । कंठितें काळ तुज संगतीं ॥ चाल ॥ जागृत सुषुप्तीं स्वप्नीं हृदयीं अससी । दुर्बळ तरी माझा मज श्रीमंत भाससी । इतुकें असून मज तूं कां न विश्वाससी । किती अवगुण पुससी । सख्या कां रुससि मजवरी । बोल ये मुख जरा क्षणभरीं ॥ सांग ॥ १ ॥ जन निंदत हे दुष्ट रीती दुजे तुला भाविती । पराचा कावळा दाविती । एथिल रांडा पहा कळलाव्या बळेंच कळ लाविती । दुरुनिया मान टोकाविती । पाहून मोहरा तुजसारखा तुजवर झेपावती । तुला आपलेकडे मोहिती ॥ चाल ॥ शुभ्र तेज मुखावर जशी चंद्राची कळा । सर्वज्ञ सख्या तूं तव मन्मथ पुतळा । नको जाऊं कोठें या रांडा पडतील गळां । सर्वांगीं कोमळा । सख्या तूं पडसील अबळा भरी । गांठ दे पल्लवाला बरी ॥ सांग ॥ २ ॥ इतुकें आळवितां न धरितां बोलसी खाचित आतां भासलें । तुला मी अन्यायी गवसलें । तुझी न धरितां भीड कोठें कोणासंगें भासलें । म्हणुनिया मन तुझें त्रासलें । अमर्यादा मजजवळून कोठें झाली असें दिसलें । दुःख त्वां त्या तिथें सोसिलें ॥ चाल ॥ काय मनीं धरुनिया दुजा भाव देखिला । अवश्यांत सख्या नाहीं माझा राहिला । निवडून सांग कांहीं दोषाचा दाखला । प्रिय विनोदें टाकिलें गोऊन मज चिखलाभीतरीं । उदासी पावलास अंतरीं ॥ सांग ॥ ३ ॥ नित्य हासशी खेळशी ज्ञान तुझें लोपलें । ध्यान हें कां रे विक्षेपिलें । जनीं वनीं तुजसाठीं मनीं झुरतां मी चोपलें । प्राण हे तुजवरी सोंपले । वियोगाग्नि मज जाळितसे या कष्टें धोपलें । तुला हें सर्व निरोपिलें ॥ चाल ॥ होनाजी बाळा । कवीराज कवीश्वर म्हणे । हंसणें रुसणें हीं प्रीतीचीं लक्षणें । राहणार अक्षई पुणें देश दक्षणे । रामा अंदु प्रीतीनें गुणी कवन युक्तीनें करी । गाति या शहर पुणेंनगरीं ॥ सांग ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ६० ॥

चाल—तुम्ही सिंधु मी सरिता लुब्धलें मी तुमच्या ठशाला ।
शब्द लागतो गोड पुरें धन दवलत कशाला ॥

—परशराम.

तुजवर आपला खूरबाण प्राण म्यां केला । तुम्ही चला राजमंदिरीं म्हणून धरितें शेला ॥ ध्रु० ॥ काय चुकी मजपासून झाली सख्या बस खालीं । सोडून चंचळता ती आज पदरीं घालीं । आजवर आपल्या रंगमहालीं आनंदाखालीं । कंठीत असतांना कां तरी मर्जी उडाली । ही लूट नौतीची लाली, तूं माझा वाली । इष्काची शिपायावाणी बांधलीस ढाली ॥ चाल ॥ दहा घरच्या रांडा दहा । राजसा ॥ वर वर त्या करतील चहा । राजसा ॥ घरीं ख्यालीं खुशालींत रहा । आपल्या स्वरूपाकडे पहा दिसतोस छबेला ॥ तुम्ही चला ॥ १ ॥ नूतन सुरूच्या रोपा कोमळ स्वरूपा । करितोस किती परघरीं वेळांतून खेपा । या रांडा न गणून पापा घालतील झेपा । जातोस न यांचे घरीं देऊन भुलथापा । मारून भलतीवर छापा देतोस थापा । येतोस घरीं धांवत चित्राच्या लेपा ॥ चाल ॥ एके दिवशीं पावशील दगा । राजसा ॥ हा शब्द मात्र वाउगा । बोललें सहज मी मघां । म्हणवुन वाटे जिवलगा राग मनीं गेला ॥ तुम्ही चला ॥ २ ॥ काढून खंजीर लवलाही एकच घाई । अरे प्राणविसाव्या आधीं मज मारून जाई । पसरूं पदर तुज पाईं ठेवितें डोई । चल ऊठ पलंगावर मी सहस्र अन्याई । मनीं नको धरूं संशय कांहीं लक्ष तुज ठाईं । मी दासी तुझिया गोष्टिस अंतर नाहीं ॥ चाल ॥ मज इष्क तुझा लागला । राजसा ॥ विकलेंस जरी आज । मी राजी मनांतून तुला । हा जीव तुज पदीं रंगला द्राक्षीच्या वेला ॥ तुम्ही चला ॥ ३ ॥ काळोखी रात्र अंधारीं दुसेर प्रहरीं । वाजतो गच अखराचा राजदरबारीं । पाऊस वर

पडतो भारी वस्त्रें सारीं । भिजली अवघी सुटली हिंवाची स्वारी । चल आतां घरामाझारीं उभा कां द्वारीं । सुखरूप भोगित जा आजपासून परनारी ॥ चाल ॥ पुरती बाहेरली मजा । राजसा ॥ पाहून नित उडवा हाजा । म्यां दिली तुम्हांला रजा । मजविषयीं लोभ करित जा विषय-वेळा । म्हणे होनाजी बाळा हा संकल्प रशेला ॥ तुम्ही चला ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ६१ ॥

**चाल**—डौल ज्वानीचा फूल गुलाबी रूपनादर गुलपरी ।
पाईं जोडवी खणण वाजे तंग चोळी तरतरी ॥ —परशराम.

गांठ सुटली कंचुकीची म्हणून अधीर झालां अंतरीं । तुम्ही शांत व्हा जरा * * * आतां मला फेडूं द्या तरी ॥ ध्रु० ॥ द्वारामध्यें पाहतांच मला मन कशावरून तुमचें फिरलें । मुखचुंबन घेऊन स्वहस्तें तुम्ही कुचाग्र माझें चुरलें । कुच उघडे दिसती म्हणून गांठ द्यावया अनुसरलें । गळ्यांत मारून मिठी कवेमधीं मज बळकट कवळुन धरिलें । द्वार लाउंद्या पाहिल कोणी मी जीवीं आपल्या घाबरलें । गर्दपोस काढून करूं द्या नीट तकये पलंगावरले ॥ चाल ॥ भोजन झाल्या सर्वांनीं घेतले विडे । आपआपल्या येकांतीं जावें याजवर पुढें । तुम्ही अधिर झालां फार पाहून मजकडे । म्हणून खोलींत रोकडे । मला राव तुम्ही बळें आणिलें धरून करीं ॥ तुम्ही ॥ १ ॥ कर्ण अलंकाराचे सख्या घोस गळून खालीं पडती । केतक मुद राखडी जिवलगा कसामधीं फांसे रुपतीं । गळ्यामध्यें ठुशा तनमणी मोत्यांचे पेंडे तुटती । चंपकळ्यांची माळ जिवलगा स्तना बाजूस फार रुपती । चंद्रहार पुतळ्यांची माळ आली घसरून पाठी-खालतीं । या मजला वेदना लागती कंगण्या तुमच्या पाठीप्रती ॥ चाल ॥ मी आतां पळून कीं काय राजसा येथून । सांपडे भक्ष व्याघ्राचे कवेमधें जिथून । कुशलता करून पळूं पाहे कसा मग येथून । तशी तुम्हांशीं रतुन

सख्या आज तोषविन बहुता परी ॥ तुम्ही ॥ २ ॥ मी काय आज गवसलें नवी म्हणून जिवीं अधिर येवढें झालां । वेड घेऊन अवघ्याच या जिनसाचा कां कारितां एकच काला । यांत मजा तरि कोणती बरी असेल वाटली चित्ताला । सांगून फेडा भ्रांत योग्य या गोष्टी न होती चतुराला । कधीं नव्हतें गुण असे आज आणले कोठून प्रसंगाला । मज इतुकें श्रमऊन वाटतें तुम्ही रात्रीं नवतां धाला ॥ चाल ॥ हे नग खुपती पाठिशीं लागल्या रगा । साखळ्या फार पदीं जड झाल्या जिवलगा । सोसितें मी कळ केव्हांचे बसलां बघा । घडेल ऐसा दगा हें पुढें ठाउक नव्हतें तिळभरी ॥ तुम्ही ॥ ३ ॥ माहित नाहीं मुळापासून ऐसे गुण स्वप्नीं तेथें । मग शंका कायसी जावया एकांतांत निर्भथ तेथें । बोध मागला काचित् जरी असतां तरी हृदयीं भेतें । उभी राहून द्वारांत तुम्हापुन शपथ आधीं वाहून घेतें । सांवरून सावधगिरीनें मी तुमच्या खोलींत येतें । नित्य शिरतां पाहून तुम्हांला मुखचुंबन आवडी देतें ॥ चाल ॥ प्रियकरा नवीन गुण हे तुम्ही शिकलां कोठून । व्यसनीं पाडिलें मला एकांतीं गांठून । असेच कराल कीं काय रोज नित्य उठून । स्तन पाहता पडियेला तुटून । कंचुकीसहित देखिल्या वरी । होनाजी बाळा म्हणे सांगितलीस मनची गोष्ट साजणी खरी ॥ तुम्ही ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ६२ ॥

चाल—पतिव्रता खुण करून पतीला गुंफून दिधला तुरा ।
परपुरुषीं रत मी होईन तरी सुकेल चातुरा ॥

—परशराम.

नाडबंद किती दिवस सख्या तूं खरें सांग मजपशीं । सहज आलें खोलींत उतावेळ होऊन आडवितां मशीं ॥ ध्रु० ॥ कवळि रे माझी काय

रोप केळीचें कवळें जसें । चढती पराई माझी शरीर हें सूक्ष्म केवळ तसें । समय न पाहतां भलतेच वेळेस मला आडविता कसें । नित्य उठून जी हें काय जिवलगा तुम्हां लागलें पिसें । आर्जवांत मर्जीनें तुम्हांला काकुलती येतसे । आतां जाऊं द्या मला घरांतील जागीं सारीं माणसें ॥ चाल ॥ सारी रात्र पडली आहे । टाकुन येवढा संदेह । मग घेऊन निजा निर्भय । हीच प्रार्थना आहे आतांची घडी टाळा हरकसी ॥ सहज ॥ १ ॥ नाभीकमळापासून सखे आमची मर्जी तुजवरी । तुला दृष्टीं पाहतांच वाटतें समाधान अंतरीं । सांपडसी कधीं तूं सखे ग येकांतीं राजमंदिरीं । हेंच इच्छितों तुला निजावें घेऊन पलंगावरी । तुजवांचून हा दिवस वाटे वर्षाएवढा सुंदरी । रात्र केव्हां होईल आलिंगन देशील बरवेपरी ॥ चाल ॥ भोगितां तुला साजणी । आम्ही नसों तृप्त ह्या मनीं । नित उठून तुझी घोकणी । करीत असेंच क्षणक्षणा चकोरा प्रीत शशीची जसी ॥ सहज ॥ २ ॥ मला भरंवसा येईना येवढी मी तुमच्या प्रीतीची । कामापुरतें बोलून धरितां आवड मनीं दुसरीची । अधीरपणा सोडून गोष्ट ऐका अंतरयामींची । कां येके दिवसीं तरी सांगा मोडली कधीं मर्जी स्वामीची । फार वेळ लागला दहशत मोठी सासूची । नका सोडूं तरी गांठ चोळी फाडाल लागबंदीची ॥ चाल ॥ सोड मजलागीं । म्यां बहुत विनविलें मघा । कां सोंग दावितां जगा । हासूं लागतील बघा । असें कळतां जावानंदांसी ॥ सहज ॥ ३ ॥ ऐक सखे साजणी मनामधें असे वाटतें मला । पलंगावर एकांतीं कधीं संग घडेल तुझा आपला । आतां न धरवे धीर बहुत अंतरीं छंद लागला । तुझ्या गळ्याची आण सखे आम्ही जाऊं ना देऊं तुला । एक वेळ हाताचें कमानीपासून तीर सुटला । आला मागें परतून असा नाहीं कोणी कोठें पाहिला ॥ चाल ॥ होईल तें होवो गडे । भोगुं दे तुला फांकडे । कर मान्य वचन येवढें । होनाजी बाळा म्हणे विडे देऊं नको चंचल होऊं असी ॥ सहज ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ६३ ॥

चाल—रुंद छातीवर बुंद गेंद जणुं गुलाब बहारामधीं फुलती ॥
वसंतकाळीं कळे कोंवळे तसे तुझे जोबन खुलती ॥

—प्रभाकर.

घडी घडी अरे मनमोहना हांसून गुणीजनां देखतां नको बोलूं मशीं । भरम धरील जन तुझान माझा पहा पुरती चौकशी ॥धु०॥ छबीदार सुरत साजिरी दिसे गोजिरी बरी आवडलीस माझ्या मना । कोठें दिसेना दुजा पुरुष मज तुजसारखा देखणा । संपन्न गुणामधीं असा रुपानें कसा जसा अमृतकर तारांगणा । रात्रंदिवस थोडकी तुझा मुखडा पाहतां क्षणक्षणा । शिरीं पगडी कंगणीदार दिसे सुकुमार फार नाजूक बांधा ठेंगणा । किती करशील पोषाग दृष्टी लागेल या चांगुलपणा ॥ चाल ॥ वेळभर करसी वेरझारा धाक याचा वाटे मजप्रती । अंधारे रात्रीं एकला नको येऊं तुज तरी सांगूं किती । होईल एखादा घात तुझा मज पापिणीचे संगतीं । तुझी प्रीत लाधली कुठून रोज निज उठून तुटून जिव पडतो झालें पिसी । ॥ भरम ॥ १ ॥ दिसतसे चटकचांदणी अगे साजणी मनीं तूं ठसली आमच्या गडे । छंद लागला तुझा आम्हांला रात्रंदिवस फांकडे । वाट पहात बससील नमून येतों आम्ही म्हणून आणून ठेविसी मिठाई पुढें । काया वाचा मनें तुझें चित्त आमच्या वाटेकडे । निजध्यास सदा अंतरीं फिदा तुजवरी घरीं स्वतःसिद्ध करूनिया विडे । एकांतीं मुखीं घालतां चकाकतील तुझ्या हातांतील चुडे ॥ चाल ॥ संतोष वाटतो मला सखे त्वां मन आमचें मोहिलें । किंचित् दुर्जेपण नसे तुझें मन आम्ही निर्मळ पाहिलें । होईल तें हो गडे तुला शिर संकल्पून वाहिलें । इष्काची चटक लागली जिवा चांगली रंगली वृत्ति आमची तुजपासीं ॥ भरम ॥ २ ॥ चातुर्यकलेमधें निपुण उभयतां आपूण जपून हा स्नेह चालिव

प्रियकरा। मी सर्वस्वें दासी मनीं नको कल्पा आणूं दुसरा। हातीं धरून विकसील जिथें जाईन मी तिथें इथें तूं संशय न धरी जरा। शरीर तुला अर्पिलें प्रचित्त पहा कर याचा त्रिकरा। हृदयांत करून मनसुबी पहा तरी खुबी उभी मी तुज सन्मुख सुंदरा। जपून टाकी पाउलें तुला विनवितें राज अंबिरा ॥ चाल ॥ जावा नणंदा बाडग्या सासरा सासु मोठी निर्दय। माहेरीं भावाबंदाची मायबापाची जशी पुढें आहे। वळचणी दुष्ट लागले बहु तया दुसमानाचे भये। असपास घराचे आडून बैसती दडून लढून मारतील एखादे दिसी ॥ भरम ॥ ३ ॥ नट चंचळ बावरी छबेली परी बरी सांपडलीस आमच्या हातां। बसावयास एकांतीं ठेवी रंगमहाल करून दे स्वतः। त्या तव बंगल्याचा राग न येतां राग सांग खिसमतगाराला पता। इशारतीची जागा तोच आपला गैर राबतां राहिला। दोघांची दशा वर्तणुकी अशा तशा करुं आपण कळा कुशलता। ज्या गोष्टींत वाढेल जनीं मानमान्यता। हें चित्त मिळाल्यापासून बहुत आपणांस लागलें पिसें। अशी गुप्त रीत प्रीतीची गोडी लागली स्नेहाच्या रीती। पहा शहाणपणाची जात धर्म राहतील वागते असे। होनाजी बाळा म्हणे भले वेड लाविलें वेधलें तनमन नव संगतिशीं। बापू धोंडीचे गुण प्रसंगामधीं केवळ समरसी ॥ भरम ॥ ४ ॥

## ॥ लावणी ६४ ॥

चाल—साजुक नाजुक कळ्या पिवळ्या गुंफीत अपहस्तकीं।
प्राणविसाव्या बैस मंचकीं तुरा खोवीन मस्तकीं ॥

नाजुक रुपडें बुंद मुखोटा नवतीची लाली। पदरांतून वर नजर पाहसी सात्त्विकपणें खालीं ॥ धु० ॥ मागें बुचडा आरळ झोक माथ्यावर पदराचा। चार आंगुळें सरळ लपविला चंद्र तारकेचा। भिवया कमान मधें बहार कुंकाचे टिकलीचा। आंत चंचळ घातला डोल वर सात्त्विक-

पणाचा । ठक मनुष्य तुज करी गौसेना गवस तुझा साचा । लाउन इष्किचा तार फोडला पडदा अंतरिंचा ॥ चाल ॥ गरातिचा अवघा साज करून या आज घटाव घटून । केवळ सात्त्विक होऊन मनें मोहून घेतीस लुटून । लवलव हलतें तुझें अंग असे गुण सांग शिकलिस कुठून । बरीच चाललीस नटून थटून । कार्णिची सीमा झाली ॥ पदरांतून ॥१॥ साधी नथ नासाग्रीं शोभली बरी साध्या वसनीं । पाहून समयोचित तुझें नारी मंद मंद हांसणें । न ढळे पाईंची दृष्टी सौम्य लक्षणें मुळापसने । चौकी करून मांड्यांची मीजाजींत बौध्यरूपें बसणें । लुब्ध सखे मन भ्रमर जलजवर्णी तुझिया रसने । गौरविल्या आदरें नको देऊं प्रत्योत्तर उसनें ॥ चाल ॥ पाहिलें तुला गुणवान सकळ सज्ञान ज्ञानी पुण । लुब्धता पाहून तव ध्यान सदनीं कोठें जाण बसवील लपून । कोणत्या वेळें निर्वाण सांग संधान यावें जपून । बसावें कोठें तरी लपून छपून बांधून अक्षई डाली ॥ पदरांतून ॥ २ ॥ बीज तसें अंकुर भासतें गुण घेऊन उठले । सकळ रूपाचें तेज सुख तुझें वदनीं एकवटलें । मीपण मिरवून सदा पुरे जे नटपणांत नटलें । तुझ्या नटपणापुढें तयाचें मन संशय फिटलें । किंचित् न फुटे भ्रम अशा व्यावृत्ती संधी तटले । उभे थव्याचे थवे पाहून तुज हृदयीं चांगटलें ॥ चाल ॥ अमरपुरीचा समुदाय तुझा नारी भाव दिसला तैसा । साधु पाहतां हांव धांव न जिंके डाव वाटे ऐसा । फोडून चित्ताची धांव बसविसील आव न कळे कैसा । नाहीं हाच भरंवसा रसायशील हृदय बाहुली ॥ पदरांतून ॥३॥ एवढें चांगट असून राखिलें त्वां वजना आपल्या । तुळतील सत्त्वस्वरूपास पाहून तुज आश्रिया दिपल्या । आधीं विषयवासना जयाच्या सर्वांगीं दिपल्या । त्या पश्चात्तापें मग होती विरक्त तपतपल्या । तसेंच तव सद्गुण उदई दुर्बुद्धी समुळी खपल्या । मन शांतीच्यामुळें कल्पना दुरोक्तीच्या लपल्या ॥ चाल ॥ निर्मळ गंगेचें नीर तुझें मन स्थिर दिसलें तसें । मध्यम मंजुळ समीर वाटतें क्षीर प्रियकर असे । तद्वत तव

देहांत धीर बहुत गंभीर तूं स्नेह रसे। होनाजी बाळा म्हणे असें तुज पाहून वृत्ती घाली ॥ पदरांतून वर नजर पाहसी सात्त्विकपणें खालीं ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ६५ ॥

चाल—रतिवंत महाराज पेशवे अमोलिक सुर्ती मोती ।
सवाई माधवराव स्वारी निघाली नवाबावरतीं ॥

याला ईश्वर साक्ष असतां माझें लक्ष तुमचे ठायीं। बिन अपराधी व्यर्थ सख्या तुम्ही कां हो मसीं बोलत नाहीं ॥ ध्रु० ॥ पंचप्राण लाऊन म्यां जितुके स्वामी सेवार्चन केलें। सांगा एकांतीं मजला तितुकें काय सख्या व्यर्थच गेलें। न बोलाल जर कृपा करून तरी मी जिवंत असतां मेलें। काय जीवित्व जगांत जिवलगा पहा शोधून अंतरीं बहिलें। जन्मांतरींचें श्रमहरणास्तव किंचितसें भाग्य उदेलें। काळमहात्म विचित्र तशामधें कर्म पुढें आडवें आलें। सर्वोपरी निरुपाय जाणोनी मनीं येऊं द्या करुणा कांहीं ॥ बिन ॥ १ ॥ बिन अपराधी जसें नभानें पक्षिगणावर कोपावें। त्याजवेगळे प्राणविसाव्या पक्ष्यांनीं कोठें जावें। जाणून जळचर पक्षिगणावर क्रोधयुक्त अंतरीं व्हावें। पदरीं पडलें पवित्र झालें अमृतद्रवीं लोभावें। लागले शब्द जनांत आपलें म्हटल्या कां नुपेक्षावें। सर्वोपरी अन्याई पसरितें पदर ना सोडूं बाही ॥ बिन ॥ २ ॥ यश कीर्ती कल्याण जगत्रामधीं बरवें व्हावें जेणें। मी रांड अभागिण पहा तुझें मन केवळ मिळऊं नेणें। असाध्य वस्तु साध्य होणें पूर्वार्चन ईश्वरइच्छेनें। ते प्राप्त होतां कोठें लपावें जाऊन प्रालब्धा भेणें। अकस्मात आळशावर निर्मळ गंगेचें झालें येणें। विन्मुख होतां यासी म्हणावें उभें पुढें संचितपणें। पुरतें मनीं विचारा अशाला धर्मशास्त्र देतें ग्वाही ॥ बिन ॥३॥ उभी जोडल्या करी जिवलगा प्रार्थित सेवेची दासी। हीच गोष्ट सारांश मुखाचें रक्षावें

पायापाशीं। पुरतेपणीं अपराध पाहून तो पदरीं घालून गुणरासी मग स्वस्थपणें तुम्ही रुसावें मज वर्जून एकांतासी। होऊन कृपाळ आधीं समयें अंगिकारिल्यावर ज्याशीं। राइसम अन्याय मेरुवत दंड नसावा मग त्याशीं। मजविषयीं अहो प्राणवल्लभा दया असो तुमचे हृदयीं। होनाजी बाळा म्हणे पतीच्या सादर सेवेस सदा राहीं॥ बिन॥ ४॥

## ॥ लावणी ॥ ६६ ॥

चाल—नटनाटक तूं छेलछबेला मत्तवाला अलबेली तऱ्हा।
अग जाळ्या ह्या भोंवतीं फिरतीं पहा गांठून नेती घरां॥

स्वरूप तुमचें पाहून पापिणी जीव आमचा प्याला वारा। स्वप्नजागृतीमध्यें तुझा तव निजध्यास अवघा सारा॥ध्रु०॥ गुलाब तक्ता आणि गुलाला बागामधीं नाफरमानी। त्या रंगासारखी मुसमुसते गडे तुझी पहिली ज्वानी। हर गोष्टींचे विषयीं आमचा शब्द तुझ्या पडतां कानीं। प्रसन्न चित्तें करून रिझविसी आधीं असून त्या संधानीं। खूप सुरत अति वदन सुधाकर तूं सुंदर राजसवानी। तव स्वरुपामृत इच्छा झालों आम्ही चकोर इष्की प्राणी। धन्य तयाचें भाग्य साजणी तूं आहेस ज्याची दारा॥ स्वप्न॥ १॥ सोडून या संसारसार नार सर्वस्व गडे आम्ही तुजपायीं। रोज हीच काळजी तुझें मुख दृष्टी पडेल किंवा नाहीं। तुझे घरीं तुजवर जती केली सखे सर्वत्रांहीं। गांठ तुझी एकांतीं पडाया उपाय तो न चले कांहीं। आमचें तुजवर लक्ष आणिक गडे लक्ष तुझें आमचे ठायीं। नित्य झुरतों अंतरीं पाहून एकीकडे एक उभयतांही। तुजकरितां तुज घरीं वेळांतून होती शतावधी वेरझारा॥ २॥ लक्षणांत नेटकी रूपसंगें तूं सुंदर राजबाळी। नग सामान्य अंगावर चमके जयेप्रती वर्षा दिपवाळी। नेत्रांमधें रस आणून पाहत बसतेस आम्हां तिसरे ताळीं। किती मन आमचे प्रसन्न होतें प्राणसखे मग ते वेळीं। आम्ही

दर्दी प्रीतीचें तुझें घर दिसते व्याघ्राची जाळी । हें भय मनांत फार एकांतीं यज्ञ करून मज कवटाळी । पिशाच्यावत आम्हीं झालों शांत कर प्रवर्तूनी अंगिकारा ॥ ३ ॥ जसें पुष्प कवळें पक्क होतां अधिक सुवासावें । तसें तुझ्या प्रीतीचें लक्षण दिसतें दिसेंदिस झालें ठावें । याच सद्‌गुणा-वरून वाटतें तुला एकांतामधीं पहावें । इच्छा आमची हीच पुरविसी कधीं न कळे अंतरभावें । पुष्प कळ्या गजऱ्याची जणुं गडे हें वर्म हृदयीं जाणावें । गोष्टीचा सारांश गोष्ट मंचकीं उभयतां रत व्हावें । यांतच विनोद मजा तुझे गडे नवतीचा पहिला पहारा । होनाजी बाळा म्हणे जिवीधर आम्हीं सांगितला गोषारा ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ६७ ॥

चाल—जय शिवलिंगा मस्तकीं गंगा पार्वतीला चोरून ठेविलें ।
ज्या गंगेनें जग उद्धरिलें त्रैलोक्यामध्यें नाणावलें ॥

सखे गुलाअनार गुलचंमन निशिचा रमण तसा गोजिरा तुझा मुख-वटा । कंठामधीं कोयाळ मधुर बोलणें रंग गोरटा । ॥ ध्रु० ॥ बांधीव बुचडयाची लबक पदर अति सुबक खोविला तिपदरी वेणीचा । चंदन ढाळीस जसा लपेटा काळे नागिणीचा । मुलतानी भवया कशा कमाना जशा वहार मधीं कुंकाचे टिकलीचा । नरम ओठ पोंवळे तुझा नासाग्रीं झोंक नथणीचा । कंबर बारिकसी बुंद छाती तुझी रुंद सडक बांधा नाजुक देहीचा । लाजुन बससील दूर पदर शिरीं सरसाउन युक्तीचा । नैनाचा कैरी झोंक जराशी नोक कळें न कळें फिरविशी पट्टा ॥ कंठामधीं ॥ १ ॥ कानांत काप साखळ्या दंडीं दंडुळ्या शिरीं शोभे केकत राखडी । चोळी अंगामध्यें तंग बहुत नापर दिसती फांकडी । हिरकण्या दंतपंगती अधर संगती त्यांत सखू तुझी रंगली विडी । कंठामध्यें पिक दिसे अशी ग तूं रूपसुंदर फुलघडी । तुझी आमची मोहोबत पाक जालों मुस्ताकखे

आम्ही तुजवर गडी । चैन पडेना कोठें सखे तुझी याद होती घडाघडा । वाटे दर्दाचें भय भरंवसा न ये तुम्ही नारी केवळ चंचळ नटी ॥ कंठामधीं ॥ २ ॥ उंबर सोळा सत्रांत शरम नेत्रांत दशा तारुण्य लहान आकृति । रूपरंग आणि सुवास निर्मळ जसें पत्र केकती । या तीन गुणांची निधी गजाचे पदीं गमन तुझेमधें मर्यादा किती । या चिन्हें मंडित पाहुनिया खूप तुजवर चित्तवृत्ती । चातुर्यपणें भान धरून आर्जव करून सखे तूं मोहिलेंस मजप्रती । रसिकता पणामधीं उभयतां नित्य घडती जागृती । गोड गोड ऐकून शब्द होतसों लुब्ध अशी सहजांत उडविसी घटा ॥ कंठामधीं ॥ ३ ॥ सखे तुझ्या गळ्याची आण आम्हांला ध्यान लागलें फार तुझें सुंदरी । जिवा वाटे हुरहूर सखे तूं दृष्टीस न पडतां जरी । पंगतीस बसतां भोजनीं आठव साजणी होती घडोघडी हृदय अंतरीं । पाणी हातावर पडतां धांवत येतों सखे तुज घरीं । मुख पाहतों तुझें गडे जेव्हां मनाचा तेव्हां हर्ष आमचा न मावे अंबरीं । पाख स्नेहामध्यें कल्प कदाकाळीं न पडे तें करी । जेथें अशा स्नेहाची जात तेथें उभयतां तें द्वैत अखटा । होनाजी बाळा म्हणे सखे ने पाख प्रीति शेवटा ॥ कंठामधीं ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ६८ ॥

चाल—हृषीकेशी दूरदेशीं अंतरलें ।
प्राणपती मनीं कोणाच्या भरले ॥

तुझें वेड लागलें अरे गुणीजना । या राजमंदरीं तुजवांचून करमेना ॥ ध्रु० ॥ पहिले दिवशीं सात्त्विकपणा दाउनी । घर घेतलेंस माझें चित्त मन मोहुनी । बाहेर असतां मज घरांत बोलाउनी । बसाविलें आदरउपचारें विनय होउनी । दुसरे दिवशीं तुम्ही आलां लक्ष लाउनी । म्यां निसंग केली प्रीत रीत पाहुनी ॥ चाल ॥ इष्काची लागली चटक । म्यां करून घेतली अटक । कां शब्द बोलतां तुटक । कसें पाहूं कोणता कटक

॥ अहो गुणिजना ॥ १ ॥ स्वपनामध्यें उचकुन उठतें शेजेवरी । भाषण करितां जणुं निजला तुम्ही शेजारीं । जागृत होउनिया पहातें घाबरी । तळमळी मिनाचे परी उभी राहतें द्वारीं । त्वां कांहीं तरी चेटुककरणी खरी । अगदींच नाहींसें झालें चित्त संसारीं ॥ चाल ॥ इतकेंही करून मज किती छळसी राजसा । चातकी लक्ष त्या मेघमंडळीं जसा । चित्ता-पासून तुजकडे ओढतो कसा । पुढें शेवट होईल कसा मला समजेना । मी कुटुंबवत्सल हें आण पुरतें ध्याना ॥ २ ॥ तूं नको मनामधीं आणूं दुजेंपण कांहीं । जें होईल तें होऊं दे माझें तुजपायीं । म्यां शपथ केली या गोष्टीस अंतर नाहीं । या उभयतांत बोलण्यास साक्ष विठाई । जाणून भंरवसा स्वस्थपणें राहीं । रात्र फार गेली बस पलंगीं लवलाही ॥ चाल ॥ पर एक आज तुला सांगून ठेवितें सदर । परकें घर पाहतां ओंगळ माझी कदर । निर्लज्जपणें मग तेथें मी पसरीन पदर । ठेऊन चित्तामधें वदर भिउनिया जना । असे बिनडागी निर्मळ मोत्याचा दाणा ॥ ३ ॥ अवघ्यांचा सोशितें जाच पहा तुजसाठीं । इतकें सोसून वचनास उभी तुजपाठीं । कांचणी पुरवली तुझी रे औशीं पहाटीं । मागून घेतें दर्शना नको आडकाठी । पहिलेंच विधीनें रेषा लिहिली ललाटीं । त्यासंबंधींच न तुटल्या रेशमी गांठी ॥ चाल ॥ एकचित्तें करूं वर्तणूक दोघेजणें । कायावाचा मानसीं हर्षाकृत मनें । उभयतां असलास तर कीर्ति जगा दावणें । होनाजी बाळा म्हणे चतुर जो शहाणा । ही प्रीत रीत अनुभविल आणून अवसाना ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ६९ ॥

चाल—रतिवंत महाराज पेशवे अमोलिक मुर्ती मोती ।
सवाई माधवराव स्वारी निघाली नबाबावरतीं ॥

त्वां बारिक कांतलें सख्या म्हणून पुससी एकांत गुजी । दुष्ट जालें मन विषयीं बहुत हें मुख्य काळजी मला तुझी ॥ ध्रु० ॥ परस्परें ऐकिलें

मारतील या रांडा तुज असा गुणी जपुन टाकी पाउलें प्रियकरा तुझ्या बऱ्यावर नाहीं कोणी । तापड प्रकृती पडली माझी वाईट पाहतां तुला कोणी । नाहीं देखवत मला तरमळित प्राण मिनापरी देताती । सख्या मी तुझे घोरानें केवळ म्यां केली शरिराची धुनी । हा लागाबांधा पुरवीचा सख्या खचित आहे मी ऋणी । इतकें सोसून सांग तरी तुज समजाविल असी कोण दुजी ॥ १ ॥ ठरे जगीं दैवाची सख्या तुज आधीं मज मरण आल्यावरी । प्रियकर स्त्रिया मतिच्या म्हणतील मजमागें भाग्याची खरी । इतुकें जरी न घडे तरी मजपुन करून घेतलीस क्रिया बरी । या गोष्टीवर सती मज निघणें प्राप्त सख्या तुज बरोबरी । आशा लागली आतां भोगूं दे सुख तुजसंगें बहुतपरी । सख्या कोणावर नको भरूं रागे चार दिवस रहा स्वस्थ घरीं । कर जोडुनिया मागून घेतें लक्ष ठेवुनिया तव पदांबुजीं ॥ २ ॥ गोड बोलणें वरवर न कळे म्हणसी अंतर भाव कसा । चातकास प्रिय जळधर प्राण्या कृतनिश्चय तुजठायीं तसा । नित्य छळसी एकांतीं परंतु मला आवडला स्नेह असा । हें वाक्य वरलें नव्हें अति हर्ष चकोरास प्रिय चंद्र जसा । माझी प्रीत तुजठायीं किती आहे ऐक सांगतें प्राणहंसा । अवरजून पंचप्राण झड घालिती खगेंद्र सुधारसा । परंतु एकटी तुझ्या लौकिकासाठीं निजत्यें एक भुजी ॥ ३ ॥ असो याजाविण नाहीं खोळांबा एक प्रार्थना तुला आहे । पदर पसरितें मी तामसगुण प्राणविसाव्या टाक तूं हे । तूं कितीकांचा इष्टदुष्ट म्हणून मजलागीं बहुत भये । बुद्धीस नको करूं वैर सुखा चालीव म्हणे उभयतां स्नेह । पूर्वसंबंधावरून आपला आधींच म्यां वाहिला देह । यावरी जें आवडेल ते करी परी म्यां सांगितलें गुज हें । होनाजी बाळा म्हणे धन्य तूं एक श्रेष्ठ मनमंत्रपूजी ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ७० ॥

चाल—आजच आला पालव मजला किती जीवा झुरशी ।
दिवस पांचवा ऋतु संपादन मज राजा गुणराशी ॥

नका लाऊं जिवलगा प्रीत तुम्ही परस्त्रीचे ठाईं । बोलून सत्य कोणाचा पण सिद्धीस गेला नाहीं ॥ ध्रु० ॥ आम्ही कुळीच्या स्त्रिया बऱ्या वाईट कीं कुळिवंता । राहून वांकडें सरल्या उठून नित्य परसदनीं जातां । कोण वर्तणुक कसी रोज स्वदृष्टीनें पाहतां । समजुन पुरतेपणें ताक कां धर्माचे पितां । दोष स्त्रियांचे असे व्यर्थ कां तुम्ही तरी शिरीं वाहतां । आमचें मन समजावून मग धुंडा परक्या वनिता ॥ चाल ॥ पाहून द्रव्य नानापरी दाविती कळ । नवती पाहुनिया बळेंच पडती गळां । बोलती असत्य त्या रांडा अमंगळा । चांडाळणी ओंगळा वोखट्या सदा सर्वदाही । अधर्मिणी जारिणी आम्हां छळितां त्यांचे पाईं ॥ १ ॥ आगजाळ्या सवतीया तुमच्या सौंदर्या । जार कर्म आचरून अंतसवरकीया । संगदोष हा जपुन हानि होती आपल्या ऐश्वर्या । कोमल आंग राजसा प्राण प्रियकरा हे गुणवर्या । जपुन टाकी पाउलें असा परद्वारींचा पर्या ॥ चाल ॥ समजाउन भलतीच गोष्ट लावितील चढी । अवयव शुद्ध कर्तृत्वाच्या परवडी । गरतिचा भाव दाऊन घालतील सांकडी । करून कुडी वावडी विघड पाडती बहु ठाईं । हें आत बेबंद नसे नेत्रांत शरम कांहीं ॥२॥ कर्महीना पापिणी नारी त्या दृष्टीनें भरल्या । टाकुन दोन्ही कुळांसदर कुसबामधें शिरल्या । दुर्गंधा दुर्बुद्धी जगीं ज्या व्यभिचारिणी ठरल्या । त्या तूं प्राण-विसाव्या आवडी करून हृदयीं धरिल्या । अपवित्रा दृष्टीनें मुळीं ज्या बारा स्थळीं फिरल्या । दुपारच्या साउल्या न होती त्या बहुल्यावरल्या ॥ चाल ॥ यासाठी व्यर्थ श्रमूं नका अहो जिवलगा । जोंवरी तेज तोंवरी त्या तुमच्या बघा । पदरीचा अर्थ सरल्यास शेवटीं दगा । फार प्रार्थिलें मघां अजुन तरी उमजा लवलाही । वर्णिती जन अवघे तुमच्या गुणा न चतुराई ॥ ३ ॥ बाहेरल्या मैत्रिया म्यां आशा सर्वांच्या खाणी । विरळा लक्षामधें एक राखिला पुरुषाचें पाणी । बहुत बोरी बाभुळी उगवल्या दाट वनस्थानीं । जाई जुई मालतिचा दुष्काळ तया वनीं । परस्त्रियेचा स्नेह तो एकच मी

ऐकतें कानीं । छेल बटाऊ साठीं निघाली ती मोहना राणी ॥ चाल ॥ इष्कार्ची कीर्ति अद्याप गाजती जनीं । वाटेल सौख्य म्यां सांगितल्या साधनीं । कल्याण सदा हा बोध ठसेल जर मनीं । मानमान्यता जनीं प्राप्त होईल उभयतांही । होनाजी बाळा म्हणे धन्य तूं एक गुणग्राही । बोलून व्यर्थ ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ७१ ॥

चाल—श्रीमंतांच्या बावन्न पागा त्यांमध्यें बावन्न सरदार ।
रघूजी भोसले दौलतराव शिंदे तुकोजी होळकर ॥

भाउबंद सोयरे मित्र आपले अथवा पारखे । स्त्री सगुण पुत्रपौत्रा अवघे प्रालब्धासारखे ॥ ध्रु० ॥ उपाय करितां अपाय केवळ निराश्रित या जनीं । पूर्वार्चनी हा शब्द असावा प्रालब्धा लागुनी । सत्यशील हरिश्चंद्र तयाची तारामती कामिनी । कसें यश पाहतांचि निंदली त्या कौशिक ब्राह्मणीं । नैषधपत्नी अरण्यांत एकटी विदर्भनंदिनी । मातृभगिनी गृहीं काळ क्रमिला समय असा पाहुनी ॥ चाल ॥ तीर्थपंथी श्रावण पिता । दशरथालागीं शापिता । विश्वनाथ मुख अवचिता । दृष्टी पडतां अलभ्य लाभास्तव हृदयीं हरके ॥ स्त्री सगुण ॥ १ ॥ शक्र विहु विस्तीर्ण रचुनिया दुर्योधन भूपती । युद्धप्रसंगीं नुलंघी एकट त्या अभिमान्याप्रती । पार्थ पितृ वैकुंठीं विलाशी ज्या मातुळ श्रीपती । दुरावले समयास म्हणावी ही कर्माची गती । षंढ शिखंडी युद्ध पावला श्रय त्या अनुकुळ रती । श्रेष्ठ शूर ते महान महान अद्भुत कीर्ति वर्णिती ॥ चाल ॥ जरजर करून या रथीं । पाडिला भीष्म वर क्षितीं । तो म्हणे अहो यदुपती । येउन या शीघ्रगती वधी मजलागी शूर निरखे ॥ स्त्री सगुण ॥ २ ॥ प्रत्यक्ष शीळ सत्याचे धर्म मूर्ति गोजिरी । सामर्थ्यें समसमान भार्गव उपमा पार्थापरी । भोजसुता वासुदेव पितृभगिनी कुंती बरी । ते विचित्रवीर्याची स्नुषा

पंडुची मुख्य अंतरी । माद्रीतनये चातुर्य बघुन थकितसी वहनेश्वरी । रूप पाहून तें लज्जित रंभा सहस्राक्षाचे परी ॥ चाल ॥ लाक्षागृहांतून त्वरें सांगून युक्त श्रीवरें । वांचविलें पांडवा बरें । विवर द्वारें क्लेशांतरें तिष्ठती कृष्ण असून द्वारके ॥ स्त्री सगुण ॥ ३ ॥ विनाशकाळें करून विराटसदनीं पांडव बळी । विन्मुख जो प्रालब्ध पाहती पांडव द्रौपदीची रळी । बळोत्कर्ष तो कीचक स्वदृष्टी उन्मत्त काय तो कामानळें । पदीं द्रौपदी ताडिली ते पहाती सर्व राजमंडळी । भुभुज मंत्री स्तब्ध न वदती शब्द कोणी ते स्थळीं । विलोकून धर्मास तोलली गदा भीमें करतळीं ॥ चाल ॥ नेत्रसंकेतें सारिला । भीम धर्मरायें आवरिला । रात्रीं कीचक मारिला । होनाजी बाळा म्हणे वारिला कर्मभोग वारिके ॥ स्त्री सगुण ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ७२ ॥

चाल—पंचप्राण तुजपाशीं सासऱ्या घेऊन जातें कुडी ।
खुशालीचें वर्तमान लिहून कळवीत जा हरघडीं ॥

— परशराम.

पती प्रवासामध्यें सखे मी येकली मंदिरीं । कंठूं कोणाच्या बळें पाठवा पत्र लिहून या तरी ॥ ध्रु० ॥ झुरझुरून पांजर झालें शरीर निपट राहिलीं हाडें । रात्रंदिवस घोकणी पतीच्या लक्ष वाटेकडे । परदेशीं येकलें जसें कां दिनदुर्बळ बापुडें । ती गत झाली मला सख्याचा दुःखीं जित्र चरफडे । एकटी पक्ष्यावाणी आणखी पदार्थ नावडे । अन्नपाणी वर्जिलें सखे मज नित्य उपोषण घडे ॥ चाल ॥ गेल्या दिवसापासून सख्यानें मधीं परत नाहीं केली । एकाकडे एक पाहून कंठीत होतों आनंदाखालीं । नाना परीचे विलास केले सखे बसून राजमंदिरीं रंगमहालीं ॥ चाल ॥ सखा निष्ठुर बाई । येवढा तरी झाला कां गे । कोठें दुर्गुण कांहीं । पाहून मजवर भरला रागे । जाऊन लवलाही । सख्यांनो

त्यास पुसा जागे ॥ चाल ॥ पतिच्या वियोगा । काय करूं मी । जाऊन कुणाचे पाय धरूं कीं । आतां हें कशानें । दुःख विसरूं कीं । खुण मुद्रेचा खंजीर पतीचा मारून घेईन उरीं । कंठूं कोणाच्या ॥ १ ॥ रथ गाड्या पालख्या अश्व कुंजर भरली । दामोदरा नवखणी उंच गगनीं गोष्ट सांगती । जागोजागीं कारंजीं बैठका त्या उदास दिसती । न ये नरम मखमाली बिछान्यावर निद्रा मजप्रती । दासी उभ्या चहुंकडे कराया पंखा शीतळ गती । गळा फुलांचे हार सर्पासारखी भासती ॥ चाल ॥ दैवी धर्मी सौभाग्यवत्या आपापल्या अंतरंगें । घरोघरीं एकांतीं विनोदें रमती भ्रतारासंगें । पती भेटतील मला अशी तूं पावसील गंगे ॥ चाल ॥ नळ दारिद्रपणें । दमयंती राणी जैशी । नेऊन या घोर वनीं । सती टाकून गेला तैसी । अशीच मी सुखशयनीं । मला ग बाई गत झाली तैसी ॥ चाल ॥ प्राणविसावा । तो गुणराशी पाहिन जेव्हां । जाऊन प्रवासी भेटेल तेव्हां । हर्ष जिवासी । मरण आठा चौ दिवसा । पती न येतां जरी ॥ कंठूं कोणाच्या ॥ २ ॥ न्हाण भोग वर्जिलें शिरीं केसांची झाली दशा । कांहीं सुचेना मला दिसती दाही दिशा । व्यर्थ दिवस जातात खबर सांगा माझ्या कवेशा । जसा अधांत्र दोर कापला तशीच राहिली आशा । विलासीक जिनसांच्या या संदुका झांकल्या जशा । पती गेल्यापासून सखे मी नाहीं उघडल्या तशा ॥ चाल ॥ लवंगा चिकणसुपारी वस्त्री जायफळ जायपत्री । उंच धनवडी पैठणी पितांबर वरतीं बारीक वस्त्री । हें नेसून दावावें स्वामीला इच्छा अंत्रीं ॥ चाल ॥ सखे त्या मनमोहना । आतां मी कधीं पाहीन दृष्टी । न ये सांगतां कोणा । सखे एकांतीच्या गोष्टी । उभयतां विषयखुणा । आठवून जिव होतो कष्टी ॥ चाल ॥ चढली उदासी । बहुत मनीं गे । काय मी दाऊं । वदन जगीं तें । वाटे त्यजावा प्राण वनीं गे । मी त्यालें नसलें । पतिसंगें दिसतें सांजिरी ॥ कंठूं कोणाच्या ॥ ३ ॥ पाऊसकाळामधीं वणिकव्यापारी घराशीं

आलें। जिन्नस करून खरेदी मागें सवदागर परतले। बहुत विजा कडकडाट त्यामध्यें सूर्यकिरण लोपले। एकसारखे मेघ सदोदित आभाळ झाकुळलें। कठीण वाट डोंगरच्या जाळ्या निबिड ओहोळ थरियेले। दोहि थड्यानें पाणी नद्यांना पूर भरून चालले ॥ चाल ॥ गेला जसा तसा कधीं पाहीन आपला प्राणविसावा। सत्वर उठा सख्यांनो मजला पक्ष्याचे पर लावा। असें वाटतें मला एकदां सखा दृष्टीनें पहावा ॥ चाल ॥ कशी गत करूं आतां। मला सुख नाहीं संसारीं। काय वर्तूं मी वृथा। या जनलोकामाझारीं। अशी करितां चिंता उभे अवचित साजण द्वारीं। ॥ चाल ॥ हर्षे उठोनी। गुण वेल्हाळी। धरून पतिला करीं कवटाळी। प्राण दिपानें आरती ओवाळी। होनाजी बाळा म्हणे सुखें कर मौजा सदनांतरीं। बापू धोंडिचे गुण प्रसंगामधीं केवळ सरभरी ॥ कंठूं कोणाच्या ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ७२ ॥

चाल—रुंद छातीवर बुंद गेंद जणुं गुलाब बहारामधीं फुलती।
वसंतकाळीं कळे कोवळे तसे तुझे जोबन खुलती ॥ —प्रभाकर.

हार नवता मधीं सहात कसें आज संकट वडवडलें। संसारा भट पडो दोघांमधीं आड पर्वत पडले ॥ ध्रु० ॥ कवळी कांता सुकुमार पती लावण्याचे राशी। गांजून सर्वत्रांनीं तयाला केलें प्रवासी। सुखानें अथवा दुःखें पहात होतों एकमेकांशीं। आज अंतर पाडियेलें ईश्वरें करूं गत कशी। कसा क्षोभलासी। काय केली तुझी चोरी बिघडलें आम्हां उभयतांसी। जळो हें मागिल कथा सुखें पती येवोत घराशीं ॥ चाल ॥ उद्यां जातील हें कळलें। म्हणवून रात्रीं कष्टी झालें। तेव्हां मज हृदयीं आलिंगिलें। आदरें मांडीवर बसविलें। स्वहस्तें करून कुर्वाळिलें। अरुणोदईं निघोन चालिले। पुढील मागें पडती पाउलें। पाहून मजकडे

वदन उतरलें । सख्यानें उष्ण नाहीं पाहिलें । बोळवून जेव्हां परतलें । ते वेळीं कसें भासलें । जणुं का आकाश कडकडलें ॥ संसारा भट ॥ १ ॥ नानापरि मिष्टान्नें करुनिया प्राणसख्यासाठीं । संतोषें वाढलीं स्वहस्तें या सुवर्णताटीं । घडोघडी मुख कुर्वाळित पाहून माझी प्रपंचरहाटी । आतां कोण हरविल श्रम येवढेंच होतें ललाटीं । धनीन पुरें पाहतां तयाच्या स्वरूपाची धाटी । आज नांदतें सदन सख्यांनो वोस लागतें ग पाठीं ॥ चाल ॥ उदास सर्वोपरी । न वाटे गोड कांहीं अंतरीं । म्हणून लागे निद्रा मंदिरीं । उभयतां याच कीं पलंगावरी । विलासें रमलों नानापरी । विनोदें विडे करून सत्वरीं । घातलें मुखामधें मुख भरी । दुःख आठवलें तया अवसरीं । तेव्हां लगबग आलें बाहेरीं । दिशा पिंवळी दिसते अंबरीं । वियोगें हा जीव तगमग करी । मला न गमे त्याविण क्षणभरीं । चित्त त्याचें स्वरूपीं जडलें ॥ संसारा भट ॥ २ ॥ जंबु आंब्र अवदुंबर कदंब फणस बिल्व आंवळी । बटमोगरे मालती रातांजन पार्यातक बकुळी । देवदार मांदार खर्जुरी मातुलिंग केळी । वट अशोक ताड माड सुरु नारंग्या नारळी । गिरीकंदरीं पोखरणी झाडी घनदाट दिशा ढवळी । मोठा दुर्धर पंथ दिसेना सूर्य अभ्रमंडळीं ॥ चाल ॥ निबिड तरुच्यांत जाळ्या । त्यांतून देती व्याघ्र आरोळ्या । आस्वलें दिवाभितें सायेळ्या । येती गुंघाटे किंकाळ्या । बदकें विटाळके पाकोळ्या । कस्तुरीमृग भुजंग वेटोळ्या । जांभया देउनी चाटती जिभळ्या । नाना जाती श्वापदपाळ्या । हिंडती वनीं निःसंग निराळ्या । शोधिती नरमांसांच्या गोळ्या । पर्वतसंधीं तस्कर टोळ्या । वधून भरती झोळ्या । दुरावलें आपल्या सांवळ्या । न कळे कांहीं भविष्य पुढिलें ॥ संसारा भट ॥ ३ ॥ चिंताग्रस्त मानसीं वियोगानळें आहाळुन भारी । म्लानवदन अति विव्हळ बैसली हृदया-माझारीं । काग पिंगळे किजबिज करिती वृक्षावर द्वारीं । पतिभेटीचीं चिन्हें दिसती सगुण सौख्यकारी । एक उभयतां निश्चय म्हणून तिकडेच

वेव्हारी । यशस्वी होऊन परतली खाशाची स्वारी ॥ चाल ॥ स्फुरतें दक्षिण बाही । लवतो वाम नेत्र लवलाही । मजलेमजलीं करून कमाई । आले आपले धनी । स्वगृहीं पाहतां आनंद पोटीं न माई । घालतां मिठी प्रीतीनें पाई । उठवली सुखस्थान देसदाई । कर्मिलें आजवर कोणे ठाईं । वियोगें तुमच्या अशक्त देहीं । जाली तव कृपादृष्टीनें पाही । येथें तव संशय उरला नाहीं । म्हणे होनाजी बाळा गुणग्राही । कवन हें रसिक रसा चढलें ॥ संसारा भट ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ७४ ॥

चाल—प्राणसख्या प्रियकरा करा शेवट पुरता मनीं धरून ॥ – सगन.

कधीं येसील भेटसील प्रीत तपसील सांगसील तरी । प्राणसख्या जीव कष्टी तुजसाठीं जैसी मैना झुरझुरी ॥ ध्रु० ॥ मी पाटींतली मास पार मन सायासीं लाधलें । अभर्वसी नको टाकुं जसें जळ वळ्वाचें वाहवलें । कोंदण कसीलें लाल आगीमध्यें जणूं सोनें तावलें । अशक्त जालें रोड तुझ्या रे प्रीतिला नादावलें । बसलें ठाईं ठाईं पाहा मी चिखलाचें भावलें । कोणीकडे चुकला वाट भेटीला आज माझ्या फावलें । मजवरतीं तुमचा शिका जना ठाउका । हकनाक डाग निर्मळास लाऊं नका । तव संग विषयनायका इच्छितें सुखा । खिडकींत उभी राहून पाहतें टकमका । शिरीं वंद्य मला पादुका भाव हा निका । देतसे बेलभंडारा मी तुळशीबुका ॥ चाल ॥ राहातें व्रतस्थ धरिल्या रितीं । साधितां योगदर्शन जाहलें मजप्रती । तुम्ही गुलाब हार मी तर पिंवळी केकती ॥ चाल ॥ किती रे साजणा विनवण्या करूं । बसल्याला सिर काढुन हातरूं । आडल्या वेळेस नको रागे भरूं । जैसें मी मुकें जनावर गुरूं । कंच्या रीतिनें स्नेहसागर तरूं । नको रे प्रीतिचा दोर कातरूं । निकर असा न ये करूं । येत जा खुशाल माझे घरीं । येकुलता येकल्या नको विसरूं अर्धा क्षणभरीं ॥ प्राण-

सख्या ॥ १ ॥ तूं दुगदुगीचा प्राण तुझ्या रे मीं ममतेला शोकलें । फुकट आजपर्यंत जसें वांकिवलें तशी वांकलें । नको उघडा भ्रम फोडूं सख्या मी तुज खालीं झांकलें । निकरट परक्या वाणी मला कां दूर अगदींच टाकिलें । घरीं दारीं कधीं दृष्टी पडेना कुठें रमतां येकलें । असें करितां मी मग्न खचित हें ब्रह्मथानें भाकिलें ॥ चाल ॥ संकल्प निर्मिला हो राजसा। मांडीशीं मांडी लावून सेजेवर बसा । तूं मज पुतळीचा ठसा आवडसी कसा । मी कलेवर तूं आत्मराज माझा राजसा । भर जातो दिवसेंदिवस मनाला पुसा । चौकसी करुनिया मग पुर्तेपणीं रुसा ॥ चाल ॥ शृंगार-सहित बसतें डावे बाजूला । सोडीना पाय मी हा जागा योजिला । रूपवंत उभयतांचा जोडा चांगला ॥ चाल ॥ मजला तुजविरहित नाहीं कोणी । अवघे दो दिवसांचे पाहुणे । न दिसे दुसरा तुज ऐसा गुणी । माझ्या मंगळसूत्राचा मणी । पाहतें नित्य वाट आंगणीं । रात्रंदिवस हंसतें मनीं । दिव्य लावणीची कडी लिहून घ्या अभय पत्रावरी ॥ प्राण-सख्या ॥ २ ॥ स्वतांच जालें राजी तुम्हांला नाहीं मीं विचारिलें । कांहीं न पडतां कमी मला तुम्ही दुधपेढे चारिले । हळूच लाविला लळा गळा गोऊन मज पाचारिलें । तुजसाठीं जीव तरफडे आंगीं भूत जसें संचरलें । व्हावी संगती म्हणउन उपासी जपतप आचरलें ॥ चाल ॥ लंपट रोहिणीच्या मृगा मजकडे बगा । अर्धांगी नजर मी जसी जुगलें जुगा । कांचन मोहोराच्या ढिगा हिराच्या नगा । मर्जी पाहून धांवत येतें लगबगा । तुमचे वर्ता जिवलगा हेत अवघा । मजविसी नका करूं कंटाळा वावगा ॥ चाल ॥ म्हणवितें दासी अंकित निद्रा धामीची । वाटते हौस कामज्वर संग्रामींची । ध्यानांत असूं द्या खुण अंतरयामींची ॥ चाल ॥ तुमची माझी ही पडली गांठी । मांडा चौपट खेळूं सोंगटी । सत्येनें करीं धरितें मनगटीं । निजतें येकांता मध्यें नागटी । जातो दुसमान दिवस पळघटी । होते या शरीराची आगटी । वियोगें रत संपुटीं । न लागे गोड साकरपुरी ।

धरणीं ठाव देईना पुढें गत न दिसे बरी ॥ प्राणसख्या ॥ ३ ॥ नको लांबणीवर घालूं उगवला दिवस जातो राहीना । या मनुष्यजन्मींचा भरंवसा कोणाला येईना । पिंजऱ्यामध्यें कोकिळा जसी गती अन्नपाणी खाईना । वर आकाश फाटलें दुःखाचे डोंगर मज साहीना । शक संवत्सर जाती एक एक सय माझी होईना । काळीज तीळ तीळ झडे मजकडे कां निश्चळ पाहाना ॥ चाल ॥ रतिसंग होता तुझ्या भोगिल्या मजा । सबळ तप साखरीं कैलासीं लाविल्या ध्वजा । कांहीं तरी अंतरींच्या बीजा । असें उमजा । शिव त्रिगुण ध्याना अध्ययनें केली पूजा । सुकुमार हृदयीं काळीजा नको रे हो दुजा । कुठवर सांगूं अंतरींच्या गुजा ॥ चाल ॥ चांगल्या पदार्थाला कां हो विसरलां । भाळला कोणत्या भलत्या हलगरजीला । म्यां तुम्हांसाठीं अवघा लौकिक वर्जिला ॥ चाल ॥ ज्याला घातलें पाठीशीं । जावें मग कां त्याच्या वाटेसी । परक्यापरी जाऊन गांठीसी । माझा मजला प्रियकर वाटसी । नसतां आज पाय कसा आटीसी । नानापरीचे थाट असे घाटिसी । धरून पोटाशीं तिला ठेविला हात नारीच्या शिरीं । होनाजी बाळा म्हणे असी प्रीति कां नाहीं दुसरी ॥ प्राणसख्या ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ७५ ॥

चाल—अर्ज विनंती ऐका लोभ हा साळु सासऱ्याला जाते ॥ – सगन.

सहज मनामधें आलें साजणी कधीं स्वामीचा येकान्त घडे । तों जासूद येऊन सांगितलें मुकाम गंगे अलीकडे ॥ ध्रु० ॥ मुखीं सांगतां नये हर्ष जाला माझ्या मनामधीं । द्या मंडप आंगणांत उभवा गुढीया तोरणें त्वरीत आधीं । दिवस उल्हास साजणी लक्ष लागलें स्वामीपदीं । करा घरीं ब्राह्मण संतर्पण भोजन घालून यथाविधि । मोहोर मोहोर एक एक दक्षणा द्यावी द्विजाच्या हातामधीं । दर कुच चालून येतील वाटे

येण्याची अवधी थोडी । ठेवा सत्वर हें आपलें मंदीर शृंगारुन चहूंकडे ॥ तों जासूद ॥ १ ॥ होतें गंगेचे पार अलीकडे स्वारी गंगेचे तीरीं । कूल शहरामध्यें ताकीद फिरवा चित्रें रेखवा घरोघरीं । असूं द्यावी तरतूद फार दीपक लावाया हारोहारीं । छतें झालरा जेथील तेथें बांधुन ठेवावया परस्परें । कारंजाचे हौद खजीने धुऊन करा निर्मळ स्वकरीं । स्वच्छ ठेवा बागेंतील बंगले आधीं जाऊन बागेभीतरीं । विलासस्थानें सजवा अवघे न्यून ज्यांत किंचित् न पडे ॥ तों जासूद ॥ २ ॥ अनुष्ठानीं ब्राह्मण मंडळी बैसविली ज्या ज्या ठाईं । भोजन विडे दक्षणा देउनिया तृप्त करा त्या त्या ठाईं । जिनसखान्या मधीं सुगंधिक जिनसांनीं भरवा कांहीं । मीं सांगतें ज्या गोष्टी यामधीं आळस नका करूं सहसाही । मर्जी प्रसन्न ज्यांत तयारी तिथि पाहून या लवलाही । जीवीं होतील संतोष साजणी घरीं येतांच गुणग्राही । पदार्थमात्र स्वयुक्त उभी राहीन कर जोडुन त्याजपुढें ॥ तों जासूद ॥ ३ ॥ असी सखयेशीं सांगत होतें स्वांतरांतील सुखोत्पत्ती । तों उभी दुसरी जासूद जोडी दरवाज्यामधीं सहज गती । वर्तमान तें ऐकावयासी सखी उताविळ बहुत चित्तीं । मुकाम आजचा नदीपलीकडे शहराबाहेर यथास्थिति । सुमुहूर्त आहे उद्यांचा येतील सदनीं सत्वर ते भूपती । नरनारी उल्हासयुक्त शहरांत आनंदें अतीप्रीती । कारखाने सुरू झाले चहूंकडे त्रिकाळ नौबतखाना झडे ॥ तों जासूद ॥ ४ ॥ संपतांच तो दिवस तयारी स्वारीची दुसरे दिवशीं । सुटल्या तोफा एक कडका घुमें न कळे दिवसनिशीं । आले शहरामध्यें सायंकाळी रोषनाई पाहून सरसी । सखी जीवी संतोष सखीची चतुराई पाहुन ऐसी । पोंहचतांच सदनांत वाढिलीं पात्रें अमृततुल्यें जशीं । सखा भोजनीं तृप्त होउनी सखी भोगली आदरली दिवसनिशीं । होनाजी बाळा म्हणे सख्याला दे सखये गोविंदविडे । काशीनाथ श्रीमंत पदासी गाई करून रुचीकर छंदडे ॥ तों जासूद ॥ ५ ॥

## ॥ लावणी ॥ ७६ ॥

चाल— हीरेखाण दीनमान तेज भाळीं ॥— सगन.

सुरतपाक देखणा पुरुष ऐसा। अमृतकर नभींमंडळांत जैसा ॥ ध्रु० ॥ बत्तीस लक्षणी गुण सगुणरासी। कोठून मुशाफर आले पुसा त्यासीं। स्वरूपवान लावण्यराज बनसी। सडपातळ आकृती लहान खासी। गौरवर्ण कोमळ अंग सुखवासी। पंचप्राण लुब्धले सख्यापासीं ॥ चाल ॥ बाई छेल छेबीला लेप चित्रीचा। मुखीं विडा रंगिला खास पत्रीचा। राहणार कोणते पुण्यक्षेत्रींचा। कंठी कंठस्थळीं तेज लईसा ॥ अमृतकर ॥ १ ॥ शामकर्ण वारू समजऊन प्यारा। जीन शोभतो वर भरगच्ची सारा। सडकेला कलगीवर जडल्या तारा। शूर शिपाई लक्षांमधीं मोहोरा। करून पांच पोशाक मारी लहरा। चमकावीत चालिला जसा वारा ॥ चाल ॥ पोषाक केसरी जरि चमके गोल। मुक्त तुरा पदकीं रत्न असे अनिमोल। राजेंद्र भूपती शान सर्वांवर डोल। कळावंत गौसेल मला कैसा ॥ अमृतकर ॥ २ ॥ स्वरूप तयाचें पाहतां सईबाई। मदनबाण चेतला करूं काई। तगमग तलकी शरीराची लाई। जसी सुकली पाण्याविण जुई जाई। जा सत्वर समजावा गुणग्राही। प्राण आतां जातो वांचत नाहीं ॥ चाल ॥ मज चैन पडेना छंद हृदयीं फार। घाबरलें सख्या रे द्या मला आंगार। जीवदान आतां द्या भेटवा सरदार। करा युक्त कांहीं रोकड खर्चुन पैसा ॥ अमृतकर ॥ ३ ॥ सख्या त्वरित ऐकून गेल्या महालांत। छेल छबेला आणिला महालांत। हर्षली कामिनी उल्हासली चित्तांत। शेज करूनी पुष्पाची खुष वक्तांत। चारी प्रहर भोगिला आनंदांत। अरुण उदय जाहला सरली रात ॥ चाल ॥ ती चपला गुजरी तोषिली सकुमार। म्हणे प्राणप्रियकरा अर्ज वारंवार। करित कीं येव्हां प्रीत ममता फार। होनाजी बाळा करी छंद खास। स्वस्थपणें ऐका क्षणभर पैसा ॥ अमृतकर ॥ ४ ॥

...ग्रंथालय, ठाणे. स्वीकृत. अनुक्रम ३५६९० क्रमांक ... वि. काव्य ... नों. दि. ९/१२/६०

## ॥ लावणी ॥ ७७ ॥

चाल—ऋतु चौथा गे बाई । तारुण्य रुपासी काय करूं ॥

— सगन.

लावण्य गुणाची खाणी । पती मज दावा गे बाई ॥ ध्रु० ॥ त्याविण मजला चैन पडेना । आहेत कोणते ठाई गुणग्राही ॥ लावण्य ॥ १ ॥ तारुण्यपण हें गेल्यावरतें । येऊन करितो कांहीं गे या ठाईं ॥ लावण्य ॥२॥ लाला कधीं महालामध्यें पाहीन । नाहीं सुचत मज कांहीं गे या ठाईं ॥ लावण्य ॥ ३ ॥ होनाजी बाळा म्हणे जिव्हाळा । काशी म्हणे आला पाही गे गुणग्राही ॥ लावण्य ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ७८ ॥

चाल— मायबापाचा लौकिक राहील असें कांहीं साधन करा ॥

— सगन.

औरनसे तुम प्रीत लगाके हामे सताना मीया । आवडलें तुम्हां सख्या स्वामीया ॥ ध्रु० ॥ येकेते दीन चलता आव नजरोंसे देखतेव सई । निजत जा खुशाल आपले गृहीं । बिगर पुछे जोशोत हमारी दर्द तुने-कुच नहीं । पुढें भरंवसा मला सर्वही । तुम सारा दिन खुशाल फिरत्यो मैं तो दीवानी भई । तुमी तर लंपट परके गृहीं । मैस पडी हो गरीब कर हाकनाक सताना मिया ॥ आवडलें ॥ १ ॥ हेबी कहेगे बस्त हमारे है सीरपे दो दीन । असेंच मन आपलें समजावीन । येक छोड दो सोते पास अब क्या अडता कोईबीना । मीच चालवितें आपल्याकुन । भला मेरे सौकनकु मारतीव सौजुतीया गीन गीन । सख्या मग तुम्हांस वाटेल सीण । कपट गुणे बेगुन हमे बैताग च्युपी क्यैंदीया ॥ आवडलें ॥ २ ॥ च्यारु तरफसे किया खराबा हो रही सबसे बुरी । सत्वर हे कुठवर पाहतां तरी । इस घरकी ना उस घरकी बदलाम दो जगठरी । असे रे काय संकट

पडलें सिरीं । मुजे नहीं सूजता अब इस वक्त निकालो छुरी । करा वध माझा आपुले करीं । गीरगदारीमें कहो तुमारा कुच पल्लोका लिया ॥ आवडलें ॥ ३ ॥ अवल दियेथे कवल करार सोकुच हो गये झुटे । सख्या रे मग तुम्ही मजवरते खट्टे । समजे बैमानी अबी क्यौं तुम हमपर रुठे । कसें सागरास सरिता सुटे । जबलग था इस बाहर ज्वानीका तबलग हमसे मीठे । आतां धड मासीं बोलता कोठें । होनाजी बाळ कहे दीवानीये अपअपना हीया ॥ आवडलें ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ७९ ॥

चाल—नाजुक माझें अंग नवी नवती आली चांगुलपणा ॥ —सगन.

आधींच छबेली सुरत त्याजवर तुमची चंचलवृत्ती । सवतीच्या दृष्टी लागती ॥ ध्रु० ॥ नाजुक बांधा सडक आकृति ठेंगणी गोजिरी । कंगणी-दार पगडी शिरीं । कंठीदार अंगरखा दुपेटा भरनक्षी भरजरी । मस्तकीं गंध केशरी । सुवर्ण तोडे सुबक हिऱ्याच्या मुद्या चमकती करीं । खुब डौल दिसे अंबरीं । गळ्यांत कंठीं कानीं भीकबाळी शोभती ॥ सवतीच्या ॥ १ ॥ बहुत बोबडे बोल गोड वाटती मधुरभाषणी । म्हणउन दृष्टी लागती झणीं । गोपी घरोघरीं जसा श्रीहरी गोकुळ वृंदावनीं । वर्ततात तसी या जनीं । अमुक ठिकाणीं वनिता सुंदर श्रवणीं ऐकल्या ध्वनी । तुम्ही जातां तेथें त्या क्षणीं । परस्परें हें वर्तमान अन्यत्र स्त्रिया सांगती ॥ सवतीच्या ॥ २ ॥ बाहेरून कधीं याल घरीं मी चिंताक्रांत मानसीं । या काळजींत दिननिशीं । झुरझुरूं पांजर झालें शरीरीं आतां करुं गत कशी । जिवलगा मी तुमचेविशीं । विषईं तुम्ही अतृप्त वर्तणूक मला समज असी । दुःख सांगुं हें कोणापाशीं । याच संकटामुळें जिवलगा देह माझा करवती ॥ सवतीच्या ॥ ३ ॥ किती उतराव्या दृष्टी हस्त सिणले माझे प्रियकरा । कांहीं अजुन समज मनीं धरा । गळां पडून या सवती

तुम्हां फसऊन नेती मंदिरा । विश्रांती न देती जरा । वारंवार मागणें हेंच मज कमळिणीच्या मधुकरा । जाऊं नका परके घरा । होनाजी बाळा म्हणे वर्तणुक करूं सांगितल्या रीति हेची । काशीरामा चिंतीं ॥ सवतीच्या ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ८० ॥

चाल—याची माझी प्रीत कधीं जडल जडल ॥ — सगन.

तुझी माझी प्रीत येकदा कधीं । घडल घडल घडल ॥ध्रु०॥ भरनवती आगरास । भोगायास न्या घरास । पाणी विषय सागरास । चढल चढल चढल ॥ तुझी ॥ १ ॥ कुचकंचुकीत तटतटीत । मद अंतरीं धडधडीत । जसे नवनीत कडकडीत । कढल कढल कढल ॥ तुझी ॥ २ ॥ या गोष्टी अवघडा । जाल्यावर सावघडा । नांवाचा चौघडा । झडल झडल झडल ॥ तुझी ॥ ३ ॥ होनाजी बाळा मथन । करितां होय विरहपतन । अहेरणी मधीं उंच रतन । जडल जडल जडल ॥ तुझी ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ८१ ॥

चाल— नांव तुझें साळू चल आज खेळूं उभी द्वारीं नार ॥
— सगन.

नको दूर देशीं जाऊं साजणा । हुरहुर करतो माझा जीव । न ये जरा भर तुजला कींव ॥ध्रु०॥ येकसारिखा जोडा पाहुनी दिलें माझ्या मायबापांनीं । पूर्वीचा दाणापाणी । विपुल मनस्वी दौलत पुष्कळ घरीं असतां दोघे प्राणी । वर्तत असों आनंदानीं । तुम्ही तरी धरली उमेद म्हणतां जाऊं निघून हिंदुस्थानीं । अंतर देउनी निधानीं । नुक्तेंच आलें न्हाण लहान कीं चौ डोळ्यांची मुखतठेव । परोपकारी दह झिजीव ॥ नको ॥१॥ समक्ष तुमच्या बसून तुम्हाशीं नाहीं आजवर भाषण केलें । लाजण्यामधीं दिवस गेले । मर्जि मिळाली असतां अलीकडे तुम्ही जातां टाकून वहिलें । कर्म

पुढें आडवें ठेलें । काळीज नाहीं ठिकाणीं वाटतें असून जिवंतच मी मेलें । डोंगर दुःखाचे उदेले । पदरीं पडलें पवित्र जाहलें । आतां मला तूं सुख दाखीव । शेत वतनदारीचें पिकीव ॥ नको ॥ २ ॥ हीच वासना मनांत लौकर या पणांत मज मूल व्हावें । दृष्टी भरून त्याला पाहावें । संयोग असतां वियोग व्हावा असें कदापी नसावें । मग दैवावर रुसावें । पुसूं नये कोणाशीं एकले उठून अरण्यामधीं जावें । हा यांतील प्रादुर्भाव । तुला सांगतां दमलें श्रमलें सर्व मनांतील शोक मिटीव ॥ नको ॥ ३ ॥ चार मास छावण्या धन्याची मुकामीहून पत्रें आलीं । मुलुकगिरी तहकूब जाली । पती राहिले घरीं तिणें ही परस्परें ऐकोनी बोली । नार मनामधीं आनंदली । बहु प्रीतीनें हात सख्याचा धरून येकांतामधीं गेली । पलंगावर दोघें बसलीं । होनाजी बाळा म्हणे साजणी जा लौकर रंग-महाल सजीव । मग चोपाळा सुखें हालीव ॥ नको ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ८२ ॥

चाल—सत्तेपुढें शहाणपण माझें कांहीं चालेना ॥

— सगन.

वरकांतीचा लोभ दाउनी लाविलीस माया मज व्यर्थ झुराया ॥ ध्रु० ॥ अनयासें सायास न करितां तुझी संगत घडली । ती बहुत आवडली । पाहुनी बरवी रीत दिसोदिस प्रीत अधिक चढली । विषईं भुल पडली । कोण दोष पाहुन कशाहुन क्रोध दृष्टी चढली । कां मर्जि बिघडली । राजी असो सर्वस्वीं तुजसाठीं दौलत हराया हें मागें फिराया ॥ वरकांतीचा ॥ १ ॥ येक निश्चय समागमें तुमच्या वर्तत असतां धरून नीट रस्ता । तुमचे मनीं कपटाई म्हणोन तीनदां मजवर रुसतां । जाऊन घरीं बसतां । निःकारणीं विषामृतांत घालुन अंतरीं हंसतां बरे नट दिसतां । असें कपट आहे जेथें तेथें मग झिजउनिया वायां ही आपुली काया ॥ वरकांतीचा

॥ २ ॥ कसुन पाहिलें तुला तूं आमचा नीट शेवट करिशी न करिशी। नको आणूं मनीं द्वैत सत्य सत्यार्थ जीवी परसी। किंवा गोष्ट ही सरसी। अमर्यादेचा वायु लागतां अगदींच अंतरशी। सुखें मग फिरसी। विश्वेश्वर-दर्शना जाऊन काशीस्नान कराया हें पाप हराया ॥ वरकांतीचा ॥ ३ ॥ मजकडोन यत्किंचित् अंतर कांहीं पडत नाहीं। आजवर पाही। पुढें तरी मी स्नेहसंबंधावरून लवलाही। देईन जीव पाही। खातरजमा असो द्यावी मनीं संशय न धरुनी कांहीं। स्वतः जीवें जाईं। होनाजी बाळा म्हणे शेवटील हा अकबर पाया काशी म्हणे उभया ॥ वरकांतीचा ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ८३ ॥

चाल—चंद्राचें चांदणें सीतळ कीं उष्ण प्राणपती ॥ — सगन.

नाजुक रुपडें बंद मुखोटा नवतीची लाली। पदरांतून वर नजर पाहतीस सात्विकपणें खालीं ॥ ध्रु० ॥ मागें बुचडा अरळ झोक माथ्यावर पदराचा। चार अंगुल्या सरस लपविला चंद्र तारकेचा। भवयाकपानामधीं बहार कुंकवाचे टिकलीचा। अती चंचल घातला डौल वर सात्विक-पणाचा। ठक धनुष्य तुज करीं गवसेना गवस तुझा साचा लाउन इष्कीचा। तीर फोडला पडदा अंतरिंचा ॥ चाल ॥ गरतीचा अवघा साज करुनिया। आज घटा गटून। केवळ सात्विक होउन मनीं मोहून घेतीस लुटून। लवलवा हालतें तुझें अंग असे गुण सांग शिकलीस कोठून। बरीच चालसील नटून थटून। कर्णीची सीमा जाहली ॥ पदरांतून ॥ १ ॥ साधी नथ नासाग्रीं शोभली बरी साध्या वसनें। पाहून समयोचित तुझें ग नारी मंद मंद हांसणें। न ढळे पाईंची दृष्टी सौम्य लक्षणें मुळापसणें। चौकी करून मांड्यांची मिजाजींत बौद्धरूपें बसणें। लुब्ध सख्ये मन भ्रमर जळज वर्णी तुझी या रसनें। गौरविल्या आदरें नको देऊं प्रत्योत्तर उसणें ॥ चाल ॥ पाहिलें तुला गुणवान सकळ संज्ञानज्ञानें निपुण।

लुब्धता बघुन तव ध्यान सदनीं कोठें जाण बसतीस लपून । कोणत्या वेळीं निर्वाण पाहून संधान यावें जपून । सांग बसावें कोठें लपून छपून बांधून अक्षयीं दाली ॥ पदरांतून ॥ २ ॥ बीज तसें अंकुर भासतें गुण घेउन उठलें । सकळ रुपाचें तेज तुझ्या सखु वदनीं येकवटलें । मी पण मी उण सदापरीस नटपणांत नटलें । तुझ्या नटपणापुढें तयाचे मनीं संशय फिटले । किंचित न पडे भरम अशा वृत्तींत संधींत तटलें । उभे थव्याचे थवे तुज पाहून चांगटलें ॥ चाल ॥ अमरपुरीचा समुदाय तुझा नारी भाव दिसला तसा । साधून पाहतां अवघा भावजये निके वाटे असा । फेडून चिंताघाव बसविसी अव न कळे कसा । नाहीं असा भरंवसा रसा येसी हृदयीं बाहाली ॥ पदरांतून ॥ ३ ॥ येवढी चाटक असुन राखिलें त्वां मज वजना आपुल्या । तुळतील तव स्वरूपांत पाहून तुज अशा स्त्रिया दिपल्या । आधीं विषयवासना ज्याच्या आंगीं सकळ विपल्या । मनशांतीच्या बळें कल्पना दुरोक्तीच्या लपल्या । त्या पश्चात्तापें मग होती विरक्ती तपतपल्या । तसेच तव सद्‌गुणें पाहून हृदयीं दुर्बुद्धी समूळ लपल्या ॥ चाल ॥ निर्मळ गंगेचें नीर तुझें मन स्थीर दिसलें तसें । मध्यम मंजुळ समीर वाटतें क्षीर प्रियकर असें । तद्वत तव देखत धीर बहुत गंभीर तूं स्नेहें रसें । होनाजी बाळा म्हणे असे तुज पाहून वृत्ती बावली ॥ पदरांतून ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ८४ ॥

चाल—सवती-सवतीचा काजिया लाऊन तुम्ही देतां ॥

— सगन.

राजमंदिरीं आपण उभयतां आज बसलों तिसरे ताली । माझ्या गळ्याची आण उद्यां सखु सांग कोणाची आहे पाळी ॥ ध्रु० ॥ गर्जेपुरतें गोड बोलणें वरकांतीची मी जाया । निकरट मनची गैरइमानी नाहीं तुम्हां

तिळभर माया । हेत प्रीतीच्या लई ममतेच्या आज अंतरल्या पतीराया । केवढा झाला घात सुटली तोफ येऊन फसला वायां । उंच किंमतीचीं नूतन वस्त्रें नित्य मिळती पांघराया । जुनें दिलें टाकून अडल्या वेळेस येईल भोगाया ॥ चाल ॥ एक एक कंठिती आज वर्षाची घडी जी । पसरितें पदर घ्या वरकांतीची त्रिडी जी । किति प्रहर चंद्र आला पाहा उघडुन कडी । फार जहाली तांतडी सुटेना तोफ पहाटेची आग जाळी ॥ माझ्या ॥ १ ॥ कपटपणें बोलतीस खोचुन बळें करून चतुराई बरी । तुझा संग न घडल्यावर काय परस्थळीं धरलीस पदरीं । वचन झालें येकदां साजणी तुजविरहित पाहणें दुसरी । दिलें बेलभंडार उचलुन प्रथमारंभीं तुझ्या करीं । किति शब्दांचे बाण मारशील हंसुन कसुन हृदयांतरीं । घरची स्त्री आणीक तूं दोघी जाउन दावी मज तिसरी ॥ चाल ॥ लक्षण तुझें मज ठाऊक पहिल्यापासून जी । घरीं आल्या येकांतीं वृथा बसावें रुसून जी । विश्वास मनामधीं वारंवार पाहावें कसून जी । पाहा पुरतेपणीं नीसून । कसून तूं आमची प्रियकर बाळी ॥ माझ्या ॥ २ ॥ करुण आकरीतें पण बरें उत्तराशीं प्रीती उत्तर देतां । खोटें तुमचें मीच जाणतां गोष्ट मारुन नेतां । माझे घरासी वेळीं अवेळीं तुम्ही कार्याकारण येतां । कुठें बैसलीस काय करीती निमित्यास पाळत घेतां । मी वचनाची खंबीर तुम्ही अमृत टाकुन कां हो देतां । तरीच बगीन होईन चाकरीस धरीन एकदां परशेतां ॥ चाल ॥ सात्विकपणा तुमचे एक ठिकाणीं नसे जी । भ्रांतीस्तव सदां कोणाचें लागलें पिसें जी । निर्बळ किती उलगडेच आपोआप दिसे जी । पदर मुखाशीं लाउन तुम्ही निजतां पलंगीं रात्रौ काळीं ॥ माझ्या ॥ ३ ॥ चार प्रहर धंद्याउदिमामधीं निमग्न आमचा हेत जडे । या भ्रांतीं प्रियकर साजणी कोण्या त्रासती तुझे वेडे । असें असतां प्रियकरा तुजला आणखीच पडतें सांकडें । नको अबोला धरूं मनामधीं शोध करून मग बोलूं गड्ये । वर्ततसे संसारीं परंतु चितमन अवघें

तुझ्याकडे । तूं परपेठ आम्ही आप सदनीं असें सांगणें रुजूं पडे ॥ चाल ॥ स्वपरियावरून असे काळजी सुंदरी जी । नित रोज आम्ही येऊं तुझे राजमंदिरीं जी । कर प्रीत सल्ये दे वार्ता नको अंतरीं जी । होनाजी बाळा करी शाहिरी रामा अंदु ब्रीद पाळी ॥ माझ्या ॥ ४ ॥

## ॥ लावणी ८५ ॥

चाल—पडलं शुभ्र चांदणं काय मी करूं ॥

— सगन.

आज कां गे काग बोलतो घरावरी । हाचि शकुन साच पती येत असे घरीं ॥ ध्रु० ॥ शुभ चिन्हें आज होतीं चांगलीं वळचणीस पाल बरी बोलुं लागली । प्राणपती भेटतील आस लागली । बाही स्फुरे नेत्र लवे हर्ष अंतरीं ॥ आज ॥ १ ॥ नटती आपणासमीप छबेली नार की । जाई जुई मोतीया फुलांचे हार की । मंदिरांत सेज करीन सौख्य सारखी । उभयतां विलास करूं राजमंदिरीं ॥ आज ॥ २ ॥ ऋतु चवथा दिवस मला आज साजणी । गांजियलें बहुत मला विषय दुर्जने । अंतरांत दुखी असोनी वागते जनीं । अशा समईं भेटतील हे मदुभरी ॥ आज ॥ ३ ॥ अकस्मात घरीं आले कांत त्या क्षणीं । मंदिरांत भोगिली नार बत्तीसलक्षणी । होनाजी बाळा कवी देश दक्षणी । गाई काशीनाथ छंद छंदशेखरीं ॥ आज ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ८६ ॥

चाल—नवी नूतन आलें न्हाण ठेंगणी नार तेलंगी ॥

— सगन.

सोडून संसारास दास मी पायाची जाहलें । आतां उपेक्षूं नका तुम्हांविण न चाले ॥ ध्रु० ॥ कृपावंत कोवळें हृदई मन पाहून प्रीत केली । नाहीं लालूच द्रव्याची दर्शनाची मी भुकेली । स्मरण करा काय काय केली पूर्वीची बोली । त्याच रीती जगवावें शरीर हें ममतेच्या खालीं ।

प्रीतीनें आवडतें तुम्हांला मी लवंग ओली । दूर भिरकाऊं नका सोबतीण जन्माची झाली ।। चाल ।। त्यागितां कां मला वाहिला प्राण पायावरी । पाहून सगुण आपले पायीं चालून येतें घरीं । प्रतिपाळ करावा आतां पोरटा लेकराचे परी । जन्मांतरींचें धन्य धन्य प्रालब्धाचे ताले ।। आतां ।। १ ।। संबंध घडल्यावरी व्यर्थ जाईल रागे भरणें । निश्चय माझा खरा मला तरी तुजपाईं मरणें । न ये तुम्हांला राग ज्यामधीं तीच गोष्ट करणें । प्राप्त जालें मला जन्म तो तुजमागें फिरणें । बालमित्र भोगितां फाकलीं प्रीतीचीं किरणें । हें स्थळ सोडुनी नाहीं कोणाचे पाय आतां धरणें ।। चाल ।। घालितें हातावर पाणी उभी राहून गंगेतीरीं । नाहीं हो मागें सरणार संकटीं प्राण गेला तरी । धनद्रव्य असो कीं नसो तुम्हांला वश झालें खरी । शोध करा अंतरीं मजविसी मन कां हो भ्यालें ।। आतां ।। २ ।। कोण सांभाळील मला तुम्हांविण काय वाट माझी । नित्य भोगीत जा मला मी तुमच्या परसांतील भाजी । द्रव्यावरतीं सर्व लोक करतील हांजी हांजी । ते नलगे हो मला रिकामी मीच जाहलें राजी । नसतां परिचय कधीं मी केला स्नेह सहजासहजीं । गोड किती तरी पाहा जसी मैद्याची करंजी ।। चाल ।। लागलें व्यसन प्रीतीचें सुटेना गांठ पडली कसी । पहिल्यानें गोड वाटलें आतां कां दूर धरितां मशीं । संकल्प हाची शेवट होऊं द्या मृत्यु पायापासीं । यासाठीं दिननिशीं वाटतें निरशन व्रत केलें ।। आतां ।। ३ ।। तुम्ही शोभला म्हणोन मी रडतें येवढें धाईं धाईं । खचींत समजलें आतां तुम्हांविरहित कोणी नाहीं । निजलें तुमचेपाशीं नका करूं माझी दुष्टाई । काय असेल योजिलें करून घ्या त्याची भरपाई । जिवें मारिलें तरी लक्ष माझें तुमचे ठाईं । जशी राधा तप करूनिया मिळाली श्रीहरींचे पाईं ।। चाल ।। जाऊं द्या दिगंतरीं कीर्त प्रीतीच्या सांगतां भागलें । मी शरण आल्याचें स्मरण असूं द्या आठवण मागलें । धरूं नये द्वैतभाव हा उभयतां हेंच भाग्य चांगलें ।

होनाजी बाळा म्हणे लागले प्रीतीचे भाले। निश्चय पाहून तुझा सुंदरी मन आमचें धालें ॥ आतां ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ८७ ॥

चाल—सोळा-सतरामधीं वय जातिवंताची प्रसवली ॥ – सगन.

सवतीसवतीचा कज्या लाउनी सख्या चौथे खणांत। लाउन मुखाशीं पदर सदर किती हंसाल मनचे मनांत ॥ ध्रु० ॥ सेवेशीं उभ्या आम्ही दासी सदा सर्वदां पदांकित असून। वर्जुनिया आमची विडी तुम्ही घडोघडीं राव बसतां रुसून। घाबऱ्या होउन या मनीं करून। विनवणी आधीं घेतों पुसून। येकीशीं होतां सुरतसंग ऐसा प्रसंग आला दिसून। तरी आनंदांत आम्ही सर्व गर्व यत्किंचित् हृदयीं नसून। रंगमहालीं आनंदाखालीं भोगितों स्वामीस चित्तापासून ॥ चाल ॥ येकीचे हातीं पीकपात्र येक द्वारांत पद्मिनीपरी। नाना नक्षीचे विडे घेउनिया पुढें आपआपले करीं। मुखीं घालावयासी सिद्ध होउनिया प्रसिद्ध सदनांतरीं ॥ चाल ॥ येक उभी करून शृंगार। येक घेउनी फुलांचे हार। येक उभी धरुनिया द्वार। हा इष्काचा परिवार। असे भलत्या मिसें रुसतां कसे। सख्या मी तुमचे पदरीं अनाथ ॥ सवती ॥ १ ॥ भांडणें भांडवितां बेरं परोपरी पशु नराचे किती। गज तुरंगजेठीं लव्हे लालभांडावे आवड ही चित्तीं। भारतामाजी हें कथन तेथें पाहा समुद्रमंथन स्थिती। तद्वत गुणीजन बोधुन पृथ्वी शोधुन आणिली ते रीती। हें योग्य नृपास चरित्र विचित्र मुळींहुन प्रभुच्या रीती। म्हणऊन अहो घरनायका बायका अतिप्रीती विनविती ॥ चाल ॥ सवतीसवतीचा मत्सर दुरधर प्राणविसाऱ्या असे। तुम्ही आम्हांलागीं प्रियकरा सदनीं पाळावें पाळिले तसे। निष्कपट तुम्ही हृदयांत कपट पाहतां यत्किंचित नसे ॥ चाल ॥ अर्धी वेडी स्त्रियाची जात। तुम्ही विनोद करितां त्यांत। मग वाढे तयाची ख्यात। हे राजविलासची आतां आम्ही माहीत नसो। पदरीं पडल्याची लाज

करावी आज प्रभुनीं मनांत ।। सवती ।। २ ।। मुळीं ऐश्वर्याची खाण मुख्य तुम्ही निधान आमचे पती । तुम्हो अमृतकर नभीं शुद्ध आम्ही नक्षत्रें प्रभुभोंवतीं । तुम्ही कल्पवृक्ष प्रत्यक्ष दुर्बळ आम्ही छायेखालतीं । नानापरी राजविलास भोगिती स्वामी तव संगतीं । गौरव भाषण अमृता-परीस श्रवणास मधुर भासती । धनकुंभ लाभला असें वाटतें आम्हां दरिद्र्याप्रती ।। चाल ।। नसे कोण्या गोष्टीचें न्यून स्वामीचें पुण्य सबळ पालवी । तव चरणप्रतापा बळें लोटितों काळ अशा वैभवीं । अंतःकर्णा-पासून सख्या आम्ही सेवेच्या लाघवी ।। चाल ।। आम्ही पदोपदीं महाराज । अन्याई गरीबा नवाज । चालवा स्नेहाची लाज । मागणें हें स्वामीराज । तुम्हांला हेंच असे । आम्ही वेड्या किंवा शहाण्या ओळखा पुरतेपणीं लक्षणांत ।। सवती ।।३।। एकीला धरून जांगासी एक आंगासी धरितां तुम्ही । उरूबुरू स्वामींच्या समक्ष मनचे मनीं कुरबुरतों आम्ही। वाढावी म्हणउन एकीला अधिक एकीला कमी । सारांश भांडणें तुम्हां आवडती हें मुख्य धरिलें मनीं । न आवडे गोष्ट दुजी कांहीं आम्हीं तव सेवेच्या भ्रमी । स्वानंद सुखें वर्ततों स्वामीनें ते नेमिल्या आश्रमीं ।। चाल ।। क्रोधाची दृष्टी नसावी असावी सदा सर्वदा कृपा । अव्हेर समर्थीं करूं नये आधीं अंगिकारिल्यावर नृपा । तव संग पाहुनी रमलों न कळे किती दमलों पूर्वींच्या तपा ।। चाल ।। वाटतें आम्ही दैववान् । तुम्ही तव सर्वज्ञ सुजाण । लाधलां आम्हांसी निधान । होनाजी बाळा म्हणे करा संकल्प तुम्ही भाउ त्रिंबक गातो प्रसंगीं । नंगी तलवार चमकली रणांत ।। सवतो ।। ४ ।।

## ।। लावणी ।। ८८ ।।

चाल—रूप स्वरूप तुझें पाहून उभी राहून गर्क होऊन टकमक ।। – सगन.

तूं पाक सुरत कामिना । कीं दाही बोटीं मीना । हातामध्यें वीणा । घेऊन गाती । तुला गुणीजन अवघे चहाती ।। ध्रु० ।। नारी तुझी गजाची

॥ चाल ॥ भांगीं गुलाल । मुलायस गाल । नवी नवती तूं सख्ये चंद्रकळा सवती । इंद्राघरींची पुतळी । आली ग भूतळीं । चतुर मंडळी तुझ्या भोंवतीं । गायनामध्यें गुणीजन स्तविती । ठेंगणी आकृती सकुमार । काल जाणार । तीर नेत्राचे नार ओवती । कितीक दर्शनेंच नाणवती । कंबर बारीकशी बुंद मनामधीं कुंद । मिजाजींत धुंद । रुंद छाती ॥ तुला ॥ १ ॥ नाकीं नथनी सर्जेदार । दिसे बेबहार । आंगावर जोहार फार खुलले । वनीं जणुं पळसतरूं फुलले । नाजुक कमळाचा देंठ । करांगळ्या पेठ । दंत दाळिंब थेट उठले । गुणावर जन अवघे भुलले । गाण्यांत कुशल सर्वदा । हंसतमुख सदां पाहून तुझी आदा । भुलुन झुकले । सुगर जन नाग होऊन डुल्ले । म्हणे होनाजी बाळा गड्ये अहो । फांकडे तुझी चहुंकडे । गुणाची ख्याती ॥ तुला ॥ २ ॥

## ॥ लावणी ॥ ८९ ॥

चाल—धुंद तुम्ही विषयांत चांगली कळ माझे पाठीस ॥ —सगन.

दिवस पांचवा मला चेतला विषयानळ अंतरीं । काय करूं सखा नाहीं घरीं ॥ धु० ॥ आम्ही स्त्रिया पापिष्ट दोष पुरता आमचे संचितीं । हें आतां समजलें चित्तीं । कसें पराधीन जिणें ईश्वरा केलें दुसऱ्या हातीं । ही कसी दैवाची गती । अहोरात्रीं मज झोंप येईना सखे बाई मजप्रती । जागावें नित्य म्यां किती ॥ चाल ॥ असे दिवस कंठितें । रात्र वैऱ्यावीण लोटितें । याच्या दुःखानें मरण वाटतें । झुरतें पक्ष्यापरी ॥ काय करूं ॥ १ ॥ पुरुषाला मोकळे मार्ग बाहेर गोष्टी संधीसी । काय स्त्री जात ही व्यर्थसी । वियोगामुळें नळाविण ती दमयंती जसी । बाई मी ग अडलें तशी । या दुःखाचें दर्द सांगतां न ये लोकापाशीं । मज लाज वाटती अशी ॥ चाल ॥ किती जिवा धीर देऊं । आतां तरी शरण कोणाशीं जाऊं । गरीब केवळ जैसी माऊ । जहर खाऊं द्या तरी ॥ काय करूं ॥ २ ॥ परदुःखाचे जाण

कोणा न ठावें दुसऱ्या जनीं । ज्याचें त्यास ठावें मनीं । दावेदार हा मदन शरीरामध्यें करितो जाचणी । असी काय मी याची ऋणी । जितेच नेऊन मला अग्न द्या सत्वर धांवा कोणी । मग निसुर पुरतेपणीं ॥ चाल ॥ डोम हृदयीं पेटला । विषयतक्षकें डंशिलें मला । एवढा कां ईश्वर क्षोभला । कहर गुजरला शिरीं ॥ काय करूं ॥ ३ ॥ सुखसंपत्तीचे सर्व असून जीव माझा झाला पिसा । मज वाटे आली अवदसा । कां निजला भगवान संकटीं हा पावेल कसा । कोणता घेऊं विसावा । नसतां कांहीं कारण आपुल्या अंतरेल राजसा । पाहा दैवयोग हा असा ॥ चाल ॥ उदास जाहलें चित्तीं । धरूं धीर मी यानंतर किती । कधीं आलिंगिन आपुला पती । या सुखसेजेवरी ॥ काय करूं ॥ ४ ॥ आतां रहावेना मला । सखे घड नाहीं बरा । पती येईसी योजना करा । शरीर विषयकर्वतीं कांपतें काळीज गे चरचरा । कोणी तरी सांवरून धरा । होनाजी बाळा म्हणे श्रमी नको होऊं धीर धरा जरा । येईल स्वामी आज घरा ॥ चाल ॥ सुदिन दिवस उगवला । प्रवासाहून सखा घरीं आला । त्वरें होई तो स्वस्थ भोगिला । आनंदमय मंदिरीं ॥ काय करूं ॥ ५ ॥

## ॥ लावणी ॥ ९० ॥

चाल—पती आज मंदिरीं कां येईना ॥ — सगन.

अगे बाई प्रियकर कोठें तूं सांग । विरहानळें मी व्याकुळ सवें । तप्त झालें माझें अंग ॥ ध्रु० ॥ नौती ही माझी आली भरोनी । जाती सख्याविण व्यर्थ तरुण । काय वृथा शृंगार करुनी । नका भरूं मोती भांग ॥ अगे ॥ १ ॥ शरदऋतूचे दिवस अगे गे प्राणसख्या मजपाशीं नसे गे । कोण्या गृहीं जाऊन वसे गे । लावा तयाचा थांग ॥ अगे ॥ २ ॥ शोभायमान हा दिसतो कैसा । पुण्यामधीं सुवासिक तैसा । विषयामध्यें तो गरक जैसा गे । स्वरूप तयाचें चांग ॥ अगे ॥ ३ ॥ होनाजी बाळा ते गुणराशी ।

येतील स्वामी तुझिया घराशीं । कासी म्हणे होई शांत जरासी । फेडील पांग ॥ अगे ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ९१ ॥

चाल—ये मन रंगें रंगरसें मुक्ताफळ बोलणें ॥

— सगन.

अशा कोठें असतात सख्या उभय स्नेहाच्या रीती । एक लुब्ध एक निष्ठुर चित्तीं ॥ ध्रु० ॥ मला भासली प्रीत तुझी चंद्रचकोरापरी । तिचा चंद्राची चकोर करी । मन चातक वांछितें जसा घनबिंदु अंबरीं । हेत मृगांचे नसे अंतरीं । प्रीतरसें तो पतंग जळे दीपक जोतीवरी । दीपक न जळे नसे अंतरीं ॥ चाल ॥ भ्रमर चीत कमळिणीपासीं । नसे कमळिणीचे मानसीं । ही प्रीत एकांती कशी । आजवर म्यां राखिले असे हे श्रेष्ठत्वाचे स्तुती । अजुन तरी तुज सांभाळूं किती ॥ एक ॥१॥ प्राणापुन निर्लोभपणें मी तंव चाहतें तुला । दुर्लभा पिंपळाच्या फुला । कोठें गुप्त उघडे सख्या रात्रौ करिसी दुला । दाविसी अनेक तऱ्हेच्या हुला । तव अंडज पाहा प्रीतीमुळें करुणा अग्नी वा जुळा । भक्षितां ज्वाला लुब्ध चंचळा ॥ चाल ॥ म्हणोन जपतें दिननिशीं । मी अगदींच झालें पिसी । कां द्वैतभाव मजविसी । मी अपराधी काय अशी । सांगा पुढली नीती । पाळितें आज्ञा प्रमाण भीती ॥ एक ॥ २ ॥ निद्रेमध्यें व्यापून जरा । पोहोंचुन निजल्या दुनीं । फिराया मोकळें मग पुणें जरी बसावें रुसून तरी । मजपेक्षां दशगुणें काढितां सर्व स्नेहाचीं कुणें । आज उणे न सेवेसी कुठें । किंचित पडतां उणें । जन्मुन मागें अंधाराचे पाहुणे ॥ चाल ॥ लाउन मज ममता मोहो । कां करितां परके गृहीं संग्रहो । या गोष्टींत वाढेल द्रोहो । पाहा पाहा त्या परीस लोहो । केवढी उभयतां प्रीती । शब्द जन आपल्याला ठेविती ॥ एक ॥ ३ ॥ छेलछबेला पाहून तुला ।

रिझतील रांडा भोळ्या । राहिल्या काढतील फासोळ्या । आवभाव दाऊन बळें हात घालती कौटाळ्या । नसे हीन हरळीच्या मुळ्या । सांगितलें परी न सोडसी घरोघराच्या वानोळ्या । सोडलें पाणी तीन अंजुळ्या ॥ चाल ॥ संकल्पच केला आधीं । नेमिला मृत्यु तव पदीं । मी कशी सोडतें मधीं । होनाजी बाळा म्हणे विधि जसे लिहिले संचितीं । तसा हा काळ कंठिला क्षितीं ॥ एक ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ९२ ॥

चाल—नटनाटक चेटकी हा या गोकुळांत बाई ॥

—सगन.

बरवे गुण श्रीरंगा । शिकवी यशवदाबाई । अवगुण तव पुत्राचे । नंदासी योग्य नाहीं ॥ ध्रु० ॥ आम्ही कुळीन कुळवंता । जगीं अबरुच्या गर्ती । रीतीनें वर्तत असतां । आपल्या स्वधर्मा अर्थीं । तुझी पूर्ण कृपा व्हावी । यावरून आम्हांवरतीं । मग कोण गती आमची । जरी हें नेणो कांहीं ॥ बरवे गुण ॥ १ ॥ संसार समुद्रनीरीं सांपडलों प्रालब्धीं । नीर वैरकार बरवा कंठितो मधुर शब्दीं । अवतारिला तूं मोती राहणार जो क्षीराब्धीं । वर्ततो तव छायेंत मुळीं आम्ही गरीब गाई ॥ बरवे गुण ॥ २ ॥ निर्लज्जपणाचा हाक मुकुटवरी तरी पर्या । आडवून मथुरेमधें झोंबून फेडी नीरीया । काळचिन्हें स्थिर मन रे श्रवणीं करी दिनचर्या । वस्त्र आमचें वृक्षीं हा नेदी सहसाही ॥ बरवे गुण ॥ ३ ॥ श्रीहरीचे चाळ्याचा कां तुज न कळे दीक्षा । श्रवणीं मननेया लावितां बरी शिक्षा । मग त्या मिळोनी अवघ्या तुजला येवढी भिक्षा । बोधितां नम्र युक्तीनें एक सर्वथाही ॥ बरवे गुण ॥ ४ ॥ दुष्ट धैर्य सदनीं आपल्या रक्षी या जगत्रपाळा । कंठीं अपार ज्याच्या शोभतात वनमाळा । लागेल दृष्टी याला । जनी म्हणे होनाजी बाळा । परमार्थ अर्थ अवघ्या वसतसे तुझ्या ठाईं ॥ बरवे गुण ॥ ५ ॥

## ॥ लावणी ॥ ९३ ॥

चाल—जाते ग वायां हो नार चंचल मनीं घावरी ॥ —सगन.

फार दिवस लागला छंद तुझा सखया । परंतु न पडे गांठ तुझी म्यां श्रम केले वायां ॥ ध्रु० ॥ दिनरजनीं माझीये मनीं । वेड तुझे लयसें । जसी कमळण त्या भ्रमरा आवडे जालीस मना ऐसें । अशा असतांना तुम्ही सख्या धरितां दुरदुरसें । करा शोध अंतरीं नका करूं मन हें निष्ठुरसें । नाहीं पाहिलें तुला तरी जीव माझा तरसे । चैन पडेना मला तुम्हांविण करूं आतां कैसें ॥ चाल ॥ सर्व सुखाचें सार जिवलगा मी तुमचे पाईं हो । राहावया इच्छितें आणीक इच्छा दुसरी नाहीं हो । परामृश तुम्ही माझा कां करीत नाहीं हो । अशी निष्ठा अंतरीं धरुन मी अर्पिली काया । अर्पण केली तुम्हां तरी कां न ये माझी माया ॥ परंतु ॥ १ ॥ किती वर्णावें मुखें आतां तुमची सुगराई । रागरंग कुशलता अशी नाहीं दुसरे ठाईं । बागबगींचे तरु हिरवी आमराई । त्यामध्यें आरसे महालांत अप्रतिम चतुराई । जळमंदीर आणि सरोवर कारंजें ठाईं ठाईं । सुवासिक शोभिवंत झाडें गुलाब आणि जाई ॥ चाल ॥ ते ठाईं प्रियकरा तुम्ही मन मौजेनें रमतां हो । नानापरीचे विलास सखया तुम्ही तेथें करितां हो । दुबळीवर तुमची दया असावी गुणी राया ॥ परंतु ॥ २ ॥ किती वर्णूं चतुराई आपली सर्वथा गुणीवंता । नाहीं पडुं दिल्ही कधीं कोणेविषयीं निवंता । होऊं काय उतराई दासी आपली प्रियवंता । पदीं अर्पण हा देह राजसा साक्ष जगत्राता । नाहीं अंतर होणार कदापि अनुभव पाहा आतां । लक्ष मन धन अर्पण पाही दोष किती पाहतां । भोगिवले आजवर पुढें नाहीं दुजा त्राता ॥ चाल ॥ वियोग झाल्या क्षणभर कर्मत मजला नाहीं हो । हुरहूर वाटे जीवा तुम्हांविण शून्य दिशा दाही हो । घरांत बाहेर चैन पडेना शरिराची लाही हो । हीच विनंति माझी न जावें श्रम केले वायां ॥ परंतु ॥ ३ ॥ आजावर मौजा केल्या सुखांत आपुले

चरणाशीं । ऐसेंच चालो पुढें हेंची आवडे मनाशीं । पदीं मस्तक ठेऊन मागतें हेंची आपणांशीं । द्यावें इतकें वचन मला आणून ध्यानाशीं । कारण नवती सरत आली वयास पन्नासी । पुरुष तरी नित्य नवा जडली प्रीती दुसरीशीं । हेंची वाटे भीती मनाशीं ॥ चाल ॥ अहर्निशीं चिंता हो । विनवितसे म्हणउन तुम्हांला परोपरी बहुता हो । म्हणे सखा करूं नये चिंता कोणतीही आतां हो । होनाजी बाळा म्हणे तुझी ही योग्य दिसे जाया ॥ परंतु ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ९४ ॥

चाल—कुणें गुजराथ कुठें शहर पुणें ख्याती करी ॥ –सगन.

तुझ्या प्रीतीचें दुःख मला दाउं नको रे । वधुन जाई प्राण घेइ जगीं ठेउं नको रे ॥ ध्रु० ॥ याचे ममतेचा लोभ मला कळला आतां । कोण्या ठिकाणीं आहे जाउन लावा पत्ता । तिथें चालत जाईन आप आंगे स्वतां । जाऊन सांगा कांहीं रानभरीं होउं नको रे ॥ तुझ्या ॥ १ ॥ कीं ज्याणें दहा घरची मजा पाहिली असेल । एक ठिकाणीं जाऊन कशाला तो बसेल । हें मी सांगतें कीं खोटें खरें पुढें दिसेल । गोष्ट ऐकुनी दुसऱ्याचा वारा घेऊं नको रे ॥ तुझ्या ॥ २ ॥ जगीं सांगतात प्रीत पतंगाची खरी । झड घालुन प्राण देतो दीपकाचे वरी । हें मी सांगत असतांना कां गे पडले भरीं। रत्न टाकुन पदरांत गार घेउं नको रे ॥ तुझ्या ॥ ३ ॥ होनाजी बाळा म्हणे हजारांत शिरा । कळा दाऊन मोहून पती आणिले घरां । गेले पलंगीं उभयतां मनोरथ पुरा करा । काशिराम म्हणे कल्प कांहीं ठेउं नको रे ॥ तुझ्या ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ९५ ॥

चाल—माया ममता लाउन वचनीं गोउन मशीं जिवलगा ॥ –सगन.

चंद्रवन कोमला प्रियकरा कोणी त्रासिलें तुला सांग चंद्र तुझा गे ॥ ध्रु० ॥ प्रीतीची सांगतों गोष्ट तुज ऐक सखे सांगतों प्रियकरे । घडूं

नये घडल्यावर आतां कां उदास बावरे । कर मतलब आपल्या बुद्धिचा जाईल शेवटा बेरें ।। चाल ।। भंवताले दुष्ट लागले पहा तुज कसे । तूं आहेस खेरे पित्याची गांजिती पिसें । पाहती तोडाया विषकमुळ राजसे । नको मनामधीं भिऊं दाविती अनेक तऱ्हेच्या हुला ।। चंद्रवदन ।। १ ।। धर निश्चयता बळकट सखे आहेस धनीन आंगीची । कर संपादन मर्जी सखे दोन दिवस लागाची । आग लावी माणसें घरामधीं नाहीं तुझया मायेची । तूं काय करशील एकटी तुझी गे शाबास । नाहीं पडत चैन तुंजला आहे निजव्यास । हा देईनात खावया सुखाचा घास । नको होऊं घाबरी रासीला गुरु ग्रह लागला गे । आहेस प्रीतीचा सागर सखे गुण तुझे आवडते गे ।। चंद्रवदन ।। २ ।। निशिदिनीं निद्रेंत होउनिया शेजारीं पाहतों । जाग्रत होऊन पाहतों नाहीं शेजारीं । विस्मित होउन पडतों येकटे घरीं । हाय हाय करुन उपवास लावितां शिरीं । उथाणें बिघड पाडिला त्यास हासत दोष लागला गे ।। चंद्रवदन ।। ३ ।। वचनाचें स्मरण करून या मनीं निष्ठुर होऊं नये । सेजेवरचे बोल मजकडून खचित आहे सखये । डोळेभेट तरी दुरुन देत जा नको करूं हयगय । पाहुन आंत नारीनें नेला मग मंदिरांत । भोगिला नेउन आपुल्या मंचकावरी । हा हर्ष बहुत जाहला उभयतां परी । होनाजी बाळा म्हणे पूर्वीचा दोष आहे मागला ।। चंद्रवदन ।। ४ ।।

## ।। लावणी ।। ९६ ।।

चाल—जाहला हो वनवास पती गेला नवतीचा ।। —सगन.

गांवा जातो प्राणविसावा राहावा दोन गोष्टी सांगुन । पसरा पदर मजसाठीं सख्यांनो घ्या येवढें त्याला मागुन ।। ध्रु० ।। हातीच्या पांखरा शिवायासाठीं बेतून अकारल्या । तंग तोबरेच्या रजामे जीन घर शृंगारल्या । जामदारखान्यांत खजिना द्रव्याच्या पेट्या भरल्या । दोर

सलीते सहीत कतरा त्या उंटाच्या तयारल्या। घरमंडळी सहवर्तमान बाई अवघ्या फौजा एक सरल्या। पहिल्यानेंच कुच करून साजणी मुकामाशीं जाती दुरल्या। चार दिवस अडथळा पडला मी दूर बसलें यालागुन ॥ पसरा ॥ १ ॥ रथ गाड्या पालख्या निवंता घरीं धनद्रव्याची नाहीं। माझेंच ओझें मोठें सख्याला जेव्हां तेव्हां पडतें बाई। येवढें जें संकटीं पडावें मजकारितां आपले ठाईं। ते कां मला स्वहस्तें मारून टाकिनात एक्या घाईं। आणीक एक सांगतें सख्याला सांगा सख्यांनो लवलाही। मुकामाशीं तुम्ही जाल तेथें चालून येईन आपुले पाईं। मग मज ठेवितां शब्द देईन जीव पती बसतां मजला त्यागुन ॥ पसरा ॥ २ ॥ आपण खुशालींत तिकडे एकली दिनासारखी मी येथें। दहा घरच्या दहा रांडा कशाला याद होईल माझी तेथें। अशीं वचनें फसविलें तीनतीनदां मजला येथें। मी दुधास पोळलें म्हणून या ताक फुंकुन सखे पीतें। वारी भांडण एकदां म्हणून मी सखा एकांतामध्यें नेतें। मर्जी तीक्ष्ण पाहून विनंत्या करायासी आणखी भेतें। एकगुणें बोलावा शब्द ऐकुन घ्यावे त्याचे चवगुण ॥ पसरा ॥ ३ ॥ न्यावें बरोबर मला सखे रात्रीं ठरली बोलाचाली। जलद यावें दरकुच अशीं आज वकिलाचीं पत्रें आलीं। तो राहिला मनसोबा आतां मज एकलें ठेविलें रंगमहालीं। चार दिवस राहिलें परंतु जाण्याची तांतडी जाली। चैन पडेना मला साजणी होती शरिराची कहाली। उद्यां राहुन परवां मज टाकुन जातो सुखें। माझा वाली राहावें मर्जिमध्यें नसावें चार दिवस पतीशीं मागुन। होनाजी बाळा म्हणे विनंती करा रात्रीची उद्यां जागुन ॥ पसरा ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ९७ ॥

चाल—लग्नाची तारीफ सांगतें पहिलीच केली जुळणी ॥ —सगन.

सर्वगुणसंपन्न सखे राजींद्र पाहिला दृष्टी। क्षमा, शांती आणि दया ज्याची केवळ कासवदृष्टी ॥ ध्रु० ॥ मन तल्लीन हें झालें साजणी वदन

तयाचें पाहतां । शिरीं पगडी बल्दार भाळ अशी सुंदर विशाळ माथा । सुलक्षण युक्त पुरुष त्यातें रत झालें मी एकांता । कशी शेवट नेशी अशाची प्रीत अनुभगवंता । सुखें असावें छत्र शरीरावरलें मज हेची अहंता । स्वधर्मेंची वर्तल्या घडेल वेदश्रुती बोले विधाता । तुजविरहित साजणी कोणाला सांगूं मनांतील गोष्टी । हरयुक्तीनें भेट व्हावी हा हेत हृदयांत संपुष्टी ॥ सर्वगुणसंपन्न ॥ १ ॥ भरगच्ची घोड्यावर अवघा साज दिसे बहु बरवा । अखंडीत लक्ष्मी अळंकृत नाहीं कोणाची परवा । दुर्गी शेवती बजी तयाला त्वरितची मागें फिरवा । तरीच आवडत्या माझ्या त्याचा मजशीं संयोग करवा । व्याकुळ विषयरसें मी माझा वृत्तान्त सांगुन सर्वां । अशा रीती भेटवा जयानें माझी होईल खुष अरवा । दासी तुम्ही परी तुम्हां विनवितें मला नका करूं कष्टी । भेटवाल तो सुदिन चकोरा जशी चंद्रामृतवृष्टी ॥ सर्वगुणसंपन्न ॥२॥ उतावेळ मन केवळ पलंगीं बसुन सखे एकांतीं । विड्या तयाच्या मुखीं घालीन कधीं हेंची वाटे मज खंती । चळ भरला देहांत सखये कशी उडेल ही भ्रांती । विषयव्याप्त जाहलें कधीं भेटेल माझी विश्रांती । राज्यामध्यें वाणी प्रजा अपूर्व स्थिती आणि शांती । मूर्तिमंत सात्त्विक प्रकृती बाई दिसे पाहिल्याअंतीं । उदय पूर्वपुण्याचा वर्तणूक घडेल अशा संघष्टीं । तरी जन्मांतरीं धन्य मनाची होईल मनाची संतुष्टी ॥ सर्वगुणसंपन्न ॥३॥ अती प्रयत्नें करून सख्यानें भेटविलें सजणाशीं । सेज केली मंचकावरी जीवीं मानुन अती उल्हासी । कावड खांद्यावरतीं कापडी समीप देखिल्या कासीं । अती आनंदयुक्त प्रवर्ततो भागीरथी स्नानाशीं । आलिंगुनिया सखा सखीला तसें वाटलें जीवाशीं । पूर्वार्जन हें सबळ देऊं रजायुक्त संबंध नृपाशीं । सेवाधर्म विषय सखीचा पूर्ण पाहून निजनिष्टीं । होनाजी बाळा म्हणे अशा देवा न दावी पृष्टीं ॥ सर्वगुणसंपन्न ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ९८ ॥

चाल—पाहिलेंस नेत्रानें जरासे कुच ठेवसील उघडे ॥ – सगन.

निजा तुम्ही वेगळे बिछाना टाकुन पलंगावरी । चार दिवस छळूं नका गरोदर मी जों आहे तोंवरी ॥ ध्रु० ॥ असून लहान वय न्हाण आलें मज आधींच धाकुटपणीं । तेव्हांपासून हवें तसें भोगितां तुम्ही क्षणोक्षणीं । आशीर्वाद विधिवाक्यावरून मी झालें आतां गर्भिणी । दिवसमास वाढतो गर्भ पाहा माझे उदरांतुनी । शरीर फार जड जाहलें नको धरूं हृदईं कवटाळुनी । दूर निजतें वेगळी पदर पसरुनी तुम्हांपासुनी ॥ चाल ॥ हें नको आतां वीट आला रे राजसा । पांचवा मास लागला राजसा । कसें वर्म कळेना तुला राजसा । माझें ठाउकें मला दुःख किती सोसूं मी परोपरी ॥ चार दिवस ॥ १ ॥ नुस्तें बोला दुरून नका हो हात टाकूं शरीरावरी । भार साहिना मला प्राण व्याकुळ होतो अंतरीं । जों जों बोलतां असे तों तों तुम्ही अधिकच धरितां उरीं । तुमचे हात कितीदां स्तनापासोनी सोडतें तरी । मीस करितें कीं काय उदर चापुन तरी आपल्या करीं । मग माझे वाटेस नका हो जाऊं आजपासुन तरी ॥ चाल ॥ हट येवढा कां करितसां रे राजसा । नको म्हणतां बळें धरितसां राजसा । कां व्यर्थ मला छळितसां राजसा । पुरुष नकोसा वाटे आतां हें मन कंटाळा करी ॥ चार दिवस ॥ २ ॥ मला नको तें बळेंच करितसां कसें वाटतें तुम्हांला। जीव जातो कीं माझा अमळसे थांब म्हणतसे तुला । काय भिडेला करूं मार्ग मर्यादेचा सोडिला । तरी ऐकाना कसें अधिर कां आज येवढे जाहलों । श्रमसागरीं मी फारच पडलें हृदईं श्वास लागला । तुम्ही प्रेमामधीं निमग्न प्राण इकडे माझा चालला ॥ चाल ॥ कांहीं तरी येऊंद्या दया रे राजसा । आम्ही सकुमार स्त्रिया रे राजसा । नाहीं शक्त बोलावया रे राजसा । पडतें मी पायां आतां गांत्रीं नाही तुमच्या तिळभरीं ॥ चार

दिवस ॥ ३ ॥ सत्ता झाली म्हणोन काय जीव घेतां येवढें । फारच मी हैराण होतसे पाहा गडे माझे वदनाकडे । धरून पलंगीं मला नका दडपूं वेडेवाकडें । वर्म न कळतां चुकून एखादें दुखवेल आंतडें । हळू हळू किती म्हणून सोसेना दुःखें येत रडें । माझें ऐकतें कोण झाला निरउपाय यापुढें ॥ चाल ॥ पाहुन विकळ नारीशीं राजसा रे । उर्किलें कार्य ते दिवशीं राजसा रे । मग दिल्हा विसावा तिशीं राजसा रे । होनाजी बाळा म्हणे अशींच प्रीतीचीं लक्षणें खरीं । जशी मर्जी स्वामीची तशींच तूं वागत जा सुंदरी ॥ चार दिवस ॥ ४ ॥

## ॥ लावणी ९९ ॥

या सृष्टींत दैवाची धुंडितां मजसारखी नाहीं ॥ ध्रु० ॥ पहिल्या न्हाणापासून शुद्ध द्वादश वर्ष न्हालें । निपुत्र निशी संपदा आतां उदयास भाग्यें आलें । गर्भ राहिला मला तयाला दोन मास जाले ॥ चाल ॥ मळमळ पोटीं लागली ओकारी मला । अन्नाची शिसारी जो पदार्थ निपजला । तो वाटे विषवत जीव हा कंटाळला ॥ चाल ॥ यांतिल वर्म किंचित् मजला समजेना । बाई लेकुरवाळ्या शहाण्या लौकर आणा । एकांतीं बसूनी त्या फेडतील कल्पना ॥ चाल ॥ दैवानें सारसाजणी । राहिला गर्भ यापणीं । अती हर्ष वाटला मनीं ॥ चाल ॥ मी पहिलारु म्हणून कळेना यांत मला कांहीं ॥ या सृष्टींत ॥ १ ॥ पूर्वार्जन चांगलें म्हणून ईश्वर मजसी पावला । बहुत आनंदामधें मला तिसरा महिना लागला । या उपरांतिक मला चवथा महिना लागला ॥ चाल ॥ घडोघडी भ्रतार येऊन बोले मजपासीं । आवडीनें बोलतो धरुनी मला पोटासीं । बाई अनकुळ अवघ्या सुखामधें ग मी आसी ॥ चाल ॥ नाजूक शरीर हें पहिलेंच माझें आधीं । पांचवा मास अखेरीच्या संधीमधीं । लागला मास सहावा पेंगुळलें पदीं ॥ चाल ॥ चढली मुखावर टवटवी । सर्वांगीं घाम डवडवी । डोकें माझें भवभवी

॥ चाल ॥ चैन पडेना मला जवळ बोलवा गुणग्राही ॥ या सृष्टींत ॥ २ ॥ दिवस भरत चाललें सातव्या महिन्याची छाया । दिसों लागली केवळ माझी कांचनवत काया । कष्ट वाटती उठतां बसतां जीव होतो जाया ॥ चाल ॥ हे फिरते डोहळे माझे नानापरी । हे शरीरसंबंधीं नेती जेवाया घरीं । चिर कंचुकी हिरवी मज नेसविती बरी ॥ चाल ॥ भासते तुष्टते सुखसोहळे मजप्रती । दिवसमास वाढतें पोट रती रती । तगमग होती निजते पलंगाखालतीं ॥ चाल ॥ हा जीव होतो घाबरा ! कोणी उठा सखेनो धरा । कोणी शीतळ पंखा करा ॥ चाल ॥ द्यावें मला जीवदान मिळुनी सर्वत्रांहीं ॥ या सृष्टींत ॥ ३ ॥ आठ महिने संपतां सखेनो या नव्वे मासीं । पोट दुखूं लागलें ठेवा सुचवून पतिरायासी । प्रसूतकाळ हा समीप दिसे राहा सावध मजपाशीं । मी अशांतुन कधीं पार पडन चांगली । ही चिंता माझ्या भ्रतारासी लागली । ईश्वरसत्तें वेळ प्रसूतसंधी आली ॥ चाल ॥ बाई श्वास वेणीचा मज माझ्या घेऊं द्या । गलबलूं नका निश्चळ प्रसूत होऊं द्या । आशावंत मुख बाळाचें पाहूं ॥ चाल ॥ या संसारीं सुखरूपें । मुख पुत्राचें साक्षपें । पाहिलें ईश्वरीकृपें ॥ चाल ॥ होनाजी बाळा म्हणे लक्ष ठेवा सद्‌गुरूचे पाई ॥ या सृष्टींत ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १०० ॥

**चाल**—पुणें शहर गुलजार मुशाफर म्हणे येथून ऊठ ॥

—सगन.

द्वादश वर्षे अंगीं पूर्ण भर नौती आली रंगा । पती नाहीं चित्ता-जोगा ॥ ध्रु० ॥ आधीं भुई ठेंगणी सख्याची ल्हानखुरी दिसते । उभयतां जन पाहुनी हसते । न ये वदन दाविती जगत्राला अशा अवस्थे । सदां मंदिरीं लपुन बसतें । विषयसमंधीं कधीं न बोले प्रिय भाषण नुसतें । व्यर्थ शेजारीं निजुन नुस्तें । कधीं भोगितो कधीं जातो नागा ॥ पती नाहीं

॥ १ ॥ विवाहकाळीं पित्यानें मनन नाहीं केलें । कसें वृत्तीस चळण झालें । मजला जरी लोटितां प्रवाहीं तरी अस्तें मेलें । कां मला अशा स्थळीं दिधलें । रत्नपरीक्षा नाहीं त्याचे हातीं रत्न गेलें । असे हे सचिंताचे ताले । आपण इच्छी तो एक विधी निर्मितो दुजी जागा ॥ पती नाहीं ॥ २ ॥ नटनाटक चंचळ रूपा आगळी जन म्हणती मजला । कांत हा कसा अयोग्य जहाला । हीण वर लज्जा कुठें ठिकाण स्थळ नाहीं लपायाला । घेऊं तरी विष भरून प्याला । प्रपंचसुख म्यां नाहीं पाहिलें कांहीं या देहाला । जन्म उपजोनी व्यर्थ गेला । कांहीं नकोसें झालें विषय चळ सुटला सदंगा ॥ पती नाहीं ॥ ३ ॥ दीप असतां अंधारी दिसेना प्रकाशित कांहीं । तसा तो असून मज नाहीं । पती पाहतां दृष्टीनें अग्न शरीराची होती लाही । अश्रू ढळढळा नेत्र वाही । काय करूं सईबाई जाहलें सर्वापरी गाई । येईना मरण मला बाई । होनाजी बाळा म्हणे गोष्ट प्रारब्ध आली भोगा । आतां तूं कां करितेस दंगा ॥ पती नाहीं ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १०१ ॥

चाल—करुनि शृंगार दिसे पीवळा ॥ — सगन.

हिरवा शृंगार करून सर्वांगें । पाहून स्वरूपाचा बहार जीव आमचा जाहला हिरवा गे ॥ ध्रु० ॥ हिरवा सखे साज करूनी आले । हिरवा शालू जरीपदरी हिरवी कंचुकी ल्याली । हिरव्या बाळ्याची शोभा आली रे हिरवी । पाचूची नथ नाकीं मुखड्यावर खुसी याली ॥ चाल ॥ अग सखे ग हिरवी कोर चंद्राकार । अग सखे ग हिरवी टिकली शोभे फार । अग सखे ग कंठीं हिरवे पाचूचे हार । हिरवा बुचड्यांत खोउनी मरवा गे । पाहून स्वरूपाचा बहार जीव आमचा जाला हिरवा गे ॥ १ ॥ हिरवी बाग शाई हिरवा बंगला गे । हिरवे बिछाने हिरवे पडदे हिरवा पलंग मजला गे । हिरवें छत हिरवी झालर त्याला गे । हिरवे झाले हिरव्या

दीवालगिऱ्या खांबाला ॥ चाल ॥ अग सखे ग हिरव्या कोच खुरच्या फार । अग सखे ग वर गलफ हिरवा जरतार । अग सखे ग हिरवे काच चहूंकडे चार । हिरवे हौदांत रंग भरवा गे । पाहून स्वरूपाचा बहार जीव आमचा जाहला हिरवा गे ॥ २ ॥

## ॥ लावणी ॥ १०२ ॥

सख्या हो ध्या रस रंग लालीचा । लुटा लालीचा रंग वक्त आजी बहुत खुशालीचा ॥ ध्रु० ॥ लाल तुम्ही श्रीमंत धनी माझे । लाल आंगावर शाल लाल पोशाख तुम्हां साजे । लाल आकृती प्राण माझे । हास्यवदन गुणी लाललाल मज लालडीचे राजे ॥ चाल ॥ अरे सख्या रे लाल आरक्त लोचन लाल । अरे सख्या रे मुखीं विडा मुखीं रंगीला लाल । अरे सख्या रे तुम्ही अजब छबेले लाल । लाल हिल्लाल लालीचा ॥ लुटा ॥ १ ॥ लाल रंग महालीं लाल पडदे । नरम बिछाने लाल पाहून लालडीचें मन लुब्धे । लाली लाल असे गोड शब्दे । गौरवर्ण लालीस लाल सांपडला प्रालब्धें ॥ चाल ॥ सख्या रे लाल एक पृथ्वीचें मोल । अरे सख्या रे तुम्ही लाल माझे आनीमोल । अरे सख्या रे लालाची लाली समतोल । लाल मज प्रियकर लालीचा ॥ लुटा ॥ २ ॥ लाल बागांत लाल लाली सजली । मी मुनीया तुम्ही लाल गुलाल मी फुललें लाली । लाली समसमान रंग लाली । लाल करील तें खरें लाल मज लालडीचे लाली ॥ चाल ॥ अरे सख्या रे लाल ध्या नवतीचा रंग । अरे सख्या रे लाली लाल उडवा रंग । अरे सख्या रे लालाची लाली खुष रंग । लालच भुजंग लालीचा ॥ लुटा ॥ ३ ॥ लाल लालाची लाली सजली । लाल आंगावर उवाहार लाल रंग महालीं चमके बिजली । लाली ती आपआपणा रिझली । लाली बहुत खुशीयाल लाल पाहून चौथे मजलीं ॥ चाल ॥ अरे सख्या रे लाली लाल लाल गुलजार । अरे सख्या रे लालीचा लाल करी प्यार ।

अरे सख्या रे रंगमहालीं लाल तयार । करूं रंग खुष रंग बहालीचा । होनाजी बाळा म्हणे लाल लुटवी रंग लालीचा । सख्या हो घ्या रसरंग लालीचा ॥ लुटा ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १०३ ॥

चाल—हासुन मसीं बोल प्रिय पात्रा ॥ — सगन.

सांगा दिसे तुमचे नेत्र लाल कर्मिली रात्र कुठें काल ॥ ध्रु० ॥ मंचकीं पुष्पशेज करूनी । सुगंधी विडे तबकीं भरूनी । हांड्या चौबाजूंनीं छत वरूनी । पाहतां जाई तहान भूक हारूनी । येतों म्हणून गेले स्वामी घरूनी । वाट मी पाहतें द्वार धरूनी ॥ चाल ॥ करीं घेऊन पुष्पपंखा । शांत झाला अर्धीचा डंखा । मंदोदरी दुःखी हरता लंका । तसें मज अंतरीं दुःख झालें ॥ कर्मिली रात्र ॥ १ ॥ नित्य नेम नरसीजीस जाणे । विठ्ठल-मंदिरीं दर्शन घेणें । दुकानीं व्यापार घेणें देणें । झाला डंका लिहितां लिहिणें । सबब नाहीं जाहलें घरीं येणें । परवर नसे गस्तीच्या भेणें ॥ चाल ॥ हिशोबीं जागृत जाहली सक्त । म्हणून नेत्र आरक्त । स्मरण तुझें होई हारवक्त । बोल नको रुसुफुगउगाल ॥ कर्मिली रात्र ॥ २ ॥ नका काठीचे कोल्हे कोल्हूं । दांत आंबे नारंग्या सोल्हूं । पारडें गेलें वर वजन तोल्हूं । नका हें मशीं झोले झोल्हू । झांकली मूठ कशी खोल्हूं । आजपून मी कशास बोल्हूं ॥ चाल ॥ मेला नाहीं राहवत हा राग । खास अंगासी कुठून लाग । कशाचें वस्त्राला डाग । झाली मज खात्री बालोबाल ॥ कर्मिली रात्र ॥ ३ ॥

## ॥ लावणी ॥ १०४ ॥

चाल—मारीला बाण भेदीला जाण ॥ — सगन.

जाईजुईच्या फुला राजसा तुला कुठें पाहूं । होईल येखादी दृष्ट नको रे तिंदा बाहेर जाऊं ॥ ध्रु० ॥ प्राणसख्या प्रियकरा राजसा ही पुण्याची

वस्ती । रात्र फार जाल्यावर फिरती गस्तीवर गस्ती । इथल्या रांडा कळलाव्या करिती जबरदस्ती । नको नादीं तूं पडूं त्यांच्या लोक तुला हासती । परद्वारीची नुकसान कितीही उघडी दिसती । राजमान्य चलावें तुम्हीं तर शाईसी रस्ती ॥ चाल ॥ या रंगीत महालीं आज कशी निद्रा आली । मी उभी केव्हांची तुमचे आज्ञेखाली । घार होउनी फिरेन मी तुमच्या भोंवतालीं । आलीकडे वाटतें मजहुनी मर्जी उडाली । दुसरी कोण मिळाली नको तूं तिचा छंद घेऊं ॥ जाईजुईच्या ॥ १ ॥ फार दिवस लोटलें तुमच्या माझ्या प्रीतीला । कसा लुब्ध झालास सखया कोण्या सवतीला । झड घालुनिया रांडा भुलतील पाहून सुरतीला । डाग येखादा लावतील या कवळ्या नवतीला । आपली मर्जी कशी सांपडल भलत्या गवतीला । द्रव्यापुरती आर्जव करिती जपावें कांतीला ॥ चाल ॥ मी फारच जपतें अहो सख्या गुणीजना । शेवट कसा होईल मला समजेना । कोण्ही वीट पाडतील या रांडा दुर्जना । हा भ्रम आपला नको दाखऊं जना । तुम्हीं कोठें गेल्यावर मी करितें रोदना । हा घोर जिवाला माझ्या तुज उमजेना । मनमानसरंजना कल्पना । कुठवर समजाऊं ॥ जाईजुईच्या ॥२॥ परस्त्रींसंग करितां कोण असा तरला । दशकंदर तो संपत्तीसंततीसहीत हारला । गुरुपत्नीशीं व्याभिचारी सोम कां ठरला । नाहीं सिंधु इंदुचा कलंक सरला । गांधीसुत लोहचूर्ण भक्षुनी अति तप आचरिला । तैसें तप पैं फेण धवळ भिलनीसवें घसरला ॥ चाल ॥ शृंगीच्या तपासी गलंडरुषी नडे । भस्मासुर जाहला भस्म मृडानीकडे । गवतम भार्या अहिल्येवर मन जडे । सहस्त्रभगें शक्राचे आंगीं पडे । असुरामाजी संदउपसंदे दोघे भाऊ । तिलोत्तमेपदीं मृत्यु पावले किती दाखले दाऊं ॥ जाईजुईच्या ॥ ३ ॥ महिकावतीमधें चंडिकेस बळी देतां रघुनाथ । महिरावणाची स्त्री कवटाळी केला पातिघात । नारदाची नारदी झाली संवछरसाठ । तारेपाईं वाली मर्दिला सुग्रीवाचे हातें । शुक्रकन्या देवयानी कचाला चाहात । संजीवनी साधितां येकमेकां

आपुनी जात ॥ चाल ॥ सुयोधनाची जीवग्राहीक द्रौपदी । कुलक्षय पावले भूप लक्षावधी । कीचक मर्दिला पांचाळीचे पदीं । वृंदेसाठीं श्रीविष्णु स्मशानामधीं । होनाजी बाळा म्हणे स्त्रिये तूं ज्ञानी ग्रंथ पाहूं । गुणानुवादें लीला श्रवणीं तुझे सदनीं राहूं ॥ जाईजुईच्या ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १०५ ॥ ✓

जसा आकाशीं चंद्र तसा राजेंद्र पाहिला दृष्टी । सखे असें वाटतें सखा कवळून मारावी मिठी ॥ ध्रु० ॥ पगडी कंगणीदार आंगावर ज्वाहार छबेल्या गडी । करून सज्ज पोषाख घेतली हातीं फुलाची छडी । मुक्त तुरा शिरपेच कानीं चौकडा सुरत फांकडी । गळा पाचूचे हार सदोदित एकाहून एक चढी । हातीं हिऱ्याच्या आंगठ्या पेट्या पाहून पडले झडीं । सखे असें वाटतें सखा मजकडे पाहतो घडोघडीं ॥ चाल ॥ हें राजस्वरूप चांगलें अगे साजणी । मज बघून वेड लागले अगे साजणी । हें मन माझें रंगलें अगे साजणी । मी विषयीं वेगळी होईल गत कसी न कळे शेवटीं ॥ सखे असे ॥ १ ॥ काय सांगूं तारिफ जसा कोणी इंद्र बैसला सभे । वीरासन घालुन भंवते देशोदेशींचे सुभे । चवरी रुमाल हुद्देदारी हातीं घेउन विलासीक डबे । सेवक जन सेवेशीं तिष्ठती रात्रंदिवस ते उभे । ऐश्वर्याची जात साजणी न वर्णवे या जिभे । मज चांदणीचा चंद्र चांदणी मी लुब्ध त्याच्या प्रभे ॥ चाल ॥ केवळ मन्मथ पुतळा अगे साजणी । सर्वांत रूप आगळा अगे साजणी । वाटतें पडावें गळा अगे साजणी । भाळीं कस्तुरी टिळा गंध केशरी सर्वांगीं उटी ॥ सखे असे ॥ २ ॥ अवचित माडीवरून सख्याचें रूप पाहतां गोजिरें । तनमय होऊन मनीं व्याप्त मी जालें कामज्वरें । करुणा जाणून मालें मजपुन जागे सख्यांनो त्वरें । मोहोनी घालून आणा सख्याला येथें मधुर स्वरें । नट ठकडे बंगाली विद्या घेतली सखे प्रियकरें । बळेंच वेड लाविलें याहुनी

मजला कमळणीस मधुकरें ॥ चाल ॥ तो भुजंग मी केतकी अगे साजणी । तो मीनकेतन मी रती अगे साजणी । भेटवा त्वरित मजप्रती अगे साजणी । करून प्रार्थना किती विरहव्याकुळ मी हृदयसंपुटीं । सखे असें ॥ ३ ॥ करून नाना यत्न राजहंसाशीं एकांतीं आणा । चरा मुक्ताचा चारा तुम्ही निर्भय तयाला म्हणा । पाहतां दिसतें आंत जसें मुखचंद्रबिंब दर्पणा । मी एक लक्षणयुक्त सखे हा न्याय सोडून मीपणा । कायावाचामनें शरण मी जाहलें त्याची अंगना । प्राण करीन खुरबान ओंवाळीन या उणें द्रव्यधना ॥ चाल ॥ संपन्न लक्षणावरून अगे साजणी । खुरबान प्राण हा करून आलें साजणी । त्या वक्ती जावें न अगे साजणी । सखा हस्तकीं धरून बसलें मग विषयानळ शेवटीं । होनाजी बाळा म्हणे सख्याची सखी धरी हनुवटी । जसा आकाशीं चंद्र तसा राजेंद्र पाहिला दृष्टी ॥ सखे असें ॥ ४॥

## ॥ लावणी ॥ १०६ ॥

चाल—का प्रवासी आम्ही जाहलों सांगतों आहोंत ॥

— सगन.

आम्ही मुशाफर गडी राहुं इच्छितों तुझे मंदिरीं । कर प्रीतीचा बेत हेत राहील तसाच सुंदरी ॥ ध्रु० ॥ चांगुलपणा विशेष अप्रतीम नूतन नौखे वय । दिसे पतीचा वियोग जसें देवाविण देवालय । जनचरच्चेची शरम साजणी तुला फारसी आहे । डोळ्याच्या पाहण्यांत घडेन घडेल वाटतो स्नेह । त्यांत आम्ही भेभिस्त तुशीं बोलाया वाटे भये । सवड पाहुनिया तूंच येउनी आम्हांसी बोल निर्भये ॥ चाल ॥ गड्ये साक्ष मनोमय असे । उभयतांत किंतु नसे । असो प्राणसखे राजसे । तुझें लागलें पिसें आम्हांशीं बोल हासुन क्षणभरी । चंद्र पाहूनी या तुझा शांत होईन येवढ्यानें तरी ॥ आम्ही ॥ १ ॥ चांगुलपणा विशेष अप्रतीम नूतन वय हें असे । पती

गेले येतील परतून मजसाठीं संशय नसे। काय जगाशीं कारण आपुला स्वधर्म आपणा दिसे। बोलुं नका भलतेंच वाटतें तुम्हां लागलें पिसें। इंद्रपदा इच्छून राज्य करूं पाहतां स्वलेभ मिणें। तपःसामर्थ्येंवीण तुम्हांला तें प्राप्त होईल कसें ॥ चाल ॥ वाटेचे वाटसरू तुम्ही। पडतसां व्यर्थ कां भ्रमीं। राहिला परके आश्रमीं। विषसाचे अनुक्रमीं। लुब्ध होऊन अहो गुणानिधी। बरळत साहे काय गोष्ट घडणार नाहीं ती कधीं ॥ आम्ही ॥ २ ॥ येक वेळ गांवाहुन गेलों मुखचंद्र पाहुनियां तुझा। धन्य जयाचें भाग्य तयाची तूं आहेस भारजा। वाट कोणाची पाहसी घे आपुल्याच मनाची रजा। बाहेरल्या पडवीमध्यें येऊन उडवी हजा। आम्ही आहों मार्गस्त गांवीं राहिल्या गांवीच्या मजा। प्रवासांत सुख दावी तुझ्या कीर्तिच्या लागतील ध्वजा ॥ चाल ॥ राहिलसी आठवण मनीं। करी असी अहो साजणी। विषयाची जपून जाचणी। अशा पणीं रंग लुट फूट पडली ही बाहेर जरी। अहो सखे सामर्थ्यवान लपवूं कर्म वरचे वरी ॥ आम्ही ॥ ३ ॥ जातां गांवावरून आधी ज्या घरीं चंद्र पाहिला। तें घर चुकलें असाल येथें व्यर्थ येउन राहिला। विषयाअंध होउन कसें बोलतां तरी भलतीला। मी नाहीं बाहेर निघत दृष्टी पडियेलें कोण्या संधीला। तूर्त आहे माहिरीं सभोंवतीं भाउबंद चौकीला। रात्रंदिवस जपताती न राहूं देती उभ्या गल्लीला ॥ चाल ॥ लौकिक वडिलांचा आहे येवढाच मोठा संदेह। न घडे मशीं तुमचा स्नेह। धरुनी मनामधीं भय वागतें लउन भजुन मी आधीं। या उपरी मज न कळें लिहिलें काय कपाळीं विधी ॥ आम्ही ॥ ४ ॥ होतों अती निद्रिस्त येकांतामध्यें आम्ही निद्राभरी। जणुं उशाशीं उभी राहिली प्रत्यक्षची प्रियकरी। अशा अवस्थेमध्यें आम्हां घालुन व्यापिलें बरें। अवलोकुन मुखचंद्र जाग्रतींत चित्तचकोर बावरे। तुला संवज्ञा केली परंतु लाजतीस लाज रे। जड पडलें दोघांशीं तुज पदराशीं येउन घर त्वरें ॥ चाल ॥

संग्रह घडेल हा जेव्हां । मन मिळेल साजणी तेव्हां । याउपरी भेटसील असें वाटतें जीवा फाकडे उभयतांस अंतरीं । आम्ही तुम्ही लिहून पत्रें धाडुं लागली वरचेवरी ॥ आम्ही ॥ ५ ॥ कपाळ फुटकें पूर्वजन्मींचें कोण पाप संग्रहीं । अशा पणामध्यें टाकुन गेला तो भ्रतार निर्दयी । कोण जिवाची सखी मिळाली असेल त्याच्या आग्रहीं । गुंतुनिया वचनास राहिला म्हणुन करितो हयगई । नाहीं साधिला उदीम म्हणुन पडिलेला अशा संशई । केव्हां होउन संन्यासी फिरतसे अलख म्हणोन अक्षई ॥ चाल ॥ कुळिवंत स्त्रियांच्या रीती । स्वामीचे चरण वंदिती । व्यभिचारपणा निंदिती । व्यास कुळीं निश्चिती निर्मिल्या मर्यादेच्या हाथीं । न घडतांही असी जवळ आयुष्याची अवधी ॥ आम्ही ॥ ६ ॥ मोहोनी प्रत्यक्ष ध्यान आपुलें त्वांच लाविलें । विसरोन गेलों मार्ग अवांतर जवळ जरा राहिले । चित्तांतील हावभाव गडे त्वां अकल्पीत दाविले । आकर्षुन मन अवघें मोहोनी मुशाफर मोहिले । पूर्वी रावणें सीतेसाठीं दाही शिरें दिलीं ऐकिलें । येक शप्पवत शिर तुला संकल्प करून वाहिलें ॥ चाल ॥ पुरीव हेत मनाचा आतां । सोडुनिया लौकिक तथा । सांग काय गे राहतां । हाच तुझा येक स्वतां होईल उपकार आमचे शिरीं । होनाजी बाळा म्हणे अग्र चेतला विझीव लौकरी ॥ आम्ही ॥ ७ ॥ मध्यस्थ घालुन दुसरी करिती भाषण नानापरी । असें स्त्रियशीं फासूं शिकलां करून कवाईत बरी । यापेक्षां सायासनीं प्रयत्न उदंड केले जरी । घडे प्रीत येकांतीं पूर्वीच्या रुणानबंधें खरी । चतुर वाटला म्हणोन राहिला दुसरे दिवशीं मंदिरीं । न कळे उद्यांची घडी काय येईल या हृदयांतरीं ॥ चाल ॥ कां लपून तुम्हां इतुकें । चतुराई करून कौतुकें । भाषण म्यां केलें मुखें । आज भोगिसी सुखें । असा नाहीं चतुर आढळला कधीं । होनाजी बाळा म्हणे धन्य तूं येक ज्ञानाची निधी ॥ आम्ही ॥ ८ ॥

नोंदी १३१४ ग्रंथालय वि. नों. दि. ११.१२.१५ अनुक्रम ५५६६० क्रमांक १५००



## ॥ लावणी ॥ १०७ ॥

चाल—माझ्या घराकडे चाल ॥ — सगन

मुशाफर पाहुन दिल खुशियाल । कोण्या लालडीचे लाल ॥ध्रु० ॥ शिरीं मंदिल बांधिला मजेचा । शुभ्र दुपेटा जरिपैठणीचा । कंठीं पदक तळिं लोलक निळीचा । साधा बाणा मुशाफरिचा । मुखीं विडा रंगला लाल करी सफर ॥ मुशाफर ॥ १ ॥ घोडा सारंगा बहु सुज्ञानी । वर प्रकाशला दिनमणी । ढाल सुरइ कमरेसी बांधुनी । हातांत रंगीत भाला लाल ॥ मुशाफर ॥२॥ मोहुन मुशाफर हार युक्तीनें नेला मंदिरी त्वरें करून । पलंगीं बसवून केला सनमान । लिंबलोण उतरी त्याजवरून । मुखीं विडा रंगला लाल ॥ मुशाफर ॥ ३ ॥ स्तविते सुंदरी म्हणे भूपाळा दासी तुम्ही सदनीं पाळा। भोगी सौख्य झुले चोपाळा । छंद गातसे होनाजी बाळा । खुशी मर्जी मन बहाल ॥ मुशाफर ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १०८ ॥

चाल—काशीचे राहणार मुशाफर पंछी प्रवास गब्रू ॥ —सगन.

सख्या तुम्ही पुणें पाहिलें श्रीमंताचें तेथील उमद्या चाली । तळ कोंकणांत मला घेउनिया चला आनंदाखालीं ॥ ध्रु० ॥ पौषमासीं हिंवाळा भारी । पुढें सण संक्रांतीचा वासांतील वाटितात का नरनारी । अवघी जाली तयारी सारी । नाहीं राहणार तुम्हांवांचून मला कांहीं न गमे संसारीं । वरततें मी तुमच्या हो आधारीं । झोंप येईना हो नयनीं मजला पाहा निजल्याविण शेजारीं । तुम्हांविण कोण माझा वाली ॥ तळ ॥ १ ॥ तुम्ही तर फारच केल्या कीर्ती । पाहिलें करनाटक हें विकट कार्तिक स्वामीची चितांबर मूर्ति । बरेंच कीं धरलें चित्तावरतीं । साल दरसाल स्नानें करिता गंगातीरीची करून वस्ती । आतां सागराची दावा भरती। कर जोडून प्रार्थितें हो ऐका माझी येवढी विनंती । मशीं बोलाउन

चलावें आज महालीं ॥ तळ ॥ २ ॥ भयंकर रान बिकट झाडी । सावजें फिरती जंगलचीं अस्वलें व्याघ्र बसती पहाडीं । तेथील लागतात ताडी माडी । वृक्ष देवदार मांदार पाहावी जिकडे तिकडे झाडी । सांगूं घेउन संधिसवें फाकडी । कुच दरकुच करुनिया गेले सोबतीण राजहंसाची जोडी । मुकाम केला घाटाखाली ॥ तळ ॥ ३ ॥ मुशाफर फंदी चतुर शहाणा । ढाल पाठीशीं हातीं तलवार अवघा शोभे शिपाई बाणा । दृष्ट लागेल या स्वरूपा जाणा । आंगावर कुल ज्वाहार शोभतसे कलगी वरता चमके मीना । लोक पुसताती कोठील पाहुणा । जोडी संगीन उभयतां दिसे जशी कां बटाव संगें मोहना । बहुत संतोष सुंदरा जहाली ॥ तळ ॥ ४ ॥ सखीचे हेत पुरे केले । निकट यावयाचे हातीं म्हणुन जलदी माघारे परतुन उलटले । मार्ग क्रमुन घराशीं आले । उभय पक्षीं हरषाकृत कैसें जैसें लावण जळीं मिळालें । आनंद करून महालीं गेले । सर्वज्ञ सखा गुणरासी होनाजी बाळा कविता बोले । कवन ऐकतांच वृत्ती धाली । गुणी कासीराम गाती करून साज अशा प्रीतीच्या चालीं ॥ तळ ॥ ५ ॥

## ॥ लावणी ॥ १०९ ॥

चाल—सुख असतां दुःख मज देतां मीं कुळवंताची कांता ॥

अवचिता प्राप्त मज जाहले दुबळीला धन सांपडलें ॥ ध्रु० ॥ कमळिणीस मधुकर जैसा तैसा तुम्ही मज स्वामी । लावण्य स्वरूप सजदार लक्षतें येकच नामी । वारंवार किति गुण आठऊं आपुले हो अंतरयामीं । आज कोणीकडे भाग्य उदेलें दुर्बळास घन सांपडलें ॥ अवचिता ॥ १ ॥ कोणीकडे चुकलां तुम्ही सखया भेटीस तुम्हां वाटलें । बरी पायधुळ झाडुनिया आज माझें भाग्य उदेलें । सुदिन दिवस हा बरवा दर्शन पायाचें घडलें । कसें तुम्हांस तरी फावलें दुर्बळास धन सांपडलें ॥ अवचिता ॥ २ ॥ नित्य प्रार्थित होतें देवासी । कधीं येतील स्वामी

घरासी । पावले प्रभु आज नवसासी । जोड्यानें पुजीन हरीहरासी । मग येऊन स्वस्थपणासी । करवीन भोजन चतुरासी । या लोकीं धन्य मी जाहल्यें ॥ अवचिता ॥ ३ ॥ सोडून उतावेळ जाण्याची आज घ्यावी हवा महालाची । आज पाहावी सेवा दासीची । सुखशय्या करीन फुलाची । गरज इतकी आहे खासीची । आशा एक मजला फळाची । कवी म्हणे हें बरवें घडलें दुर्बळास धन सांपडलें ॥ अवचिता ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ११० ॥

चाल— राजसा देऊन भरंवसा कोणे गोष्टीचा राग धरिला ॥

— सगन.

साजणी आम्हांसी फार लाविली माया ॥ध्रु०॥ नट नाटक तूं नट नार दिव्य सुकुमार । तुझी सुरत मुरत लावण्य फार अनिवार । देखणे सजीव मन रिझीव सजीव सजदार ॥ चाल ॥ कंठस्थळीं चंद्रहार । नाकीं नथनी झुमकेदार । आंगीं तारुण्याचा बहार । दोन्ही स्तनें बहु अनिवार । आले रसवाया ॥ साजणी ॥ १ ॥ बोबडे बोल आम्हांसी । लागते फार प्रियकरे गोड जिवासी आदरें । आदरें कधीं गे नेसी सांग सदनासी ॥ चाल ॥ तूं सासुरवासी नार । कर गड्ये मनीं विचार । दे रात्रीं चारी प्रहर । लुटवी ज्वानीचा बहार जाईल ही काया ॥ साजणी ॥ २ ॥ बीन केल्याविण या जनांत भरम पडला । साजणी तुझा ग नाहीं अजून संग्रह घडला । तुजपासीं फार प्रियकरे हेत जडला । तुजवरून हा जीव प्राण टाकीन करून खुरबाण । नारी तुझ्या गळ्याची आण । होईन तुशीं बैमान । येईन निज ठायां ॥ साजणी ॥ ३ ॥ असें ऐकुन नारीनें तया सख्याशीं हस्तकीं धरून नेलें निज महालासी । चारी प्रहर भोग भोगिला राजविलासी ॥ चाल ॥ कवी राजगुणी सागर । इष्काचें पुणें आगर । ठिकाण शहर गुणी रायाचें ऐकाया ॥ साजणी ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १११ ॥

चाल— नको कुठं जाऊं उभी राहून करून साज ॥ — सगन.

हृदयकमळनाभा । नमीं सुतेज वदना । पाहून प्रतिमी धुंद रती मदना ॥ ध्रु० ॥ चालरीत साधा नमृत मोळा । लक्ष चरणावर भाव भोळा । इच्छितें सेवा नको मज द्रव्याचा गोळा । लगट तरिती मासा तोळा । लीन चरणांबुज प्रिय जाणती सुखसोहळा । सुगर सुज्ञ जाणती कन ओळा ॥ चाल ॥ पदीं देह वाहतें । वरखालीं पाहतें । निशिदिनीं चाहतें । हृदयसदना ॥ पाहून ॥ १ ॥ थोर नशिबाची मी भाग्याची देवा । झालें दर्शन संतोष जेवा । अल्पसेवेसी हजारींत हुजुर ठेवा । काय मज दुबळीचा केवा । दुष्ट दुर्जन ते निंदक करिती हेवा । मज पुतळ्या मोहोराच्या पेवा ॥ चाल ॥ सुज्ञ सुजाण । प्राण दिनमान । चेतला बाण । तनमदना ॥ पाहून ॥ २ ॥ शीतल मैलागर चंदन बुध सुगंधी । लुब्ध नागीण प्रीत समंधीं । पूर्वींच पूजिला होता ईश्वरनंदी । दृढ निश्चय भावेबंदी । अलड अपराधी अजाण हुकूम बंदी । नव्हे मतलबगरजी बिलंदी ॥ चाल ॥ कृपेची छाया । असावी माया । अहो प्रभुराया । सौख्यधना ॥ पाहून ॥ ३ ॥ अगर सौदागर पर्वत उपकाराचा । सीतळ कल्पवृक्षाचा छत्राचा । प्रीत आवडीचा । संधुक शृंगाराचा । सोरोमणी नवरत्न हाराचा । जळनिधी सिंधुवर तारु उताराचा । भरंवसा पैल पाराचा । मार्तंड म्हणे सारांश अर्थसाराचा वर्षला प्रजन्य गाराचा ॥ चाल ॥ लोभ मनीं असो । हृदयीं ठसो । निरंतर असो । सुखी तव रणकंदना ॥ पाहून ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ११२ ॥

चाल—अरे माझ्या चोचल्या उभी साळू मुख पाह्या ॥ — सगन.

देउनी इमाना कापी माना दुसमाना । अरे क्रियानष्टा दगलबाज बैमाना ॥ ध्रु० ॥ येतों आतां मी पुन्हा मागल्या पाईं । बोलुन गेला दिली

बुडी कोण्या ठाईं । बऱ्या मुलथापा करुं सिकलासी कांहीं । नवीच कीं होती जुनी कोणती गुणमोहना ॥ देउनी ॥ १ ॥ नको तूं बोलूं सख्ये खरी चुकी जाहली । काल घरीं स्त्री ती ऋतुवंती नाहाली । तिला भोग देतां बहु अपरात्र जाहली । येतां नये सोडुन मोडुन शास्त्र प्रमाणा ॥ देउनी ॥ २ ॥ हारतुरे सारे सेज फुलाची । सुकलीं तीं पानें पाहा तबकीं विड्याची । येणें नवतें तरी कां केली निराशा मनाची । वाट पाहूं उदय झाला दिनमाना ॥ देउनी ॥ ३ ॥ पुरे नको बोलुं आतां शपत गळ्याची । आढी सोड सारी गडये मोकळ्या मनाची । गेला कल्प उभयतांस प्रीती आनंदाची । कवी मार्तंडाचे छंद जैसे तीर कमाना ॥ देउनी ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ११३ ॥

चाल— काय गोड बोलणें भुजवर चालणें मुरवत ॥

— सगन.

मराठमोळा तुझा । जपुन चाल लोक छिनाल म्हणतील नको नारा उडवुं भुजा ॥ ध्रु० ॥ तुझे गुण सद्गुण ठीक । किती नारी संसारीं व्यवहारीं तुझ्याच शिकल्यासीक । तुझी चतुराला भूक । सोडुनी खटपट घरीं येते झटपट मग आनंद जीवास सुख । जगण्यांत कौतुक । सावकार सरदार किती सोडून घरदार चालून येती पाहती मुख । श्रवणीं पडेल कधीं मजा । किती बुडले वटी वसरी पडल कइकाची देवपुजा ॥ मराठमोळा ॥ १ ॥ रूपसुंदर चांगट । नाजुक डोळे लाल साजुक गोरे गाल वेल पवळ्याचे होट । गुणी तुजवर लंपट । होऊं दे फायदा वायदा नको करूं बेदा मैदा लूट । चौघी गडणी चांगट । सुरी उरांत नको मोर्गेश्वरांत कर कोंढणपुरीं शेवट । नाजुक पांखरूं धाकट । पहाटेची थंडी पडुं द्या हुंडी जुग मैना पोपट । दुर्गुण अवगुण तजातु भोळवट वर मळवट । घे भंदे जगदंबा भजा ॥ मराठमोळा ॥ २ ॥ अर्थबोध मावला

तुम्ही माझी एकजात आम्ही गडये नेकजात लाऊं शिंगी पागेला । वेळ वरभ चांगला । गुण गहिना । अजून कां होईना । दीड महिना लागला । जीव लई वैतागला । होऊं दे स्वार बे बहार वारफार करगार शीण भाग भागला । नाहीं मोळ्यामधीं मजा । साकार चपाती मनीं होत खात पडुं दे कर मोळा बाकी वजा ॥ मराठमोळा ॥ ३ ॥ प्रीत करून गांठला । नार भरांत शेत सरात हरात मद घरांत माठला । चुकली होती वाटला । चौना चोचला मजल पोहोंचला गोडसा वाटला । प्रेम मोहो दाटला । मनोमय पटल आटपल खटल सारा मजकुर आटला । नाहीं मोळ्यामधीं मजा । मार्तंड म्हणे अखंड श्रीसद्गुरु हृदयांतरीं भजा ॥ मराठमोळा ॥४॥

## ॥ लावणी ॥ ११४ ॥

चाल—शाम भई राम तुझे आराम करेगा ॥

—सगन.

सकी शाम चले मथुरा नंदनलाल दुलारे । रोरोब्रीजवाला सबहाक पुकारो ॥ ध्रु० ॥ भई पुकार मार रामकिसन कुंस बुलाये । आजी अक्रूर सकी आनन यदुनाथ चलाये । यंव सुनके सकी ब्रिजकी सवी मोहन मिलाये । चार वोर घेर बिचराम मुरारे ॥ सकी शाम ॥ १ ॥ कोई वाग पकड घोडे खडे कानमनाती । कोई छाती पिटे बाल छुटे खैचतनाती । कोई कदमो परसीस धरे सीजद सुनाती । अक्रूर दे दान सवो पल्ले पसारे । सकी शाम ॥ २ ॥ नहीं अक्रूर तूं क्रूर किने नाम दिलाया । क्या सरबतके मीसरींगे जेहेर पिलाला । जरदलाल जले आंगार उपर सेज सुलाया । काट ल्ढे नाग मोरे आंग पुकारे सकी शाम ॥ ३ ॥ ब्रिजनाथ गये मथुराजन शोक लुटाये । कंसमार उग्रसेन शेहेर तरष्ट बिठाये । बाळा बहिरू कहे उद्धव सब शोक मिटाये । मार्तंडके छंद खुबसी ध्यारे आलम देख खडे चक भये सीस झुकारे ॥ सकी शाम ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ११५ ॥

चाल—लाडक्यावाणी मुका घ्यावा ॥

आसन आरशांत करून दावा । मम म्हणून देह तृप्त आज व्हावा ॥ ध्रु० ॥ नार लव्याची मिठी गळ्याची । मोहित प्राणविसावा ॥ आसन ॥ १ ॥ टेकुन चवडे । उचला आवडे । आधर झेलून वर लावा ॥ आसन ॥ २ ॥ जुगुन जव्याला । हात खव्याला । निजल्या पेच जडावा ॥ आसन ॥ ३ ॥ मार्तंड म्हणे ती । ही विष्क गणती । सुगर जाणे सुगरावा ॥ आसन ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ११६ ॥

चाल—काय करूं सखे बाई मजवर पर्वत कोसळला ॥ — सगन.

जळो जळो बापमाये । जो कन्येचा धन खाये । अनाथ कन्या गाय । तिला जेथें घाला तेथें जाय ॥ ध्रु० ॥ प्रथम शाळेमधें गेले मेहते पंतोजी पुढें जाव । वर वर लेखण फिरवुन ओनामा केला ठाव । कसें जोड अक्षरें लिहिला हा कोरा ताव । शाई न फुटतां खेळ चौऱ्यायसी मी शिकले डाव । ती चटक लावुन आवल्या गेला टाकून नांव । आइन युद्धसंग्रामीं मोडलेली रथाची अडला धाव । नारायणांनीं धरले गर्दभाचे पाय । अशोक वनीं सीता शोकें रुदन करी धाय धाय ॥ जळो जळो ॥ १ ॥ जानकीस वनवास तसा कां, हा मजवर वखत । मावुष्य गेले दसती शरीरीं दिसे हास्ती फक्त । छत्रपतींविण हीन दिन दिसें सातारें तखत । कसें ईश्वरा दुधामध्यें त्वां कालविलेंस रक्त । देवाल्यामध्यें देव असल तर अधिकारी भक्त । प्राप्त नाहीं मेवा देवा केली सेवाशक्त । विषयमेष घेऊन देशोदेशीं मन जाये । ज्योत न लागे बोतन ज्यानें परक्याला काय ॥ जळो जळो ॥ २ ॥ पिता नव्हे तो वइरी पूर्वजन्मीचा कळला । त्याचा भरला वोटा हुंडा तो मजला फळला । पती वृद्ध मीं उपवर जल्म जाईल

कसा जळला। कन्येचें धन खाई त्याचा ना जाई नरक टळला। वृद्ध पती तरी कळस माझा न जावो ढळला। नरा कुंजरा म्हणतां अंगुष्ठ धर्माचा गळ्ला। सावित्री सत्यवान उठवी यमधर्म साथ। तसें सत्त्व या कलीमधें कुठें माझ्या मधीं आहे ॥ जळो जळो ॥ ३ ॥ भौमेस नोषध औषध म्हणून दिली रक्षा। झाली भेट करी पलंगीं आज्यान वृक्षा। शृंगी देई श्राप परीक्षी ती डौंस करी दक्षा। शुक सांगे भागवत आळी निंबे बोरामधीं भक्षा। वृद्ध त्रिनेत्रासी कन्या कसी दिधली दक्षा। मार्तंड म्हणे पुढील यश आपेश न कळे नक्षा। दामू नागू म्हणे स्त्रीचें दैवत पतीचे पाय। ताकापुरतें रामायण गोंधळे आमुचे शिकुन गाय ॥ जळो जळो ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ११७ ॥

चाल—सदा खंडेरावमहाराजांच्या चरणीं ॥ — सगन.

दूर कर मोहना राणी काय शिंदळिया प्रसंग। घरस्वामी सोडून सती गेली परपुरुषासंग ॥ ध्रु० ॥ दिल्ली शहरचा बघु पंचि स्वरुपानें सरस। मायबापाचा राग धरुनी आला माझ्या नगरास। शीतल चंदन छाया पाणी त्या बारवेचें सरस। आली मोहना पाणिया पाहुनि चंचळ झाली त्यास। घरीं आणिला परपुरुष संपादुनी आपल्या सासूस। चारी प्रहर भोगिल्या भोग मन केलें संतोष ॥ चाल ॥ वाटे लाविला दिला घरस्वामीचा लोभास। केवड्याचे बनी तिच्या पतीनें वधिला तो परपुरुष। घरीं कळलें मोहनीला तिनें मन केलें उदास। आली केवड्याचे बनीं मेळउन चंदन-काष्ठास। सती निघाली जळून गेली जन कीर्ती सांग। दोन्ही कुळ्या बुडविल्या घराचा केला घरभंग ॥ दूर कर मोहना ॥ १ ॥ प्रधानाची नार कुपात्रा ऐका गुणवंत। पंचारती घेउनि आली गोसाव्या मठांत। ओवाळु-निया म्हणे अवधुता मज द्यावा रुत। तो गोसावी म्हणे नाहीं आम्ही आहेव भोगीत। फिरली नार माघारी मारिला पलंगावरी कांत। खुशाल जाली आली गोसाव्यापाशीं हरुषांत ॥ चाल ॥ तेव्हां गोसावी म्हणे नाहीं

आम्ही विधवा भोगित । केली शंखध्वनी नारीनें येऊन मंदिरांत । पती मारुनी सती निघाली पहाटच्या समयांत । राजा विक्रम पाहे चरित्र हिंडुन नगरांत । निवडावती जाउन देती गवंड्याला भोग । जाली हो दैना मैना राघोला सांग ॥ दूर कर मोहना ॥ २ ॥ पतिव्रता कामिना म्हणावी राणी सुलोचना । रणीं वधिला इंद्रजित येउनी भुज पडिली आंगणां । निर्जीव-हस्तें अक्षरें लिहिलीं पत्रीं लेखणा । शिर नेलें म्हणुनि भुज धाडिली धड पडलें रणां । गहिंवर संगें रडती पक्षीकुळ तोते मैना । चित्रशाळेमधीं कीं अबळा करिती रोदना ॥ चाल ॥ श्रीरामाच्या आली दळामधें चालुनी कुळांगना । हासुनिया शिर करीं घेतलें चुंबितसे वदनी । धड शिर भुज मेळउन पतिव्रतेनें रचले दहना । बसुन विमानीं जळुनी दोघे गेले निज भुवनां । शतकोटी रामायण युद्धकांड हा प्रसंग । दंतकथा सांगती गोंधळी खाउनिया भांग ॥ दूर कर मोहना ॥ ३ ॥ दुसरी पाहा पतिव्रता नळ-रायाची दमयंती । अनुसयेनें जिता विमानीं कसा नेला पती । विलंब होईल ग्रंथ शोधितां कथितां या कीर्ती । परनारीच्या पाईं मारिले गेले अतीरथी । घरस्वामी सोडुनी नारी जया परद्वार करिती । कुंभपाक पचती ज्या स्वधर्म बुडविती ॥ चाल ॥ नागेशवेळचे कवि बोलले भारती भगवे । झेंडे निशाण शोभा चंगावर देती । शाहीर कोडगे गपा टपा नित्य रांडामधें गाती । तेडी बाकी पगडी फाटकी समले सोडिती । महादू विश्वनाथ वरकस त्याचा अभंग । शेहेर पुण्याचा कवि गातो ऐकुनि जाहले दंग ॥ दूर कर मोहना ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ ११८ ॥

हा छेलछबेला गुरजरचा रहिवासी । पती जातो प्रवासी देशविदेशीं । मनीं धरूनी उदासी या वनवासी । निजदासी त्यजून सदनासी अशा समयाशीं ॥ ध्रु० ॥ कोणी कर जोडून प्रार्थना करा गे तयाशीं । मी लुब्ध रूपासी सखये त्याशीं । खुरबान जिवासी प्राण गहाण त्यापाशीं । हा

प्राणसखा लावण्य गुणाची रासी । स्नेह घडो आशाशीं मी सुखवासी । पती पदकमळाशीं मानून प्रयाग काशी । चेतला मदन आग जाली या शरिराशीं । कधीं येती घराशीं राजविलासी । सारांश सख्याशीं अंतरलें पायाशीं । जीव कंठीं जशी गुंतली मधामधें माशी ॥ पती जातो प्रवासी ॥ १ ॥ पति जातो उद्यां हा वृत्तान्त ऐकोनी कर्णीं । श्रम अंतःकर्णीं हे प्रियकर्णीं । त्या दुःख मनीं ठाव देईना धर्णीं । निर्दोष दासी मी सेवेशीं अनुसरणी । नवी नाजुक तरणी परी विस्मरणी । स्वामिच्या चरणीं नसून लागलें झुरणी । माया चिखली सांपडली निघेना हरणी । ही विपरीत करणी गडे मैतरणी । कोण सवत मिळाली ठगणी सांग मनधरणी । काय करूं सुचेना न पडे चैन मनाशीं ॥ पती जातो प्रवासी ॥ २ ॥ घरीं धन दौलत अनकूळ असतां सारी । सौभाग्यें विहारीं गेले परभारी । टाकुन घोर कांतारीं दुःख अंधारी । प्रस्थानीं सख्यानें केली सर्व तयारी । गडे उभ्या दुपारीं कोण निवारी । कंठूं मी दिवस संसारी कोणाचे आधारीं । प्रार्थिला पती एकांतीं बहुत प्रकारीं । राहा एक विचारीं निज व्येव्हारी । नका भोगूं सख्या परद्वारीं पराची नारी । बहु याचपरी बोधितां न ये ध्यानासी ॥ पती जातो प्रवासी ॥ ३ ॥ जा जा गे सख्यांनो स्वामिला विनवावें । परमुलखीं न जावें गृहीं फिरवावें । पती येण्याचें ठरवावें यश हें घ्यावें । इतक्यांत आलें मंदिरांत कांत स्वभावें । परमेश्वर पावे सखे मग धावे । पती हृदयीं आलिंगूं भावें पुढें सरसावें । निजकरीं सख्याला धरून म्हणे आज राहावें । मनीं रुष्ट न व्हावें महालीं चलावें । मज चार दिवस भोगावें सुखें नांदावें । गातो रामचंद्र कवी अशा विषयरसाशीं । पती जातो प्रवासी ॥ ४ ॥

## ॥ लावणी ११९ ॥

श्रीमंताचें तक्त पुणें खुषवक्त नमुना बाई । चल पाहूं कन्हयाराव राजेंद्र सवाई ॥ ध्रु० ॥ अपूर्व महाल मंदिर उंच गोपुर हवाशीर कैसी । पुण्यशील

नगरी दिसे द्वारका जैसी । कांहीं सांगूं तेथील मजा वर्तती प्रजा आनंदें लेसी । सगरी नगरीं मज न दिसे नेत्रे ऐसी ।। चाल ।। ठाईं ठाईं चवकी पहारे करूनी परभोरें बंदोबस्ती । चौघडे की झडती द्वारीं राजदरबारीं नित्य प्रहस्ती । सुखी हाली मवाली सदा सधन संपदा घरोघर पाही ।। चल पाहूं ।। १ ।। गोकुळ वृंदावन मथुरा प्रयाग काशी । अटक कर्नाटकचे लोक हर भासी । एके ठाईं झाले जमा नसे उपमा तया शहरासीं । बावरा मुशाफर बनसी कुठील रहिवाशी । हार कंठीं कानीं चौकडा फंदी फाकडा सगुण गुणराशी । हरिद्वाराहून आले पुणें शेहेराशी ।। चाल ।। जरद्या घोड्यावर स्वार शिपाई सरदार तो छेल छबेला । मस्तकीं फुलाचा तुरा शिपाई झुरा इष्की रंगेला । पौर्णिमेस तारांगणीं जसा बाई गगनीं चंद्र उदेला । हे भगवंताचे लाल सदा खुशियाल न्यूनता नाहीं ।। चल पाहूं ।। २ ।। केवळ रत्नाची खाण सुस्वरूप दिनमान राजबीज पुतळा । मध्यभागीं आपुण भोंवत्या नाटकशाळा । शृंगार करुनी कामिनी नित्य अवध्याजणी मिळूनी वेल्हाळा । एक आपल्या हातीं एकान्तीं चुरिती पदकमळा । एक आजूबाजू एक सन्मुख घाली डोळा । त्या मुशाफराच्या संगें भोगिती सोहळा ।। चाल ।। एकीहून एक देखण्या हिरकण्या स्वर कोकिळेप्रमाणें । एक दिवाणखान्यामधें आनंदें मंजुळ गाती गाणें । एक आनंदांत डोलती एक विनोद बोलती गोजिरवाणें । दाउनी आपआपुल्या खुब्या सभोंवत्या उभ्या करुनी चतुराई ।। चल पाहूं ।। ३ ।।

## ।। लावणी कृष्णाची ।। १२० ।।

चाल—( भूपाळी ) घनःशाम सुंदरा श्रीधरा० ।।

आवरी आवराया श्रीरंगासी । यशोदे ग माय ।। ध्रु० ।। आम्ही गौळणी बरवंटी । जातों मथुरेच्या हाटीं । येउन धरितों आमच्या वाटा ।। चाल ।।

१ पतिव्रता. २ बाजाराला.

नानापरी चेष्टा करितो गे । मार्गी बैसुनी । जाउनी पदरासी धरितो गे । आडवा होउनी । हस्त टाकी हृदयावरी तो गे । धरी कुचाग्र दोन्ही । ऐसा नटनाटक श्रीहरी तो गे । या गोकुळ भुवनीं ॥ चाल ॥ लज्जितकणी यशोदेमाय । हें तुजला सांगावें काय । करीं धरितांना तव यदुराय । दुडदुड दुडदुड पळुनी जाय ॥ चाल ॥ पाहे लवलाहें वृजेवनीं तो । कळंबावर गे । मुरली मंजुळ सुश्रवणीं तो । ऐकवितो अंबे । अवघे मार्गावर घेउन तो । गोपाळसंगें ॥ चाल ॥ माठें फोडुनी दहींदुधलोणी । सर्व भक्षुनी जाई ॥ आवरी ॥ १ ॥ दुसरी गौळण म्हणे निकरानें । जीव त्रासविला तुज कुमरानें । यशोदेपासीं सांगे गाऱ्हाणें ॥ चाल ॥ तुझिया नगरांतूनी जाऊं गे । दूर देशोदेशीं । आपल्या आबरुनें राहूं गे । आम्ही सासुरवासी । खोटा पैसा देऊं गे । अदलुन हाकमासीं । स्वैस्तिक्षेमाची पाहूं गे । वस्ती राह्यासी ॥ चाल ॥ हरि गोकुळीं नंदाचा नंद । नूतन नूतन करितो छंद । किती सोसावे फंदें । नवनीत भक्षून अनाथकंद ॥ चाल ॥ हृदईं सुछंद वाटतो गे । परसदनीं जाया राधेनें केला आचाटतो गे । मुखचुंबन घ्याया करणी करितो बहु आचौंट तो गे । हें नये सांगाया ॥ चाल ॥ गोपविलासी तो हृषीकेशी । श्रीरंगासी करुणा कैसी नाहीं ॥ आवरी ॥ २ ॥ तिसरी गौळण म्हणे ते वेळीं । कृष्ण सांवळा हरी वनमाळी । धरी कवटाळुन करी धुमाळी ॥ चाल ॥ यमुनेजळीं जातां श्रीरंग । चुंबितो वदना । कैसा लावित सुटला नंग । पतिव्रतेपणा । करूं नये ते करितो बेढंग । हा मुकुंद कान्हा ॥ चाल ॥ कंसापासीं सत्वर जाऊं । मथुरा नगरीं बांधुन नेऊं । शीघ्रगतीनें अभ्रू घेऊं । जीवपद कमळीं याच्या ठेवूं ॥ चाल ॥ दंड पडला जो तो देऊं । या मिळुन सर्वत्रां । शिक्षा आपल्या हस्तें लावूं । कमलोद्भवनेत्रा । त्राहे त्राहे जाला हा जिउ । या गोकुळक्षेत्रा । हा कंसारी नंद-

१ सोंगाड्या. २ गोकुळांत. ३ रांजण. ४ सुखाची. ५ चावट. ६ अद्भुत. ७ कंसशत्रु कृष्ण.

खिलारी यमुनेतिरीं धेनु चारितो गाई ॥ आवरी ॥३॥ चवथी पांचवी म्हणे करीं धरिलें । नवनीत भक्षुन सिंक्यावरलें । मम स्नुषांचे जोबन चुरले ॥ चाल ॥ भरले नेत्र बाई श्रीहरीनें । मृत्तिका टाकून । ठेविलें होतें म्यां युक्तिनें । दहिंदुध हें झांकुन । घेतो करकमळीं । आवडिनें बाई पाहतो चाखुन । हास्य वदन करी प्रितीनें तो तुजला देखुन ॥ चाल ॥ ऐसी करणी करितो थोर । बाछाइतका हा नट चोर । तुजला दिसतो लहान थोर । रात्रंदिवस हा जिवास घोर ॥ चाल ॥ करीं दोर बांधुन जरी ठेविसी । तरी गुणनाटकी । ब्रह्मादिक वर्णिती ज्यासी । कळसूत्र नाटकी । सातागवळी नित स्मरणासी । हरिगुण नाटकी ॥ चाल ॥ रक्षी लाज भक्तकाज शरणांगत आज । बाळा बहिरू गुण गाई ॥ आवरी ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १२१ ॥

चाल—गृहीं चला जरा मज कमळिणीच्या हरा ॥ —सगन.

तुम्ही सजण सुजाण घ्या आदराचें पान । मज दुबळीचा राखा स्वामी मान ॥ ध्रु० ॥ तुम्ही कां रुसलां काय चुकलें मी सेवेला । प्रतिपाळ तुम्ही आजवर माझा केला । नाहीं कधीं रे मला शब्द दुःखाचा दिधला । येकायेकी निष्ठुर कां हो जहालां । म्यां धीर धरला कंठीं प्राण उरला । या प्रीतीचें हें दुःख सांगूं कोणाला । तुम्हांसाठीं करीन जिवाचें रान ॥ मज ॥ १ ॥ त्वां सजणारे कसी लाविली माया । अर्पण तुम्हांसी केली माझी काया । तुमची आमची जाहली इमान क्रिया । झड घातली म्यां बळकट तुमच्या पाया । तुप साकर भात नित्य वाढीन जेवाया । अंतर नका मज स्वामीराया । धन संपत हा जीव प्राण करीन खुरबान ॥ मज ॥ २ ॥ दो दिवसांत कसी तोडितां प्रीत । ही सजणपणाची ऐसी नव्हे रीत । नरदेहांत या माणुसजन्मांत । ना चिंतावा कोणाचा घातपात ।

१ सुनांचे. २ माती.

धन संपत देईल श्रीभगवंत । संसारघडी हे निर्जीव नाशवंत । हाण मृत्यु लाभ नाहीं कोणा आधीन ॥ मज ॥३॥ जैसें यावें तैसें निधना जावें । हा भ्रांतिदशेचा मोडा निज ठावे । मनशांतीचा ऐकोन बोध व्हावें । मग प्राण पतीचा गेला राग सर्वे । बाळा बहिरू म्हणे आतां समजावें । हा राग घडीचा याचें काय घ्यावें । सख्ये सजणासी नको होऊं बेमान ॥ मज ॥४॥

## ॥ लावणी ॥ १२२ ॥

चाल—तूं रत्न माझें गुणी सद्‌गुणी त्राळपर्णीचा गडी ॥

— सगन.

हे नेत्ररमणे सख्ये गुणनीके रात्रौ चौथे घडी । उघड मागल्या द्वाराची कडी ॥ ध्रु० ॥ दीपसमयासी तव स्वरूपासी । आम्ही गड्ये पाहुनी भ्रमांत झालों कीं आपले मनीं । डुलत झुलत चालणें गजगती । पद ठेविसी मेदिनीं । सुबक नाजुक कंबर देखणी । कटीं कसला दीडमजला शालु । बहु आरवा पैठणी । कंचुकी तटतटीतसे स्तनीं ॥ चाल ॥ तारुण्यदशा मुख चंद्रकळा टवटवी । सुकुमार अंग नूतन नवी । हा मदनबाण चेतला आमचे जीवीं । सर्व आंग रवरवे गमेना तुजविण मज पळ घडी ॥ उघड मागल्या ॥ १ ॥ सकुमरा सख्या सुंदरा कसे याल तुम्ही तरी । पिता माता बंधु मंदिरीं । मुंगीस होइना वाट असी जप्ती आहे मजवरी । रक्षिती भावजय परोपरी । तुम्ही तर इष्कबाज मोहिलें मजला मधुरोत्तरीं । सिधी न्या मसलत सख्या बरोबरी ॥ चाल ॥ एक विचार सुचला आहे माझे मानसीं । सांगतें गृहीं भूतबाधा जाहली मशीं । मी सर्वां देखतां अगदींच होतें पिसी । ब्रह्मचारी पंचाक्षरी होऊन तुम्ही यावें तांतडीं ॥ उघड मागल्या ॥ २ ॥ ती नटनागर सुंदर मातेप्रती सांगती । झाली भूतबाधा मजप्रती । काळीज धरिलें आहे भूमीवर आंग ती टाकिती । पिता माता बंधु धांवती । गेली कुची रस्त्यांनीं जाउन पंचाक्षरी पाहता । तेथें एक उभा घेउन

छडी हातीं ॥ चाल ॥ कर जोडून तेव्हां बंधु तयासी पुसे । तो म्हणे ब्रह्मचारी पंचाक्षरी असे । धरी चरण बंधु मग गृहाप्रती नेतसे । भुतबाधा झालीसे इजला करा झाडनी या घडीं ॥ उघड मागल्या ॥ ३ ॥ श्रेष्ठासनीं नेऊन बसविला खोलींत पंचाक्षरी । दाविली तयाप्रती सुंदरी । म्हणे पंचाक्षरी आहे पिशाचमळा इच्या वरी । म्हणोन ही होतसे घाबरी । छडी मारून भूमीवर लाउन कवाड स्वस्थ बरें घेतली सुंदरी मांडी ॥ चाल ॥ मग पाहती एकमेकांशीं आनंदमय । उडविला रंग उभयतां होऊन निर्भय । उघडून कडी द्वाराची झाली सय । गर्जुन सांगे भूत आंगीं परतुन न ये । बाळा बहिरू म्हणे अशा ह्या प्रीतीच्या परवडी । असी ही नट चंचल फाकडी ॥ उघड मागल्या ॥ ४ ॥

## ॥ लावणी १२३ ॥

चाल—कोणी आणा साजण धुंडुनी । टाकिलें वनीं ॥ —सगन.

साजण गेले टाकून काय म्हणउन । पत्र धाडा लेहून त्याज कारण ॥ ध्रु० ॥ डाग हळ्हीचा लाउन गेला । फार दिवस जहाले बाई त्याला । कोणे गोष्टीचा राग धरियेला । एकाएकी निष्ठुर जहालां । जी म्हणे कामीन ॥ पत्र ॥ १ ॥ सेज पलंगावर बाई म्यां केली । रात्र वैऱ्याची मजला गेली । शेज पुष्पाची सुकुनिया गेली । पाहते मंदिरांत मी भंवतालीं । जी त्याजवांचुन कवटाळी खांब जाउन पती म्हणवुन ॥ पत्र ॥ २ ॥ कधीं हा भेटेल प्राणपती । घडोघडीं मजला वैऱ्याची जाती । धीर जीवाला देऊं किती । कोणी भेटवा प्राण संगती जी । त्याजवांचून आकांत करी कामीन गुण आठवुन ॥ पत्र ॥ ३ ॥ आला नारीचा प्राणसखा । देव पावले तिच्या दुःखा । शेज पलंगावर बसली सुखा । बाळा बहिरू कवेश्वर ऐका जी । सवाई गायन धोंडी सुभाना बोले वचन । गाई मजेनें । रावळ गेले दपकुन । लुंगे पळुन ॥ पत्र ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १२४ ॥

चाल—तुजवर आमची प्रीत कशी तुज ठावे आहे कीं ॥ —सगन.

बहुता दिवसा मज दुबळीवर पायधुळ झाडली । वाकडी वाट कोणीकडे केली ॥ ॥ ध्रु० ॥ बहु प्रीतीनें मनापासुनी माया लाविली मला । तुम्हांसी हा जीव अर्पण केला । भर नौतीचा रंग नौतीचा लुटुन तुम्ही घेतला । नष्ट बैमान कळुनिया आला । देया घेयाची लालुच तुमचा हेत नाहीं ठेविला । झोंबलें नाहीं कधीं पदराला ॥ चाल ॥ सात्त्विक तुमची मर्जी । हा जीव तुम्हांस झाला राजी । मजवर कां करितां इतराजी । असी काय चुकी मजपासून जाली । पाट बसकर बसाया घाली ॥ बहुता दिवसा ॥१॥ तुम्ही सजन सख्या गुणीरत्न पाहुन पडलें तुमच्या गळां । तुम्ही चालवा प्रीतीचा ळळा । माया लावली मला कसा केसानें कापितां गळा । आतां पदरासी घालीन पिळा । गोड शब्द ऐकून तुमचे माशी लुब्धली गुळा । किती गुण आठवूं वेळोवेळीं ॥ चाल ॥ काय करूं मी आतां । घडोघडीं मजला विस्मत नौता । वेळांतुन तीनदां येत होतां । कोण्या सौतीनें तुट पाडिली । जीवासी चटपट लागुन गेली ॥ बहुता दिवसा ॥ २ ॥ गुणगंभीर गुणसागर चातुर भले लोक दिसतां । तसे दुबळीला अंतर देतां । लबाड लटके तुम्हां ठाउके गुण अवगुण जाणतां । दोषहीन अपराधी लावितां । वेडेंवाकुडें काय पाहिलें आंगीं लावितां पत्ता । तुम्ही बोलाया आहे सत्ता ॥ चाल ॥ कां करितां जन चार । माझे शिरीं तुमचा उपकार विनंत्या करितें वारंवार । आस्त्रीची जात इमानी भली । नाहीं पुरुषाच्या बोलींत बोली ॥ बहुता दिवसा ॥ ३ ॥ बहुता दिवसा आला घराशीं घ्या पानाचा विडा । पुढे ठेवीन लवंगाचा पुडा । आजची घटका उद्यां येईना करा जिवाचा धडा । संसार पाण्याचा बुडबुडा । बहु प्रीतीनें नार खोवी मुंडाशांत केवडा । रावजी राग मनाचा सोडा ॥ चाल ॥ मनाशीं मन

मिळालें । बाळा बहिरू कवीश्वर बोले । सखया सजणाशीं समजाविलें । सुंदरा मनीं हरुषली । आशावंतीची आशा पुरविली ॥ बहुता दिवसा ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १२५ ॥

आस्त्रीप्रलयंगता तुझी ग बुध नाहीं कामाची । आलीं धन्याचीं पत्रें आम्हांला जलदी जाण्याची ॥ ध्रु० ॥ या लष्करची सुखसाजणी न ये ग सांगाया । आहे धन्याची दया आम्हांवर कृपेची छाया । उठून ताजीम देती ठाव पंगतीचा जेवाया । पोऱ्या खिसमतगार कोतवाल घोडा बसाया ॥ चाल ॥ स्वारी जपून चाले । नवुसे रंगीत भाले । बीटेपटेवाले । हात्ती बिनीवर चाले । नौबत वाजे कडाख्याची । नामज्यात शिपाई पुढें जिलीब गारद्याची ॥ आस्त्रीप्रलयंगता ॥ १ ॥ करनाटकची स्वारिस होतों श्रीमंता-बरोबर । रणसंग्रामीं झटुन आंगीं केली तलवार । ढिगांतुन फटके आम्ही शिपाई रणशूर । झाडीमध्यें पिटून घातला लुटून हैदर ॥ चाल ॥ पाहून मनीं चटका । म्हणती त्याला हाटका । शिर पाव द्या जरीपटका । चवरी अबदागिरी बक्षीस कंठी मोत्याची । आंवदाची बोली येक पालखीची ॥ आस्त्रीप्रलयंगता ॥ २ ॥ पूर्वीपासुन नक्षा चालत आला वडिलाचा । आणीबाणीच्या वेळीं विडा उचलिला पैजेचा । कटुन मरावे खरे असा धर्म क्षत्रियाचा । कसे राहा म्हणतीस घरीं डाग लागेल जन्माचा ॥ चाल ॥ नाहीं असें कधीं घडलें । यास्तव येणें पडलें । न कळे कांहीं पुढलें । होईल गे इतराजी आबरु आमची । बाकी साकी गुंतून राहिली साल मजकुराची ॥ आस्त्रीप्रलयंगता ॥ ३ ॥ करुनिया मनसुबा निघाले मग नगरांतून । प्रातःकाळीं सहा घटकेचा मुहूर्त पाहून । घर पागाहि तैयार केली मोठे हौशीनें । चौकोसावर मुकाम केला लौकर जाऊन ॥ चाल ॥ कवी म्हणे बाळा बहेरू । गुणीजन सजन हे तरू । नाथपंथ्याला बहिरू धोंडी बापू गुणी म्हणे लावणी ही मनीं रामाची । ज्ञान वळीची फते तलवार रेवडी रावळाची ॥ आस्त्रीप्रलयंगता ॥ ४ ॥

## ।। लावणी ।। १२६ ।।

कुठील मुशाफर कोठुनी आला कोठील रहिवासी । उभे राहुनी बोला मजशीं ।। ध्रु० ।। कोण देश मुलूख तुमची कोण ग्रामवस्ती । सुंदरा मुशाफरा पुसती । लक्ष मनुष्यामधें आकृति राजबीज दिसती । प्रकाशे गगनीं गभस्ती । नवी नवती तारुण्य स्वरूप लावण्यकळा सजती । राज-अंबिरा दिसे धजती ।। चाल ।। काय वखत पडला शिरीं सख्या झडकरी सांग तरी मजला । सुहास्य वदन गुणी जना सगुण सज्जना प्रार्थितें तुजला । घेउनिया मनांत भेष तुम्हीं आपदेश कशास्तव त्यजिलां ।।चाल।। धनद्रव्याची मनीं आस तुला असल्यास सांग जिवलगा । हिरे रत्न मुक्त माणिक द्रव्य आणिक सुवर्णिक नगा । ताजव्यांत बसून तोल तुम्हां संतोल सांगतें बगा ।। चाल ।। तुम्ही चला राजमंदिरीं हो सुंदरा विनंत्या करी । माझी कुसुमकांती साजरी हो जळो तुमची मुशाफरी ।। चाल ।। तुम्ही गेल्यावर कुठें धुंडीत जाऊं जी जी । गुणी रत्न तुम्हांसारिखें कुठें मी पाहूं जी जी । करूनी सोळा शृंगार कोणाशीं दाऊं जी जी ।। चाल ।। कोमळ वदना करितें तुमची अर्जी राव जी जी । प्राणाशीं प्राण देणार नव्हे आपगर्जी राव जी जी । तुम्ही कांहीं ममता ठेवा मजवरते राव जी जी । ।। चाल ।। मम प्रियकर गुणीवंता ।। चतुर चातुर्य लक्ष्मीकांता । स्वरूप सुंदर मी कोमळ कांता ।। चाल ।। धरुनी करकरमळीं करितें आदर । तुम्ही करा प्रीत मशीं सदर । धाउनिया धरिला पदर ।। चाल ।। झडी पडलें मी कमळण भ्रमरा केव्हां भोग देसी ।। उभे राहुनी ।। १ ।। म्हणे मुशाफर ऐक सुंदरी आम्ही राजबनसीं । छबेला वृंदावनवासी । गोकुळ वृंदावन मथुरा नगरी तेथील रहिवासी । आलों पाहून प्रयाग काशी । घडी घटकेचा गुण साजणी झालों प्रवासी । आलों ग या दक्षण देशाशीं ।। चाल ।। द्रव्याशीं नाहीं घरीं न्यून्य सर्वसंपन्न ईश्वरें दिधलें । आम्ही

भगवंताचे लाल सदा खुशियाल विषयरंगेले । कांचनी स्वरूप सुंदरी राजमंदिरीं बहु विलास केले ।। चाल ।। आमुची आमुच्या देशांत हाकम हुकमत कीर्ती गाजती । सदनांतरीं त्रिकाळ झडे द्वारीं चौघडे नित्य वाजती । श्रीमंत पदाचा डौल पाहुनी अनिमोल शत्रु लाजती ।। चाल ।। दैवानसार साजणी । घडला प्रवास या जनीं । घरीं भार्या सुलक्षणी । टाकूनी आलों दक्षणी ।। चाल ।। हत्ती घोडे महाल मुलुख परगणे जी जी । बाछाई नेमुन दिलें कीं वतनी ठाणें जी जी । चालती कीं रस्तो-रस्तीं दप्तरखाने जी जी । देतात उठून ताजिम बहू आदर मानें जी जी ।। चाल ।। पदरीं वडिलाचा लौकिक असून ऐसा जी जी । भरतरी गोपिचंदानें बघा तरी कैसा जी जी । आमच्या शिरीं प्रवास घडला ऐसा जी जी । सोडून राज्य हा योग घेतला ऐसा जी जी ।। चाल ।। आम्ही मुशाफर प्राणी । कनोजे ब्राह्मण हिंदुस्थानी । दखणी लोक येथील तुफानी ।।चाल।। जिवाशीं घात कराविशील बरा । हा इष्क-संग नाहीं बरा । तुम्ही नारी अगोचरा ।।चाल।। आणीबाणी पडल्यास संग घडल्यास निघून जासी ।। उभे राहुनी ।। २ ।। म्हणे सुंदरी मुशाफराला मी करितें अर्जी । विनंती ऐकावी माझी । अंतःकर्णापासून जालें मी तुम्हांस राजी । मग दुसऱ्याचा कां डर जी । जशी मोहनानें बटावसंगें केली इष्क-बाजी । सकळ जन म्हणती व्हावा जी ।। चाल ।। तुज पदकमळीं राजसा प्राण म्यां तसा रे. अर्पण केला । तुम्ही चला राजमंदिरा म्हणे सुंदरा मनीं कां भ्यालां । मी पडलें तुमच्या गळां चालवा लळा हांसून मशीं बोला ।। चाल ।। खर्चून द्रव्य अपार जरी जरतार वस्त्रभूषणें । घेउनी देईन तुम्हांस नित्य ल्यायास सव्या हौसेनें । शिरपेच कंठीं चौकडा शिपाई फाकडा तुला सजविणें ।। चाल ।। मंदिल बांधुन भरजरी । लघु पत्र केतकी शिरीं । पीतवर्ण गंध केसरी । नवरत्न पौंच्या करीं ।। चाल ।। शामकर्ण वारू सजऊन बहु सायास जी जी । वर बसून फिरा मिरवत अति

सायास जी जी । झुरक्यांत उभी राहूनि तुम्हां पाह्यास जी जी । माझे दृष्टी डोळे निवती बघून तुम्हांस जी जी ॥ चाल ॥ बाळपणीं पित्यानें सयंवर केलें जी जी । दिवसा मासा मी उपवर झालें जी जी । मज पती माझे टाकून छावणीस गेले जी जी ॥ चाल ॥ कुठवर धीर मी धरूं । किती तारुण्यदशा आवरूं । झालें शरीर झुरझुर पांजरू ॥ चाल ॥ जशी का अनिरुद्धाविण उखा । चीत चंचळ विषयसुखा । कवटाळिती खांब दुखा ॥ चाल ॥ ती गत मजला झाली पतां मी रे म्हणऊं कोणाशी । उभे राहुनी ॥ ३ ॥ म्हणे मुशाफर ऐक सुंदरी आपगरजेसाठीं । सांगसी तेव्हां ह्या गोष्टी । स्त्रीसंग हा नाहीं कामाचा जीवास हाण मोठी । लागली कळ बघतां पाठीं । परनारीची प्रीत जशी का विष सुवर्ण ताटीं । आदर करी धन असल्या गांठी ॥ चाल ॥ चातकी न परपक्षांत असा लक्षांत इमानी विरळा । मतिमंद व्यभिच्यारिणी लोक बारगळा । काय संग्रह त्याशीं करून असावें दुरून मुख विषगरळा ॥ चाल ॥ आम्ही दूरदेशी राहणार नाहीं इदबार कोणाचा धरित । हा पापलेप दुर्गुणी आम्ही सद्गुणी नाहीं भरणा करित । तूं नको करूं आग्रह नाहीं संग्रह कोणाचा करित ॥ चाल ॥ नाहीं संगत घडली जंवर । बहु ममता आहे तंवर । मनशांती पुढेंही आवर । कमळणीस प्रियकर भ्रमर ॥ चाल ॥ दूर होय बाहेर नको पडूं आमच्या छंदीं जी जी । या मदनगर्भिची आली मज धुंदी जी जी । आम्ही झुरे बावरे लाल मुशाफर फंदी जी जी । नटचंचळ मैना तूं दिसती बाजींदी जी जी ॥ चाल ॥ ममता लाऊन तूं नको करूं मनधरणी जी जी । तूं आस्त्री जात कौटाळीण करशील करणी जी जी । तुम्ही दक्षण देशी रांडा जादुगारिणी जी जी । म्हणून प्रीत कराया भितों अंतःकरणीं जी जी ॥ चाल ॥ आम्ही मुशाफर लोक । सखे तूं पातळ पुतळी फोक । नको मारूं नैनाची नोक ॥ चाल ॥ कशी इष्कामध्यें जाली गरक । धर मनीं बोध रे तरक । नको लाऊं जीवाशीं चरक ॥ चाल ॥ आम्ही लक्षाचे

मोहरे भितों आपुलें आबरुसी ॥ उभे राहुनी ॥ ४ ॥ म्हणे सुंदरी मुशाफराला कर वचनाचा मान । सख्या तूं मम कुडींतला प्राण । दक्षण देश आला सोडुनी आपलें हिंदुस्थान । म्हणून मी करितें तुमचा मान । फट म्हटल्यावर कोणी तिथें मी करीन आपली जान । तुमचें माझें हेंच इमान ॥ चाल ॥ बाछाई तक्त गुलजार दिसे रंग बहार पुण्याची वस्ती । श्रीकृष्णाची द्वारका कीं सुवर्णलंका नगरी दिसती । ठाईं ठाईं चवकी पहारे लागती परभारें कीं बंदोबस्ती ॥ चाल ॥ रावसाहेब आणि श्रीमंत लक्ष्मीकांत राजे भूपती । साक्षात विष्णु अवतार सर्व अधिकार लोक शोभती । सन्निध अष्ट प्रधान राखिती मान शत्रु कांपती ॥ चाल ॥ मम सदनीं प्राणेश्वरा । राहुनी राज अंबिरा । तुम्ही श्रीमंत राजेश्वरा ॥ चाल ॥ जाऊनिया मुजरा करा जी जी । चाकरी हुजरची धरा जी जी । तुम्ही जाऊन निष्ठा करा जी जी ॥ चाल ॥ करा दास्यत्व लक्ष लाउनी जी जी । अपार वर्त्रें दिधलीं कीर्ति पाहुनी जी जी । बाच्छाई मौजा करा येथें राहुनी जी जी ॥ चाल ॥ या पुण्यासारिखें क्षेत्र कोठें नाहीं । छपन्न देशींचे मनुष्य एक्या ठाईं । श्रीमंत पेशवे धनी ब्राह्मण बाछाई ॥ चाल ॥ हर जिनसी व्यापार । नांदती लक्षपती सावकार । मुक्त माणिक भरे बाजार ॥ चाल ॥ सख्या गुणीजना तूं मुशाफरा प्रियपाचूचा मनोहरा । तुम्ही चला राजमंदिरा ॥ चाल ॥ इथेंच ईश्वर देईल म्हणावें या द्रव्याच्या राशी ॥ उभे राहुनी ॥५॥ गोउनिया वचनांत मुशाफर तिनें महालीं नेला । आदर उपचार बहुत केला । उष्णोदक ठेऊन आरगजा उंची आणविला । उटणें चर्चुनि न्हाणाविला । दुग्धघृत पंचामृत अती रस सुरस पाक केला । भोजना प्रियकर बसाविला ॥चाल॥ परिपाक जाल्यावरी धरूनिया करीं हा चवथे ताली । घेऊन या सुंदरा प्राण प्रियकरा तिसरे ताली । भरजरी वस्त्रभूषणें आणि हौसीनें सगुण वेल्हाळी ॥ चाल ॥ उत्तम महिना फाग करा पोषाग तुम्ही जिवलगा । केशरी करुनिया रंग टाकितें बगा । शिरपेच कंठीं चौकडा पदकावर जडा

जसे देवीन जगा ॥ चाल ॥ वेळालवंगाचे पुडे तबकांत भरोनिया विडे । सुहास्य वदन आड जुडें । ठेविती ईश्वरापुढें ॥ चाल ॥ जाई जुई शेवंती फुलें कुसुंबी रंग लाली जी जी । मोगरा बकुळ मालती चंपा चमेली जी जी । अपूर्व तुरे हार गजरे गुंफुनिया घाली जी जी । रंगमहालीं मंचकीं बहु आरास केली जी जी ॥ चाल ॥ सखा चंद्र चांदणी बत्तीस लक्षणी नार जी जी । जेहनाबादीं पातळ बहु सुकुमार जी जी । लेउन जिनसवार जी जी । बहु हर्षे केला श्रृंगार जी जी ॥ चाल ॥ आलिंगन दिधलें बाळ बहेरूला ईश्वर म्हणे । मुशाफर फंदी भोगिला तिनें ॥ चाल ॥ गाई गुणी धोंडीराज छंद हिरा । हें कवन जडणी हिरा । उतरला हारी महादुचा तुरा ॥ चाल ॥ तुरा शीघ्र लाविला सासवडवस्ती रहिवासी ॥ उभे राहुनी ॥४॥

## ॥ लावणी कृष्णाची ॥ १२७ ॥

चाल— ( भूपाळी ) घनःशाम सुंदरा० ॥

सोडी आतां नेली रात्र श्रीरंगा रवि उदय झाला । अजुन तुला कंटाळा येइना झोंबसी पदराला ॥ ध्रु० ॥ कसें तुला वाटतें आधींच कीं मी सासुरवासी । बंदोबस्ती करून आलें चोरून तुजपासीं ॥ पतिच्या शेजारीं कीं निजविली सेवेची दासी । तो जागृत झाला नाहीं तों जाऊं दे मला ॥ अजुन तुला ॥ १ ॥ पहा माझें धारिष्ट केवढें तुजकडे आलें । अजुन तुझें मन शांत होईना कसें तरी झालें । जर तुजला मजला धरिलें तर काय येथें चाले । मरण उद्यांचें आज येईल कीं हानी या स्वरूपाला ॥ अजुन तुला ॥ २ ॥ चारी प्रहर क्रमिली रात्र तुशीं सारी । नानापरिचे विलास तुझिया शेजारीं । तूं पुरुष तुज काय परंतु मजला भय भारी । दे आज्ञा मज आतां मुरारी जातें सदनाला ॥ अजुन तुला ॥ ३ ॥ ऐक राधिके मी रमलों असतां तुजसंगें ॥ कोण तुला छळणार मी करणार निवारण अंगें । ऐशा परिचें भाषण केलें मग त्या श्रीरंगें । शांत सिद्ध म्हणे मतीवर देई धोंडी बापूला ॥ अजुन तुला ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १२८ ॥

चाल—आम्ही न बोलुं अजपुन गडे फिरून तुज गुणवंता ॥

आज नाहीं रतलों कधीं । सखे तुजपाशीं । म्हणवुन प्रीत राहिली तुझी तुजपाशीं ॥ ध्रु० ॥ अंतरींचे भोळे आम्ही सखे तुजसाठीं । घर सोडुनियां लागलों स्नेहाचे पाठीं । परिणामीं त्वां लाविली आम्हां आडकाठी । हें सांग काय म्हणउनिया न ये सदनाशीं ॥ आम्ही ॥ १ ॥ चतुरांनीं चातुरपणें कसें चालावें । कोणाशीं कोण्या रीती कसें बोलावें । स्नेह संपादुनी त्या नरा कसें तोलावें । या मूढसंगतीमुळें न ये कामासी ॥ आम्ही ॥ २ ॥ उंच पाहा वसना पडियेले डाग बिबव्याचे । मग तेथें न चले कधीं धुई ओत्याचे । पाहा सार्थक हे सुंदरी उण्या संगाचे । असाल शुद्ध असतां विके मालासी ॥ आम्ही ॥ ३ ॥ थोड्या दिवसांमध्यें सखे तुझी चतुराई । पाहुनिया शिणलों आम्ही पुरी असलाई । तुजपाशीं गे साजणी प्रतारणा नाहीं । म्हणे धोंडी बापू ही नव्हे भल्याची दासी ॥ आम्ही ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १२९ ॥

चाल—मी पिवळी पाकळी । पिवळा प्राणसख्या चाफ्याची कळी ॥

— सगन.

हिरवी प्राणसख्ये बनलीस अरवा । खोउन वेणीमधीं मरवा ॥ ध्रु० ॥ हिरवा साज करुनिया प्रियकरणी । कटीं कसली पैठणी । हिरवी तंग चोळी त्यालीस गडणी । हिरवा दुपेटा वरुनी हिरवा तीळ गालावर मृगनयनी । शोभतसे मैतरणी । हिरवा सरंजाम केला सर्वा ॥ खोउन ॥ १ ॥ हिरवे जडिताचे अलंकार । हिरवा पाचुचा हार नाकीं नथ शोभे उमदा फार । लालडी हिरवी गार । हिरवीं टीक जडली बहु गुलजार । मोती हालकडीला चार । तनमणी गळ्यांत शोभे बेपरवा ॥ खोउन ॥ २ ॥ हिरवी चौगर्दी

फुले आंबराई। हिरवीच बागशाई। हिरवा महाल मीन्याचा सवाई। त्यांत केले चतुराई। झाडी बिलोरी ठाईं ठाईं। मेणबत्त्या रोषनाई। पडदे मखमलीचे वर छत हिरवा ॥ खोउन ॥ ३ ॥ गाद्यागिरद्या वर हिरवा रंग। हिरवा छपरपलंग। हिरवा महाल सोनेरी हा रंग। त्यामधीं समसेर नंग। होनाजी बाळा म्हणे घडुं दे संग। हाच आहे प्रसंग। धोंडी बापू म्हणे आज बेत ठरवा ॥ खोउन ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १३० ॥

चाल— येउं द्या माझी कांहीं करुणा ॥ — सगन.

राघोकारणें झुरे मैना। अरे चलनष्टा बैमाना ॥ ध्रु० ॥ क्रियानष्टाची संगत। धरुनिया काय होईल हित। आधीं मसी लावलीस प्रीत। पुढें त्वां केलीस आवरीत। आतां मन झालें दुश्चित। बुडालें संशयनदींत ॥ चाल ॥ नष्ट पुरुषाची जात। कळुन मज आली सह जात। नव्हे नारी आम्ही कमजात। जहाली यापाईं माझी दैना ॥ अरे ॥ १ ॥ कोणे येके दिवशीं चाऱ्यासाठीं। गेलों आम्ही समुद्राच्या कांठीं। तेथें एक वृक्षाची फाटी। त्यावर पक्ष्याची दाटी। पाहा पाहा रांड उफराटी। आली लागून आमच्या पाठीं ॥ चाल ॥ फासेपारधी जपला होता। त्यांनीं मज धरिलें अवचिता। मग मी जाहलों बोलतां। सोडविली गुण गहेना ॥ अरे ॥ २ ॥ यांनीं उपकार सांगितला। म्यां केला तो व्यर्थ गेला। एक्या कळवंतिणीनें याला। करुन ठेवला लोला। तेव्हां मीं जाउन राजाला। गाउन खुषी केलें त्याला ॥ चाल ॥ तेव्हां त्या कळवंतिणीपुन। याला मी घेतलें सोडउन। आतां मशीं झाला बैमान। एके दिवशीं जवळ राहिना ॥ अरे ॥ ३ ॥ राघु म्हणे मैनेकारण। माझें उदासलें मन। तुमचें आणि आमचें बोलणें। नाहीं घडणार आजपुन। तुमचे ओळखुन ठेविले गुण। असावे दूर मजपासून ॥ चाल ॥ तेव्हां ती मैना घाबरली। राघूच्या चरणां लागली। म्हणे जी

झाली ती बरी झाली। धोंडी बापू चतुर शहाणा। एक झाली राघूमैना ॥ अरे ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १३१ ॥

चाल—कां हो रुसलां आतां या रंगमहालीं ॥ —सगन.

साजण कोणी आणा समजाउनिया। त्यावीण मजला न गमे करूं कांहीं ॥ ध्रु० ॥ अनुकूळ सर्वही या संसारीं। तळमळतें मी बाई सुख या शरीरीं। कां रुसला गे माझा तो घरबारी। न कळेंच कांहीं सयबाई ॥ त्यावीण ॥ १ ॥ कोण सवतीनें स्वामी मोहुनी नेला गे। मज न कळे गे असा फितवा केला। पाहूं मी आतां कोठें प्रियकर गेला। धुंडीत जाऊं कोण्या ठाईं ॥ त्यावीण ॥ २ ॥ घरोघरीं ज्या त्या नारी असती आनंदें। पती रती अनुकूळ त्याला विषयविनोदें। किती दुःख सांगूं आतां पतीच्या छंदें। ओस दिशा ह्या मज दाही ॥ त्यावीण ॥ ३ ॥ कवी धोंडी बापू बोले अति प्रियकरणी। नको शोकें गोऊं आतां तूं नवी तरणी। त्वरित पती कुळ भेटवा गे मैतरणी। अनुकूळ त्याच्या लागते पाईं ॥ त्यावीण ॥ ४ ॥

मुशाफराची

## ॥ लावणी ॥ १३२ ॥

सुंदरा म्हणे दिलभरा राज आंबीरा हासून मसीं बोला जी। घेतला शिरीं परदेश कुठून तुम्ही आलां जी ॥ ध्रु० ॥ तुम्ही दिसतां उमेदवार थोर सरदार फार सकुमार शिपाई बाणा जी। नांव गांव सांगा कां हो ओळख द्याना जी। शिरीं पगडी कंगणीदार आंगावर ज्वाहार कुठील राहणार कोण परगणा जी। तुमचा वारू बहु रंगी चतुर शहाणाजी। वर खड्या पट्याचा जीन कलगी संगीन हातामधें आणीन राजस बाणा जी। तुमचें रूप जसे हुरमुजी दाणा जी ॥ चाल ॥ डोईस बांधिला चिरा झळकतो हिरा तुऱ्याशेजारीं। शिरपेच कंठीं चौकडा पदक तळवटीं गळा-

माझारीं । माणिकमोत्यांचे हार आंगावर ज्वाहार झळके भारी । मुद्रिके पवित्रें करीं सख्याचे शिरीं शोभे अब्दागिरी ॥ चाल ॥ पाहुनिया चांगुलपणा अहो बाई जी जी । मला सूर्य दिसतो उणा अहो बाई जी जी । शालजोडी गोप्यापणा अहो बाई जी जी । दंडींत या मनमोहना अहो बाई जी जी । हातीं रुमाल बारीक जुना अहो बाई जी जी ॥ चाल ॥ तिरकमान हातांत भाला जी जी । घेतला शिरीं परदेश कुठून तुम्ही आलां जी ॥ सुंदरा म्हणे ॥ १ ॥ सुंदरा उमज अंतरीं बारवे तिरीं सांगसील गोष्टी ग । तूं नटबाजी दिसतीस मोठी ग । पाउलें जपुनिया टाक आबरू राख जरा नाहीं धाक तुझीया पाठीं ग । या परनारी संगत महा खोटी ग । तूं दिसतीस लई थोराची नव्या बहाराची सावकाराची गोरी गोमटी ग । नाजूक रूपडें पिक दिसतें तुझ्या कंठीं ग । करूनी सोळा शृंगार गळ्यामध्यें हार पाईं पोल्हार दाही बोटीं ग । हातांत झळकती जडावाची अंगठी ग ॥ चाल ॥ डोईस मूद राखडी हाले हलकडी दिसे फाकडी जसी मोहना राणी । गळ्यामध्यें मोहनमाळ आणिक जपमाळ करीं झळाळ तेज सुढाळ चंद्रावाणी । मनगट्या गोठ पाटल्या हातीं दाटल्या गुंफुनी गाठल्या कुंडलें कानीं । बाजुबंद दंडावर लहान उंबर बारिक कंबर दिसे सिंहावाणी ॥ चाल ॥ त्यालीस पातळ भरजरी अगे नारी जी जी । जरतारी चोळी अंजीरी अगे नारी जी जी । वर कंठा नवपदरी अगे नारी जी जी । दोन्ही जोबन चढले उरीं अगे नारी जी जी । तूं रायाची आस्तुरी अगे नारी जी जी । जशी रंभा इंद्रपुरीं अगे नारी जी जी ॥ चाल ॥ परनार विषाचा प्याला जी जी । या कर्मानें कैकांचा नाश जाहला जी ॥ सुंदरा म्हणे ॥ २ ॥ अहो मुशाफरा चातुरा मनीं खरखरा नको धरूं कांहीं । खरबान प्राण मी करीन तुमच्या पाईं । एकलीच घरची राणी आला सांडुनी काय म्हणुनी बरी गत नाहीं । मंदिरांत आठवीत असाल दिशा दाही । तुम्ही राजबीज दिसतां कुठें राहतां मला भासतां थोर शिपाई । काय दुःख जालें

सख्या तुझ्या हृदईं ॥ चाल ॥ काय वखत पडला शिरीं आला बाहेरी एकले तरी कां वनांत फिरतां । सोडुनिया आपला देश घेतला भेष पालटून वेष असें कां करितां । कोणी तुम्हां घातले भरी मुलखावरी कीं गिरिकंदरीं कां जाऊन बसतां । कोण्या गोष्टीचा राग सख्या मज सांग धरूनी वैताग मनामधें झुरतां ॥ चाल ॥ तुम्ही चला हो माझे घरीं अहो राव जी जी । राहा वरल्या माडीवरी अहो राव जी जी । बसूं आपण पलंगावरी अहो राव जी जी । करूं मौजा नानापरी अहो राव जी जी । मी आहें इमानी खरी अहो राव जी जी ॥ चाल ॥ तुम्ही उठा चला रंगमहालीं जी जी । चार दिवस राहून पाहत आलां मला जी ॥ सुंदरा म्हणे ॥३॥ तूं नार फार सकुमार चतुर अनिवार आहेस गडी शहाणी ग । गडे ऐक सांगतों आम्ही आपली कहाणी ग । आम्ही भगवंताचे लाल सदा खुशियाल घरीं धन माल भरल्या खाणी ग । जातीचे गौड ब्राह्मण हिंदुस्थानी ग । आमुचे आमच्या देशांत हक्मकहमात चहूं मुलखांत आहेत गडे वाणी ग । बादशाई देणगी दिली भगवंतांनीं ग । सनया त्रिकाळ चौघडे वाजती पुढें वेळ संधानी ग । नौबती घड्याळ ऐकतों कानीं ग ॥ चाल ॥ दैवानुसार साजणी आलों या वनीं तुला कामिनी काय सांगावें । घरीं भार्या सुलक्षण देशलक्षण आलों टाकून गडे ऐकुनि घ्यावें । मुलखांतिल राजे येती खंडण्या देती वस्त्रें घेती वंदिती भावें । मोठा भरतो दरबार थोर कारभार आम्ही सांगणार नाहीं नांवें ॥ चाल ॥ पसरून सुंदरा पदर म्हणे तेव्हां जी जी । शक्तीनुसार घ्या आदर लोभ ठेवा जी जी । ठेवितें तुम्हांपुढें मिठाई मेवा जी जी । ठेविन स्नेहाचा आदर करीन सेवा जी जी ॥ चाल ॥ कवी धोंडी बापू म्हणे पाहा नारीनें मुशाफर नेला जी जी । म्हणे मोरू नारीचा भाग्य उदय जाला जी । सुंदरा म्हणे दिलभरा राजआंबीरा हासून मशीं बोला जी । घेतला शिरीं परदेश कुठून तुम्ही आला जी ॥ सुंदरा म्हणे ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १३३ ॥

चाल—पंचानन वाघनीचे पती पाहूं तमाशा॥ —सगन.

पती पाहूं हवा रागरंग या दुनयाचे। तुम्ही लाल मज मिनयाचे ॥ ध्रु० ॥ हा प्रथम ओनामा मशीं घटबाजी। गोड बोला मशीं चटकरा शाग्रीत मलखांबी मशीं झटवाजी। कुस्तींत पटणी पटवा जी। स्नेही कोरी भुस आतां कोरी चांदी आठवा जी। घ्या हिशोब व्याज कटवा जी। अहो इष्कबाजा समजावे गुणी याचे ॥ तुम्ही ॥ १ ॥ हा प्राणदान खुरबान तुम्हां मी जाजी। चित्तापासुनी मी राजी। नव्हे गर्जी मर्जी ही ऐका अर्जी माझी। इष्काचा प्याला प्याजी। गुण स्मरली तरी काय करील येथें काजी। मशीं खेळा आज रंगबाजी। स्नेह पैलपार उतरावें जपून याचे ॥ तुम्ही ॥ २ ॥ घ्या मेदनी कोंदणीं बरोबर हिरा बसवा। द्वैतभाव मनीं नसावा। पेरा शेत हेत बेत हाच मनीं ठसावा। प्रेमाचा मोहा वसावा। घ्या इमान कमान धरुनी तीर कसावा। निरंतर लोभ असावा। पोंचलें चोचलें टोंचलें मथुन याचें ॥ तुम्ही ॥३॥ करा एकंदर वजन हिशोब घडीचा। नाहीं भरंवसा पळ घडीचा। जाईल टाकून प्राणनाथ हो कुडीचा। आज सुदिन पाडवा गुढीचा। स्नेह घडला पावला तिशीं कान्होबा मर्दीचा। वर्षला प्रजन्य झाडीचा। म्हणे दामू विठू वर्णावे गुण याचे ॥ तुम्ही ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १३४ ॥

चाल—कीने घुंगरू बजाया छननन छननन ॥ —सगन.

कीने मुरलि बज्याई। गरररागिरकी आईरी ॥ध्रु०॥ मुजे जल भरनेकु ज्याना। ये हाकनाहाक सताता कान्हा। मैनें खुब बताया बहाना। देख रे सास मेरी बहिरी ॥ कीने ॥ १ ॥ क्या किया मुजे तेरा। ज्यान दे छोड पल्लो मेरा। तुजकु कम बख्तीने घेरा। मेरा दूला हयगा ज्येहेरी

॥ कोने ॥ २ ॥ आश्रापकी मैं होऊंगी । देखरे कबोना चुप रहूंगी । सची तेरे माकु जाके कहूंगी । ढोंगी मैं ग्वालन नहीरी ॥ कोने ॥ ३ ॥ बतलाते लीला बानया । उनके ऐसे फैल सुनैया । मार्तंड कहते येही कन्हैया । करे दामु विठू शाहिरी ॥ कोने ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १३५ ॥

चाल—दहा शिंदळक्या करीन परंतु एक लग्नाचा नको नवरा ।
माहेरीं माझें चित्तमन रमलें सासरचा नलगे वारा ॥ —परशराम.

फंदी अनंत कवनाचा सागर, अजिंक्य ज्याचा हातखंडा । चमत्कार चहुंकडे चालतो, सृष्टीवर ज्याचा झेंडा ॥ ध्रु० ॥ मूळ संगमनेर ठिकाण त्याचा कीर्ति उदय जैसा अर्की । नवीन तऱ्हा नारळी डोईला पदर पागोट्याची फिरकी । वाचावंत संपत्तीसारखी बहुतांचें तनमन हरकी । लांगेलुंगे कवि भेदरले, अवघ्यांवर त्याची गुर्की । समोर गातां कोणी टिकेना, मनामधीं बसली कर्की । धन ज्याचा हातचा मळ, केवळ तोच रुपयांचा हांडा । फंदी अनंत कवनाचा सागर, अजिंक्य ज्याचा हातखंडा । चमत्कार चहुंकडे चालतो, सृष्टीवर ज्याचा झेंडा ॥ १ ॥ फंदी आनंदी छंदी वरदी, ब्राह्मण त्यावर गुरुकृपा । सरस्वती जिव्हाग्रीं अक्षयी, भंग नसे ज्याचा हरपा । कवन बहुत उदरामधीं भरलें, फणस जसा मोठा कापा । भाळीं त्रिपुंड्रीं टिळा केशरी, कस्तुरीचा वरतीं छापा । मोठमोठ्या राज्यांमधीं महशूर, जगजाहीर चारी तर्फा । आकट बिकट कवनांच्या चाली, नित्य नव्या अक्षयीं थापा । विद्याअभिमान नाहीं जयाला, असा कवी कंचा धुंडा ॥ फंदी अनंतकवनाचा सागर । अजिंक्य ज्याचा हातखंडा । चमत्कार चहुंकडे चालतो, सृष्टीवर ज्याचा झेंडा ॥ २ ॥ नांवाचें चांदणें जगाचें, मुख्य मुख्य खासे खासे । कीर्तनरंगीं झडा घालिती मानवला सर्वत्रासी असे । पुढें मागें ऐसा नसे दुसरा मृत्युलोकींचा रहिवासी ।

पहा रत्न पंधरावें माता, धन्य जन्मली हो त्याशीं । असा पुरुष चिरकाळ असावा, गुणनिर्गुण पंडितराशी । होनाजी बाळ म्हणे जगावा, बहुत काळ आयुष्य याशीं । अविट ज्याची करणी ऐकतां, देहप्राण होतो थंडा । गुरव त्याचे संगें सोबती, कुशल कला जाणें उदंडा । फंदी अनंत कवनाचा सागर, अजिंक्य ज्याचा हातखंडा । चमत्कार चहुंकडे चालतो सृष्टीवर ज्याचा झेंडा ॥ ३ ॥

## ॥ लावणी ॥ १३६ ॥

चाल—नको मारुं मुरका उभी राहुनी बोल आम्हांसी ॥ —सगन.

पाऊस वर पडतो आहे रात्र सख्या अंधारी। भिजतें तुजसाठीं केव्हांची द्वारीं ॥ ध्रु० ॥ कोठून तुसी केला स्नेहसंग सख्या पहिल्यानें । होसी नित्य वेडा न्याहाळून मला पहिल्यानें । किती पुसूं डोळे धावुं धावुं तुझ्या शेल्यानें । सांडकर माझी दोन दिवस स्वस्थ निजल्यानें । मी सासुरवासी आब जाईल उघड हंसल्यानें । होईल जनीं चर्चा येकांतीं आपण बसल्यानें । भिंतीआड माझ्या नांदतो हाकीम शेजारीं । तशामधीं झाली अनुकूळ घरांतील सारीं ॥ पाऊस ॥ १ ॥ प्राणप्रियकरणी तुझें स्वरूप आणुनी ध्यानांत । दोन्ही हात धरुनी घालितों विडा वदनांत । जवळ जणुं बसली शृंगार सदनांत । गळां मिठी मारून मोहिलें सखे वचनांत। अशी पडे दृष्टी गोजिरी मूर्त सदनांत । जागेपणीं पाहतां येकटीच मी मंदिरांत । रत्न मज ऐसें कसें दुरावलें संसारीं । अशी काय केली ईश्वरा तुझे घरीं चोरी ॥ पाऊस ॥२॥ नका होऊं कष्टी मला प्राणसख्या प्रियपात्रा । वचनीं कोठें ढळतां जीभ शेंड्यापुन कात्रा । फकीरीण होईन मी करीन यात्रा । जिता आणि मेल्या द्या माती कोमळ पात्रा । परया पुरुषा आधीं संगत सोमल मात्रा । करून येकली दया बाहेर सारी रात्रा । माझी मी राजी जाहलें तुला निरधारा । मनापुन भोगावी तसी नेऊन मंदिरीं ॥ पाऊस ॥

॥ ३ ॥ आम्ही तर दर्दी इष्काचे भुकेले प्राणी । शेवट कर सखे तूं आहेस गुणाची खाणी । मनीं नको आणूं संशय भयाची :कहाणी । शिर जरी गेलें तरी देतों सोड घे पाणी । तुसी स्नेह कैसा मोहराची लाधली गोणी । ईश्वरी दिधली रूपवती आम्हांसी राणी । गंगू हैबती गाणार पुणेंशहरीं । महादेव गाती म्हणे ऐक प्रभाकर तूं नारी ॥ पाऊस ॥ ४ ॥

## ॥ लावणी महादेवाची ॥ १३७ ॥

चाल—महाराज गौरिनंदना, अमरवंदना, दैत्यकंदना हे मंगलमूर्ती ।
ठेवी कृपादृष्टि एकदंत दिनावर पुरती ॥ —रामजोशी.

श्रीविश्वनाथ पशुपती, अखिल सुरपती भवानीपती भवनाशकमूर्ती । हें लिंगरूप मृत्युंजय अगाध कीर्ती ॥ ध्रु० ॥ साजिरा जटासंभार जान्हवी नार चंद्र साकार मस्तकीं धरिला । तृतीयांबकीं अति सुंदर शोभतसे आनळा । आननीं तेज अपार कुंडलाकार अहीचे हार सकटी गरळा । नागाचा हार गळा धरी नरकपाळा । विराजित हस्तीं आयुधें गजानन सुधेही प्रावर्णाला । शार्दूल चर्म शोभतसे वसनाला । कैलासाचळ जो धांवली त्यावरी । सिंहासनीं मूर्ती विमळा, गोजरी । आठवा निशिदिनीं भोळा, अंतरीं । मूर्ती ही सगुणसाकार भेदविकाररहित जो आकार साधुजन भजती ॥ १ ॥ अंकिते बाळ षण्मुख आणिला गजमुख जगातें सुख देती वरदी । वामांकीं स्थित हिमतनया आनंदी । येउनी छत्र चामरें बहुत परिकरें वसती आदरें वीरभद्रादी । सन्मुख तिष्ठती प्रमथादिगणनंदी । गंधर्व करिती गायनकृत सुस्वर मधुरस्वर छंदी । झलरितास्वर वाद्ययुक्त वीणादी ॥ चाल ॥ कमळोद्भव आणि रमावर । नेउनी दिक्पाळसहित अमरेंद्र, वंदुनी । मुनिजनश्रेष्ठ महेंद्र, पूजनीं ॥ चाल ॥ तिष्टती पूजा अर्पित मुनि हर्षती शिवे अर्चिती, हरहर हे वदती ॥ २ ॥ हे सांबकृत्तिवासा जगत्रयेधीशा सुनिर्मळ यशाकृषानुरेता । हे विश्वनाथ ओंकारेश्वर अवधूता ।

त्र्यंबका भीमाशंकरा हे घृष्णेश्वरा मल्लिकेश्वरा भीमभयहर्ता । हे दक्षयज्ञ-हरणा, हे त्रिशूळधरता । नागनाथ सोमेश्वरा बद्रिकेश्वरा रामेश्वरा दीनभर्ता । देवाधिदेव वृषभध्वज त्रईगुणकर्ता ॥ चाल ॥ हे क्रूरसदनारे त्रिपुरारे पाहि मां । अहिकुंडल सुंदरहारे, पाँहि मां । कृतवासस्मंशांनविहारे, पाहि मां । सर्व-दारिद्रसजना त्रिदशवदना, पापनाशना छेदी भवभीति ॥ ३ ॥ ऐसी हे करुनी स्तुती शीव अर्चिती अहिरनिसीं मतीच हे शिवभजनीं । व्रत सोमवार शिवरात्र हर्ष शिवभजनीं । प्रत्यहीं करिती पार्थिवा त्यासी वैभवा देउनी । भवा दूर करी स्मरणी । ते धन्य शिवभक्त जन्मले प्राणी । उद्धरती कोटी कुळस्वय त्याचीं अन्वयें दिलाचें भय दूर करोनी । लाविती मार्ग शिवदीक्षा उपदेशोनी ॥ चाल ॥ अनुपम्यमूर्ती हे ऐसी, चांगली । न कळेची पार वेदासी, मौनली । करी कांहीं कृपा कां ऐशी, माउली ॥ चाल ॥ ईश्वरीं ध्यास लागुनी, सगुणवर्णनीं मति जनार्दनीं. व्हावी हेच विनंती ॥ ४ ॥

## ॥ लावणी ॥ १३८ ॥

या इष्काचे पायीं बुडाले कैक लक्षापती । खंडीमध्यें तूं एक पारवती ॥ ध्रु० ॥ स्त्रीचरित्र समुद्र त्यांतून कोण पार पडियेला । विरळा क्वचित त्यांत राहिला । चहूं युगांमध्यें कितीएक बुडाले ऐका यांचा दाखला । तपश्चर्येचा मेरु भंगला । विश्वामित्रें तप सोडुनिया उर्वसीमागें लागला । मार्तंड पीतवर्ण झाला । मोहनीरूप पाहून शंकरलिंग पतन पावला । ब्रह्मा अपूज्य जगीं ठरविला ॥ चाल ॥ अमरेंद्र इंद्रभुवन । सोडुनिया फिरतो वन । गौतुमी शाप दारुण । सीता सीता म्हणऊन प्राणा मुकले लंकापती ॥ खंडीमध्यें ॥ १ ॥ परपुरुषाचे पायीं स्त्रियांनीं सोडून आपला वर[1] । केली अपकीर्ति पृथ्वीवर । महिरावणाची स्त्री कवटाळी राम पाहिला वर । मारवी

---

१ विवाहित पति.

आपला प्राणेश्वर। पाहा शचीशीं पार्थ[1] रतला शाप दिला दुस्तर। नपुंसक होय एक संवत्सर ॥ चाल ॥ पर पुरुष स्वप्नीं पाहून। चित्रेशीं उखा प्रार्थून। आणियेला द्वारकेहून। तारा बृहस्पतीची लुब्धली कलंक चंद्राप्रती ॥ खंडीमध्यें ॥२॥ अहो प्राणपती स्त्रीसंगतीनें कैक गेले मरून। नाहीं उदयासी आले ते फिरून। रंभेनें शृंगा आणिलें धरून। नारदाची नारदी झाली स्त्री मागितल्यावरून। कीचक मेला द्रौपदी करून ॥ चाल ॥ पहा पाराशर ऋषी। दिवसाची केली निशी[2]। भोगुनिया झाला खुषी। पांचाळी[3] करितां रणीं पडिला दुर्योधन दुर्मती ॥ खंडीमध्यें ॥३॥ स्त्रीपासून जे दूर राहिले कीर्ति त्यांची वानिती। पराक्रम तीन लोक जाणती। स्त्रीव्रत लक्ष्मणानें वधिला इंद्रजीत दुर्मती। बंदीचे सोडविले सुरपती। ब्रह्मचर्यव्रत चालविलें भीष्मवीर भारतीं। धरविलें शस्त्र श्रीहरीचे हातीं। एकपत्नी रघुनंद नंदन। म्हणून दशशिर मर्दन। शुकमाहात्म्य त्या कारण। पराक्रमाचा सागर धन्य स्त्रीविरहित मारुती ॥ खंडीमध्यें ॥४॥ कोण पदार्थ स्त्रियांच्या चाली अपवित्र दुष्टिनी। पती असतां व्याभिचारिणी। तारेनें सुग्रीवापासून वाली मारिला रणीं। कचावर वेडी देवयामिनी। शुक्रें दैत्यालागीं दिधला मंत्र संजीवनी। स्त्रियांची जात कुळघातनी ॥ चाल ॥ कवी होनाजी बाळा म्हणे। या इष्कातें जुकवणें। हीं पूर्वींचीं प्राक्तनें। पांडु म्हणे हरिभक्त वांचले भोळे भावरथीं ॥ खंडीमध्यें ॥ ५ ॥

## ॥ लावणी ॥ १३९ ॥

चाल—नटून थटून चालसी रोख खुप नको मारूं नैनाचे ॥

—सगन.

लटपट लटपट तुझें चालणें मोठें नखऱ्याचें। बोलणें मंजुळ मैनाचें ॥ ध्रु० ॥ वय वरुषें पंधराची दिसे चंद्राची प्रभा ढवळी। आकृति लहान

१ अर्जुन. २ रात्र. ३ द्रौपदी.

दिसे कवळी । दिसे नार सकुमार मुदराखडी वेणींत आवळी । नरम गोजिरे गाल होट पवळी । रूपस्वरूपाचा झोक दिव्य नारी लोट चवळी । जशी चमके नागीन गौवळी । तारुणपण आंगांत नोक मदनाचे जोराचे ॥ बोलणें मंजुळ ॥ १ ॥ डुलत डुलत चालणें बोलणें बहु मंजुळवाणी । नाहीं कोणी दुसरी इजवाणी । इष्की यार सरदार कैक सोडून केविलवाणी । हिंडताती वेड्यावाणी । न पडे नख दृष्टींत कुठें सृष्टींत इच्या वाणी । फंदी झुरती मोरावाणी । लखलखाट चकचकाट जैसें दुकान बोहोऱ्याचें ॥ बोलणें मंजुळ ॥ २ ॥ रूप सुर्तीचा डौल तेज अनमोल सगुण गहिना । जैसी का पिंजऱ्यांतील मैना । इच्यासाठीं कैकाची जन लोकांत जाली दैना । अशी ही चंचळ मृगनयना । मर्जी तुटेना भीड लोटेना जहाला एक महिना । कधीं ग सांपडसील निजभुवना । निर्मळ कोमळ कांती जैसी तुटती ताऱ्याचे ॥ बोलणें मंजुळ ॥ ३ ॥ असे ऐकुनिया बोध नारीनें शोध मनीं करुनी । हस्तकीं सखयाला धरुनी । जाईजुईची सेज फुलांची पलंगी सावरुनी । भोगिला सखा कल्प हरुनी । होनाजी बाळा गुणा आगळा कवीची जडणी । तयाचे जा चरण स्मरोनी । धोंडी सटवा म्हणे बापुजी बाजी हारीप वैऱ्याचे ॥ बोलणें मंजुळ ॥ ४ ॥

## ॥ पोवाडा ॥ १४० ॥

वीरक्षेत्रीं प्रभुछत्र शिरावर स्तविती हस्त जोडुनी । घेउनी मुशाफर वेष देश कुठें जातां असे सोडुनी ॥ ध्रु० ॥ धर्मराज गायकवाडीं असे नाहीं दुसरें स्थळ । छपन देशिचे गुणीजन येती या जागीं अपबळ । तुम्ही जातां टाकुनी नाहीं मज पोटीं पुत्रफळ । घालुनी मनाला गळ येथें कंठूं मी कोणाच्या बळं ॥ चाल ॥ प्रभु खुष तुम्हां क्षत्रीं हो साजणा । नेमणुक सनदी पत्री हो साजणा । दिली करुन मशाल छत्री हो साजणा ॥ चाल ॥ तुम्ही मानकऱ्या संगतीचे जी । मुजरे ताजीम रंग तिचे जी । नित्य चालु

ताट पंगतीचें जी । प्रभु धणी खंडेराव गांव बक्षीस दिला तोडुनी ॥ घेउनी मुशाफर ॥ १ ॥ म्हणणें वडलांचे जिवीं धरा स्मरा त्याला त्यागूं नका। गोड करुन खा नरम करुन निजा कुरीति वागूं नका। सोडून जुना सावकार न करशी कर्ज मागूं नका। टाकुनी अर्धी भाकर सगळी पाठी लागूं नका ॥ चाल ॥ ज्यांनीं दाविलें अन्नाचें घर हो साजणा । उलटतां हो त्याचेवर साजणा। नाहीं ईश्वर करणार बरें साजणा ॥ चाल ॥ नाहीं जाणार माडी कळसाला । गेला कोकणांत प्रवासाला। तेथें तीन पानें पळसाला । तीर्थी गेल्यावांचुन होत बोडुनी ॥ घेउनी मुशाफर ॥२॥ नृपोत्तम परिपूर्ण जाणतसे राज्याचें लक्षण । गुणी अवगुणी दिन दुनिया करी सर्वांचें रक्षण । दिल्ली अटकेचे येथें व्यापारी सोडुनिया दक्षण । द्रव्य नसे बा अधीन । यथास्थित मिळे अन्न भक्षण ॥ चाल ॥ रावसाहेब ज्ञाते अती हो साजणा । भाऊसाहेब सेनापती हो साजणा। मती अनकूळ सरस्वती हो साजणा ॥ चाल ॥ हरिबा दादा सुनेकजी । तिन राज्य सारखे टेकजी । ताऱ्यांत धणी चंद्रमा एकजी ।तुम्ही आशावस्तीचे टाकाल हस्तिचे दंत मोडुनी ॥ घेउनी मुशाफर ॥ ३ ॥ अग स्त्रिये तुझें मन पाहिलें प्रभु युधिष्ठिर जसे । असें स्थळ सोडून आम्ही परमुलखीं जाऊं कसें । काय कमी आम्हां केलें धन्यांनीं दिलें, बक्षीस हवें तसें । विलायतेंत अठरा आणे अबरू आमच्या प्रभूची असे ॥ चाल ॥ मोरचल सुवर्ण गण साजणी। मूर्तिमंत जीवंत कर्ण ग साजणी। कुठें जाऊं सोडून असे चरण ग साजणी ॥ चाल ॥ पूर्वीचें तप सायाचें तें नाहीं तुमचे झालों सेवक या रायाचे। दामू नागू म्हणे रुणानुबंध। अन्नजळी वेोढुनी। धुणीपाणी संजोग म्हणुनी आम्ही आलों पुणें सोडुनी ॥ घेउनी मुशाफर ॥ ४ ॥

## ॥ पोवाडा ॥ १४१ ॥

चाल—वसंतीं बघुन मेनकेला। गाधिज मुनिनें० — किर्लोस्कर.

त्रेतायुगीं शूर पाही। परशुराम विख्यात, कलींत माधवराव सवाई ॥ध्रु०॥

एकवीस वेळां धरत्री । फरशधरें आति पराक्रमें कुंभिनी केली निःक्षत्री। माघ शुभनक्षत्रीं । पुरंदरीं जन्मतां दक्षिणेमध्यें राज्य एकछत्री । नाना प्रधान मंत्री । श्रीमंत गर्भीं असतां राज्य रक्षिलें आराधुन यंत्री ॥ चाल ॥ कीर्ती दिगंतरीं मिरवे । जे महा महा दळ दक्षण उरवे । करून पुंडाई वर्तती गर्वें । अजिंक शत्रु जिंकून सर्वे । त्यांच्या मुखें वदाविलें ब्वें । श्रीमंतां सन्मुख युद्ध न करवे । स्वकरें बुद्धी शस्त्र न धरवे ॥ चाल ॥ नाना ज्ञानगभस्ती अस्ता । करी स्वराज्य न्यून न दिसतां । मुलखामध्यें चौथाई शिरस्ता । शहर पुण्याशीं येती रस्ता । जयजय धर्मराज इंद्रप्रस्था । तैसे श्रीमंत तक्तीं बैसतां । संनिध नाना दीपिच्या बस्ता । मोंगलांवर कंबरबस्ता। युद्धीं गवस्तां काय अवस्था । तें कथन बुध श्रवणीं वरसतां । वाटे प्रजेशीं सौख्य समस्तां । ऐकुनि हे व्यवस्था सारी ॥ चाल ॥ अहा रे अवघे भूप तयारी । पर्वतीस जाते जंत्र स्वारी । गजपृष्ठीं आदर्श अंबारी । चोपदार ललकारी भारी । हारोहारी रयत व्यापारी । सावकारी मुजरे होतां मग मान तया साहेब दरबारीं ॥ चाल ॥ नानाची चतुराई धन्य तयाचें करणें दुसरी उपमा नाहीं ॥ त्रेतायुगीं ॥ १ ॥

अमृत वेळ सुमुहूर्ती । गारपिरावर डेरे दिधले शत्रूशीं बांधुन शर्ती । रणीं पण केल्या अर्थी । नानाचें शौर्य तेज जें अर्जुन जैद्रथ वधार्थी । दळ तीन लक्षांची भरती । व्हावयास नानांनीं धाडिलीं पत्रें देशावरतीं ॥ चाल ॥ कोण कोण सरदार ते न कळे । प्रळयकाल शत्रूशीं तमले । वैकुंठीं यशाचे इमले । बांधुन मग सुरवंशीं जन्मले । तें श्रवण करा कथनीं न कळे । जरीपटक्याचे सवें नेमिले । बाबा फडके हुजरातींतले । मानकरी शत्रूशीं तमले । शिरीं समले लाउन निकरानें ॥ चाल ॥ धायगुडे पाटणकर माने । जाधव यादव रणाभिमानें । घोरपडे केवढे मर्दाने । निंबाळकर पांढरे स्फुराणे । ढमढेरे बरे सत्रानें । उभे आपआपल्या बाजूनें । हुजरातींतले नामाभिधानें । किंचित कथली यथामतीनें । मध्यम पतकीं

हिंदुस्थानें । विंचुरकर पवार धिरानें । उभे सडे फौजेंत भरानें ॥ चाल ॥ राजे बहादर रंगराव होळकर स्वतां आदी उमवार । तयाचें जाहीर पृथ्वीवर नांव । प्रतापी शिंदे दौलतराव । सैन्यसमुदाव समंधी ॥ चाल ॥ जिवबादादा ते रणफंदी । काबीज हिंदुस्थान सिबंदी । करून आले दक्षिण संधी । मिरजवाले भोंसले सुबुद्धी । आपा बळवंत निशाधी । ते परशुरामपंत प्रातिनिधी । बजाबा बापू ते स्थीरबुद्धी । फिरंगाणी हापसाणी सिद्धी । फराशीस आरबस्तानी सिंधी । चंदीचंदावर बुंदी । कोट्याचे नृपाळ असंख्य सर्वे शूरांची मांदी । धनी माधवराव त्यामधीं । प्रवर्तले मग मोंगल युद्धीं । राज्य अविंधी । बुडवुन होतां किंचित अवधी । परागंदा शत्रूंशीं करूं म्हणती । द्वादश कोस तळाची गणती । महा महा मागिल युद्धांतीं । सैन्य न कळे तें पैं वस्ती । वडील वृद्ध आश्चर्य सांगती । धन्यधन्य नानाच्या युक्ती ॥ चाल ॥ असो शत्रूच्या पराजयालागीं वेळ होती । मजलेंमजलीं चढाई करून चाललें सैन्य पुढें नेमून सन्मुख लढाई ॥ त्रेतायुगीं ॥ २ ॥

युद्धप्रसंगकाळीं । मोंगल दळरण युक्तीशीं[1] सादर श्रीमंत सैन्य मुऱ्हाळी । होतां रणखंदाळी । यंत्राचे भडिमार न दिसे धूम्रें सूर्य निराळीं[2] । मोकलितां शरजाळी । भयाभीत गज शूर शत्रुसैन्य माळोमाळीं ॥ चाल ॥ येकच रणवाद्याची घाई । वीरश्रीची धुमराई अचळप्राय मत्तकुंजर शाई । चक्राकार उभे शूर शिपाई । दळ आशिलता धरून करा पाईं ॥ चाल ॥ ठाईं ठाईं रथ शोभिवंत मग दाही दिशा चवताळती वारु । असी वादा असीवार तों ठाईं । थाट पुढें शत्रूचा देखोन हाट करुनिया साठ तुरंगा जाणउन मग गांठ घालिती । प्राणाशीं दुजायींच्या दाऊन ऊर्ध्व वाट माघारे फिरती । दाट पराक्रम तुमचा साहेब अफाट कीर्ती । वडलावडली भार असे जंव पडती । चढती कळा धन्याची जाणून वीर असे

१ मुक्तीशीं. २ आकाशांत.

भिडती । तेथें चढती मारून अडती कैनरमुंडे पडती । झडती घे यासीं येकयेकाशीं उलटे । किंवा काळच परसैन्यावर उलटे । पापभार शत्रु निवटले फुटलें परदळ लुटलें । अवघे विटलें । मोंगल मल्ल युद्धासी उठले । मागें इतक्यांत यशस्वी । श्रीमंत वीर प्रगटले । बळे लगटले । खटलेखोर तो मश्गुलमुलूख त्यास विगटले । घाबरलें दळ त्यांचें पळाया पुढें वीर सरले । गांगरले परिवारासहित हरिले । अवघे पराक्रम भुवनत्रयीं भरले । जें शत्रूचें मीपण हरलें । कारागृहीं ठेवावें ठरलें । सर्व सैन्य यशवंतराव साहेबांचें फिरलें ॥ चाल ॥ विरलें जिकडे तिकडे सारें । बिनहत्यारें येती शरण तृषेचे भारें । पाणी पाजुन प्राण वांचवा । म्हणती हे परभारें वार्ता । ऐकुन कानीं श्रीमंतांनीं । आज्ञा दिधली नाहीं, मनाई । कोणाशीं पाणी द्या सर्वांशीं । इकडे आज्ञा वकिलाशीं चवथाई आणखी महाल मुलुख पूर्वीचा होता तो मागून घ्या त्याशीं । श्रीमंत आज्ञेनें नबाबाशीं मग वकिल भेटले । चवथाई मुलुखाचें निवेदन श्रुत केलें । मग वकिल आदरें गौरविले । त्या करें त्वरें मग तें कबुलायतपत्र दिधलें । वाचितांच हर्षकृत मनीं झाले । जय संपादुन शहर पुण्याशीं येऊन आदरले ॥ चाल ॥ करून नगांची राई । जयवाद्यें वाजवीत परतली श्रीमंताची शाई ॥ त्रेतायुगीं ॥ ३ ॥

शृंगारुन गजातें । आदर्श अंबारींत । करिती शूर मुजरे पिटुन भुजातें । पुणें मार्गीं लागले हें ऐकुन श्रवणीं सौख्य प्रजातें । आनंदरूप द्विजातें । ठेवूनियां श्रीराम आले भेटायाला भरतानुजातें । स्नेहसद्गदित नंदीग्रामीं । तैसे श्रीमंत थेऊर मुक्कामीं । स्वामी देखुन स्वसेवका सुख अंतरयामीं । व्योमींहून सुर पुष्पवृष्टि करितातीं सकळिका । सरंजामी ते सरदार तैनामी

---

१ भिडले. २ तृषेच्या व्यथेनें. ३ पर्वताची राई केली म्हणजे पर्वतासारखा जो मोठा मोंगल त्यास जिंकून राईसारखें लघुत्व आणिलें. ४ स्वर्गांहून.

स्वामी संनिध शोभताती अती सव्यवामी[1]। कामीं पडले रणसंग्रामीं। मुहूर्त शुभ पाहून स्वधर्मीं। यावयास जमावले। ताकीद शहरांतील रस्ते झाडा ऐकतां दूत धावले। निर्मळ रस्ते करुन दुतर्फा दीप लावले। नगर-लोक पहावया धांवले। पाहुन मन विश्रांती पावले। ते समयीं कोणाचे कसें जिवीं भासलें। पूर्वतपश्चर्येचें फळ आज उद्भवलें। कीं श्रीमंत रूप या दृष्टीमाजीं सामावलें। सर्वांनीं धन्याशीं पोहोंचविलें। वाड्यांत आनंदें बैसविलें। गादीवर साहेब मग मुजरे करून सकळ शूरांनीं। त्वरेनें निरोपवारे घेतले। स्वनगरासी जाया इच्छिलें। येथून मोंगल युद्ध संपलें। श्रेष्ठ भाग्य रायाचें केवढें। शके सोळाशें शहाण्णवांतील जन्म। धन्य तेधींपासून[2] या दिवसोंदिवशीं। राज्याचीं चिन्हें दाखविली लीला। अद्भुत हे कीर्ती गाजती। सर करुनिया सर्व ही सृष्टी। शके सतराशें सत्तर राक्षसनाम संवत्सरीं। शुक्लपक्ष अश्विनी पौर्णिमा ते दिवशीं। सायंकाळीं मग संपविला अवतार आपला। श्रीशांत (?) सिद्ध कृपावरें। होनाजी बाळा करी कवन रसिक जें जनांसीं प्रिय या। श्रीमंत राज्यामधीं प्रजेला सुखापार, ऋषी महान महान कल्याण वांछिती गादीचा अधिकार ज्याला लक्ष श्रीमंतापायीं। लावुनी रामा अंदु[3] निशिदिनीं रसिक कवनरस गाई ॥ त्रेतायुगीं ॥ ४ ॥

## महादजी शिंदे यांजवर

## ॥ पोवाडा ॥ १४२ ॥

द्वापारीं[4] श्रीमाधवविलास भामवतीं प्रत्यय पहावा। तसे कलीमध्यें रंग खेळले श्रीमंत पाटीलबावा[5] ॥ ध्रुवपद ॥

---

१ उजव्या डाव्या बाजूस. २ तेव्हांपासून. ३ अंदु हें उपनांव असावें. ४ द्वापारयुगांत. ५ महादजी शिंदे.

पुण्यासारखें दुजें शहर या दक्षिणेंत कोठें नाहीं । धर्मराज श्रीमंत धन्याची त्रैलोक्यामध्यें अवाई । धन्य रणवीर पाटीलबावा पराक्रमी जाणती शाई । नवखंडामध्यें कीर्ति गाजती धनी रावसाहेब सवाई । यशवंत अति श्रेष्ठ तपोबळी साजती ब्रह्म बादछाई । दिल्लीपतीनें माहिमरातें दिल्ली नालकी लवलाही ॥ चाल ॥ स्वामी प्रताप अद्भुत वर्णूं कुठवरी । सारें हिंदुस्थान पाटीलबावाचे करीं । घेविलें असून स्वस्थानीं परात्परी मी वर्णूं कुठवरी हा प्रादुर्भाव स्नेहाचा ऐकावा ॥ द्वापारीं ॥ १ ॥

शके सतराशें पंधरा चैत्र नाम प्रमादी संवत्सरीं । अत्यादरें हा रंग खेळले उभयपक्षीं हर्ष अंतरीं । बंब भरून रंगाचे ठेविले ठाईं ठाईं शहराभीतरीं । गुलालाचे हौदे भरूनिया खुप कसले हस्तीवरी । तक्त राव्यावर पात्रा नाचती परोपरी । रंग भरून पिचकाऱ्या घेतल्या सर्वांनीं आपले करीं । ॥ चाल ॥ एक एकावरी चालले रंग टाकीत । नानांनीं बंब रंगाचे ठेविले जेथें त्या ठाईं येतां श्रीमंत स्वारी अवचित । सर्व भिजविले तेथें हा कुठवर घोष कीर्तीचा वर्णावा ॥ द्वापारीं ॥ २ ॥

सर्व मुत्सद्दी मानकरी यांच्या हौद्याचे जमावानिशीं । हस्ती सेवकांसुद्धां सकळही लाल रंग रसीं । रविवार पेठेमध्यें पाहा तात्यांचे दरवाज्याशीं । दोन बंब रंगाचे भरून ठेविले होते अति सायाशीं । नीट बुधवार पेठेंतून श्रीमंत स्वारी गेली त्या ठायाशीं । खूप गर्दी रंगाची केली तात्यांनीं अति उल्हासी । ते दिवशीं सफेत असा कोण नाहीं राहिला । रंगाविरहित नाहीं दृष्टीनें पाहिला । लौकिक रंग हा पृथ्वीवर पसरला । पुत्रपौत्रांशीं सांगायाशीं जाहला । हा रंग सुवदावा ॥ द्वापारीं ॥ ३ ॥

---

१ राजमंडळ. २ सवाई माधवराव. ३ ब्राह्मणांची. ४ "माहीमोर्तबे" पा०. ५ "घेववली स्वस्थानें परस्परी" पा०. ६ फडक्यांचे वाड्याशीं ७ हरिपंततात्यांना.

नानापरी गोकुळीं क्रीडले श्रीमाधवजी कुंजवनीं । तें साक्षात् दृष्टी पाहिलें पुणें नगर पुण्यस्थानीं । नाना परींचे हरिचे विलास शास्त्रीं ऐकिल्या श्रवणीं । पुणें ग्राम गोकुळ क्रीडले त्यांत कृष्ण श्रीमंत धनी । अधिक देह आमचे आम्हांला भासतसे आपले ध्यानीं । स्वामीपद अवलोकुन दैवी उल्हासी होते नित्यानीं ॥ चाल ॥ होनाजी बाळा पदरचा आहे किंकर । विज्ञप्ती श्रुत करितों जोडून कर । अक्षई असावी कृपा सेवकावर । धनी बक्षीस देणार । रामा अंदु वांछी स्वामीसेवा ॥ द्वापारीं ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें, स्थलप्रत.
अनुक्रम ३५६९० दि: ४/८४
क्रमांक १६०० नों: दि: ९/१२/८५

REFBK-0013473

REFBK-0013473

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
93863